म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0014435

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3८६२२ वि: चरित्र
क्रमांक १२२२ दि: २०।६।६५
मराठी ग्रंथ संग्रहालय
१४४३५

मनोहर ग्रंथमाला
प्रकाशन – १३२ वें

# उभविलीं जयांनीं स्वप्नमंदिरें

भाग २

★ लेखक – डोनाल्ड कुलरॉस पीटी ★

अनुवादक – मनोहर महादेव केळकर

REFBK-0014435

२६ जानेवारी १९६५

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला,
टिळक रोड, पुणें २.

* Lives of Distiny
by Donald Culross Peattie
या पुस्तकाचा अनुवाद.

* Copyright 1954
by Donald Culross Peattie

मुद्रक :
बा. रा. वर्तक
प्रशान्त प्रिंटिंग प्रेस,
४६१/१ सदाशिव पेठ, पुणें २.

किंमत
चार
रुपये

चि. अनिल, सुनील, अतुल
या त्रयीस—

# प्रास्ताविक

Lives of Destiny या चरित्रमालेंत एकूण चोवीस चरित्रें आहेत. त्यांपैकीं बारा चरित्रांचा अनुवाद **उभविलीं जयांनीं स्वप्नमंदिरें** या नांवानें १९६२ सालीं प्रसिद्ध केला. त्याच पुस्तकाचा हा दुसरा भाग होय. या भागांत उरलेलीं बारा चरित्रें आहेत. यांतील पहिलीं चार वाङ्म-शोभेंत येऊन गेलीं असून बाकीचीं प्रथमच या पुस्तकांत येत आहेत.

पहिल्या भागाच्या प्रास्ताविकांत म्हटलेलेंच पुन: थोडक्यांत सांगतो. तें असें कीं, या चरित्रांचे नायक समाजांतल्या विविध थरांतले असून (वेगवेगळ्या काळांतलेहि) त्यांच्यांत साम्य कुठलेंहि नाहीं; एक अपवाद वगळून. पण तो अपवादच फार महत्त्वाचा आहे. या सर्वांनीं महान् स्वप्नें रंगविलीं. एवढेंच नव्हे तर तीं साकार करण्यासाठीं त्यांनीं आपलें आयुष्य समर्पित केलें.

पहिल्या भागाविषयीं एक अभिप्राय लेखक म्हणतात, " वाचतांना एखादी अद्भुत रोमांचकारी कादंबरीच वाचत आहोंत असें वाचकाला वाटावें इतकी प्रत्येक जीवनकथा आकर्षक आहे, स्फूर्तिदायक आहे आणि ध्येयदर्शी आहे. लेखक स्वत: या कथांत रंगलेला आहे आणि त्यामुळें त्याची भाषा व लेखनशैली अतिशय परिणामकारक झाली आहे. "

पहिल्या भागाप्रमाणेंच या भागाचेंहि वाचक स्वागत करतील अशी खात्री आहे.

**मनोहर महादेव केळकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८९२२ वि: ...
क्रमांक १२२२३ नों. दि. ...
१४४३४



# हॅन्स ख्रिश्चन अँडरसन

१

## परीकथांचा जादूगार

फार फार वर्षांपूर्वींची एक गोष्ट आहे. डेन्मार्क देशामध्यें ओडेन्सी गांवीं २ एप्रिल १८०५ या दिवशीं एक गरीब मुलगा जन्माला आला. त्याचें कुळ चांभाराचें होतें. लहानपणींच वडील वारल्यामुळें त्याची विधवा आई त्याचा सांभाळ करीत होती. पण आपला वडिलोजित धंदा चालू ठेवून उदरनिर्वाह करण्याऐवजीं आपण कांहीं तरी वेगळें आणि अद्भुत करून दाखवावें अशी कल्पना लहानपणापासूनच त्याच्या डोक्यांत घोळूं लागली. आपल्या राजाला भेटून त्याचेकडून आपलें ईप्सित साध्य झालें तर पहावें असें त्याच्या मनांत आलें. मनांत यण्याचा अवकाश,तो राजाकडे गेला आणि त्यानें त्याच्यापुढें संगीत नाटकांतील पदें गाऊन आणि संभाषणें म्हणून दाखविलीं. राजानें त्याला मोठ्या ममतेनें येण्याचा हेतु विचारला. त्यावर तो मुलगा धीटपणें म्हणाला, 'महाराज, मला संगीत नाटकें लिहून तीं राजवाड्यांतील रंगमंचावर, करून दाखवायची इच्छा आहे.' राजानें एकवार त्याच्याकडे

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

निरखून बघितलें. काटकुळचा हातापायांचा, पाहिल्याबरोबर हंसूं येईल अशा फेंदरट नाकाचा, उदास डोळ्यांचा आणि एकंदरींत बावळट ध्यान असलेला तो मुलगा समोर पाहून राजानें त्याला व्यावहारिक सल्ला दिला, ' बाळ, नाटकं म्हणून दाखवणं निराळं आणि तीं लिहिणं निराळं. तुझ्या भल्यासाठींच आमचा तुला असा सल्ला आहे कीं, सुतार-कामासारखा एखादा उपयुक्त धंदा तूं शिकावास हें चांगलं !

पण राजाचा हा उपदेश त्या मुलाला मानवला नाहीं. त्याजजवळ व्यवहारज्ञान नसेल कदाचित्,पण अत्यंत दुर्मिळ अशी प्रतिभेची देणगी त्याला मिळालेली होती. तो घरीं गेला. त्यानें गाडग्यांत सांठवलेली पुंजी काढून घेतली. गरीब बिचारी आई आणि बेपर्वा सावत्र बाप अशा दोघांचा एकदमच निरोप घेतला आणि नशीब काढण्यासाठीं तो घराबाहेर पडला. त्याची अशी श्रद्धा होती कीं, भावी पिढ्या एक ना एक दिवस हॅन्स ख्रिश्चन ॲन्डरसन या नांवाचा जयजयकार खचितच करतील.

अशी श्रद्धा मनांत निर्माण व्हायला माणसाचा अद्भुत परीकथांवरहि विश्वास बसायला हवा. हॅन्सचा असा विश्वास होता. तो मुळी लहानपणापासूनच अशा स्वप्न-रंजनांत रंगून आणि गुंगून गेलेला असायचा. अशा कांहीं कथा त्यानें आपल्या वडिलांकडूनच ऐकल्या होत्या. त्यांचा व्यवसाय जरी चर्मकाराचा होता—आणि त्याबद्दल त्यांना नेहमींच वाईट—वाटायचें. तरी त्यांना एक बौद्धिक देणगी होती. आणि मनाला विरंगुळा म्हणून ते झोंपायच्या आधीं अरेबियन नाइट्समधील सुरस आणि चमत्कारिक कथा मोठ्यांदा वाचीत असत. हॅन्सच्या आईला त्यांतलें फारसें कांहीं समजत नसे, पण तो स्वतः मात्र झोपेचें सोंग घेऊन त्यांतला शब्द न् शब्द अंत.करणांत सांठवून ठेवीत असे. दुपारचे वेळीदेखील चरखा फिरवतां फिरवतां आयाबाया ज्या गोष्टी व दंतकथा सांगत त्या तो लक्षपूर्वक ऐकत असे. त्याकाळीं डेन्मार्क देशामध्यें दर घरागणिक करकोचे आणि अशा

दंतकथा या दोन्हींचा सुकाळ असे. आजचें डेन्मार्कदेखील अशीच एक स्वप्नभूमि आहेसें भासतें. अनेक समुद्रवलयांकित द्वीपांचें हें राज्य असून त्याच्याभोंवतीं असणाऱ्या किल्लयांतून पहारा करणारे शिपाई खेळांतल्या शिपायांइतकेच ताठ उभे असतात. आणि या किल्लयाभोंवतींच्या खंदकांतून हंस पक्षी तरंगत असतात. हॅन्सचें जन्मग्राम ज ओडेन्सी, येथेंहि अशा खूप दंतकथा ऐकूं येत. त्यापैकीं एक दंतकथा मोठी विचित्र पण गमतीदार आहे. कुणी एक परी नृत्याकरतां जोडीदार मिळवायची आणि एकदां त्याच्याबरोबर नाचाला सुरुवात केली कीं दमूनभागून त्याचा प्राण जाईपर्यंत आपलें नृत्य थांबवीत म्हणून नसे.

हॅन्सच्या बालपणची गोष्ट. त्याच्या गांवांतील एका संदर तरुण युवतीनें गडद लाल रंगाच्या रेशमी सपातांचा जोड त्याच्या वडिलां-कडे बनवून मागितला. पण तो तयार झाल्यानंतर जेव्हां त्याची किंमत द्यायची दुष्टपणानं नाकारली तेव्हां त्या गरीब बिचाऱ्या कुटुंबावर कटुतम वफल्याची छाया पसरली. हा लहानसा दुःखकारक प्रसंग आणि वर सांगितलेली नृत्यांगनेची परीकथा यांच्या कौशल्यपूर्ण मिश्रणानें त्यानें लाल सपाता–The Red Shoes ही विख्यात कथा लिहिली. आणि तिच्यावर आधारलेला चित्रपटहि लक्षावधि लोकांनीं पाहिला. प्रतिभेची जादूच अशी असते कीं, कुठलीहि अनुभूति–मग ती कटुतम कां असेना–प्रतिभेच्या साह्यानें सौंदर्यपूर्ण स्वरूपांत जगाला सादर करतां येते. लेखकाच्या अंतःकरणांतली ती एक दुःखद स्मृति असली तरी वाचकाच्या किंवा प्रेक्षकाच्या अंतःकरणाची पकड घेतांना तें दुःख, दुःख राहूनहि सौंदर्यसंपन्न बनतें. अॅन्डरसनच्या परीकथा सर्वश्रेष्ठ तर आहेतच पण त्यांचें वैशिष्टय हें कीं, अॅन्डरसनच्या प्रभावी प्रतिभेनें त्यांमध्यें दनंदिन जीवनांतील कितीतरी सत्यकथा कौशल्यानें गुंफिल्या आहेत.

हॅन्सचें शालेय शिक्षण अगदींच बेतास बात झालेलें होतें. इतकें कीं त्याला धड एक वाक्यदेखील शुद्ध लिहितां येत नव्हतें. पण

✦ ◆ ◆ ✦ ◆ ◆

जीवनांतील दुर्दैवाचे दशावतार त्याला अगदीं लहानपणापासून परिचित झाले होते. आज डेन्मार्कमध्यें जी लोकशाहीप्रधान राजसत्ता आहे आणि जें सुख जनतेला मिळत आहे त्याचा त्यावेळीं गंधहि नव्हता.अत्यंत मोठी विषमता, सर्वत्र पसरलेलें दैन्य आणि निरक्षरता यांचेंच त्यावेळीं राज्य होतें.

अगदीं लहानपणींच हॅन्सच्या आईवर रस्त्यांतून भीक मागत हिंडण्याची पाळी आली. पण तिच्यावर लादलेलें हें जीवन तिला आवडत नव्हतें. भीक मागण्याच्याऐवजीं शहराच्या पुलाखालीं आपले अनवाणी पाय जवळ घेऊन ती बसून राही. कारण भिक्षा आणलेली नसल्यानें घरीं जायची तिला भीति वाटे. तिच्या आयुष्यांत तिला पहिला [illegible]यकर भेटला तो तिच्यावर बलात्कार करणारा एक बदमाष आणि तोहि तिची मुलगी जन्माला येण्यापूर्वींच कुठेंतरी गुप्त झाला. हॅन्सनें कधींहि या गोष्टींचा उघडपणें उच्चार केला नाहीं. पण आपल्या बिचाऱ्या मातेबद्दलची करुणा आणि तिला अशा घृणास्पद रीतीनें वागविणाऱ्या जगाबद्दलचा त्याचा राग त्यानें The Little Match Girl आणि She's no good या दोन कथांतून व्यक्त केला आहे.

ॲन्डरसनची लेखणी म्हणजे एक जादूची कांडीच होती. तिच्याद्वारें कथालेखनाच्या काळांत आपल्या लहानपणच्या सर्व दु:खांना-आपल्या वडिलांची ढासळत जाणारी प्रकृतीदेखील–त्यानें वाचा फोडली. एके दिवशीं खिडकीच्या तावदानावर पडणाऱ्या हिमाच्या पाकळ्यांकडे तो कुतूहलानें पहात उभा असता वडिलांनीं त्याला हांक मारून त्या बर्फावर दिसणारी एक स्त्रीची आकृति दाखविली आणि ते म्हणाले, 'ती पाहिलीस का हिमराणी, आतां लवकरच ती मला न्यायला येईल.' हें ऐकतांच तो चरकला आणि आपल्या वडिलांची प्रकृति काळजी करण्यासारखी आहे याची त्याला प्रथमच जाणीव

झाली. आणि त्याच्या दुर्दैवानें या प्रसंगानंतर थोड्याच महिन्यांत त्याचे वडील निवर्तले.

ही झाली थोडी मागची हकीगत. त्यानंतर त्याच्या आईनें पुनर्विवाह केला. पुढें सुरुवातीस सांगितल्याप्रमाणें राजानें त्याला सुतारकाम करण्याचा सल्ला दिला आणि आईनें त्याला शिंपी होण्यास सांगितलें. कारण काय तर लहानपणीं वडिलांनीं त्याच्यासाठीं केलेल्या बाहुल्यांसाठीं तो चांगले कपडे बेतत असे. पण असलें कांहींहि मनाविरुद्ध लादून घ्यावयाचें त्याच्या मनांत नसल्यामुळें वयाच्या चौदाव्या वर्षींच तो घराला रामराम ठोकून नशीब उघडतें का तें पहावयास कोपनहेगन येथें गेला. तेथें जाऊन ऐकिवांत असलेल्या सगळ्या प्रतिष्ठित लोकांना तो भेटला. एका विख्यात नर्तकीकडे जाऊन त्यानें नृत्य शिकायचा प्रयत्न केला. पण त्याला एक विदूषक समजून तिनें बाहेरचा रस्ता दाखविला. आपला फाटकातुटका पोशाख घालून आणि कानापर्यंत खालीं येणारी हॅट घालून तो एका ख्यातनाम नाटककाराकडे गेला आणि लहानपणीं बाहुल्यांच्या नाटकाकरतां त्यानें लिहिलेल्या दुःखांतिकांपैकीं कांहीं संवाद त्यानें धडाधडा म्हणून दाखविले. यावेळीं त्याचेजवळ फक्त सात पेनी शिल्लक होत्या.

पण त्याच्याजवळ आणखीहि एक गोष्ट होती. ती म्हणजे त्याचा उंच सुरेल आवाज. प्रोफेसर सिबोनी नांवाच्या एका संगीत विद्यालयाच्या शिक्षकास आणि त्यांच्या कांहीं मित्रमंडळींना हॅन्सचा आवाज आवडला आणि त्यांनीं आपसांत कांहीं पैसे गोळा करून त्याच्या उदरनिर्वाहाची आणि संगीत-शिक्षणाची सोय केली. या घटनेमुळें तो अगदीं हवेंत तरंगूं लागला. पण त्याचा हा आनंद फारच अल्पकाळ टिकला. नुकतेंच त्यानें आपलें बाल्य ओलांडून पौगंडावस्थेंत प्रवेश केला होता. आणि त्यांतच त्याला कोपनहेगनची भयंकर थंडी बाधली. या दोन्ही कारणांनीं त्याची सुरेल आवाजी कायमची नष्ट झाली आणि त्याच्या वयाच्या इतर तरुणांप्रमाणेंच त्याचा आवाज घोगरा झाला.

✦ ◆ ✦ ◆ ◆ ✦

तरी पण त्याच्या गोडीगुलाबीनें वागण्याच्या स्वभावामुळें आणि कांहींशा विचित्र भासणाऱ्या बुद्धिप्रभावामुळें त्यानें नवे मित्र मिळविले आणि आपल्या उपजीविकेचीहि सोय केली. त्याच्या मित्रांनीं लॅटिन शिकण्याबद्दल त्याचें मन वळविलें तर उलट त्यांनीं आपल्याला नृत्यशाळेंत पाठवावें असें त्यांना विनवून ते त्यानें त्यांचेकडून मान्य करून घेतलें.पण दोन्हीहि त्याला न जमल्यामळें त्याचा आधार आणि मित्रहि त्यानें गमावले. तरी पण त्यानें आणखी नवे मित्र मिळविले. त्यांत एक राजकन्याहि होती. तिनें त्याला अन्नवस्त्रासाठीं कांहीं पैसेहि दिले. अर्थात् ते पैसे त्यानें काव्याचीं पुस्तकें आणि नाटकांचीं तिकिटें यांवर खर्च केले.

पोटमाळ्यावरच्या आपल्या खोलींतून कितीतरी गोष्टी त्याच्या नजरेस पडत. दूरवर दिसणारे इमारतींचे गोल घुमट, आकाशांत उंच दिसणारे मनोरे, तसेंच त्या पुरातन शहरांतील घरांचीं पाखीं आणि रस्त्याच्या कडेच्या नाल्या ह्याहि त्याच्या नजरेस पडत. तो बाहेर नजर लावून पहात बसला म्हणजे पाकोळ्या आणि चिमण्या त्याला दिसत. रस्त्यावरचे उशीरापर्यंत जळत राहणारे दिवेहि त्याच्या चांगल्या परिचयाचे झाले होते. आणि एखाद्या रुग्ण मुलाच्या खोलींत लावून ठेवलेली मेणबत्तीहि त्याच्या नजरेंतून सुटत नव्हती. त्यानें पुढें लिहिलेल्या The old Street Lamp आणि What the Moon Saw यांसारख्या कथांतून या काळांत त्यानें टिपलेले लहानसहान प्रसंगहि पुन: साकार झाले आहेत. हॅन्स स्वप्नरंजनांत गुंगून जात असे. पण डोळ्यांसमोर घडणाऱ्या महत्त्वाच्या गोष्टींची दखल घेणें त्याला जमत नसे. अंथरुणावर पडल्या पडल्या तो सारा दिवस लिहीत असे. पण आपलीं महाकाव्यें आणि नाटकें हीं इतरांच्या सामान्य नकला आहेत हें त्याला कळत नसे. पण या सगळ्या कचऱ्यांतहि कांहीं सोन्याचे क्षण चमकत होते. आणि त्यांनींच रॉयल थिएटरचा एक डायरेक्टर जोनास कॉलीन याचें लक्ष वेधून घेतलें. कॉलीन खंबीर

होता तसा दयाळूहि होता. आणि त्याच्यामुळेंच पुढें हॅन्सच्या कुठेंहि वहावत जाणाऱ्या जीवननौकेला नांगर मिळाला.

कॉलीननें कांहीं पैसे गोळा करून हॅन्सच्या शिक्षणाची व्यवस्था केली. सायमन मेसलिंग नांवाच्या एका गृहस्थानें चालवलेल्या एका शाळेंत तो नव्या उमेदीनें दाखल झाला. त्याच्या राहण्याची सोयहि मेसलिंगकडेच करण्यांत आली. पण येथेंहि दुर्दैव आड आलें. मेसलिंग स्वतः एक अयशस्वी कवि होता. पहातां पहातां लोकप्रिय झालेल्या हॅन्सवर तो जळफळूं लागला.

चिडलेल्या मेसलिंगनें हॅन्सला दहा वर्षें वयाच्या मुलांच्या वर्गांत घातलें. त्या तिसरींतल्या मुलांच्या लहानखुऱ्या बांकावर त्याला धड बसतांहि येईना. आधींच गोंधळलेल्या हॅन्सच्या डोक्यावर त्यानें बीज-गणित, भूमिति आणि ग्रीक व हिब्रू व्याकरण यासारखें ओझें लादलें. हॅन्स या विषयांत जेमतेम पास होऊं शकला. हेंहि त्याच्या बुद्धिमतेचेंच द्योतक मानलें पाहिजे. पण मेसलिंग मात्र 'तूं नापास होणार' असें सांगून त्याचा सतत पाणउतारा करीत असे.त्याला तो धड अन्न किंवा थंडींत शेकोटीची ऊब देखील घेऊं देत नसे.असें असूनहि या क्षुद्र बुद्धीच्या म्हाताऱ्यानें त्याला फुकटाफुकटीं भरपूर राबवून मात्र घेतलें. मेस-लिंगच्या एरवीं दुर्लक्षित असलेल्या लहान मुलांना संभाळण्याचें काम त्यानें हॅन्सला दिलें. तीं मुलेंदेखील हॅन्सच्या मांडीवर बसलीं म्हणजे गप्प रहात. कारण तो त्यांना छान छान गोष्टी सांगायचा. हॅन्सच्या अजरामर कहाण्यांनीं पहिला आकार याच ठिकाणीं घेतला.

यानंतर मात्र लहान मुलें हींच अँडरसनचीं सर्वस्व बनलीं. स्नेही, आणि मार्गदर्शकदेखील. मेसलिंगनें हॅन्सला दिलेल्या दुष्ट वागणुकीची हकीगत उजेडांत आली तेव्हां कॉलीननें त्याला शिक्षणासाठीं कोपेन-हेगन येथेंच आणलें. येथें असतांनासुद्धां तो सदोदित मुलांमध्येंच रमा-यचा, त्यांच्याबरोबर असतांनाच प्रसन्न असायचा. सहा सच्छील कुटुंबांत त्याचे जेवणाचे वार ठरविले गेले होते. या प्रत्येक घरीं तो

✦ ◆ ◆ ◆ ◆ ◆

आला कीं मुलें त्याच्या अंगावर चढत. त्याच्याशीं लाडीगोडी लावत आणि त्याच्याकडून गोष्टी सांगवून घेत. तोसुद्धां त्यांना करकोच्यांच्या पराक्रमाच्या, खेळांतल्या सैनिकांनीं गाजविलेल्या शौर्याच्या, हिम-मानवाच्या, नाताळांतल्या देणग्यांनीं लहडलेल्या कल्पवृक्षाच्या अशा अनेक कथा सांगे. त्याच्या कथेंतला एक वाळूचा माणूस चांगल्या मुलांना तीं झोंपलीं असतांना रोमहर्षक स्वप्नसृष्टींत घेऊन जाई व वाईट मुलांना स्वप्नेंच पडत नसत, आणि त्यामुळे मोठेपणीं तीं मूर्ख व बावळट रहात. हॅन्सची निवेदनशैली इतकी जिवंत होती कीं त्याच्या कथेंतले सैनिक एक-दोन, एक-दोन अशा तालावर प्रत्यक्ष कूच करीत आहेत आणि घोडे दौडत आहेत असें मुलांना वाटे. कथा-निवेदनाच्या जोडीला अतिशय सुंदर चित्रें कागदांतून कापायची कला त्याला अवगत होती. एक कात्री त्याच्या खिशांत सदोदित असेच. त्यानें कापलेलीं अशीं चित्रें ओडन्सी गांवांत ज्या घरांत त्याचा जन्म झाला त्याच ठिकाणीं 'ॲन्डरसन वस्तुसंग्रहालयां'त आजहि जतन करून ठेवलेलीं आहेत.

पण भोंवतालचीं माणसें अत्यंत रुक्ष आणि स्वप्नसृष्टींत कधींहि रममाण होऊं न शकणारीं अशीं असलीं तर त्यांच्यांत राहून दारिद्र्यांत पिचत असतांहि तारुण्याची उमेद आणि मनाची संवेदनाक्षमता टिकविणें सोपें नाहीं. ज्या सच्छील कॉलीनचें सौहार्द त्याला लाभलें होते त्याच्या मुलांनातवंडांनींसुद्धां त्याला आपल्या कुटुंबांतलाच एक असें मानलें. पण प्रतिभाशाली माणसांचे आप्तस्वकीय नेहमींच अशा माणसाला व्यावहारिक शहाणपणानें वागण्याचा सल्ला देत असतात. कॉलीन कुटुंबांतील माणसांनींदेखील हॅन्सनें हें खुळचट स्वप्नरंजन सोडून एखादी लहानशी सरकारी नोकरी मिळविण्याचा प्रयत्न करावा असा त्याला वारंवार आग्रह केला. हे सर्व वादसंवाद हॅन्सनें पुढें आपल्या कथांतील पशुपक्ष्यांच्या तोंडून वदविले आहेत. एक कोंबडी बदकाच्या कुरूप पिल्लाला सांगते आहे, " हें बघ, मी तुझ्या

◆ ◆ ◆

ऱ्याकरतांच सांगते कीं तूं आपला माझ्यासारखीं अंडीं घालायला शीक, नाहींतर अग्नीसारखा तेजःपुंज हो, नाहींतर मांजरासारखा मँव मँव करायला शीक." त्यावर मांजर म्हणतं, 'हो खरंच आहे नाहीं तरी. तुला जर मँव मँव करतां आलं नाहीं तर मग तुला दुसरं काय करतां येईल ? ' या कथेमध्यें डॅनिश भाषेंतील परखड उपरोधाचा आश्रय करून हॅन्सनें आपलीच हकीकत सांगितली आहे.

पण आपलें खरें बुद्धिसामर्थ्य कशांत आहे याची जाणीव हॅन्सला फार उशीरा आणि अत्यंत सावकाश झाली. पहिलीं कित्यक वर्षें आपण डॅनिश भाषेंतील नाटकावर शेक्सपियर किंवा कवि बायरन् व्हावें अशा महत्त्वाकांक्षेनें त्यानें महाकाव्यें,कादंबऱ्या, दुःखान्त नाटकें वगैरे वाङ्मय लिहिलें. तें सर्व आज विसरलें गेलें आहे. या उद्योगांत उदरनिर्वाहापुरता पैसा मिळवणें आणि प्रवास करणेंहि त्याला शक्य झालें. पण तरीसुद्धां या पायीं आपल्या खऱ्या कार्यक्षेत्रापासून तो दूर दूर जात होता. त्याला सोसाव्या लागणाऱ्या अनेक पराभवांनीं तो अगदीं खचून गेला. डॅनिश टीकाकारांची जीभ मोठी तिखट आहे. एका सभेच्या प्रसंगीं त्यानीं त्याच्या नवीनच बाहेर पडलेल्या साहित्य-कृतीचे इतके वाभाडे काढले कीं, अखेरीस एका सहा वर्षांच्या मुलीनें त्या पुस्तकांतील a-n-d या शब्दावर बोट ठेवून टीकाकारांना सांगि-तलें कीं, अहो, हा एक शब्द राहिला ना ! यावर तुम्ही अजून कशी झोड उठविली नाहीं ?

पण मोठ्या माणसांनीं जरी त्याची अशी टर उडविली तरी लहान मुलांना मात्र त्याच्याविषयीं विलक्षण आत्मीयता वाटे. प्रेय-सीच्या प्रेमाची प्राप्ति मात्र या बेडौल आणि दरिद्री माणसाच्या नशिबांत नव्हती. त्याचें अन्तःकरण त्यासाठीं तुटत होतें, पण व्यर्थ ! रिबोर्ग नांवाच्या तरुणीनं एका मोसमांत त्याला नादीं लावलं पण विवाह मात्र दुसऱ्याशींच ठरविला. तसेंच सोफी काय, लुईस काय, या सगळ्यांच्या बाबतींत याच गोष्टीची पुनरावृत्ति झाली. जेनी म्हण-

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
३८०२२ दि:

✦ ◆ ◆ ◆ ◆ ✦

जेच मॅडॅम लिंड ही स्वीडनची विख्यात गानकोकिळा असून त्याच्याशीं अत्यंत सौजन्यानें वागे. पण फक्त सौजन्यानेंच.

मुलांच्या जगांत मा त्याची किंमत वाढत होती. त्याचा पहिला कथासंग्रह १८३५ सालीं प्रसिद्ध झाला. पण त्याबाबत त्यानें फारशी अपेक्षा बाळगली नाहीं. एवढेंच नव्हे तर तो कांहींसा बेपर्वाच होता. मुलांना त्याचें पुस्तक आवडलें होतें, पुष्कळांनीं तें वाचलें होतें. शेकोटीशीं शेकतांना किंवा गुलाबाच्या ताटव्यालगत बसून गप्पा मारतांना मुलें त्याच्या गोष्टींविषयीं आपसांत चर्चा करीत. त्याच्या आणखी कथा पुस्तकरूपानें निघाव्यात अशी त्यांची मागणी होती.अशा रीतीनें मुलांच्या प्रेमानें आणि कुतूहलानें त्याचें भटकणारें जीवन योग्य मार्गावर आलें. आणि हाच त्याच्या यशाचा खरा मार्ग असें त्याच्या दैवांत लिहिलेलें होतें. मग मात्र तो मनापासून कथालेखनाच्या मागें लागला आणि त्यांतूनच पुढें गाजलेल्या त्याच्या महान् कथांची निर्मिती झाली. याविषयीं तो म्हणतो, " आतां मी माझ्या अंतःकरणांतच खोलवर बुडी मारतों, प्रौढांनादेखील आवडेल अशी एखादी कल्पना शोधून काढतो आणि कथारूपानें सांगतांना मात्र मुलांना गोष्ट सांगतो आहे अशा थाटांत, पण त्यांच्या आईवडिलांनाहि ती ऐकावीशी वाटली पाहिजे हें लक्षांत ठेवून ती लिहून काढतों." आणि मग प्रतिवर्षी नाताळच्या सुमारास अॅन्डरसनच्या परीकथांचा नवा खंड प्रसिद्ध होऊं लागला. आणि असें सदतीस वर्षें अव्याहत चाललें. या कथांत सत्य होतें, पण तें कल्पनेच्या पंखावर भराऱ्या मारणारें होतें. सौंदर्य होतें, पण त्यांत दुःखाची छटा होती. उपहास होता, पण तो विनोदप्रचुर होता. मुख्य म्हणजे या कथा मुलांच्या दृष्टीनें अपूर्व होत्या. बालवाङ्मयांत अशा कधीं लिहिल्या गेल्याच नव्हत्या.

आणि खरोखरीच मुलांनींच नव्हे तर वडिलांनींसुद्धां त्या कथा मनःपूर्वक ऐकल्या. कारण त्या कथांतून आपल्या जीवनांतील सत्य-

झाली. आणि त्याच्या दुर्दैवानें या प्रसंगानंतर थोड्याच महिन्यांत त्याचे वडील निवर्तले.

ही झाली थोडी मागची हकीगत. त्यानंतर त्याच्या आईनें पुनर्विवाह केला. पुढें सुरुवातीस सांगितल्याप्रमाणें राजानें त्याला सुतारकाम करण्याचा सल्ला दिला आणि आईनें त्याला शिंपी होण्यास सांगितलें. कारण काय तर लहानपणीं वडिलांनीं त्याच्यासाठीं केलेल्या बाहुल्यांसाठीं तो चांगले कपडे बेतत असे. पण असलें कांहींहि मनाविरुद्ध लादून घ्यावयाचें त्याच्या मनांत नसल्यामुळें वयाच्या चौदाव्या वर्षींच तो घराला रामराम ठोकून नशीब उघडतें का तें पहावयास कोपनहेगन येथें गेला. तेथें जाऊन ऐकिवांत असलेल्या सगळ्या प्रतिष्ठित लोकाना तो भेटला. एका विख्यात नर्तकीकडे जाऊन त्यानें नृत्य शिकायचा प्रयत्न केला. पण त्याला एक विदूषक समजून तिनें बाहेरचा रस्ता दाखविला. आपला फाटकातुटका पोशाख घालून आणि कानापर्यंत खालीं येणारी हॅट घालून तो एका ख्यातनाम नाटककाराकडे गेला आणि लहानपणीं बाहुल्यांच्या नाटकाकरतां त्यानें लिहिलेल्या दुःखांतिकांपैकीं कांहीं संवाद त्यानें धडाधडा म्हणून दाखविले. यावेळीं त्याचेजवळ फक्त सात पेनी शिल्लक होत्या.

पण त्याचप्राजवळ आणखीहि एक गोष्ट होती. ती म्हणजे त्याचा उंच सुरेल आवाज. प्रोफेसर सिबोनी नांवाच्या एका संगीत विद्यालयाच्या शिक्षकास आणि त्यांच्या कांहीं मित्रमंडळींना हॅन्सचा आवाज आवडला आणि त्यांनीं आपसांत कांहीं पैसे गोळा करून त्याच्या उदरनिर्वाहाची आणि संगीत–शिक्षणाची सोय केली. या घटनेमुळें तो अगदीं हवेंत तरंगूं लागला. पण त्याचा हा आनंद फारच अल्पकाळ टिकला. नुकतेंच त्यानें आपलें बाल्य ओलांडून पौगंडावस्थेंत प्रवेश केला होता. आणि त्यांतच त्याला कोपनहेगनची भयंकर थंडी बाधली. या दोन्ही कारणांनीं त्याची सुरेल आवाजी कायमची नष्ट झाली आणि त्याच्या वयाच्या इतर तरुणांप्रमाणेंच त्याचा आवाज घोगरा झाला.

✦ ✦ ✦ ✦ ✦ ✦

तरी पण त्याच्या गोडीगुलाबीनें वागण्याच्या स्वभावामुळें आणि कांहींशा विचित्र भासणाऱ्या बुद्धिप्रभावामुळें त्यानें नवे मित्र मिळविले आणि आपल्या उपजीविकेचीहि सोय केली. त्याच्या मित्रांनीं लॅटिन शिकण्याबद्दल त्याचें मन वळविलें तर उलट त्यांनीं आपल्याला नृत्यशाळेंत पाठवावें असें त्यांना विनवून ते त्यानें त्यांचेकडून मान्य करून घेतलें.पण दोन्हीहि त्याला न जमल्यामळें त्याचा आधार आणि मित्रहि त्यानें गमावले. तरी पण त्यानें आणखी नवे मित्र मिळविले. त्यांत एक राजकन्याहि होती. तिनें त्याला अन्नवस्त्रासाठीं कांहीं पैसेहि दिले. अर्थात् ते पैसे त्यानें काव्याचीं पुस्तकें आणि नाटकांचीं तिकिटें यांवर खर्च केले.

पोटमाळ्यावरच्या आपल्या खोलींतून कितीतरी गोष्टी त्याच्या नजरेस पडत. दूरवर दिसणारे इमारतीचे गोल घुमट, आकाशांत उंच दिसणारे मनोरे, तसेंच त्या पुरातन शहरांतील घरांचीं पाखीं आणि रस्त्याच्या कडेच्या नाल्या ह्याहि त्याच्या नजरेस पडत. तो बाहेर नजर लावून पहात बसला म्हणजे पाकोळ्या आणि चिमण्या त्याला दिसत. रस्त्यावरचे उशीरापर्यंत जळत राहणारे दिवेहि त्याच्या चांगल्या परिचयाचे झाले होते. आणि एखाद्या रुग्ण मुलाच्या खोलींत लावून ठेवलेली मेणबत्तीहि त्याच्या नजरेंतून सुटत नव्हती. त्यानें पुढें लिहिलेल्या The old Street Lamp आणि What the Moon Saw यांसारख्या कथांतून या काळांत त्यानें टिपलेले लहानसहान प्रसंगहि पुनः साकार झाले आहेत. हॅन्स स्वप्नरंजनांत गुंगून जात असे. पण डोळ्यांसमोर घडणाऱ्या महत्त्वाच्या गोष्टींची दखल घेणें त्याला जमत नसे. अंथरुणावर पडल्या पडल्या तो सारा दिवस लिहीत असे. पण आपलीं महाकाव्यें आणि नाटकें हीं इतरांच्या सामान्य नकला आहेत हें त्याला कळत नसे. पण या सगळ्या कचऱ्यांतहि कांहीं सोन्याचे क्षण चमकत होते. आणि त्यांनींच रॉयल थिएटरचा एक डायरेक्टर जोनास कॉलीन याचें लक्ष वेधून घेतलें. कॉलीन खंबीर

◆ ◆ ◆

घटनांचेंच काव्यात्म-स्वरूपांत पुनर्दर्शन होतें. त्या प्रभावी रूपककथा आहेत; अत्यंत नाजुक अशा बोधकथा आहेत. येशू ख्रिस्तानेंसुद्धां अशा बोधकथांच्याद्वारें बहुजनसमाजाला हितोपदेश केला. हॅन्सची दिव्यदृष्टि अशी समर्थ होती कीं, एखादी फुटकी बाटली, गटारींतून वाहत जाणारा चेंडू किंवा तत्सम क्षुद्र गोष्ट यांतूनसुद्धां एखाद्या चमत्कदार बोधकथेची निर्मिती तो करीत असे.

१८४४ च्या भयंकर हिमवर्षावांत डेन्मार्कमधील मुलें बर्फावर घसरगुंडी करीत होती आणि बर्फाचे चेंडू करून खेळत होतीं. अशा वेळीं हॅन्सनें The Snow Queen (हिमराणी) ही परीकथा लिहिली. या कथेमध्यें एका जादूच्या आरशाचें वर्णन असून त्या आरशांतून जी जी वस्तु प्रतिबिंबित होते ती ती भग्न आणि कुरूप अशी पहाणाऱ्याला भासते. विकृत दृष्टीनें जगाकडे पहाणाऱ्यांना जग कसें दिसतें हें सांगण्यासाठींच ही गोष्ट लिहिलेली आहे हें उघड आहे. The Emperor's New Clothes-बादशहाचे नवे कपडे-ही गोष्ट मोठी मिष्किल आहे. एक विणकर राजाला सांगतो कीं, महाराज मी आपल्यासाठीं अप्रतिम कापड विणून देतो, पण तें अत्यंत बुद्धिमान् आणि गुणवान् अशा माणसालाच दिसूं शकेल. कालांतरानें राजा आणि त्याचे दरबारी ते कापड पहायला जातात. समोर रिकामा माग पाहूनसुद्धां त्यावर कापड दिसत नाहीं असें म्हणायची कुणाची छाती होत नाहीं. कारण मग तो हुशार व गुणवान् नाहीं असें ठरलें असतें. राजासकट सर्वजण त्या उत्कृष्ट कापडाची अपरंपार स्तुति करतात. इतकेंच नव्हे तर त्या आदर्श कापडाचे कपडे अंगावर घालून प्रजाजनांचे जयजयकारांत राजा गांवांतून मिरवतो. फक्त एक निर्व्याज मनाचें मूल मात्र माडीवरच्या खिडकींतून बाहेर बघून आईला सांगते, "आई ग, आपला राजा बघ नागडाच हिंडतो आहे." जेव्हां जेव्हां जगांत ढोंग-

◆ ◆ ◆ ◆ ◆

बाजी डोकें वर काढील त्या त्या वेळीं ही गोष्ट लोकांचे डोळ्यांत अंजन घालायचें काम करील यांत शंका नाहीं.

'चिमुकली मत्स्यकन्या'ही कथा अॅन्डरसनची कदाचित् सर्वांत सुंदर कथा म्हणावी लागेल. डेन्मार्क देशाची समुद्रपर्यटनाची परंपरा हजार वर्षांची जुनी आहे. तरी पण या चिंतनशील मत्स्यकन्येइतकी लोक-प्रियता त्यांतल्या कुठल्याच व्यक्तीला लाभलेली नाहीं. हॅन्सनें अनु-भवलेल्या दुःखांतून त्याच्या कथांतील कारुण्य जन्मास आलें आणि भोगलेल्या कष्टांतून शहाणपणाची निर्मिती झाली.

आतां तो कीर्तिमान् झाला होता तरी त्याचें अंतःकरण अत्यंत मृदु झालें होतें. त्याचा छळ करणारा त्याचा शिक्षक मेसलिंग त्याला एकदां रस्त्यांत भेटला आणि आपल्या कठोर आणि दुष्ट वागणुकीच्या आठवणीनें ओक्साबोक्शी रडूं लागला. अॅन्डरसननें त्याला क्षमा तर केलीच पण त्याचें सांत्वनहि केलें. तो मध्यम वयाचा असतांना कॉलीनच्या चौदा वर्षें वयाच्या नातीच्या प्रेमांत पडला. तिच्यासाठीं ती जाणती होईपर्यंत तो थांबलाहि असता पण त्याचें प्रेम निरागस आणि समंजस होतें म्हणूनच तिचें जेव्हां एका युवकावर प्रेम बसलें तेव्हां हंसतमुखानें त्यानें तिच्या वैवाहिक जीवनाला शुभाशीर्वाद दिले. अपेक्षा आणि आकांक्षा या दोन्ही गोष्टींना त्याच्या जीवनांत स्थान होतें. पण परीकथा लिहितांना त्याला झालेल्या सत्यज्ञानामुळें त्या दोन्हींचें उदात्तीकरण झालें होतें. आणि म्हणूनच राजानें त्याला बोलावून त्याच्याबद्दलचा सद्भाव व्यक्त केला—याच राजानें पूर्वी त्याला एखादा उपयुक्त व्यवसाय शिकण्याचा सल्ला दिला होता—आणि त्यानें कांहीं मागणें मागून घ्यावें असें सुचविलें, तेव्हां 'मला पुरेसें मिळत आहे' एवढेंच अॅन्डरसन म्हणाला.

त्यानें खरोखरीच कांहीं मिळवलें असेल तर तें म्हणजे साऱ्या जगाकडून प्रेम आणि प्रशंसा. तो दिसण्यांत बेडौल होता हें खरें, पण

✦ ✦ ✦

तो आतां इतका कीर्तिमान् झाला होता कीं त्याचा परिचित चेहरा, उंच हॅट आणि हातांतली काठी पाहिल्याबरोबर त्याचे बालमित्र त्याचेकडे धांव घेत आणि त्याला वेढून टाकीत. त्याच्या कथा इतक्या परभाषांतून रूपांतरित झाल्या कीं, हा मान बायबलखेरीज दुसऱ्या कुठल्याहि ग्रंथाला मिळालेला नाहीं. युरोपच्या अनेक राजदरबारांतून त्याचा सत्कार केला गेला आणि त्याच्यावर मोठमोठ्या सन्मानांचा वर्षाव झाला. अमेरिका हें राष्ट्र त्यावेळीं नवीनच उदयास येत होतें. पण त्याच्या कथा लिहून झाल्या रे झाल्या कीं, त्या अमेरिकेंत प्रसिद्ध होऊं लागल्या. भारतासारख्या दूरच्या देशांतहि त्याला लक्षावधि वाचक मिळाले. डिकन्सपासून व्हिक्टर ह्यूगोपर्यंतच्या जागतिक कीर्तीच्या लेखकांनीं त्याला आपल्यापैकींच एक मानलें आणि या लोकांत गणना होऊं लागल्यानंतर त्याला कळलें कीं, बदकाच्या खुराड्यांत जरी एकाद्याचा जन्म झाला असला तरी हंसीच्या अंड्यांतून जो बाहेर आला त्याला स्वतःबद्दल कमीपणा वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. हें सत्य कळल्यानंतर तो मनानेंहि सुखावला.

ज्या दिवशीं तो आपल्या खुराड्यांत म्हणजे ओडेन्सी गांवांत मोठ्या सन्मानानें परतला तो दिवस त्याच्या आयुष्यांतील परमोच्च सुखाचा दिवस होय. ओडेन्सी सोडून त्याला सुमारें पन्नास वर्षें झालीं होतीं. आणि आतां त्याच गांवांत या परीकथांच्या राजाचा सन्मान करण्यासाठीं सारे लोक जमून महान् उत्सव साजरा करीत होते. डॅनिश राष्ट्राचीं लाल-पांढरीं निशाणें वाऱ्यावर फडफडत होतीं, लोक समुदायानें ठिकठिकाणीं जमून त्याचीं गाणीं गात होते आणि त्याच्या नांवाचा जयजयकार करीत होते. गांवानें एका जंगी मेजवानीचा बेत केला होता आणि ठिकठिकाणाहून धन्यवाद देणारे संदेश येत होते. त्या रात्रीं हातांत पेटलेले पलिते घेऊन लोक त्याच्या घराच्या खिडकी–खालीं जमून त्यांच्या आनंदांत बाहेर येऊन सामील होण्यासाठीं त्याला

◆ ◆ ◆ ◆ ◆

बाजी डोकें वर काढील त्या त्या वेळीं ही गोष्ट लोकांचे डोळ्यांत अंजन घालायचें काम करील यांत शंका नाहीं.

'चिमुकली मत्स्यकन्या'ही कथा अॅन्डरसनची कदाचित् सर्वांत सुंदर कथा म्हणावी लागेल. डेन्मार्क देशाची समुद्रपर्यटनाची परंपरा हजार वर्षांची जुनी आहे. तरी पण या चिंतनशील मत्स्यकन्येइतकी लोक-प्रियता त्यांतल्या कुठल्याच व्यक्तीला लाभलेली नाहीं. हॅन्सनें अनु-भवलेल्या दुःखांतून त्याच्या कथांतील कारुण्य जन्मास आलें आणि भोगलेल्या कष्टांतून शहाणपणाची निर्मिती झाली.

आतां तो कीर्तिमान् झाला होता तरी त्याचें अंतःकरण अत्यंत मृदु झालें होतें. त्याचा छळ करणारा त्याचा शिक्षक मेसलिंग त्याला एकदां रस्त्यांत भेटला आणि आपल्या कठोर आणि दुष्ट वागणुकीच्या आठवणीनें ओक्साबोक्शी रडूं लागला. अॅन्डरसननें त्याला क्षमा तर केलीच पण त्याचें सांत्वनहि केलें. तो मध्यम वयाचा असतांना कॉलीनच्या चौदा वर्षें वयाच्या नातीच्या प्रेमांत पडला. तिच्यासाठीं ती जाणती होईपर्यंत तो थांबलाहि असता पण त्याचें प्रेम निरागस आणि समंजस होतें म्हणूनच तिचें जेव्हां एका युवकावर प्रेम बसलें तेव्हां हंसतमुखानें त्यानें तिच्या वैवाहिक जीवनाला शुभाशीर्वाद दिले. अपेक्षा आणि आकांक्षा या दोन्ही गोष्टींना त्याच्या जीवनांत स्थान होतें. पण परीकथा लिहितांना त्याला झालेल्या सत्यज्ञानामुळें त्या दोन्हींचें उदात्तीकरण झालें होतें. आणि म्हणूनच राजानें त्याला बोलावून त्याच्याबद्दलचा सद्भाव व्यक्त केला—याच राजानें पूर्वी त्याला एखादा उपयुक्त व्यवसाय शिकण्याचा सल्ला दिला होता—आणि त्यानें कांहीं मागणें मागून घ्यावें असें सुचविलें, तेव्हां 'मला पुरेसें मिळत आहे' एवढेंच अॅन्डरसन म्हणाला.

त्यानें खरोखरीच कांहीं मिळवलें असेल तर तें म्हणजे साऱ्या जगाकडून प्रेम आणि प्रशंसा. तो दिसण्यांत बेडौल होता हें खरें, पण

✦ ✦ ✦

तो आतां इतका कीर्तिमान् झाला होता कीं त्याचा परिचित चेहरा, उंच हॅट आणि हातांतली काठी पाहिल्याबरोबर त्याचे बालमित्र त्याचेकडे धांव घेत आणि त्याला वेढून टाकीत. त्याच्या कथा इतक्या परभाषांतून रूपांतरित झाल्या कीं, हा मान बायबलखेरीज दुसऱ्या कुठल्याहि ग्रंथाला मिळालेला नाहीं. युरोपच्या अनेक राजदरबारांतून त्याचा सत्कार केला गेला आणि त्याच्यावर मोठमोठ्या सन्मानांचा वर्षाव झाला. अमेरिका हें राष्ट्र त्यावेळीं नवीनच उदयास येत होतें. पण त्याच्या कथा लिहून झाल्या रे झाल्या कीं, त्या अमेरिकेंत प्रसिद्ध होऊं लागल्या. भारतासारख्या दूरच्या देशांतहि त्याला लक्षावधि वाचक मिळाले. डिकन्सपासून व्हिक्टर ह्यूगोपर्यंतच्या जागतिक कीर्तीच्या लेखकांनीं त्याला आपल्यापैकींच एक मानलें आणि या लोकांत गणना होऊं लागल्यानंतर त्याला कळलें कीं, बदकाच्या खुराड्यांत जरी एकाद्याचा जन्म झाला असला तरी हंसीच्या अंड्यांतून जो बाहेर आला त्याला स्वत:बद्दल कमीपणा वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. हें सत्य कळल्यानंतर तो मनानेंहि सुखावला.

ज्या दिवशीं तो आपल्या खुराड्यांत म्हणजे ओडेन्सी गांवांत मोठ्या सन्मानानें परतला तो दिवस त्याच्या आयुष्यांतील परमोच्च सुखाचा दिवस होय. ओडेन्सी सोडून त्याला सुमारें पन्नास वर्षे झालीं होतीं. आणि आतां त्याच गांवांत या परीकथांच्या राजाचा सन्मान करण्यासाठीं सारे लोक जमून महान् उत्सव साजरा करीत होते. डॅनिश राष्ट्राचीं लाल-पांढरीं निशाणें वाऱ्यावर फडफडत होतीं, लोक समुदायानें ठिकठिकाणीं जमून त्याचीं गाणीं गात होते आणि त्याच्या नांवाचा जयजयकार करीत होते. गांवानें एका जंगी मेजवानीचा बेत केला होता आणि ठिकठिकाणाहून धन्यवाद देणारे संदेश येत होते. त्या रात्रीं हातांत पेटलेले पलिते घेऊन लोक त्याच्या घराच्या खिडकी-खालीं जमून त्यांच्या आनंदांत बाहेर येऊन सामील होण्यासाठीं त्याला

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

विनवीत होते. त्याचें अंतःकरण भरून आलें होतें. त्या विशाल आणि कोमल अंतःकरणांतील आजपर्यंतचा एकाकीपणा नाहींसा झाला होता. यावेळच्या त्याच्या भावना त्याच्याच शब्दांत सांगणें इष्ट. ते शब्द असे होते: ' परमेश्वर आणि मानव यांचा मी ऋणी आहे. माझी भक्ति त्यांना अर्पण असो ! '

० ० ०



# जीन फेबर

२

## कीटकांच्या जीवनांतील काव्य

‘मी तुला अटक करीत आहे !’ असें उद्गार वाळूंत पालथा पडून राहिलेल्या एका माणसाला उद्देशून त्या खड्यांतल्या पोलिसानें काढले. त्या माणसानें मान वर करून पोलिसाकडे बघितलें व मृदु शब्दांत त्याला अटक करण्याचें कारण विचारलें.

‘मी तुला येथें केव्हांचा येथें पडलेला पहातो आहे. मला तुझ्या वर्तणुकीविषयीं दाट संशय आहे.तुला माझ्याबरोबर चलायलाच पाहिजे.’

त्या माणसानें टुण्कन उडी मारली आणि तो उठून उभा राहिला. त्याच्या डोक्यावर भली मोठी काळी टोपी होती. त्याच्या दाट पापण्यामुळें त्याचे काळेभोर तेजस्वी डोळे अर्धवट झांकल्यासारखें दिसत. एखादा अनुभवी शिक्षक पोरकट बुद्धीच्या विद्यार्थ्यांना शांतपणें एखादी गोष्ट ज्या आवाजांत समजावून सांगतो त्या आवाजांत त्या माणसानें पोलिसाला ‘आपण कीडमुंग्यांचा अभ्यास करीत होतों’ ही गोष्ट समजावून सांगितली.

✦ ✦ ✦ ✦ ✦ ✦

'किडयांचा अभ्यास ! ' तो पोलीस त्याच्यावर खेंकसून म्हणाला, 'तुला काय वाटलं कीं मी वाटेल त्या भाकडकथेवर विश्वास ठेवीन होय ? या तळपल्या उन्हांत वाळूंत पालथा पडून तूं काय किडे पहात बसला होतास ? '

त्या माणसानें पोलिसाच्या बुद्धिमत्तेपुढें आपण शरण आहोंत हें दाखविण्यासाठीं फक्त खांदे उडविले. तेवढयांत त्याच्या त्या फाटक्या तुटक्या कोटाच्यावर अडकवलेली लालभडक रंगाची एक फीत दिसली. ती फीत म्हणजे 'लीजन ऑफ ऑनर' चें मानचिन्ह होतें. फ्रान्स-मध्यें १८०२ सालीं नेपोलियननें हा सन्मान रूढ केला. महान् सैनिकी किंवा अन्य राष्ट्रोपयोगी कामगिरीबद्दल मोजक्या व्यक्तींना हा मान दिला जातो. ती फीत पाहिल्याबरोबर तो पोलीस तेथून पसार झाला. कारण ती फीत ओळखण्याइतकी अक्कल त्यालाहि होती. तो वृद्ध मनुष्य पुन्हा खालीं पडून आपलें काम करूं लागला. त्याला तेथें पहांटे-पासून पडून असलेला शेतांत कामावर जाणाऱ्या बायांनीं बघितला होता. आणि संध्याकाळीं त्या परत आल्या तरी तो तसाच पडलेला बघून त्या म्हणाल्या, 'कुणीतरी वेडपट दिसतो आहे झालं !'

जीन हेन्री कॅसिमीर फेबर हें त्या वेडपट दिसणाऱ्या माणसाचें संपूर्ण नांव, आणि त्याला अशा तऱ्हेनें हेटाळणी करून घेण्याची संव-यच होती. आपली भावविवशता झांकून टाकण्यासाठीं तो बाह्यतः उदासीनतेचा मुखवटा धारण करीत असे येवढेंच. लहानपणीं सुद्धां त्याच्याविषयीं नेहमीं गैरसमज निर्माण होत असत. त्याचा जन्म फ्रान्समध्यें १८२३ या वर्षीं झाला. त्याची आई निरक्षर होती आंणि तिच्या या थोरल्या मुलाचें शेतामळयांतून भटकणें म्हणजे तिला बेजबाबदार आळशीपणा वाटे. आणि धातूंचे तुकडे, पक्ष्यांचीं घरटीं किंवा किडे गोळा करणें तिला शुद्ध मूर्खपणाचें वाटे. त्याचा शेतकरी बाप आपल्या आयुष्यांतील अपयशामुळें पराभूत मनोवृत्तीचा झाला होता. फेबर कुटुंबाचें जीवन घाणेरडया खेडवळ वस्तींत

✦ ✦ ✦

वस्तींत गेलें होतें आणि कर्ज व मानसिक विवंचना यांनीं तें कुटुंब सदैव पिडलेलें होतें.

त्याच्या वयाच्या अवघ्या चौथ्या-पांचव्या वर्षी, तेवढेंच एक माणूस पोसायला कमी, या भावनेनें त्याला त्याच्या आजोबांकडे पाठविण्यांत आलें. तें कुटंबहि खेडवळ व अडाणीच होतें. त्यांनीं त्याला घरांत ठेवून घेण्यापलीकडे त्याच्याकडे कसलेंहि लक्ष दिलें नाहीं. डरांव डरांव करणारे बेडूक आणि कर्कश आवाज करणारे रातकिडे यांनीं प्रथम त्याचें चित्त वेधून घेतलें. हवेंत भिरभिरणाऱ्या सोनेरी मधमाशा पहाणें त्याला आवडूं लागलें. उड्या मारणारे टोळ तो चपळाईनें पकडूं लागला. तिथल्या पांच-सहा वर्षांच्या मुक्कामांत त्यानें आपल्या पुढील आयुष्याचा पाया घातला असें म्हणावयास हरकत नाहीं. यापुढच्या ऐंशीं वर्षांच्या जीवनक्रमांत त्यानें विज्ञान आणि वाङ्मय, राजे आणि राज्यसरकारें यांच्याकडून जितके कांहीं मानसन्मान मिळवण्यासारखे होते तेवढे सगळे मिळवले.

वयाच्या दहाव्या वर्षी त्याला तुरुंग वाटेल अशा शाळेंत अडकवण्यांत आलें. त्या शाळेंतल्या मठ्ठ मलांना वाचतां यायला पांच वर्षें लागत. पण हेन्री हा आपल्यांतला नाहीं हें त्यांना पांच मिनिटांत समजलें आणि त्या वेगळेपणाचें प्रायश्चित्त त्यांनीं त्याला बडवून आणि हुर्रेवडी करून दिलें. त्याच्या वडिलांची जेव्हां शेतीवर गुजराण होईना तेव्हां तेहि देशोधडीला लागले. एका शहरांतल्या भिकार वस्तींतून दुसऱ्या शहरच्या भिकार वस्तींत जावें आणि उपजीविकेसाठीं छोटेसें उपहारगृह चालवावें हा त्यांचा जीवनक्रम झाला होता. त्यामुळें हेन्रीच्या जीवनास घाण आणि भांडणें यांनीं बुजबुजलेल्या नरकाचें स्वरूप आलें होतें. वयाच्या सतराव्या वर्षी परिस्थितीमुळें कां होईना पण शिक्षणास रामराम ठोकावा लागल्यामुळें त्याला दक्षिण फ्रान्समध्यें मुक्त मनानें खूप भटकतां आलें. आणि त्यामुळेंच कित्येकदां उपास काढावे लागूनहि तो स्वतःला सुखी समजत होता. उप-

✦ ✦ ✦ ✦ ✦ ✦

जीविकेसाठीं तो एखाद्या भटक्या मजुराप्रमाणें कधीं शेतांत तर कधीं स्टेशनवर राबत होता. एकदां त्यानें एक कवितासंग्रह विकत घेतला तेव्हां जवळचे पैसे संपले व जेवण विकत घ्यावयास जवळ कांहीं उरलें नाहीं, तेव्हां सारा रस्ता त्यानें त्यांतल्या कविता म्हणत पाया-खालीं घातला.

त्याच्या या व्यासंगाचा फायदा त्याला झाल्यावांचून राहिला नाहीं. फ्रान्समध्येंच हॅव्हिनॉन या गांवीं एका अध्यापनशाळेंतील शिष्यवृत्ती-साठीं चढाओढीची परीक्षा होती. त्या परीक्षेस बसून तो पहिला आला. त्या ठिकाणीं शिक्षण घेत असतां त्याचे शिक्षक मात्र त्याला आळशी समजत, त्याला कल्पना नव्हती कीं निर्बुद्ध घोकंपट्टीचा देखावा करून तो आपल्या आपण एका लॅटीन भाषांतरावरून ग्रीक व लॅटीन या दोन्ही भाषा शिकत होता. वयाच्या एकोणीसाव्या वर्षीं पदवी परीक्षा पास होऊन तो प्रत्यक्ष अध्यापन करूं लागला. त्याचे विद्यार्थी सर्व वयांचे होते. कांहीं वयानें लहान असून हुशार होते तर कांहीं त्याच्याच वयाचे आणि मंदबुद्धि होते. मात्र सगळेचजण घाणे-रडे, असभ्य, शिक्षण आणि शिक्षक या दोघांचाहि द्वेष करणारे होते. आणि त्याचीं साधनें म्हणाल तर फक्त फळा, खडू आणि त्याची जिव्हा. तरीसुद्धां तेवढ्या जोरावर त्यानें आपल्या विद्यार्थ्यांना पाठ्य-विषयांत अगदीं तल्लीन केलें. तो स्वतः रसायनशास्त्र आणि पदार्थ-विज्ञानशास्त्र हे विषय शिकला नव्हता तरी केवळ वाचनाचे जोरावर यांचा अभ्यास करून त्या विषयांचीं मूलतत्त्वें नेहमींच्या कंटाळवाण्या अभ्यासक्रमांतच घुसडून आपल्या विद्यार्थ्यांना त्यानें शिकविलीं. आपलें स्वतःचें ज्ञान नेहमीं वर्गाचे पुढें राहिलें पाहिजे म्हणून उसनीं पुस्तकें आणि ऐनवेळीं मिळतील तीं उपकरणें आणून तो आपला अभ्यास चालू ठेवी.

कीटकांच्या अभ्यासाचें एक पुस्तक विकत घ्यावयाचें तर त्यासाठीं त्याला आपला एक महिन्याचा पगार मोजावा लागे. म्हणून फेबरनें

बीजगणिताची एक शिकवणी पत्करली. मात्र त्याला बीजगणिताचा श्रीगणेशासुद्धां माहीत नव्हता. 'अ' नें 'ब' ला कसें गुणायचें हेंहि शिकायचें होतें. पण केवळ दृढनिश्चयाचे जोरावर अवघ्या दोन दिवसांत त्यानें तो विषय माहीत करून घेतला. भूमितीसुद्धां तो स्वतःच शिकला.

पण तो जबाबदाऱ्यांनीं बांधला गेला होता. वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यानें लग्न केलें होतें त्याला अगदीं अपुरा पगार मिळत होता. तशांतच त्याला एक मूल झालें. तें पुढें गेलें हा भाग वेगळा. त्यांतून त्याचा पगार त्याला वेळेवर मिळत नसे. कितीतरी दिवसांचा पगार तुंबून रहात असे. यांतून कांहीं मार्ग काढावा म्हणून त्यानें रसायन व पदार्थविज्ञान यांच्या परीक्षा देऊन मॉन्टमेलियर विश्वविद्यालयाचा डिप्लोमा मिळविला. पण नोकऱ्या मात्र सामान्यबुद्धीच्या लोकांना मिळून या बिचाऱ्याला कापेन्ट्रासच्या शाळेंत परत यावें लागलें. वेळांत वेळ काढून कीटकांचा अभ्यास मात्र शेतांत हिंडून तो करीत असे. जे इतर शिक्षक, विद्यार्थ्यांतील त्याची लोकप्रियता पाहून मत्सरग्रस्त झाले होते ते त्याच्या उद्योगाकडे पाहून त्याला 'माशी' म्हणून संबोधूं लागले. पण जे विद्यार्थी इतर शिक्षकांची टवाळी करीत ते फेबरला मात्र देवस्वरूप मानीत.

शेवटीं त्याला एक प्रवास करायचा प्रसंग आला. त्याच्या लांब-लचक आयुष्यांतील तो पहिला व शेवटचाच. कॉर्सिका बेटावरील एका कॉलेजांत वार्षिक ३६० डॉलर पगारावर त्याची नेमणूक पदार्थ-विज्ञानशास्त्राचा प्राध्यापक म्हणून झाली. कॉर्सिकांतील फुलांचें वैपुल्य आणि बर्फाच्छादित पर्वतशिखरें, सभोंवतालचा सागर आणि त्यांच्या कांठचे विविध शिंपले पाहून त्याला आपण नंदनवनांत आहोंत असें वाटूं लागलें. येथें त्याची एका वनस्पती-शास्त्रज्ञाशीं भेट झाली. त्यानें फेबरला फुलांचें वर्गीकरण कसें करावें तें शिकविलें. तसेंच एका प्राणिशास्त्रज्ञानें गोगलगाईचें विच्छेदन कसें करावें तें दाखविलें. या दोन नवीन शास्त्रांचा सखोल अभ्यास करावा असें त्याला वाटायला

◆ ◆ ◆ ✦ ◆ ✦

लावायला एवढी सूचक माहिती पुरेशी होती. आणि जेव्हां हिंवतापानें पछाडल्यामुळें त्याला कॉर्सिका सोडणें भाग पडलें तेव्हां टुलोज विश्वविद्यालयाच्या जीवशास्त्राच्या परीक्षेस तो बसला. त्याचे परीक्षक त्याचें ज्ञान आणि विशेषत: त्याचें त्या विषयाचें आकलन पाहून चकित झाले. पण इतकेंहि करून त्याला जी सर्वोत्तम नोकरी मिळाली ती मात्र ॲव्हिनॉन येथील एका शाळेंत अवघ्या ३२० डॉलर्स पगारावर आणि वीस वर्षांनंतर त्यानें जेव्हां ती नोकरी सोडली, तेव्हांहि त्याचा पगार तेवढाच होता.

दरम्यानच्या काळांत, त्याकाळीं नामांकित असलेल्या–पण आतां विसरला गेलेल्या–एका लेखकाचें कीटकशास्त्रावरील एक पुस्तक फेबरच्या हातीं पडलें. त्या पुस्तकानें आपलें सारें आयुष्यच बदललें असें तो म्हणतो. गंमत मात्र अशी कीं, त्या पुस्तकांतल्या एका चुकीच्या विधानाकडे फेबरचें लक्ष वेधलें आणि त्यानें ती चूक शोधून काढली. आणि म्हणूनच त्या पुस्तकाला फेबरच्या जीवनांत महत्त्व प्राप्त झालें. त्या लेखकानें म्हटलें होतें कीं, गांधीलमाशी कीडमुंगीवर हल्ला करून तिला ठार मारते आणि आपल्या कोषांतील पिलांना ते किडे अन्न म्हणून खाऊं घालते. पण फेबरला माहीत होतें कीं, गांधीलमाशी ज्या किड्यांवर हल्ला करते त्यांना पुरते ठार मारीत नाहीं. आपल्या नांगीनें त्यांच्या मर्मावर अचूक वार करून ती त्या किड्यांना पक्षघात झाल्याप्रमाणें निर्बल करून टाकते, पण ते जिवंतच असतात. आणि म्हणूनच गांधीलमाशीच्या पिलांना सांठवलेली पण सदैव ताजी वैरण म्हणून ते उपयोगी पडतात.

हा शोध लहान असला तरी त्यानें फेबरला एक गोष्ट कळून चुकली ती ही कीं, शास्त्रविचारांत केवढाहि मोटा अधिकारी पुरुष असला तरी त्याच्या अधिकाराचा पंचनामा करतां येतो. त्याच्या हेंहि लक्षांत आलें कीं, त्याचें व्यावहारिक जीवन कितीहि जखडलें गेलें असलें तरी विज्ञानाचा प्रांत अमर्याद पसरलेला असून तो त्याला

◆ ◆ ◆

संशोधनासाठीं खुला होता. त्याच्या आणखी असें लक्षांत आलें कीं, प्राणीजीवनाच्या ज्या थरांत बुद्धिमत्ता (Intelligence) ही अगदीं खालच्या पातळीवर असते त्या ठिकाणीं उपजत प्रवृत्ति (Instinct) अत्यंत समर्थपणें परिस्थितीचा परामर्श घेते, आणि या उपजत प्रवृत्तींतच फार मोठें सुप्त शहाणपण दडलेलें असतें. फेबरच्या मर्मग्राही बुद्धीनें हें सत्य ओळख पटतांच आत्मसात् केलें. त्याकाळीं प्राणीजीवन ही एक आत्मा नसलेली यंत्रणा आहे अशी समजूत होती. पण ती बाजूला सारून उपजत प्रवृत्ति ही किती गुंतागुंतीची पण सर्वोत्कृष्ट पद्धतीनें आपलें कर्तृत्व प्रकट करीत असतें याचा अभ्यास करावयाचा असें त्यानें ठरविलें. एका विख्यात फ्रेंच जीवशास्त्रज्ञानें तर उपजत-प्रवृत्तीची व्याख्या 'जी नाहीं ती'–Nothing–अशी केली होती. पण एका बाजूच्या गांवांतील अप्रसिद्ध अशा या तात्या पंतोजीला तिचें खरें स्वरूप व सामर्थ्य कळूं लागलें होतें. प्राणीजीवनाच्या ज्या थरांत बुद्धिमत्ता अगदीं खालच्या पातळीवर असते त्या ठिकाणीं उपजत प्रवृत्ति हेंच सामर्थ्यसर्वस्व असतें हें त्याला उमजलें होतें. ही 'उपजत प्रवृत्ति' खरोखरीच जन्मजात असते. एकदमच संपूर्णपणें ती जन्मास येते. बुद्धीप्रमाणें नंतर तिची वयोमानानुसार वाढ होत नाहीं. संवय किंवा अनुभव यांपासून तिच्यांत सुधारणा व्हायला फारसा वाव नसतो. तिला तिच्या क्षेत्राचें संपूर्ण आकलन होतें पण त्यापलिकडे तिला कांहींहि कळत नाहीं.

या गुंतागुंतीच्या अनेकपदरी रहस्याचा छडा लावण्यासाठीं त्यानें शाळेचें कंटाळवाणें काम संपल्यानंतर उरणारा सारा वेळ द्यावयास सुरुवात केली. उन्हाळ्यांत ज्यांचे प्रवाह आटून गेले आहेत अशा ओढ्यांच्या वाळवंटांत पडून किंवा झाडांझुडपांत फिरून कीटकांच्या जीवनाचीं रहस्यें तो उकलूं लागला. Oil Beetle नांवाचा एक कीटक असतो. तो सुरवंटावस्थेंत फुलांवर पडलेला असतो आणि त्याठिकाणीं मध गोळा करण्यासाठीं येणाऱ्या मधमाशीच्या पाठीवर

✦ ✦ ✦ ✦ ✦ ✦

गुपचुप स्वार होऊन तिच्या मोहोळांत जाऊन तिचीं घरटीं उध्वस्त करतो. आपल्या वैऱ्यालाच आपण घरीं नेत आहों हें तिला कळतच नाहीं ! Scaral Beetle म्हणून इजिप्शियन लोकांना पूज्य वाटणारा आणखी एक किडा असतो. त्याचाहि फेबरनें अभ्यास सुरू केला होता. चाळीस वर्षेपर्यंत हा अभ्यास चालू होता आणि तोपर्यंत आपले निष्कर्ष प्रसिद्ध करावयास तो तयार झाला नाहीं. अर्धवटपणानें कुठलेंहि काम उरकणें त्याला माहीतच नव्हतें.

सुरुवातीस त्याचे संशोधनपर प्रबंध प्रसिद्ध झाले, तेव्हां पॅरिस-मधले आणि अन्य युरोपीय देशांतले कीटकशास्त्रज्ञ जागे होऊन डोळे चोळूं लागले. तोंपर्यंत त्यांच्या शास्त्रीय ज्ञानाची मर्यादा कीटकांच्या नवीन जाती शोधून काढण्यापलिकडे गेली नव्हती. एखाद्या किड्याला शास्त्रीय नांव देईपर्यंत त्याचें अस्तित्वहि मानायला ते तयार नसत. फेबरनें अधिक वास्तववादी पद्धतीनें संशोधन सुरू केलें. अगदीं क्षुल्लक भासणाऱ्या या कीटकांच्या जीवनांतहि विलक्षण नाट्य असतें. पूर्वप्रथे-प्रमाणें मृत किडे जमा न करतां तो जिवंत किडे पकडून त्यांना पिंजऱ्यांत ठेवून तें नाट्य हुडकून काढीत असे किंवा त्यासाठीं रानोमाळ हिंडत असे. इंग्लंडमधील विख्यात संशोधक चार्ल्स डार्विन यानें त्याचे प्रबंध वाचले तेव्हां त्याला सानंदाश्चर्य वाटलें. त्यानें ताबडतोब त्याला पत्र लिहून ' मधमाशांच्या घर बांधण्याच्या उपजत प्रवृत्ती ' विषयींच्या संशोधनांत त्याचें सहकार्य मागितलें व ' अतुलनीय निरीक्षक ' (Incomparable Observer) हा किताब त्याला कौतुकानें बहाल केला.

आणि एक दिवस आणखी एक चमत्कार घडला. फ्रान्सचा शिक्षण-मंत्री व्हिक्टर डूरी याचें मनांत शाळांतील शिक्षणपद्धतीची संपूर्ण पुनर्घटना करावयाची होती. तोंपर्यंत शिक्षणाचें धोरण कर्मठ सनातन्यांच्या हातीं होतें. डूरीनें त्यांना हुसकून लावलें आणि मुलींना शाळेंत प्रवेश मिळवून दिला. फेबरबद्दल त्याचा अत्यंत अनुकूल ग्रह झाला. त्यानें फेबरला पॅरिस येथें बोलावून घेतलें. त्याला ' लीजन

◆ ◆ ◆

ऑफ़ ऑनर ' ही सन्मानाची पदवी दिली आणि सम्राट तिसऱ्या नेपोलियनशीं त्याची भेटहि घडवून आणली. राजपुत्रांचा शिक्षक म्हणूनहि त्याची नेमणूक झाली असती असें म्हणतात. पण स्तुतिसुमनें उधळणें त्याच्या स्वभावांत नसल्यामुळें त्यानें राजधानीच्या गर्दी-गोंधळांतून आपल्या गांवाकडे पळ काढला. तिथल्या वैज्ञानिक वस्तु-शाळा पहायलाहि तो थांबला नाहीं. सिकॅडस माशांचें पंचमांतील गाणें आणि मधमाशांची 'गुं गुं' ऐकण्याची ओढ त्याला अधिक होती.

पुढें तिसरा नेपोलियन आणि डूरी यांचेहि दिवस संपले. खुनशी धर्ममार्तंडांनीं डूरीला राजिनामा द्यायला भाग पाडलें. डूरीच्या मर्जी-तला माणूस म्हणून त्यालाहि नोकरीवरून काढून टाकलें. कारण काय दाखवलें तर त्यानें आपल्या वर्गांत मुलींना जागा दिली आणि त्यांची निष्पाप मनें कलुषित केलीं. तो घरीं येतो तों त्याच्या धार्मिक वृत्तीच्या घरमालकिणीनें त्याला घर सोडायची नोटीस दिली.

तत्पूर्वी कांहीं महिने फिरावयाच्या वाटेवर फेबरची एका इंग्रजाशीं ओळख झाली होती. त्याची पत्नी वारल्यामुळें तो विषण्ण झाला होता. आणि एकाकी दिवस कंठीत होता. हा गृहस्थ म्हणजेच सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता जॉन स्टुअर्ट मिल होय. पण वनस्पतिशास्त्र हा विषय दोघांच्याहि अत्यंत आवडीचा होता. या विपत्काळीं फेबर त्याच्याकडे गेला आणि मिलनेंहि तावडतोब त्याला २०० डॉलर्सचें कर्ज दिलें. त्याबरोबर फेबरनें ऑरेंज या फ्रान्समधल्याच एका सुप्रसिद्ध शहरा-जवळच्या एका छोटेखानी घरांत आपलें सारें कुटुंब—त्याचे वृद्ध वडील, पत्नी व पांच मुलें—हलवलें आणि अत्यंत अनिश्चित् अशा भविष्य-काळाला तोंड द्यायला तो सज्ज झाला. यावेळीं त्याचें वय ४७ वर्षांचें होतें, आणि शिक्षकाच्या पेशांतून त्याची कायमची हकालपट्टी झालेली होती. तो संपूर्णपणें निराधार होता. जवळ होते काय तर, सुरवंट, आळ्या, विंचू इत्यादि नाना प्रकारच्या किड्यांसंबंधीं व कीटकां-संबंधीं परिश्रमपूर्वक गोळा केलेलें संपूर्ण ज्ञानभांडार,

✦ ◆ ◆ ✦ ◆ ◆

मग हेंच आपण इतरांना कां निवेदन करूं नये? असा विचार त्याच्या मनांत आला. पीकॉक मॉथ या किडयाची मादी आपलें अस्तित्व कशा गूढ रीतीनें कित्येक मैल दूर असलेल्या आपल्या प्रियकराला कळवते आणि लहानसा काजवा एखाद्या मोठ्या गोगलगाईला भूल आणणारें इन्जेक्शन देऊन कशी मारून टाकतो, या मनोरंजक परंतु शास्त्रीय कथा आपणांस इतरांना सांगतां येतील. घाणेरडा काळा कुरूप विंचू प्रणयाराधन कसें करतो व तें करतांना कसा नाचतो तें आपणांस लिहितां येईल. गुलाम पकडणाऱ्या मुंग्या काळ्या मुंग्यांवर कसा हल्ला करतात त्याचें वर्णन आपल्याला करतां येईल. मनुष्येतर योनींतील जीवांच्या अशा गुंतागुंतीच्या पण मनोरंजक रहस्यकथा त्यानें ज्या पुस्तकांत लिहिल्या आहेत त्याची बरोबरी करणारें साहित्य वैज्ञानिक वाङमयांत अन्यत्र नाहीं. त्यांत नर्म विनोदाची पखरण आहे; आणि त्या वाचणारा आरंभीं चकित होतो, मग त्याचें रूपांतर कौतुकांत आणि नंतर या प्राण्यांचे कांहीं प्रकार त्याला आवडायला लागण्यांत होते. प्रोव्हेन्स या फ्रान्समधील प्रदेशांतील अरण्यें, शेतें आणि फुलें यांचीं शेंकडों सुंदर वर्णनें त्यांत आहेत. या पुस्तकाच्याद्वारें फबरच्या कुटुंबांतहि आपला प्रवेश होतो. कारण त्याच्या मुलांनीं त्याला या कामांत मदत कसकशी केली त्याचाहि मोठा खुबीदार उल्लेख त्यानें केला आहे. त्या चिमुरड्यांची किलबिल आपण प्रत्यक्षच ऐकत आहोंत असें आपणांस पुस्तक वाचतांना वाटतें.

पण या पुस्तकांची विक्री मात्र मंदगतीनें होत होती. कारण त्यांचा कागद वाईट, छपाई बारीक टाइपांतली, आंत चित्रें वा आकृत्या नाहींत आणि पुस्तकाची जाहिरात तर अजिबात केलेली नव्हती. कित्येक वर्षें त्यांच्या विक्रींतून त्याला फारच थोडें उत्पन्न होई व तेंहि अनियमित असे. टीकाकारांनींहि त्याची कांहींशी उपेक्षाच केली होती. अनेक वैज्ञानिकांना तर त्यांतील गोडवा आणि ओजस्विता हे गुणच आक्षेपार्ह वाटले,— " शास्त्रीय पुस्तक कसें रुक्ष आणि कंटाळवाणें

◆ ◆ ◆

असलें पाहिजे असें त्यांना बहुशः वाटत असावें" असें तो थट्टेनें म्हणत असे.

"हे कीटकांनो, इकडे या आणि माझी बाजू माझ्या विरोधकांच्या पुढें मांडा. माझ्या बाजनें मी तुमची साक्ष काढतों आहे. तुमच्या-बरोबर किती आत्मीयतेनें मी राहतों, शांतपणानें आणि न कंटाळतां मी तुमचें निरीक्षण करतों आणि किती काळजीपूर्वक तुमच्या हाल-चाली आणि जीवनपद्धती यांचें टिपण करतों तें सगळे तुम्ही या विरोधकांना समजावून सांगा. आणि इतकेंहि करून तुम्हाला त्या सद्गृहस्थांची खात्री पटवितां न आली तर मी त्यांना म्हणेंन, तुम्ही हे जीव मारून टाकतां आणि मी त्यांना जिवंत ठेवून त्यांचा अभ्यास करतों. तुम्ही त्यांच्याविषयीं किळस आणि कींव उत्पन्न करतां पण मी त्यांच्याविषयीं प्रेम निर्माण करतों; तुम्ही त्यांचे विध्वंस बघतां, तर मी त्यांचें जीवन अभ्यासतों."

फेबरच्या लिखाणांत निसर्गाविषयी एक श्रद्धापूर्ण आदराची भावना–तिचा स्पष्ट उल्लेख नसला तरी – सदोदित आढळते. सृष्टीमध्यें एक निश्चित् संगति आहे अशीच त्याची श्रद्धा आहे. वास्तविक पाहतां सामान्य इतरेजनांना हे कीटक किळसवाणे आणि अतएव नकोसे वाटतात. पण फेबरची गोष्ट वेगळी होती. सृष्टींत जिकडे तिकडे त्याला ईश्वरी सूत्राचा साक्षात्कार घडत असल्यानें कीटकांच्या जीवनाविषयींहि त्याला आस्था वाटे. हा आस्थेवाईक समजूतदारपणा हेंच त्याचें मुख्य उपकरण. बाकी मग मिळेल त्या साधनांनीं तो ज्ञानसंपादनाचा प्रयत्न करी. रातकिड्यांची किरकिर थांबते का तें पाहण्यासाठीं त्यानें तोफांचे आवाज काढून बघितले. पण त्यांचा आरडाओरडा थांबेना. तेव्हां त्यानें निष्कर्ष काढला कीं ते किडे स्वतः बहिरे असले पाहिजेत. पीकॉक मॉथ नांवाच्या किड्याची मादी ज्या पिंजऱ्यांत त्यानें ठेवली होती तिथेंच डांबराच्या गोळ्या त्यानें ठेवल्या. हेतु हा कीं तिच्या अंगाला वास येत असला तर तो

◆ ◆ ◆ ◆ ◆

झांकला जावा. डांबर-गोळयांच्या वासानें भोंवतालच्या माणसांचें डोकें उठलें पण तिच्या पिंजऱ्याभोंवतीं पिंगा घालण्यासाठीं येणारे नर तिच्या वासानें आकर्षित झालेच. इतका तिचा वास त्यांच्यापुरता तरी परिणामकारक ठरला. शेंकडों कीडयामुंग्यांचा त्यानें तासन् तास, दिवसन् दिवस, नव्हे वर्षानुवर्षें बारकाईनें अभ्यास केला. आणि आपलें सर्व निरीक्षण व निष्कर्ष प्रयत्नपूर्वक गोळा करून प्रसन्न काव्यमय शैलींत त्यांना शब्दरूप देऊन ठेवलें. पण त्याला मात्र साधेपणानें – नव्हे दारिद्र्यांतच जीवन कंठावें लागलें. त्याच्या मुलांना पौष्टिक अन्न व आजारी पत्नीला औषधपाणी क्वचितच मिळालें असेल !

अखेरच्या दिवसांत त्याला सेरिग्नान नांवाच्या जेमतेम हजार माणसांची वस्ती असलेल्या गांवीं स्वत:ची अशी छोटीशी जमीन मिळाली. तिची मशागत कधींच बंद झाली असल्यामुळें तिथें कांटेरी रान माजलें होतें. पण तिथें फेब्रच्या सर्व प्रकारच्या मित्रांची मात्र दाट वस्ती होती. पण मोठ्या कष्टानें मिळविलेल्या या कीटकांच्या नंदनवनांत फेबर आला तो जीवनांतील पराभवानें भ्रमनिरास झालेला.

त्याची पत्नी आणि आवडता मुलगा ह्यांच्या मृत्यूनें त्याचें हृदय विदीर्ण झालें होतें. त्या मन:स्थितीविषयीं तो म्हणतो, "मला गतायुष्यांतील कशाबद्दलच दु:ख होत नाहीं व आतां कशाचीहि अपेक्षा राहिलेली नाहीं."

पण हळूहळू त्याचा लौकिक समाजांत पसरत होता. एकानें दुसऱ्यास सांगावें, त्यानें तिसऱ्यास सांगावें, असें होत होतें. कीटकांच्या जगांत रममाण झालेल्या तपोवृद्धाकडे कीर्ति, लक्ष्मीचा हात धरून यावयास निघाली होती. साहित्यिकांनासुद्धां आतां ध्यानांत आलें होतें कीं, कीटकांचें गीत गाणारा महाकवि 'होमर' त्यांच्याच जगांत, त्यांच्याच काळांत रहात होता. त्या होमरनें ट्रॉयच्या युद्धाचें वर्णन करून नांवलौकिक मिळविला तर या होमरनें आयुष्यभर

खपून नानातऱ्हांनीं लढला जाणारा कीटकांचा जीवनकलह काव्यमय शब्दांत रंगवला होता. नामांकित शास्त्रज्ञ त्याच्या भेटीसाठीं त्याचा दरवाजा ठोठावीत होते आणि तो उघडण्याची वाट पहात दारांत तिष्ठत होते.

अखेर तो मंगल दिवस उजाडला. त्याच्या वयाच्या ८७ व्या वर्षी त्याची ओळख पटलेल्या जगानें त्याच्याविषयीचें प्रेम आणि आदर त्याचा भव्य सन्मान करून व्यक्त करावयाचें योजिलें. इ. स. १९१० मध्यें एके दिवशीं सेरिग्नान हें छोटें खेडें नामांकित व्यक्ती, लेखक, शास्त्रज्ञ, फ्रेंच अकादमीचे सभासद, राज्यांतले मोठमोठे अधिकारी आणि परराष्ट्रीय वकील यांच्या आगमनानें गजबजून गेलें. पदकें, फिती, किताब, आणि मानमरातब यांचा या तपस्व्यावर त्या दिवशीं अक्षरशः वर्षाव झाला. त्या दिवशीं जगांतील थोर लोकांनीं, वाङमय आणि विज्ञान यांत सारखेंच अभिजात आणि अलौकिक ठरलेले कीटकशास्त्रावरील दहा महान् ग्रंथ लिहिणाऱ्या या लेखकाचें प्रथमच दर्शन घेतलें. ज्याची मुद्रा रुक्ष आणि भावनाहीन आहे पण ज्याच्या काळ्याभोर डोळ्यांचें तेज कायम असून ते अपूर्व तेजानें तळपत आहेत असा शहाणा आणि दूरदृष्टीचा हा थोर पुरुष त्यांच्या नजरेस पडला. या सन्मानांनीं त्याला आनंद निश्चित् झाला—कारण त्याच्या उपेक्षेचें जगानें घेतलेलें तें प्रायश्चित्त होतें—पण भावनोद्रेकानें मन आर्द्र व्हायची वेळ निघून गेली होती !

त्याच्या आयुष्याचीं अखेरचीं पांच वर्षें त्यानें फारसें कांहीं न लिहितां किंवा फारसें कामहि न करतां घालविलीं. त्याच्या प्रयोगशाळेंत पाळलेल्या कीटकांचे पिंजरे ठेवलेल्या मेजाभोंवतीं वर्षानुवर्षें त्यानें सतत फेऱ्या मारल्या होत्या त्यामुळें त्याच्या जड बुटांनीं टेबलाभोंवतालच्या जमिनींत एक चर खणला गेला होता. आतां त्या फेऱ्याहि थांबल्या. आपल्या खुर्चीवर बसून, तिच्या हातावर हात ठेवून समोर अंतराळांत रोखून बघण्यांत त्याची नजर गुंतून राही. जणूं

काय तो मानवी जीवनांतलें अखेरचें गूढ जो मृत्यु त्याचाच विचार करीत होता.

कुणा एकाला फेबरचें ईश्वरविषयक मत समजून घ्यावेसें वाटलें. तेव्हां त्यानें त्याला प्रश्न केला, " आपला परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास आहे काय ?" त्यावर तो खोडकरपणानें उत्तरला, ' मुळींच नाहीं; माझा ईश्वरावर विश्वास आहे कीं नाहीं हा प्रश्नच गैरलागू आहे–कारण मला तो सर्वत्र साक्षात दिसतो ! "



# कार्ल शूर्झ

## ३

## अमेरिकेचा जर्मन नागरीक

तो तरुण लेफ्टनंट सकाळीं जागा झाला आणि त्याला आठवलं कीं आज त्याच्या जीवनाचा अखेरचा दिवस होता. आज त्याला गोळी घालून मारणार होते.

जर्मनींत गेलीं दोन वर्षे चालू असलेल्या लोकशाही क्रांतीचा तो एक नेता होता. त्याच्या आईनें त्याच्या पितामहांची तलवार त्याच्या कमरेला बांधल्यापासून कुठल्याहि लढाईंत पराभव पत्करून त्या तलवारीचा दरारा त्यानें कमी होऊं दिला नव्हता. मोठमोठ्या सभांचें नेतृत्व स्वीकारून आपल्या प्रखर शब्दांनीं त्यानें विद्यार्थी, शेतकरी आणि सैनिक यांना बंडास प्रवृत्त केलें होतें. आणि तें करीत असतांना त्याच्या वाडवडिलांनीं घालून दिलेली परंपरा तो विसरला नव्हता. त्याच्या वडिलांनीं एकदां त्याला जॉर्ज वॉशिंग्टनची तसबीर दाखवून बजावून सांगितलें होतें कीं ती तसबीर जगांतल्या सर्वांत थोर पुरुषाची होती. आपलें कार्य करीत असतांना ही गोष्टहि तो विसरला नव्हता.

✦ ◆ ◆ ◆ ◆ ◆

गेलीं दोन वर्षे क्रांतिकार्याच्या उदात्त भावनेनें थडथडत असलेलें त्याचें हृदय अमानुष जर्मन अधिकारी बंदुकीच्या गोळ्यांनीं आज छिन्न-विच्छिन्न करणार होते.

१८४८ च्या जुलैची ती २१ तारीख होती. तो दिवस त्याच्या आयुष्यांतला खराच घातवार ठरणार होता. तो तरुण होता, उभें आयुष्य त्याच्या समोर होतें, पण मृत्यूच्या मार्गानें गेलेल्या अनेक क्रांतिकारक बांधवांच्या मागोमाग आज त्यालाहि जावें लागणार होतें. कारण ज्या किल्ल्यांत ते लढत होते तो रास्टाटचा किल्ला आणखी थोड्याच तासांनीं शत्रूच्या स्वाधीन केला जाणार होता. आपल्या बांधवांविषयीं आणि विशेषतः आपला गुरु आणि नेता प्रोफेसर गॉटफ्रिड किन्केल यांच्याविषयींच्या दुःखभावनेनें त्याचें अंतःकरण भरून आलें. मृत्यूपूर्वीचें अखेरचें काम समजून त्यानें आपल्या मातापित्यांना एक पत्र लिहिलें आणि त्याखालीं 'तुमचा लाडका मुलगा' अशी सहीदेखील केली.

—आणि एकदम त्याला एक आशेचा किरण दिसला. किल्ल्यांतून थेट शहराच्या भिंतीबाहेर पाणी वाहून नेणारा पण वरून बंद असलेला नाला किल्ल्यांत असल्याचें त्याला आठवलें. सुटकेची शक्यता होती तर! जेव्हां सगळ्यांनीं शरणागतीपूर्वी अखेरचें एकत्र-येण्याचा बिगुल वाजला तेव्हां एक सहकारी आणि एक इमानी नोकर यांच्यासह तो त्या नाल्यांत उतरला आणि अंधारांत ते कित्येक तासपर्यंत चांचपडत आणि रांगत पुढें चालले होते.

वर किल्ल्यांत ताबा घेणाऱ्या विजयी जर्मन सैनिकांच्या घोड्यांच्या टापांचे आवाज त्यांना ऐकूं येत होते. तेवढ्यांत अचानक पाऊस कोसळूं लागला आणि नाल्याचें पाणी एकाएकीं वाढलें. त्या पाण्यांत बुडून मरायची पाळी त्याच्यावर आली होती. बाहेर पडण्यासाठीं धडपडत असतां बाहेर जर्मन पहारेकरी खडे असलेले त्यांना आढळले. ते पुन्हा माघारीं वळले आणि रात्र पडल्यानंतर हळूंच किल्ल्यांत आले.

त्याच पोशाखांत कुणाच्या नजरेस न पडण्याची खबरदारी घेत त्यांनीं एकामागून एक जागा बदलल्या.

असे कित्येक दिवस काढल्यानंतर ते परत त्या नाल्यांत उतरले आणि पहारेकरी नाहींत असें पाहून एक दिवस एका छोट्या होडक्यांतून त्यांनीं ऱ्हाईन नदी ओलांडली आणि फ्रेंचांच्या ताब्यांतील आल्सेस प्रांतांत पोंचून त्यांनीं स्वतंत्रता मिळवली.

पण त्याचा गुरु किन्केल अजून प्रशियनांचा कैदी होता याचें त्याला दुःख होत होतें. तेवढ्यांत त्याला समजलें कीं त्याच्यासारख्या इतर निर्वासितांनीं किन्केलची सुटका करण्यासाठीं थैली जमा केली आहे. त्यांनीं ती थैली अवघ्या २१ वर्षांच्या कार्ल शूर्झच्या स्वाधीन केली. राजद्रोहाचा आरोप त्याच्यावर होताच. पण तशाहि परिस्थितींत एका जर्मन किल्ल्यांत कडेकोट बंदोबस्तांत ठेवलेल्या किन्केलच्या सुटकेचा प्रयत्न करण्यासाठीं तो पुन्हा जर्मन हद्दींत शिरला.

हें काम अत्यंत अवघड होतें. तें चोरून करायला हवें होतें. नाना क्लृप्त्या, लढवूनहि तें चटकन् होण्यासारखें नव्हतें. त्यांत पदोपदीं जिवाला धोका होता. पण हें सर्व त्यानें पत्करलें. एका रात्रीं चांदण्याच्या प्रकाशांत किन्केलला तुरुंगाच्या खिडकींतून खालीं सोडण्यांत आलें. घटकाभरांतच एक घोडागाडी हे दोन निर्वासित घेऊन, कुणालाहि संशय येऊं नये म्हणून खूप गोंगाट करीत समुद्रकिनाऱ्याकडे रवाना झाली. या दोघांच्या यशस्वी पलायनाची आणि ते एडिंबर्गमध्यें सुखरूपपणें पोंचल्याची वार्ता जर्मनांना कळली तेव्हां ते दांत ओठ खाऊं लागले पण सगळ्या यूरोपांत मात्र कार्ल शूर्झचेंच नांव गाजलें.

या स्वातंत्र्यप्रिय जर्मन तरुणाच्या कर्तबगारीला अखेरीस अमेरिकेच्या राजकारणांत योग्य तो वाव मिळाला. पण तोंपर्यंत त्यानें बरेच उद्योग करून पाहिले होते. प्रथम त्याला वाटलें कीं त्याच्यासारखे जे जर्मन देशभक्त निर्वासित झाले होते त्यांची संघटना करून आणि लंडनमधील ध्येयनिष्ठ स्वातंत्र्यभक्तांची मदत घेऊन जर्मनींत

✦ ◆ ◆ ◆ ◆ ✦

मोठी क्रांति घडवून आणणें शक्य होईल. पण तीन वर्षांनंतर त्याचा भ्रमनिरास झाला. लंडनमध्येंच मार्गारेथ मेयर नांवाची एक अठरा वर्षें वयाची तरुणी त्याला भेटली. अथांग जलाशयासारखे दिसणारे तिचे डोळे अत्यंत निरागस होते असें कार्लनें वर्णन केलें आहे. कार्लचा आवेग आणि उत्साह विलक्षण असला तरी त्याला माणसाची पारख चांगली होती. आणि मार्गारेथचा पत्नी म्हणून स्वीकार करून त्यानें अत्यंत अनुरूप अशी निवड केली. तिचा बाप हॅम्बुर्गमधला एक श्रीमंत कारखानदार होता. आणि आपल्या मुलीनें मायदेशांतून पळून आलेल्या एका दरिद्री निर्वासिताशीं लग्न करावें हें त्याला पसंत नव्हतें. पण सर्व अडथळे झुगारून हें जोडपें, एकमेकांवरील नितांत प्रेम आणि अंतःकरणांत प्रज्वलित झालेला आशादीप यांच्या आधारावर अमेरिकेस निघालें. कारण तेथील स्वातंत्र्याची ज्योत कार्लला अवाहन क ीत होती.

ज्यावेळीं त्यांनीं न्यूयार्कमध्यें पाय ठेवला त्यावेळीं कार्लला इंग्रजीचा गंधहि नव्हता. पण थोड्याच महिन्यांत स्वतः अभ्यास करून शेक्सपियर आणि ब्लॅकस्टोन वाचण्याइतकी त्यानें इंग्रजीच्या अभ्यासांत प्रगति केली. अमेरिकेचें नागरीकत्व मिळविण्याची पूर्वतयारी करण्यासाठीं देशाची लोकसभा, राजकीय पक्ष आणि तत्कालीन पुढारी यांचा अभ्यास करण्यासाठीं तो वॉशिंग्टनला गेला. हा हेतु साध्य झाल्यानंतर अमेरिकेंतील मोठीं शहरें पाहतां यावी म्हणून एका व्यापारी कंपनीचा प्रतिनिधि म्हणून तो प्रवासाला निघाला,

अमेरिकेंत सिनसिनाटी, शिकॅगो, सेंट लुई आणि मिलवॉकी या ठिकाणीं जर्मन लोकांच्या वसाहती भरभराटीला आल्या होत्या. तेथील लोकांनीं उंचनिंच आणि तेजस्वी डोळ्यांच्या शूर्झचें स्वागत केलें. आणि नंतर तर तो त्यांचा आवडता नेता बनला. त्याचा नादमधुर आवाज, दांडगें वक्तृत्व, छाप पाडणारें व्यक्तिमत्व या गुणांमुळें तो जेव्हां रिपब्लिकन पक्षाला मिळाला तेव्हां त्या पक्षांतील लोकांना

ती एक ईश्वरी देणगीच वाटली. अमेरिकेंतील जर्मन वंशाच्या नागरिकांचीं सर्व मतें तो म्हणेल त्या उमेदवाराला मिळतील इतकी लोकप्रियता त्यानें अगदीं थोड्या अवधींत मिळविली. त्या काळीं अमेरिकेंत गुलामी हा ज्वलंत प्रश्न होता आणि लवकरच गुलामगिरी नष्ट झालीच पाहिजे असें म्हणणाऱ्या पक्षाचा तो अध्वर्यू बनला.

केवळ कांहीं महिन्यांच्या अवधींत त्यानें कायद्याचा इतका सखोल अभ्यास केला कीं त्याला लागलीच वकिलीची सनद मिळाली. पण त्यानें वकीली कधींच केली नाहीं. वृत्तपत्रव्यवसायांत शिरून आपल्या मतांचा प्रचार करावा असें ठरवून त्यानें व्हिस्कॉन्सिन येथें एका जर्मन भाषेंतील वृत्तपत्राची स्थापना केली. बातम्या गोळा करण्याकडे त्याचा भर नसे तर मतप्रतिपादनाकडे असे. त्याचे संपादकीय लेख म्हणजे जणूं कांहीं प्रचारध्वजच होते, आणि जन्मभर इंग्रजी आणि जर्मन या दोन भाषांतून त्यानें डेट्रॉईट, न्यूयॉर्क वगैरे अनेक ठिकाणीं आपल्या मतांचे हे ध्वज फडकविले.

अमेरिकेंत आल्यानंतर अवघ्या आठ वर्षांत तो न्यूयार्क संस्थानच्या दुय्यम राज्यपाल-पदासाठीं निवडणुकीस उभा राहिला.तो निवडणुकींत हरला,पण अवघ्या ४८ मतांनीं. एक अलेक्झांडर हॅमिल्टन सोडला तर परदेशांत जन्मास येऊनहि अमेरिकन राजकरणांत शूर्झइतका यशस्वी झालेला दुसरा माणूस आढळणार नाहीं. लिंकन व डग्लस यांच्या गुलामगिरीविषयींच्या वादविवादामुळें अमेरिकन राजकारणहि त्यावेळीं अत्यंत निकरावर आलें होतें.

त्या वादांत शूर्झनेंहि अटीतटीनें आणि या दोघांच्या बरोबरीनें भाग घेतला. एकदां एका बाजूच्या स्टेशनांत कुणी एक गृहस्थ पावसांत छत्री घेऊन त्याला भेटण्यासाठीं उभा असलेला त्याला आढळला. तो माणूस अगदीं काटकुळा होता. त्याच्या एका हातांत एक विटक्या कापडाची छत्री होती आणि दुसऱ्या हातांत एक जीर्ण झालेली बॅग होती. त्याच्या डोक्यावर एक उंच टोपी आणि अंगावर



अनुक्र.: दि:

✦ ✦ ◆ ◆ ◈

झाल होती. तो इसम म्हणजे विख्यात अब्राहम लिंकन असून तो त्याच्या कार्याबद्दल कार्लला धन्यवाद द्यायला आला होता. कालां-तरानें लिंकननें त्याला सांगितलें, ' इतक्या अल्पपरिचित मित्रांत तूं सगळ्यांत मला अधिक जवळचा वाटतोस. ' ही भेट म्हणजे त्यांच्या भावी मैत्रीची सुरुवातच होती. त्यामुळेंच लिंकन राष्ट्राध्यक्ष झाल्या-वर कार्ल त्याला भेटण्यासाठीं ' व्हाईट हाऊस ' मध्यें म्हणजे अध्य-क्षांच्या निवासांत वारंवार येऊं जाऊं लागला. सामान्यपणें तो लिंक-नला कांहीं सल्ला देण्यासाठीं म्हणून येत असे. पण मग यादवी युद्धाच्या ताणानें शिणलेल्या लिंकनला रिझविण्यासाठीं तिथल्या पिया-नोवर बीथोव्हन आणि मोझार्ट यांचें संगीत वाजवून दाखवीत असे.

ज्या पक्षपरिषदेंत अध्यक्षपदासाठीं लिंकनचें नांव सुचविलें गेलें, तेथें शूर्झनेंच त्या नांवास पाठिंबा दिला आणि सुचविलें कीं, लिंकनची निवड एकमतानें व्हावी. या सूचनेचें लोकांनीं टाळ्या वाजवून स्वागत केलें. लिंकनच्या निवडणुकीच्या प्रचार-मोहिमेंत त्यानें हिरी-रीनें भाग घेतला आणि प्रचंड सभा गाजवण्याचा नवा विक्रम प्रस्था-पित केला. रिपब्लिकन पक्षाचा सर्वश्रेष्ठ वक्ता म्हणून त्याचें नांव झालें, आणि जर्मन-अमेरिकनांचीच नव्हे तर इतरहि हजारो मतें त्यानें लिंकनला मिळवून दिलीं. पण लिंकनला विजय मिळाल्यानंतर त्यानें कुठलेंहि अधिकारपद मात्र स्वतःसाठीं मागून घेतलें नाहीं. तसें करणें त्याला कमीपणाचें वाटे.

पण न मागतांहि त्याच्या श्रमांचें पारितोषिक त्याच्याकडे चालून आलें. अमेरिकेचा स्पेनमधील वकील म्हणून त्याची माद्रिद येथें नेम-णूक झाली. एका प्रतिगामी देशांतून तिथला छळ चुकवून पळून गेलेला एक निर्वासित दुसऱ्या एका प्रतिगामी राज्यांत जाऊन वकील म्हणून आपले कागदपत्र सादर करतो, ही एक विलक्षण अभिमानाची गोष्ट होती. पण अमेरिकेंत गुलामांच्या प्रश्नावर जेव्हां यादवी युद्ध सुरू झालें तेव्हां त्यानें आपल्या वकिलाच्या जागेचा राजीनामा देऊन

तो परतला. आणि त्यानें जर्मन-अमेरिकन नागरिकांचें एक स्वयंसेवक-दल उभें केलें. माद्रिदमध्यें असतानांच त्यानें युद्धशास्त्राचा अभ्यास पुन्हा सुरू केला होता. आतां त्याला ब्रिगेडियर जनरल ही पदवीहि मिळाली.

जनरल ली च्या जोरदार हल्ल्यास दोन-तीन ठिकाणीं त्याच्या पथकानें तोंड दिलें. गेटिस्बर्ग येथील लढाईत तर त्याचें निम्मेअधिक सैन्य कामास आलें आणि खुद्द त्याचा घोडाहि गोळी लागून मेला. एका प्रसंगीं तर तोफखान्याच्या प्रखर माऱ्यासमोर त्याच्या पलटणीस शांतपणें जमिनीवर पडून राहून तोंड देण्याची पाळी आली. आपल्या सैनिकांचा धीर खचूं नये म्हणून एक सिगरेट पेटवून शूर्झ त्यांच्यासमोर शांतपणें येरझारा घालीत होता.

यादवी युद्ध संपलें आणि दैनंदिन राजकीय व्यवहार सुरू झाले. पण आपल्या राजकीय जीवनांत आपल्या लढाईतील कर्तबगारीचा भांडवल म्हणून उपयोग करून घेण्याचें शूर्झन नाकारलें. त्यानें जनरल ही पदवीदेखील टाकून दिली. दक्षिणेकडील संस्थानांचा पराभव झाल्यानंतर त्यांना न हिणवितां त्यांच्याशीं दिलदारपणानें वागणें जरूर होतें हें सगळ्यांपेक्षां शूर्झनेंच चांगल्या रीतीनें ओळखलें. जेफर्सन डेव्हिस हा १८६१ ते १८६५ अमेरिकेचा अध्यक्ष होता. या अध्यक्षावर त्याच्या गैरकारभाराबद्दल खटला करावा असें ठरलें तेव्हां तो खटला गुप्त सैनिकी चौकशी मंडळापुढें चालावा असें कुणीतरी सुचविलें. त्याला शूर्झनें, ही प्रथा अमेरिकेच्या लोकशाहीच्या लौकिकास शोभणारी नाहीं असें म्हणून कडाडून विरोध केला आणि त्यामुळेंच अमेरिकन राष्ट्राला कलंक लागण्याचें टळलें.

१८६९ सालीं तो मिसूरी संस्थानतर्फे सेनेटर म्हणून निवडला गेला. सेनेटमध्यें देखील गुलामगिरी राहावी म्हणून लढलेल्या पण नंतर पराभूत झालेल्या दक्षिणेकडील संस्थानांनाहि झालें गेलें सर्व विसरून

✦ ✦ ✦ ✦ ✦ ✦

पूर्वीप्रमाणेंच प्रतिनिधित्व द्यावें यासाठीं तो झगडला. निग्रोंना नागरिकत्वाचे संपूर्ण हक्क दिले गेले पाहिजेत आणि गोऱ्या लोकांची वंश-श्रेष्ठत्वाच्या नांवाखालीं चालणारी 'कु क्लक्स क्लॅन' ही विध्वंसक चळवळयांची संघटना भयावह आहे असेंच त्याचें मत होतें. यादवी युद्धानंतर व्हर्जिनिया, लुसियाना आणि दक्षिण कॅरोलिना या संस्थानांतून सुरू झालेला लष्करी अंमल नाहींसा करावा यासाठींहि त्यानें यशस्वी खटपट केली.

हुतात्मा लिंकनची, दक्षिणेकडील संस्थानांची शांततेच्या मार्गानें पुनर्घटना करण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठीं इतकी धडपड शूर्झ-खेरीज दुसऱ्या कुणीहि केली नसेल.

सेनेटमध्यें त्यानें दारूबंदीला विरोध केला. सॅन्टो डोमिंगो हे स्वतंत्र प्रजासत्ताक अमेरिकेनें बळकवावें हा ग्रॅन्टचा बेत त्यानें हाणून पाडला. चिनी लोकांना नागरिकत्वाच्या हक्कांतून वगळावें याविरुद्ध त्यानें एकटयानेंच आवाज उठविला. अमेरिकेंत नवीन वसाहतीस येणाऱ्या लोकांना नागरिकत्वाचे हक्क मिळूं नयेत म्हणून जे जे कायद्याचे मसुदे पुढे येत त्यांना त्यानें कडाडून विरोध केला. या सगळयाच गोष्टींवरून त्याची लोकशाहीवरील निष्ठा आणि न्यायबुद्धि प्रकट होते.

अमेरिकन राजकारणांत त्या काळीं लांचलुचपत शिगेला पोचली होती. शूर्झनें बेडरपणानें आणि सातत्यानें जागरूक राहून अशा लांडयालबाडया एकामागून एक उघडकीस आणल्या आणि असें करतांना आपल्या पक्षांतील बडया धेंडांचीसुद्धां तमा राखली नाहीं. कागदी चलनवाढ आणि मुद्दाम ठरवून केलेली भाववाढ या गोष्टींना त्यानें यशस्वी विरोध केला. त्याला बदनाम करण्यासाठीं त्याच्या विरोधकांनीं त्याचे एखादे गुप्त रहस्य हुडकून काढण्यासाठीं हेरहि त्याच्या मागावर पाठविले. पण त्याचें चारित्र्य स्वच्छ आणि शुद्ध

◆ ◆ ◆

असल्यामुळें ते हात हालवीत परत गेले. अर्थात् या कॉंग्रेसमध्य त्याला पराभूत करायचा डावहि फसला.

त्याची सर्वांत मोठी राष्ट्रसेवा म्हणजे सिव्हिल सर्व्हिसमध्य–वरिष्ठ नोकरवर्गाची यंत्रणा-त्यानें केलेली सुधारणा. त्याकाळीं अमेरिकेंत नोकऱ्या गुणवत्तेपेक्षां राजकीय कामगिरीचें बक्षीस म्हणून दिल्या जात. खुद्द अध्यक्षदेखील असें धरून चालत कीं देशाचें राजकीय जीवन स्वपक्षीयांना अशा तऱ्हेनें मोठमोठ्या नोकऱ्या वांटून दिल्या–खेरीज चालणार नाहीं. अध्यक्ष ग्रॅन्ट यांचें मन थोडेंफार वळवून ह्याच्या सरकारी नोकऱ्या उमेदवारांची परीक्षा घेऊन त्यांच्या लायकीप्रमाणें त्यांना द्याव्या यासाठीं निदान एक गोलमोल कायदा करून घेण्यांत शूर्झ यशस्वी झाला. ग्रॅन्टनंतर अनेक अध्यक्ष आले आणि गेले. त्या सर्वांना शूर्झनें अधिकाधिक जागृत केलेल्या लोकमताला तोंड द्यावें लागलें. विनोदानें असेंहि म्हणतां येईल कीं, सरकारी नोकरांच्या खात्यांतील घाण काढली गेली याचें कारण शूर्झ प्रत्येक नव्या अध्यक्षाच्या हातांत एक खराटा आणि घमेलें देऊन त्याला ती घाण उपसायला भाग पाडीत होता.

अध्यक्ष हेज यानें शूर्झला अंतर्गत खात्याचा मंत्रि नेमलें. आतां–पर्यंतच्या प्रथेस अनुसरून कुणीहि येऊन आपली तुंबडी भरून घ्यावी याला शूर्झ हरकत देणार नाहीं असें राजकारणी पुढारी आणि बडे धंदेवाले यांना वाटत होतें. शूर्झनें तिजोरी तर डोळ्यांत तेल घालून संभाळलीच पण पक्षीय राजकारणाचा विचार न करतां आळशी नोकरांची खरडपट्टी काढून कर्तबगार माणसांनाच नोकरींत वाव दिला. त्याच्या हाताखालचा टपालखात्याचा प्रमुख गुरगुरून म्हणायचा, ' याला आपलं खातं म्हणजे जणुंकाय एखाद्या बनियाची पेढीच वाटते !'

अमेरिकेंतील आदिवासी किंवा रेडइंडियन लोकांना स्वतंत्र वसाहतींत

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

ठेवण्यांत येत होते. या वसाहतींचा कारभार म्हणजे त्याच्या खात्यांतील एक चिघळणारी जखम होऊन बसली होती. जुनी प्रथा मोडून शूर्झ स्वतः त्यांच्या वसाहतींत गेला आणि त्यांना भेटून, त्यांची गाऱ्हाणीं समजून घेऊन त्यानें त्यांच्या मनांत विश्वास निर्माण केला. अमेरिकन राष्ट्राच्या इतिहासांत आदिवासी बांधवाला इतकी चांगली वागणक प्रथमच मिळत होती. त्यांच्यांतल्या कांहीं लोकांना सरकारी नोकरींत घेऊन त्यांच्याच जमातीची व्यवस्था पाहण्याचें आणि त्यांच्यात शिस्त राखण्याचें काम शूर्झनें ह्या नोकरांवर सोपविलें. या वसाहतींतील तरुणांना अमेरिकन जीवनाशीं समरस होतां यावें म्हणून पेन्सिल्व्हानिया येथील घोडेस्वारांच्या रिकाम्या पडलेल्या बराकींत त्यानें एक औद्योगिक शाळा केवळ रेडइन्डियनांसाठीं सुरू केली. कार्लिसल येथील आजच्या सुप्रसिद्ध औद्योगिक विद्यालयाच्या कल्पनेचें बीज या प्रयत्नांत आहे.

मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर शूर्झनें दुसरें कोठलेंहि अधिकारपद स्वीकारलें नाहीं. त्यानें जंगलांचें संरक्षण, नियतकालिकांचें संपादन, संगीत वगैरे आपल्या आवडत्या छंदास वाहून घेतलें. अमेरिकेच्या इतिहासांत लिंकनपासून थिओडर रूझवेल्टपर्यंत जे अनेक अध्यक्ष होऊन गेले त्या साऱ्यांच्या कारकीर्दींत राज्यकारभाराचा नैतिक आधार कायम राखण्याचें थोर कार्य शूर्झनें केलें. राजकीय पक्षोपक्षांनीं ज्यावेळीं आपल्या तत्त्वांना सोईस्कर रीतीनें मुरड घातली वा हरताळ फांसला – राजकारणांत असें नेहमींच चालतें; फक्त तें उघडपणें कबूल केलें जात नाहीं—तेव्हां अवधान राखून शूर्झनें पक्ष बदलले पण निष्ठा सोडल्या नाहींत. "माझा देश चूक असो वा बरोबर–तो माझाच; तो योग्य मार्गावर नसेल तर त्याला त्या मार्गावर आणणें आपलें कर्तव्य आहे." हें शूर्झचें ध्येयवाक्य होतें.

तो १९५६ सालीं निधन पावला. अखेरच्या विश्रांतीस जातांना ॲन्ड्र्यू कार्नेजी, फेलिक्स ॲडलर, यांसारख्या नामांकित समकालि-

◆ ◆ ◆

नांनी त्याला खांदा दिला. अमेरिकन राजकारण स्वच्छ आणि शुद्ध करण्यासाठीं त्याच्या इतका जिवाचा आटापिटा कोणीच केला नाहीं. जर्मन वंशांतील तो सर्वश्रेष्ठ अमेरिकन नागरिक होता. त्याचा जन्म जर्मनीतील एका किल्यांत झाला होता, आणि हा थोर जर्मन पुन्हा त्याच राष्ट्रांत जन्म घेईल अशी आपण आशा करूंया.

● ● ●



# जीन लाफाईत

४

## सागरी लुटारू खरा, पण देशभक्त

"**पांचशें डॉलर्सचें बक्षीस**– जीन लाफाईत या लुटारूला पकडून पोलीसप्रमुखाच्या स्वाधीन करणारास वरील बक्षीस मिळेल." असा जाहीरनामा विल्यम क्लेबोर्न या लुसियानाच्या गव्हर्नरनें २४ नोव्हेंबर १८१३ या दिवशीं न्यू ऑर्लिन्समध्यें प्रसिद्ध केला. सदर जाहीरनामा देखणा जीन लाफाईत स्वतः हंसत उभा राहून वाचत होता तेव्हां अनेकांनीं त्याला ओळखलें असेल. पण तो चांचा असूनदेखील कोणीहि त्याला पकडलें नाहीं, इतका तो न्यू ऑर्लिन्समध्यें लोकप्रिय होता अमेरिकेनें लुसियाना प्रांत फ्रेंचांपासून विकत घेऊन तेथें आपला गव्हर्नर नेमला होता त्यावेळची ही गोष्ट आहे. वरील जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर तीन दिवसांनीं गव्हर्नर क्लेबोर्न यानें तो हमरस्त्यावर चिकटवलेला जाहीरनामा स्वतः पाहिला तेव्हां तो रागानें लाल झाला. कारण त्याच जाहीरनाम्यावर लाफाईतनें दुसरा जाहीरनामा चिकटवून त्यावर विल्यम क्लेबोर्नला पकडून जीनच्या वसति-

◆ ◆ ◆

स्थानीं म्हणज ग्रॅन्ड आईलवर पोंचवणारास तिप्पट बक्षीस लावलें होतें. हा जाहीरनामा वाचून हा उद्धटपणाचा पण विनोदी प्रतिहल्ला पाहून राजधानीतील नागरीक किती हंसले असतील याची कल्पनाच केलेली बरी !

बाराटारिया बे नांवाच्या उपसागराच्या मुखाशीं ग्रॅन्ड आईल हें बंदर होतें. यांचे लोकांनीं भर समुद्रांत पकडलेलीं स्पॅनिश, ब्रिटिश व क्वचित् अमेरिकन जहाजें या बंदराजवळ आणलीं जात. त्या ठिकाणीं त्या जहाजावरील लूट लहान नावांवर उतरवून घेऊन लहान लहान आणि चकव्या जलमार्गांनीं तो माल सर्व प्रांतभर विखुरला जाई. हे जलमार्ग वेताचीं जंगलें, सायप्रसच्या राई आणि ओक वृक्ष यांनीं ठिकठिकाणीं झांकले जात आणि त्यांतून रातोरात जलदीनें हा माल शहरांत किंवा मळेवाल्यांच्या वखारींत पोंचविला जाई.

जीन आणि त्याचा भाऊ पीरे या दोघांनीं प्रस्थापित केलेला हा काळा बाजार न्यूऑर्लिन्समध्यें शिष्टसंमत झाला होता. लुसियाना अमेरिकेकडें गेल्याला जरी दहा वर्षें झालीं होतीं तरी तिथले नागरीक अजून वृत्तीनें अमेरिकन झाले नव्हते. आणि दूरवरच्या वॉशिंग्टन येथील केंद्रसत्तेविषयींहि त्यांच्या मनांत निष्ठा उत्पन्न झाली नव्हती. म्हणूनच आयातीच्या मालावरील जकात चुकविण्यासाठीं इथले श्रीमंत लोक हा चोरून आणलेला माल म्हणजे रेशीम, मखमल, मद्यें, चांदीचीं भांडीं आणि जडजवाहीर, राजरस्त्यावर थाटलेल्या दुकानांतून खुशाल खरेदी करीत.

लाफाईत बंधूंनीं मळेवाल्यांचा आणखी एक प्रश्न सोडवला होता. लुसियानावर अमेरिकेचें राज्य झाल्यापासून आफ्रिकेंतील निग्रो गुलामांची आयात कायद्यानें बंद झाली होती. स्पॅनिश जहाजांतून इतर लुटीबरोबर गुलामांची जिवंत लूटहि मिळत असे. आणि " हे काळें हस्तीदंत " मळेवाल्यांना वजनावर पौन्डाला एक डॉलरप्रमाणें विकलें जात असें. बाराटारिया मुलुखांत पांचशें ते हजार लोक

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

लाफाईतबरोबर देवघेव करीत. हा भाग म्हणजे देशत्याग केलेल्या लोकांचें वसतिस्थान होतें. यांपैकीं कांहीं माणसें शिक्षा चुकविण्या-साठीं तर कांहीं कंटाळवाण्या आयुष्यक्रमांत बदल म्हणून येथें आलेलीं असत. एकदां तीं जीन लाफाईतच्या आहारीं गेलीं कीं त्यांना त्याच्या मर्जीनेंच वागावें लागे. कारण तो आपल्या श्रीमंत गिऱ्हाइकांशीं वागण्यांत जितका गोड होता तितकाच हाताखालच्या माणसांशीं वागण्यांत कठोर होता. या सर्व व्यवहाराचा सूत्रचालक या नात्यानें धोरण ठरविणें, पत्रव्यवहार करणें–हा तीन भाषांत असे–पैसे बँकेंत टाकणें, पतीचे व्यवहार करणें, वकीलांची मदत घेणें, बाजाराशीं संबंध ठेवणें आणि गिऱ्हाइकांना भेटणें इत्यादि कामें स्वत: करून घेई. त्याचीं गिऱ्हाइकें त्याच्या भुरळ पाडणाऱ्या व्यक्तिमत्त्वावर खुष होतीं. (कुणी म्हणत कीं, फ्रेंच राज्यक्रांतींत मारल्या गेलेल्या एका फ्रेंच उमरावाचा तो मुलगा होता.) आपल्या भेटीस येणाऱ्या लोकांना उत्कृष्ट दारू देऊन तो चकित करीत असे. कारण त्या दलदलीच्या प्रदेशांत तें एक नवलच होतें. कित्येक वेळां त्याला पकडावयास आलेल्या अधिकाऱ्यांना आपणच कैद करून आणि त्यांना भरमसाट देणग्या देऊन–इतक्या भरमसाट कीं त्या नाकारायची त्यांची छातींच होऊं नये–तो परत पाठवीत असे.

त्यावेळीं अमेरिका इंग्लंडबरोबर युद्धांत गुंतली होती. इ. स. १८१२ हें युद्धाचें तिसरें वर्ष अमेरिकेला फार वाईट जात होतें. ब्रिटिशांनीं केलेली बंदरांची नाकेबंदी ही देशाची गळचेपी ठरूं पहात होती. अशा स्थितींतहि मिसिसिपी नदीच्या खोऱ्याची जणुं किल्लीच असें न्यू-ऑर्लिन्समधील बंदर अजूनहि ब्रिटिशांचा विजय होईल याविषयीं उदासीन होतें. गेल्या दहा वर्षांत त्यांच्यावर तीन देशांचीं निशाणें फडकून गेलीं होतीं. त्यामुळें त्यांच्या मनांत आपण अमेरिकन आहोंत ही भावना प्रबळ झाली नव्हती. नेहमींप्रमाणें नाच, गाणीं, नाटक-तमाशे, कॉफीपान यांत ते मग्न होते आणि लाफाईतनें पुरविलेल्या

◆ ✦ ✦

अनेक चैनीच्या वस्तूंवर ते पैसा उधळीत होते. अशा स्थितींत गव्हर्नर जळफळत असला तर नवल नाहीं.

क्लेबोर्नला जर कळलें असतें कीं, याचवेळीं ब्रिटिश नौका सोफीया ही लाफायतच्या निवासाजवळच नांगरलेली असून कॅप्टन लॉकीर आणि कॅप्टन विल्यम्स् हे दोघे लाफाईतच्या समवेत मदिरापान करीत असून त्याला आपल्या बाजूस वळवायचा प्रयत्न करीत आहेत तर त्याला खचितच लाफाईतला खाऊं कीं गिळूं असें झालें असतें. इंग्लिश सेनापतींनीं लाफाईतकडे अमेरिकन सरकार उलथून पाडण्यासाठीं त्याच्या सहकार्याची मागणी केली होती. तें त्यानें केलें तर त्याबद्दल त्याला व त्याच्या अनुयायांना भरपूर मोबदला मिळणार होता आणि लुसिआनांत जमिनी मिळणार होत्या. पण तें जर त्यांनीं नाकारलें तर त्यांची सबंध वसाहत उडवून दिली जाणार होती. लाफाईतनें त्यांच्या चषकांत आणखी दारू ओतली आणि गोड शब्दांत विचार करायला वेळ मागून घेतला.

त्याची तेवढीच विनंति मान्य झाली. त्याचा फायदा घेऊन ब्रिटिशांच्या अटींचें कागदपत्र त्यानें क्लेबोर्नकडे पाठविलें आणि कळविलें कीं, अमेरिकन सरकार बाराटारियन्सना जर सार्वत्रिक माफी देऊन अमेरिकन नागरिकत्वाचे हक्क द्यावयास तयार असेल तर तो सर्वस्वानें त्याच्यासाठीं लढावयास तयार होता. हा निरोप पाठवून तो उत्तराची वाट पहात बसला.पण कित्येक दिवस उत्तर आलें नाहीं.

पण जें उत्तर आलें तें अत्यंत विपरीत होतें. क्लेबोर्ननें जहाजांचा एक काफीला पाठवून लाफाईतची वसाहत आपणच उध्वस्त केली. त्याची संपत्ती आणि सामानसुमान लुटलें आणि गांवावर अग्निवर्षाव केला. त्यामुळें लाफाईत अनुयायांसह माघार घेऊन दलदलीच्या प्रदेशांत आणखीं आंत जाऊन राहिला. लुटारूंशीं अमेरिकन राष्ट्रानें समझोता करूं नये, हें क्लेबोर्नचें मत न्यू ऑर्लिन्सच्या संरक्षणासाठीं आलेल्या अॅन्ड्रयू जॅक्सन या सेनापतीलाहि मान्य असल्यानें क्लेबोर्ननें

✦ ◆ ◆ ✦ ◆ ◆

या बदमाश लुटारूंना शिक्षा केली, याबद्दल जॅक्सननें क्लेबोर्नची पाठ थोपटली.

पण जॅक्सन जेव्हां न्यू ऑर्लिन्समध्यें येऊन पोंचला तेव्हां तिथें फक्त ७०० शिपायांची शिबंदी, थोडासा दारूगोळा आणि कांहीं तोफा, एवढीच लढाईची तयारी पाहून त्याच्या तोंडचें पाणी पळालें. सगळ्या शहरांत घबराट पसरली होती. बँका बंद झाल्या होत्या, व्यवहार थंडावले होते. बाराटारियावर केलेल्या हल्यामुळें लाफाईत ब्रिटिशांना मिळाला होता याबद्दल आतां कुणालाहि संशय नव्हता.

पण आत्तांपर्यंत उदासीन असलेले लुसियानाचे नागरीक संकट दाराशीं येतांच खडबडून जागे झाले. इंग्लिश सेनापती सर एडवर्ड पाकेनहॅम, ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या हातांखालीं तयार झालेले चौदा हजार सैनिक घेऊन न्यू आर्लिन्स जिंकायला आल्याचें कळतांच तेथल्या लोकांनीं शस्त्रें धारण केलीं,आणि ते सर्व अमेरिकेच्या राष्ट्रध्वजाखालीं येऊन उभे राहिले. त्यांत सर्व वर्गाचे लोक होते. स्वतंत्र निग्रो होते, जंगलांत राहणारे रेड–इंडियन होते, टेनेसी आणि केंटुकी येथले सदतीसशें लोक खूप लांबचा प्रवास करून आले होते आणि ते निशाणबाजींत प्रवीण होते. पण इतकें असूनहि दारूगोळा आणि गोलंदाज कमी पडत होते आणि जलमार्ग रोखून धरण्यासाठीं लढाऊ जहाजेंहि हवीं होतीं.

तो अशा चिंतेंत असतांना त्याच्या दारांत एक लक्ष वेधून घेणारी व्यक्ति उभी राहिली. आलेला पुरुष भक्कम शरीरयष्टीचा, सहा फूट उंचीचा, हिरव्या रंगाच्या गणवेशांत, डोक्यावर कातड्याची टोपी घातलेला, एक डोळा अर्धवट मिटलेला असा उभा होता. जीन लाफाईतला पकडून देणारास मोठें बक्षीस लावलेलें असतांना तो आपल्या पायांनीं येऊन जॅक्सनच्या स्वाधीन झाला होता.

"माझीं सारीं माणसें, जहाजें आणि दारूगोळा घेऊन मी तुमच्या सेवेला आलों आहे !" येवढेंच तो म्हणाला. सन्यांतला दर्जा,

✦ ◆ ◆

मदतीची भरपाई किंवा सार्वत्रिक माफी याविषयी त्यानें अवाक्षरहि उच्चारलें नाहीं. मात्र आपलें सर्वस्व त्यानें राष्ट्रकार्याला वाहिलें.

सेनापती जॅक्सननेंहि आपल्या दर्जाला शोभेल असाच निर्णय एका क्षणांत घेतला. तो म्हणाला, " तुझ्या मदतीचा आम्ही स्वीकार करतों. ती योग्य वेळीं आलेली आहे आणि अमेरिकन राष्ट्र त्याबद्दल कृतज्ञ राहील."

अर्थातच गव्हर्नर क्लेबोर्नला नवा जाहीरनामा काढून,बाराटारिया-मधील कांहीं व्यक्तींनीं युद्धकार्यांत अमेरिकेला मदत करावयाची ठरविलें असल्यामुळें, त्यांनीं आपली कर्तबगारी दाखविल्यास त्यांना देशभक्त राष्ट्रबांधव म्हणून स्वीकारण्यांत येईल, असें जाहीर करावें लागलें. आणि जेव्हां एकेकाळचे लुटारूंचे दादा असलेले डॉमिनिक यू, गॅम्बी, शिगीझोला, रेनेबेलूश इत्यादि बाराटारियन्स न्यू ऑर्लिन्सच्या रस्त्यांतून रुबाबांत हिंडूं लागले तेव्हां नागरिक विस्फारित नेत्रांनीं त्यांचे-कडे बघूं लागले. इ. स. १८१५च्या ८ जानेवारीस इतर सैनिकांबरोबर हे माजी लुटारूहि ब्रिटिश फौजेला तोंड देण्यासाठीं शहराबाहेर पडले.

ब्रिटिश सेनापती पाकेन्हॅम याच्याजवळ अमेरिकन सैन्याच्या तिप्पट सैन्य होतें. त्यामुळें त्याला सहज जय मिळेल असें वाटत होतें. पण अमेरिकन सैन्यानें आपल्या सभोंवार कापसाच्या गांठींची तटबंदी उभारली होती. त्यामुळें ब्रिटिशांच्या गोळ्या त्यांत अडकून बसत आणि अमेरिकन सैन्यांतील निशाणबाज सैनिकांच्या माऱ्यानें पुढें येणारे लाल पोषाखांतील ब्रिटिश सैनिक धडाधड कोसळत होते.

तिसरी आणि चौथी पलटण यू आणि बेलुशे यांच्या अधिपत्या-खालीं होती, आणि त्याच्या सैनिकांना हलणाऱ्या बोटींच्या डेकवरून गोळीबार करायची संवय होती. तसेंच त्यांचे कांहीं गोलंदाज नेपोलि-अनच्या सैन्यांत पूर्वी होते. त्यांनीं ब्रिटिशांच्या तोफा एकामागोमाग एक बंद पाडल्या. आपल्या सरकारी अहवालांत जॅक्सन लिहितो, " कॅप्टन यू आणि बेलुशे यांनीं ज्या तऱ्हेनें लढा दिला आणि शेवट-

✦ ◆ ✦ ◆ ◆ ✦

पर्यंत ज्या शौर्यानें देशाच्या रक्षणाचें दिलेलें वचन पूर्ण केलें त्याबद्दल त्यांची मन:पूर्वक प्रशंसा केल्यावांचून राहवत नाहीं. लाफाईत बंधूंनींहि तसेंच धैर्य आणि निष्ठा प्रत्ययास आणली.''

जीन स्वत: त्या दिवशीं एका जहाजावर बसून मार्गदर्शकाचें काम करीत होता. आणि लढाईची जलमार्गाकडील बाजू सांभाळीत होता. ब्रिटिशांची लांच नाकारून आपलें बलसर्वस्व त्यानें अमेरिकनांच्या दिमतीस दिलें. या त्याच्या अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णयामुळें त्या दिवशींच्या अपूर्व जयांत त्याचा वांटा मोठा होता हें कबूल करायलाच हवें. त्या लढाईंत सर एडवर्ड पाकेन्हॅम आपल्या १४०० सैनिकांसह मारला गेला. आणि फक्त १३ अमेरिकन सैनिक त्या लढाईंत पडले होते.

लगेच १५ दिवसांनीं म्हणजे २३ जानेवारीस विजय साजरा करण्यासाठीं पूर्वीच्या फ्रेन्चांच्या मुख्य कचेरीच्या जागीं एक नृत्य-गायन-वादनाचा कार्यक्रम करण्यांत आला. त्याठिकाणीं न्यू ऑर्लिन्सच्या नागरिकांनीं एक फ्रेंच नृत्य सुरू करतांच जनरल जॅक्सननेंहि एक स्कॉटिश नृत्य करून त्यांना साथ दिली. जीन लाफाईतच्या गौरवाची ती रात्र होती. खानदानी लोकांच्या समाजांत त्याला स्थान मिळालें होतें. गव्हर्नर क्लेबोर्न एकाद्या शाळूसोबत्याप्रमाणें त्याच्याशीं गप्पागोष्टी करीत होता. अमेरिकन अधिकाऱ्यांबरोबर परस्परांचें शुभचिंतन करण्यासाठीं त्यानें मद्य घेतलें,सन्मान्य नागरिकांबरोबर हातांत हात घालून तो हिंडला आणि सुंदर युवतींच्याबरोबर त्यानें नृत्यांत भाग घेतला.

मार्च महिन्याच्या सुरुवातीला अमेरिकेचा अध्यक्ष मॅडिसन यानें बाराटारियन्सना संपूर्ण सार्वत्रिक माफी तर दिलीच,पण त्यांच्याविषयीं राष्ट्राच्या वतीनें कृतज्ञताहि व्यक्त केली. याठिकाणींच वास्तविक पाहतां कादंबरीतल्याप्रमाणें जीनच्या कथेचा शेवट व्हायचा, तर

✦ ✦ ✦

त्यानें तलवार म्यान करून राजधानींतल्या सन्मान्य नागरिकाचें जीवन पत्करायला हवें होतें.

पण तसें व्हायचें नव्हतें. ईश्वरानें त्याला जसा जन्मास घातला तसाच तो होता. एक महिन्याचें आंतच त्याचीं जहाजें पुन्हा चांचेगिरी करूं लागलीं. प्रामाणिक व्यापारी आणि नागरीक यांच्या मालाला आणि जिवाला पुन्हा धोका निर्माण झाला. इंग्लंड, स्पेन आणि अमेरिका ह्या तिन्ही राष्ट्रांनीं एकत्र येऊन चांच्यांचा नायनाट करावयाचाच असें ठरविलें या तिहेरी माऱ्याला तोंड देणें अशक्य होऊन त्यांना आपलीं आवडतीं घरेंदारें सोडून परागंदा व्हावें लागलें.पाठीमागें उरलें काय, तर फक्त पुरलेल्या संपत्तीच्या दंतकथा आणि त्या अजूनहि अधून-मधून ऐकूं येतात. लुसियानांतल्या लाफाईत या खेड्यांत मच्छि-मारीचा धंदा कसा तरी चालतो.तिथें कुठें जर हें सोनें पुरलेलें असलेंल तर रानटी जस्माईन वेली आणि पाण्यांतले विषारी साप दक्षतेनें त्याचें रक्षण करीत आहेत.

पुन्हा चांचेगिरी सुरू केल्यानंतर लाफाईत टेक्सासमधील गॅल-व्हेस्टन बेटावर वसाहत करून राहिला. पण त्याचा आपल्या अनुयायां-वरील ताबा सुटत चालला होता. स्पॅनिश व्यापारी जहाजांबरोबर जेव्हां पहाऱ्यासाठीं लढाऊ जहाजें जाऊं लागलीं तेव्हां त्यांचा नाद सोडून लाफायतच्या अनुयायांनीं त्याच्या हुकुमाविरुद्ध अमेरिकन जहाजांवर हल्ले सुरू केले. त्यांच्यावर जरब बसविण्यासाठीं त्यानें गुन्हेगारां-पैकीं एकाला फांशी दिले आणि चौघांना अमेरिकन पोलिसांच्या स्वाधीन केलें.पण व्यर्थ! इ. स. १८१७ मध्यें अमेरिकन सरकारनें त्याला गॅल्व्हेस्टन बेट सोडून जाण्याबद्दल कडक सूचना दिली. भांडण न करतां त्यानेंहि मान तुकविली. तो इंग्लंड अगर स्पेन यांना कधींच घाबरला नाहीं. पण अमेरिकेविरुद्ध आपण शस्त्र उचलणार नाहीं असें तो म्हणे आणि तसा तो वागला. त्यानें आपल्या गांवाला आग लावून दिली आणि एका गलबतावरून तो निघाला तो अदृश्य झाला.

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

तेव्हांपासून कुणालाहि या सभ्य डाकूचा आणि लुटारू देशभक्ताचा पत्ता लागलेला नाहीं. समुद्रानें अथवा समुद्रानजीकच्या वाळूनें त्याला कायमचें गिळंकृत केलें असावें. त्याची कुठलीहि आठवण आतां शिल्लक नाहीं. फक्त त्यानें राष्ट्राच्या रक्षणार्थ उपसलेली त्याची तलवार तेवढी न्यू ऑर्लिन्सच्या वस्तुसंग्रहालयांत अजूनहि दिसते !

● ● ●



# पॅट्रिक हेन्री

५

## जिव्हा नव्हे अग्निशिखा

पॅट्रिक हेन्रीनें स्वातंत्र्यलढ्याचे वेळीं उच्चारलेले सात शब्द प्रत्येक अमेरिकन माणसाला मुखोद्गत आहेत. पण अमेरिकेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं त्यानें काय काय केलें हें फारच थोड्या लोकांना ठाऊक असेल. ज्या देशभक्तांनीं स्वातंत्र्यासाठीं लढा दिला त्यांचा तो अग्रणी होता आणि त्याच्यावर लोकांनीं जसें प्रेम केलें तसें वेडें प्रेम आणि भक्ति दुसऱ्या कोणाहि अमेरिकन माणसाला लाभली नसेल. लोकांच्या मनावर त्याचा एवढा जबरदस्त पगडा होता कीं, तो सहजच सर्व सत्ताधारी झाला असता. पण त्याच्या लोकशाही-निष्ठा इतक्या विशुद्ध व निर्धाराच्या होत्या कीं, सर्व सत्ताधारी होण्याची कल्पनाहि त्याला सहन होण्यासारखी नव्हती. सर्व सत्ता-धारित्व पत्करण्यापेक्षां मृत्युदंडहि त्यानें पत्करला असता.

कारण, स्वतःच्या स्वातंत्र्याइतकेंच इतरांचें स्वातंत्र्यहि त्याला बहुमोल वाटत होतें. इतर अनेक देशभक्तांप्रमाणें इंग्रजांच्या वसाहत-

* * * * * *

वादाविरुद्ध लढा पुकारूनच त्यानें आपल्या राजकीय जीवनास प्रारंभ केला. संपूर्ण स्वातंत्र्यापेक्षां वसाहतीचें स्वातंत्र्य अधिक सुरक्षित म्हणून अनेकांना पसंत पडलें असतें. पण हेन्री त्यांपैकीं नव्हता. तो संपूर्ण अमेरिकन होता. त्याचा जन्म १७३६ मध्यें अमेरिकेंतच व्हर्जिनिया येथें झाला. त्याच्या पाठीशीं समुद्र होता आणि त्याची नजर देशाची सीमा आणि त्याचें भवितव्य यांकडे लागलेली होती. अमेरिका हें राष्ट्र त्यावेळीं नुकतेंच उदयास येऊं लागलें होतें. त्या काळांतच हेन्री लहानाचा मोठा झाला आणि राष्ट्राच्या बरोबरच त्याच्या बुद्धीलाहि परिपक्वता आली.

इंग्रज माणसाचे स्वभाव–विशेष त्याच्यांत अजिबात नव्हते. तो अमेरिकेंत जन्मला, वाढला आणि स्वत:च्या कर्तबगारीवर मोठा झाला होता. त्यामुळेंच कुणाहि व्यक्तीला स्वप्रयत्नानें मोठें होतां आलेंच पाहिजे अशी त्याची निश्चिती होती. तो स्कॉच–आयरिश वंशाचा होता, खानदान होता आणि ज्वलज्जहाल स्वतंत्र वृत्तीचा होता.

प्रारंभींच्या जीवनांत त्यानें अनेक गोष्टी करून पाहिल्या पण त्यांत त्याला अपयश आलें आणि मगच त्याला आपली बुद्धि कशांत चालतें तें कळलें. त्यानें एक दुकान काढलें पण त्यांत तो बुडाला. प्रेमांत मात्र तो यशस्वी झाला. वयाच्या अठराव्या वर्षीं त्यानें लग्न केलें. बायकोकडून त्याला लहानशी शेतीवाडी मिळाली. वयाच्या तेविसाव्या वर्षीं चार मुलें, कर्जाचा डोंगर, असंख्य मित्र आणि स्वत:जवळ कोणतीहि खास विद्या नाहीं अशी आपली स्थिति आहे हें त्याला उमजलें. पण त्याच्याजवळहि कांहीं गुण होते. तल्लख स्मरणशक्ति, तर्कशुद्ध विचारसरणी प्रत्युत्पन्न मतित्व आणि शांत स्वभाव या गोष्टी त्याच्या अंगभूत होत्या. हार न जाणारी विवादपटुता त्याचें अंगीं होती. पण त्याची भाषणशैली मात्र सौजन्यपूर्ण होती. सामान्य माणसाचे विचार अनेक बुद्धिमंतांना कळत नाहींत. ते त्याला नेहमींच आकलन

होत सामान्य माणसांनाहि त्याचें बोलणें कळत होतें. कारण, अगदीं साध्यासुध्या शब्दांतच तो आपलें म्हणणें मांडत असे. वाऱ्यानें जशा समुद्रावर लाटा उसळून याव्यात तसा तो जनतेला प्रक्षुब्ध करी.

पण या सगळ्या गुणांचा उपयोग होईल असें जीवनकार्य कुठलें ? याचें उत्तर त्याला एक दिवस अचानक सांपडलें. त्याला उत्तम वकील होणें शक्य होतें. पण स्वास्थ्य आणि पैसा यांशिवाय हा अभ्यास करणें त्याला कसें शक्य होणार होतें ? त्यानें न्यायशास्त्र आणि व्हर्जिनियाचे कायदे यांवरील दोन पुस्तकें उसनीं आणलीं. त्यांत मुळांतील विषय सारांशरूपानें दिले होते. सहा आठवड्यांत त्यानें त्यांतील ज्ञान आपल्या डोक्यांत खच्चून कोंबलें आणि आपल्या खेडवळ पोषाखांतच तो व्हर्जिनियाची राजधानी विल्यम्सबर्ग येथें वकिलीची परीक्षा घेणाऱ्या परीक्षकांपुढें जाऊन उभा राहिला. त्याचें कायद्याचें ज्ञान बेताबाताचेंच असलें तरी न्यायाचें मूलभूत तत्त्व समजण्याचा प्रश्न येतो तिथें त्याचा निर्णय अचूक असतो हें त्यांच्या ध्यानांत आलें. तो अगदीं निर्दोष पद्धतीनें आपली बाजू मांडीत असे. हेन्रीचें वाचन अपुरें असलें तरी तो जन्मजात वकील आहे हें लक्षांत येतांच त्यांनीं त्याला वकिलीची सनद बहाल केली.

तो आपले गांवीं परत येऊन वकिली करूं लागला. त्यानें कायद्याचा कसून अभ्यास केला आणि तीन वर्षांत ११८५ खटले चालवून त्यांतले बहुतेक जिंकले. त्यानंतर सुप्रसिद्ध पार्सनचा खटला–Parsons' Trial उभा राहिला. व्हर्जिनियांतील धर्मगुरूंची दुष्कीर्ति जुनीच होती. ते दुराचारी, राक्षसी वृत्तीचे आणि लोभी होते. त्यांना प्रार्थनामंदिरासाठीं मिळणारा दहावा हिस्सा कर तंबाखूच्या रूपानें मिळे. पण तंबाखूचे भाव कमी-जास्त होत म्हणून भाव कमी झाल्यास अधिक तंबाखू ते मागूं लागलें. तेव्हां यांतील कायद्याची निश्चित भूमिका कळावी म्हणून एक कसोटीचा खटला मुद्दाम चालविला गेला. या खटल्यांत हेन्रीचे वडील हेच स्वतः न्यायाधीश असून त्यांनीं धर्मगुरूंच्या बाजूनें निकाल

* * * * * *

दिला होता. नाहीं म्हणावयास ज्यूरीनें कराची रक्कम निश्चित केली होती. याचवेळीं हेन्री प्रतिवादीची म्हणजे लोकांची बाजू मांडावयास उभा राहिला. खटल्याची गंमत पाहण्यासाठीं कितीतरी पाद्री लोक कोर्टांत जमले होते. पण फक्त एका तासांत त्यांना फजीत पावून कोर्टांतून पळ काढावा लागला.

कारण, हेन्रीनें त्यांच्यावर न भूतो न भविष्यति असा हल्ला चढविला आणि त्यांना सळो की पळो करून सोडलें. त्यानें मुळीं ‘ मूले कुठार: ’ या न्यायानें धार्मिक कायद्यांच्या मुळावरच घाव घातला. त्यानें गर्जून सांगितलें कीं, या कायद्यामुळें व्हर्जिनियाच्या स्वतंत्र नागरिकांचा ब्रिटिश राजवटीकडून अधिक्षेप होत होता. त्याच्या अमोघ वक्तृत्वामुळें खुद्द न्यायमूर्ति भयचकित झाले आणि ज्यूरीनें वादीला एक पेनीची रक्कम बहाल केली. कोर्टांत जमलेल्या प्रेक्षकांनीं हेन्रीला अक्षरश: डोक्यावरून उचलून नेलें.

पुढच्या वर्षीं तो व्हर्जिनिया वसाहतीच्या विधानसभेंत निवडला गेला. या निवडणुकीनंतर अवघ्या नऊ दिवसांनीं पार्लमेंटनें वसाहतींना लागू केलेल्या स्टॅम्प ॲक्टच्या प्रती अमेरिकेंत येऊन पोचल्या. त्या कायद्यान्वयें संरक्षणखर्च म्हणून वर्तमानपत्रें, पुस्तकें, पंचांगें, तसेंच कायदेशीर कागदपत्रें, सर्वांवर भरभक्कम कर लादला गेला होता. या कायद्याविरुद्ध हेन्रीनें आवाज उठविला. तो म्हणाला, “ वसाहतींतले लोकहि स्वतंत्र आहेत. त्यांच्यावर त्यांच्या संमतिशिवाय कुठलाहि कर लादणें म्हणजे मॅग्नाचार्टा या ब्रिटिश राजानें आपल्या प्रजेला दिलेल्या सनदेंतील तत्त्वांचा भंग होय. ” सभागृहांत एका मागोमाग एक ठराव मांडून याच तत्त्वाचें त्यानें प्रतिपादन केलें आणि वर असेंहि सांगितलें कीं, व्हर्जिनियाच्या लोकसभेवर इंग्लिश पार्लमेंटचा कुठलाहि अधिकार नसून ती संपूर्णपणें स्वतंत्र आहे.

पुढें नांवारूपास आलेले त्याचे सहकारी जॉर्ज वॉशिंग्टन आणि थॉमस रूझवेल्ट हेदेखील चकित होऊन पण कौतुकानें हेन्रीचा वक्तृत्व-

★ ★ ★

घोष सभागृहांत बसून ऐकत असतील. आपल्या भाषणाच्या अखरीस हेन्री उच्च स्वरांत म्हणाला, " सीझरला ब्रूटस् भेटला, पहिल्या चार्लेसची क्रॉम्वेलशी गांठ पडली आणि आतां तिसरा जॉर्ज—" आणि एवढेंच बोलून तो थोडा थांबला. तेवढ्यांत " राजद्रोह राजद्रोह " अशी सभागृहांत हाकाटी झाली. आपलें अपुरें वाक्य पुरें करीत हेन्री म्हणाला, " तिसरा जॉर्ज या उदाहरणावरून शहाणपण शिकेल काय? " आणि जातां जातां त्यानें अखेरचा फटका मारला. तो म्हणाला, " हा जर राजद्रोह असेल तर जास्तींत जास्त राजद्रोही बना. "

लोकक्षोभाच्या वादळांत लोकसभेनें हेन्रीचे ठराव पसार केले. दुसरे दिवशीं व्हर्जिनियाच्या गव्हर्नरनें लोकसभेच्या वृत्तांतामधून हा ठराव काढून टाकावयास लावला. पण तत्पूर्वींच त्याच्या प्रती सर्वत्र वांटल्या गेल्या होत्या. हा अहवाल त्याकाळीं अत्यंत भयंकर समजला गेल्यामुळें त्याचा प्रसारहि गुप्त रीतीनें पण अत्यंत जलद होऊन जनतेमध्यें एक नव्या आशेची ज्योत प्रज्ज्वलित झाली. परिणामीं पार्लमेंटनें माघार घेऊन स्टॅम्प अॅक्ट रद्द केला.

पुन्हा ज्यावेळीं लोकसभेची बैठक भरली तेव्हां हेन्रीचें वजन गव्हर्नरपेक्षांहि वाढलें होतें आणि तो त्याचा मोठेपणा पुढेंहि कायम राहिला. ब्रिटिशांनीं लादलेल्या कायद्यांना त्यानें सतत विरोध केला. वसाहतींत ठेवलेल्या सैन्याच्या खर्चाकरतां बसवलेला कर, चहा, कागद, रंग, कांचसामान इत्यादींवरील आयात कर यांना त्यानें कडाडून विरोध केला. खुद्द इंग्लंडमध्येंदेखील पिट आणि बर्क सारख्या नामवंतांची सहानुभूति त्यानें मिळविली पण व्हर्जिनियाच्या गव्हर्नरनें मात्र हेन्रीचा इतका धसका घेतला कीं, त्यानें विधानसभाच बरखास्त करून टाकली.

पण तापट डोक्याचे हे बंडखोर एवढ्यानें माघार घेणार नव्हते. व्हर्जिनियाची राजधानी जें विल्यम्स्बर्ग शहर त्याच्या रस्त्यांतून ते मिरवणुकीनें रॅले टॅव्हर्न नांवाच्या मद्यपानगृहांत शिरले आणि त्याचीं

★ ★ ★ ★ ★ ★

दारें बंद करून त्यांनीं विधानसेभेचें कामकाज पुढें चालविलें. ही बैठक अधिकृत नसली तरी ऐतिहासिक महत्त्वाची ठरली. कारण, तिनेंच पुढें इतिहास घडविला. त्या ठिकाणीं 'अपोलो रूम' नांवाच्या सुंदर दालनांत थॉमस जेफर्सन, रिचर्ड हेन्री ली, फ्रान्सिस लाईट-फूट ली, डॅब्ने कार, पीटन रॅन्डॉल, जॉर्ज मेसन यांनी हेन्रीसमवेत अमेरिकेस स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या शपथा घेतल्या. त्या काळीं ते 'भयंकर' शब्द दारें बंद करूनच त्यांना उच्चारतां आले. पण त्याच शौर्यशाली उद्‌गारांनीं एका स्वतंत्र देशाचें नवें निशाण फडकावलें. कारण, या बंडखोर लोकांनाच पुढला उज्ज्वल भविष्यकाल दिसत होता. पॅट्रिक हेन्री हा सर्वांचा अग्रणी होता आणि 'त्याच्यामुळेंच आमची एकी अभंग राहिली' असें जेफर्सननें म्हटलें आहे.

आणि या एकतेच्या भावनेचीच स्वातंत्र्यलढ्यांत गरज होती. कारण, कुठल्याहि एका वसाहतीला प्रबळ साम्राज्यसत्तेशीं यशस्वी सामना देणें अशक्य होतें. एकीच्या बळावरच राजा आणि पार्लमेन्ट यांना ते नमवूं शकले असते. म्हणूनच त्यांनीं १७७४ सालीं फिलाडेल्फिया येथें सर्व वसाहतींची कॉन्टिनेन्टल काँग्रेस ही परिषद भरविली. या परिषदेंत "फॉरवर्डमेन" या नांवाने प्रसिद्ध असलेले पॅट्रिक हेन्री-सारखे आघाडीचे बंडखोर तर होतेच पण शिवाय जॉर्ज वॉशिंग्टन सारखे सनातनी मनोवृत्तीचे स्वातंत्र्यवादीहि होते. या व्हर्जिनियन स्वातंत्र्यवाद्यांची त्या ठिकाणीं न्यू इंग्लंड वसाहतींतील देशभक्तांशीं भेट झाली. या व्हर्जिनियन चळवळ्यांविषयीं जॉन ॲडॅम्स आपल्या दैनंदिनींत लिहितो, "ही मंडळी अत्यंत तळमळीची आणि निष्ठावान होती. पण यांपैकीं फक्त पॅट्रिक हेन्रीलाच एकूण परिस्थितीची आणि त्यांतील धोक्याची सुस्पष्ट जाणीव असून तो त्यानें धैर्यानें पत्करला होता."

परिषदेचें उद्‌घाटन करतांना, मतभेद विसरून केवळ देशभक्तीच्या भावनेनें प्रेरित होऊन मतदान करण्याबद्दल त्यानें सभासदांना आवा-

* * *

हन केलें. स्वत:विषयीं तो म्हणाला, " मी व्हर्जिनियन नसून अमेरिकन आहे." विसर्जित होण्यापूर्वी या परिषदेनें ब्रिटनला जें निवेदन पाठविलें त्याविषयीं लॉर्ड चॅथॅम म्हणाला, " हें निवेदन इतके सयुक्तिक आणि सार्थ आहे कीं, याच्या विरुद्ध जाऊन अमेरिकन लोकांवर गुलामगिरी लादण्याचा प्रयत्न केला तर त्याचे परिणाम भयावह होतील." परिषदेनंतर बहुतेक प्रतिनिधी समाधानानें घरोघर गेले. पण हेन्रीला पक्कें वाटत होतें कीं, इंग्लंड परिषदेच्या ठरावांची दखल घेणार नाहीं आणि मग इंग्लंड विरुद्ध युद्ध करणेंच वसाहतींना भाग पडेल.

हेन्रीचें अनुमान किती बरोबर होतें याचा प्रत्यय लवकरच आला. बोस्टन बंदरांत इंग्लिश सैनिक आणि तिथले नागरिक यांची चांगलीच जुंपली आणि खवळलेल्या लोकांनीं बोटीवरून उतरवलेला चहा समुद्रस्तृप्यंतु केला. तेव्हां इंग्लंडनें वसाहतीच्या व्यापाराची गळचेपी करावयाचें ठरविलें. लगेच हेन्रीनें व्हर्जिनियाचें स्वतंत्र सैन्य उभें केलें. हेन्रीवर इंग्रजांचा इतका राग होता कीं, पश्चात्तापदग्ध बंडखोरांना माफी द्यावी असा ठराव जेव्हां पार्लमेन्टमध्यें आला तेव्हां त्यांतून पॅट्रिक हेन्रीचें नांव मुद्दाम वगळण्यांत आलें होतें.

१७७५ च्या मार्चमध्यें रिचमंड येथें सेन्ट जॉर्जच्या चर्चमध्यें अपुऱ्या जागेंत व्हर्जिनिया परिषद बोलाविली गेली. कारण विल्यम्सबर्ग या राजधानीचे गांवीं ती भरविणें धोक्याचें होते. त्या ठिकाणीं हेन्री बोलावयास उठला तेव्हां तर ती जागा फारच अपुरी भासूं लागली. देशापुढें युद्ध कीं शांतता असा सवाल होता. युद्ध करावयाचें म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. इंग्रजांचें सैन्य कसलेलें आणि कवायती होतें आणि आरमारहि सुसज्ज होतें. उलट बंडखोरांचें सैनिक शिकाऊ होतें. त्यांच्याजवळ पुरेशीं शस्त्रास्त्रें नव्हतीं आणि मच्छीमारी बोटी हेंच त्यांचें आरमार होतें. म्हणून युद्धाऐवजीं शांततेचा तह पत्करला तर त्यांचें भांडवल, संपत्ति आणि प्राण सुरक्षित राहणार होते.

★ ★ ★ ★ ★ ★

म्हणूनच या परिषदेला आलेले प्रतिनिधीसुद्धां कांहींसें साशंकच होते. हेन्रीनें बोलावयास सुरुवात केली तीहि दबत दबकतच.

पण ती त्याची नेहमींचीच युक्ति होती. सुरुवातीस अगदीं हळूं थांबत थांबत आपल्या मनाबद्दल आपलीच खात्री नसल्यासारखें दाखवीत तो बोलूं लागला. आणि मग त्याचा आवाज चढूं लागला आणि थोडयाच वेळांत तें सगळे चर्च दणाणून गेलें. " आपणापैकीं कांहीं प्रतिनिधी ' शांतता, शांतता ' अशी हाकाटी करतील पण जीव जगविण्यासाठीं किंवा शांतता मिळविण्यासाठीं आपण गुलामगिरी पत्करावी इतक्या मोलाच्या त्या गोष्टी आहेत काय ?" भाषणाच्या अखेरीस तो म्हणाला, " परमेश्वरा, इतर कोणी कांहींहि करोत मला मात्र विपरीत बुद्धि देऊं नकोस. मला एक स्वातंत्र्य तरी दे नाहींतर मरण तरी दे !"

हेन्रीचे ज्वलंत शब्द ऐकून परिषदेंतील प्रतिनिधींचीं मनें पेटून निघालीं आणि त्यांनीं ब्रिटिशांशीं लढण्यासाठीं घोडदळ, पायदळ आणि तोफखाना यांच्या पलटणी उभारण्याचें ठरविलें. तेवढ्यांत बातमी आली कीं, गव्हर्नर डनमोरनें विल्यम्स्बर्ग येथील दारूचा सांठा ताब्यांत घेतला. लगोलग सैन्याची एक तुकडी घेऊन हेन्री राजधानी-वर चालून गेला तेव्हां डनमोर घाबरून गेला व त्यानें एका युद्धनौकेचा आश्रय केला. दुसरे दिवशीं त्यानें पॅट्रिक हेन्री याच्या हद्दपारीचा हुकूम काढला.

पण तोंपर्यंत हेन्री दुसऱ्या कॉन्टिनेन्टल कॉंग्रेसला गेलेला होता. त्या ठिकाणीं जॉर्ज वॉशिंग्टनची मुख्य सेनापति म्हणून निवड झाली होती. हेन्रीनेंहि स्वतः एका तुकडीचें आधिपत्य स्वीकारलें. विशेष म्हणजे त्याची पत्नी त्यावेळीं मृत्युशय्येवर होती. पण हेन्री हा केवळ ' परोपदेशे पांडित्य ' करणारा वक्ता नव्हता. तो लढवय्याहि होता. आणि म्हणूनच त्याला डावलून वॉशिंग्टनला सरसेनापति केलें, तेव्हां ती गोष्ट त्याच्या जिव्हारीं लागली आणि त्यानें आवरलें नसतें तर

★ ★ ★

त्याच्या सैनिकांनीं वॉशिंग्टनविरुद्ध बंडहि केलें असतें. पण त्यानें फक्त आपल्या जागचा राजीनामा दिला आणि त्याच्या मित्रांच्या इच्छे-प्रमाणें व्हर्जिनियाची राज्यघटना तयार करण्यांत त्यानें प्रामुख्यानें भाग घेतला आणि लगोलग तो व्हर्जिनियाचा पहिला गव्हर्नर म्हणून निवडला गेला.

हेन्री हा फार मोठा लढवय्या नसेल. पण जॉर्ज रोजर्स क्लार्क याला अमेरिकेच्या पश्चिमेकडील भागांत गुप्तपणें मोहिमेवर पाठवून तो भाग त्यानें नव्या अमेरिकन राज्यांना मिळवून दिला. तो मोठा मुत्सद्दी नसेल पण वॉशिंग्टनविरुद्ध मत्सरी अधिकाऱ्यांनीं केलेला कट त्यानेंच उघडकीस आणला. तो कट्टर देशभक्त होता आणि प्रामाणिक होता हीच त्याची थोरवी ! युद्धाची भयानक अशीं सात वर्षें संपलीं आणि विजय मिळाला खरा, पण तिथपासूनच कसोटीचा काळ सुरू झाला. त्यावेळीं अमेरिकेच्या डोक्यावर डोंगराएवढें कर्ज होतें. हेन्रीच्या आवाजांत आपला आवाज मिळवून युद्धाच्या घोषणा अनेकांनीं केल्या, पण त्यासाठीं द्यावी लागणारी किंमत द्यायची मात्र तत्परता माणसेंच काय पण राज्येंसुद्धां दाखवीनात. युद्धांत लढ-णाऱ्यांचे थकलेले पगार देऊन टाकून जनतेनें आपल्या शब्दांतून मुक्त व्हावें असें एखाद्या राजकारणी पुरुषानें त्या काळीं म्हणणें आत्म-घातकीपणाचें निश्चितच होतें. पण हेन्रीनें तें मनोधैर्य दाखविलें. आणि ब्रिटिशांनीं कधींहि बसवला नव्हता एवढा कर व्हर्जिनियांतील नाग-रिकांवर बसवला-नव्हे त्यांना खुषीनें तो पत्करावयास लावला—आणि तरीहि तो पांच वेळां व्हर्जिनियाचा गव्हर्नर म्हणून निवडून आला.

अशा रीतीनें हेन्रीचें नांव अमेरिकेच्या इतिहासांत चिरस्थायी झालें; त्याची देशभक्ति आणि लौकिक यांबद्दल कुणालाहि शंका घेतां येणार नाहीं; तरीदेखील एका बाबतींत मात्र आपल्या इतर कांहीं देशबांधवांप्रमाणें तो राष्ट्रीय एकतेचा राजरस्ता सोडून प्रादेशिक अभिमानाच्या आडरानांत शिरला हेंहि तितकेंच खरें. सगळ्या

* * * * * *

वसाहतींचें एकसूत्रीकरण करण्यासाठीं बोलावलेल्या घटनापरिषदेंत प्रतिनिधि म्हणून भाग घेण्याचें त्यानें नाकारलें. १७८७ सालीं संयुक्त संस्थानांची घटना तयार होऊन ती निरनिराळ्या राज्यांकडे त्यांच्या मान्यतेसाठीं सादर केली गेली, तेव्हां व्हर्जिनियाच्या विधान-सभेंत पॅट्रिक हेन्रीनें तिला कडाडून विरोध केला. तेवीस दिवसपर्यंत तो रोज पांच पांच वेळी बोलूनसुद्धां विरोध करीत होता. कारण मध्य वर्ति सत्ता राज्याचे हक्क आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांवर आक्रमण करील अशी त्याला भीति वाटत होती.

पण इतकेंहि करून व्हर्जिनिया आणि इतर राज्यें ह्यांनीं जेव्हां ती घटना पत्करली, तेव्हां हेन्रीनें तितक्याच दिलदारपणानें तिच्याविषयीं निष्ठा व्यक्त केली. पण मध्यवर्ति सत्तेविषयींची त्याची भीति कधींच नष्ट झाली नाहीं. वॉशिंग्टननें मध्यवर्ति सत्ता बळकट व्हावी म्हणून स्वतःचें सगळें बळ खर्ची घातलें तर हेन्रीनें तिला तितकाच विरोध केला. मध्यवर्ति सरकारांत त्यानें मंत्रिमंडळांत यावें किंवा सरन्यायाधीश व्हावें अगर इच्छा असल्यास फ्रान्सला राजनैतिक वकील म्हणून जावें यांसाठीं अध्यक्ष वॉशिंग्टननें खटपट केली. पण मध्यवर्ति राज-वटींत कुठलेंहि अधिकारपद पत्करण्याचें हेन्रीनें नाकारलें.

व्यक्तिस्वातंत्र्यासाठीं मात्र तो सदैव झगडत राहिला. अमेरिकेच्या त्यावेळच्या घटनेंत एक मोठी उणीव राहून गेली आहे असें त्याचेंच नव्हें, तर जेफर्सन, मेसन वगैरे अनेकांचें मत होतें. आणि ही उणीव कायम राहिली तर ज्यासाठीं क्रांतिकारक लढले आणि त्यांनीं मरणहि पत्करलें, तीं तत्त्वेंच पायदळीं तुडविलीं जाणार होतीं. भाषणस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, खटल्यावांचून तुरुंगांत न पाठविण्याची हमी, शस्त्र-धारणाचा हक्क, ज्यूरीसमोर खटला चालवला जाण्याचा हक्क, सरकार आणि सरकारी अधिकारी यांवर टीका करण्याचा हक्क आणि धर्ममताचें स्वातंत्र्य इत्यादि गोष्टींवर कळत न कळत मध्यवर्ति सत्तेनें

* * *

आक्रमण न करावें म्हणून एक नागरिक हक्काचा कायदा करवून घेणें आवश्यक होतें.

आणि या विषयांवरील आपल्या मतांचें प्रतिपादन तो सतत करीत राहिला आणि त्याला श्रोतेहि मिळत राहिले. परिणामीं लोकमताचा जोर होऊन राज्यघटनेमध्यें ' पहिल्या दहा दुरुस्त्या ' करण्यांत आल्या. प्रत्येक सामान्य अमेरिकन नागरिकाला या दुरुस्त्यांचा अभिमान वाटत आलेला आहे. त्यावेळीं हेन्री कॉंग्रेसमध्यें नसल्यामुळें या कायद्याचा मसुदा त्याचा नसला तरी त्याच्या जागृततेमुळेंच अमेरिकन नागरिकांना आजचें व्यक्तिस्वातंत्र्य लाभलेलें आहे.

साठ वर्षें पूर्ण होण्यापूर्वींच तो जराजर्जर दिसूं लागला होता. सतत तीस वर्षें केलेल्या अतोनात परिश्रमांमुळें तो थकून गेला होता. एखाद्या खेड्यांत जाऊन निवांत आयुष्य घालवावें एवढीच त्याची इच्छा उरली होती. त्याचें जेफर्सनबरोबरचें स्नेहसंबंध संपलें होतें. आणि तो वॉशिंग्टनचा विरोधक बनला होता तरीसुद्धां सामान्य जनतेला तो पूजनीयच वाटत होता. पण त्यालाहि पुढारीपणाचा कंटाळा आला होता. म्हणून तो व्हर्जिनियांतील ' रेड हिल ' या रम्य ठिकाणीं आपल्या मुलांनातवंडांत जाऊन राहिला.

पॅट्रिक हेन्रीप्रमाणेंच जॉर्ज वॉशिग्टनहि निवृत्त होऊन मौन्ट व्हर्नॉन येथे शांततेनें ऊर्वरित आयुष्य घालवीत होता. वयानें तो हेन्रीपेक्षां मोठा होता आणि देशासाठीं आपण जास्तीत जास्त कष्ट केले आहेत हें समाधान लाभल्यामुळें अशा शांततापूर्ण जीवनावर त्याचा हक्कहि होता पण त्याला मन:स्वास्थ्य मिळणें अशक्य झालें, कारण देशांत फुटीरपणा वाढत आहे असें त्याला दिसूं लागलें. देशांतला एक पक्ष इंग्लंडबरोबर युद्ध पुकारावें असें ओरडून सांगत होता तर दुसरा फ्रान्सबरोबर युद्ध करावें असें कंठशोष करून सांगत होता. फ्रान्समध्यें सुप्रसिद्ध रक्तलांछित क्रांतीनंतरचें वेड अजून संपलेलें नव्हतें आणि फ्रान्सचे हस्तक अमेरिकन जनतेला उघड उघड इंग्लंड–फ्रान्सच्या

* * * * * *

झगड्यांत भाग घ्यायला सांगत होते. मध्यवर्ती सत्तेचे विरोधक आपल्या राज्यांत, मध्यवर्ती कायद्यांची सत्ता राज्यांतील विधानसभा संपुष्टांत आणूं शकतात असे ठराव मंजूर करून घेत होते. राज्यांच्या आणि संघराज्यांच्या निवडणुका जवळ आल्या होत्या आणि या नवजात राष्ट्रांत एकीपेक्षां बेकीचीच प्रवृत्ति वाढूं लागली होती. व्हर्जिनियास सुरुवातीपासून स्वातंत्र्य लढ्यांत विशेष महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें होतें आणि आतांदेखील संघराज्याचीं शकलें पडण्याची भीति व्हर्जिनियांतील असंतोषामुळेंच अधिक वाटत होती. आणि व्हर्जिनिया काय करणार हें पॅट्रिक हेन्रीवर अवलंबून होतें. म्हणूनच वॉशिंग्टननें त्याला लांबलचक पत्र लिहून देशाला वांचविण्याची विनंति केली :—

...अशा आणीबाणीच्यावेळीं हा पक्ष राज्यकारभाराच्या गाड्याला खीळ घालायचा प्रयत्न करीत आहे. राष्ट्राच्या संरक्षणासाठीं कराव्या लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीला तो पद्धतशीर विरोध करींत असून त्याचा परिणाम अखेरीस हें संघराज्य मोडून पडण्यांत होणार आहे. अशावेळीं या देशाला वांचविण्याचें सामर्थ्य असलेल्या तुमच्यासारख्या थोर पुरुषानें घरीं बसून कसें चालेल ? मला आशा आहे कीं, येत्या निवडणुकींत तुम्ही भाग घ्याल आणि तुमच्या वजनानें सध्यांच्या धोकादायक फुटीर प्रवृत्तींना विरोध करण्यासाठीं लोकसभेंत प्रविष्ट व्हाल. या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं तुम्ही तेथें असावें अशी माझी इच्छा आहे.

आपला नम्र आणि
आज्ञाधारक सेवक,
**जॉर्ज वॉशिंग्टन.**

पॅट्रिक हेन्रीनें जेव्हां हें पत्र वाचलें, तेव्हां रणदुंदुभी ऐकल्यासारखा तो जागा झाला. आजहि आपण हें पाहतोंच कीं, शांततेच्या रक्षणासाठीं अलिप्ततावादी राष्ट्रांनाहि एकत्र यावें लागतें. हेन्रीला हें पक्कें

* * *

माहीत होतें कीं, व्यक्ती आणि राज्यें यांचे हक्क कितीहि बहुमोल असले तरी संघराज्याच्या एकीपेक्षां तें अधिक महत्त्वाचें खास नव्हते.

आगामी निवडणुकींत आपण स्वतः व्हर्जिनियाच्या विधानसभेसाठीं उभे राहणार असून एकतावादी जॉन मार्शलला संघराज्याच्या सेनेट-साठीं पाठिंबा देणार आहोंत असें हेन्रीनें जाहीर केलें. आजारी आणि थकलेल्या स्थितींतच वीस मैल दूर असलेल्या शार्लोट गांवीं तो भाषणा-साठीं गेला. तो पुन्हा राजकारणाच्या आखाड्यांत उतरत आहे ही बातमी हां हां म्हणतां सर्वत्र पसरली. आणि सर्व भागांतून त्याला पाहण्यासाठीं लोकांचे थवे लोटले. वयोमानानें तो थकलेला दिसत होता. त्याचा चिंताक्रांत चेहरा फिकट दिसत होता. नेहमींप्रमाणें त्यानें थांबत थांबत बोलावयास सुरुवात केली. आज त्याला आपल्या तोंडानेंच पूर्वी मांडलेल्या मतांच्या विरुद्ध बोलावयाचे होतें. त्यानें आज-पर्यंत संघराज्याच्या अधिकाऱ्यांना व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होईल म्हणून विरोध केला होता. पण आज तें संघराज्यच नष्ट होऊन सगळेंच स्वातंत्र्य परकीयांच्या पायदळीं तुडविलें जाण्याची वेळ आली होती. पण यावेळीं देखील तो कधीं नव्हे इतका ताठ उभा राहिला. तो एक जुना लढवय्या होता याची आठवण त्याचेकडे पाहून होत होती. त्याचा आवाज जसजसा मोकळा होऊं लागला तसतसा त्याचा आवेश वाढूं लागला.

"कुठल्याहि राज्याला संघराज्याच्या कायद्याचें बंधनकारकत्व तपासून पाहण्याचा अधिकार नाहीं. लक्षांत ठेवा कीं, वस्तूचा कुठ-लाहि भाग संपूर्ण वस्तूपेक्षां मोठा असूंच शकत नाहीं.

"मला प्रश्न विचारला जातो कीं, जनतेला सरकारचा छळ असह्य होतो तेव्हां काय करावें ? त्याला माझें उत्तर हेंच कीं तें राज्य जन-तेनें उलथून पाडावें. पण--हें केव्हां ? तर ज्यावेळीं तुमच्या हक्कावर होणारें अतिक्रमण दुसऱ्या कुठल्याहि मार्गानें दूर करतां येणार नाहीं तेव्हांच हें लक्षांत ठेवा. कारण, तुम्ही जर आहे ही परिस्थिति बदला-

★ ★ ★ ★ ★ ★

यला गेलांत तर लोकांच्या प्रातिनिधिक सत्तेला तुम्हांला कदाचित् कायमचाच रामराम ठोकावा लागेल ! "

त्याचें भाषण संपलें आणि तो अक्षरशः खालीं कोसळत असतांना जयजयकार करणाऱ्या जमावानें त्याला आपल्या बाहूंवर सांवरलें आणि उचलून नेऊन एका कोचावर निजवलें, त्याच्या शेजारीं उभा असलेला एकजण म्हणाला, " हां सूर्य खरोखरी संपूर्ण तेजानें तळपत असतांनाच मावळला आहे."

पुढल्या महिन्यांत हेन्री आणि मार्शल दोघेहि निवडून आले. पण विधानसभेची बैठक सुरू होण्यापूर्वींच, ज्याची तलवार सदैव निष्कलंक राहिली असा शूर पुरुष जॉर्ज वॉशिंग्टन आणि ज्याची जिव्हा तलवारीसारखी तळपली असा पॅट्रिक हेन्री हे दोघेहि देशभक्त स्वर्गवासी झाले होते.

● ● ●



# डॅनिएल बून

६

## दिव्यत्वाची इथें प्रचीति

अमेरिकेतील जंगलांत शिकारीसाठीं किंवा नवीन प्रदेशांत वसाहतींसाठीं जाणाऱ्या लोकांचा विख्यात मार्गदर्शक डॅनिअल बून ह्यांच्याबद्दल तो ऐन तारुण्यांत असतांनाच अनेक दंतकथा प्रसृत झाल्या होत्या. महाकवि लॉर्ड बायरन यानेंहि त्याच्यावर एक कविता केली. त्याची कीर्ति रेड इंडियन्सना मारणारा, काळविटांची शिकार करण्यांत पटाईत आणि कून या प्राण्याच्या केंसाळ कातड्याची टोपी घालणारा तो एक बैरागी होता अशी होती. पण वास्तविक पाहतां एकाहि रेड इंडियनला त्यानें अकारण मारलें नाहीं. वन्य पशूंचेंहि संरक्षण केलें पाहिजे असेंहि त्याचें मत होतें. आणि तो एकलकोंडा तर नव्हताच नव्हता. आपल्या भाईबंदांसाठीं जंगलें निर्भय करण्याकडे त्यानें आयुष्यभर लक्ष पुरविलें. त्याची अशी भोळीभाबडी श्रद्धा होती कीं, अमेरिकेची पश्चिमेकडची सीमा वाढविण्यासाठींच परमेश्वरानें त्याला जन्माला घातलें होतें. परमेश्वराची खरोखरीच तशी इच्छा होती असें

* * * * * *

मानलें तर मात्र ती इच्छा पार पाडण्याकरतां बूनइतका दुसरा कोणीहि झटला नाहीं.

परंतु वयाच्या पस्तीस वर्षांपर्यंत आपल्या शेताची नांगरणी खुरपणी करणारा तो एक सर्वसामान्य शेतकरी होता. खूप कष्ट उपसूनहि त्याचा कर्जबाजारीपणा कमी न होतां वाढतच होता. नजरेंत मुळींच न भरणारा, मध्यम उंचीचा, हळू बोलणारा, भिडस्त स्वभावाचा हा इसम मानेवर राठ केंसांची गांठ बांधून असे आणि डोक्यावर रुंद कांठाची जुनीपुराणी टोपी घालीत असे. त्याचे निळी झांक असलेले घारे डोळे वैशिष्ट्यपूर्ण होते आणि ते बघितले म्हणजे त्याची दृष्टि एखाद्या दूरवरच्या ध्येयाकडे लागली आहे असें वाटे. समृद्ध भूमि, पुष्ट गुराढोरांचे कळप व उत्तम घोडे ज्यांच्यापाशी आहेत असे सुखी-लोक आणि त्यांना रहाण्यासाठीं हिरवळीनें आच्छादलेलें एक राज्य असें स्वप्न पाहण्यांत तो मश्गुल असे.

वास्तविक केंटकी हा प्रांत अमेरिकेंतल्या फारशी माहिती नस-लेल्या मुलुखाच्याहि पलिकडे होता. आणि त्या ठिकाणीं अमेरिकन लोकांना जायला इंग्लंडच्या तिसऱ्या जॉर्जनें बंदी केली होती. शक्य झालें तर तो विकून टाकून चांगला नफा करावा नाहींतर मर्जींतल्या उमरावांना देऊन त्यांचा भलेपणा मिळवावा अशी राजाची इच्छा होती. आतांपर्यंत फारच थोडे लोक तेथें जाऊन सुखरूप परत आले होते. जे परत आले ते तिथल्या काळ्याभोर मखमलीप्रमाणें असलेल्या जमिनीचें वर्णन करीत, नजर पोंचत नाहीं इतक्या दूरवर पसरलेल्या कुरणांचें वर्णन करीत. तेथें मोठालीं अणकुचीदार शिंगें असणारें काळ-वीट होते आणि हरणें, वीव्हर्स आणि रानम्हशी हे प्राणी तर असंख्य होते असें ते सांगत असत. रेडइंडियन लोकांचीसुद्धां त्या ठिकाणीं कायम वस्ती नसून जंगलाच्याहि पलिकडे पसरलेलें तें एक निर्जन साम्राज्यच होतें.

* * *

बून वर्षानुवर्षें त्या जंगलांत अधिकाधिक आंत जाऊन शिकार करीत होता. पण त्याच्या मनांत त्या मना केलेल्या राज्यांत जायचें होतें. रेड इंडियन्स त्या भागाला ' केन्टक ' म्हणजे ' कुरणांचा प्रदेश . असें म्हणत असत. इ. स. १७६९ सालीं मे महिन्यांतल्या एका पहांटे' बून त्या राज्यांत जाण्यास निघाला. त्याच्याबरोबर त्याचा भाऊ स्क्वायर, मेहुणा जॉन स्टुअर्ट, जॉन फिन्ले नांवाचा वाटाड्या आणि तीन नोकर होते. हे सात बहाद्दर शिकारी नवें जग जिंकायला निघाले खरे पण मागें आपली बायको रेबेका, खंडीभर मुलें आणि संसाराच्य, सगळ्या काळज्या तशाच टाकून बून निघाला होता. साहस आणि संशोधन यांना वाव, नवीन जमिनीची मालकी व कदाचित् संपत्ति या गोष्टी मिळायची फक्त आशा असली तरी स्वातंत्र्य, पदोपदीं लपलेला धोका आणि घुवडाचें भयानक ओरडणें हें मात्र हमखास मिळणार होतें.

तो रस्ता ब्लू रिज या पर्वतांच्या रांगा ओलांडून टेनेसीमधल्या वटागा वसाहतीपर्यंत गला होता. ही वस्ती म्हणजें गोऱ्या वस्तीचें शेवटचें नाकें होतें. तेथून पुढें लागणारा रस्ता बूनलाहि भयानक वाटला. त्या ठिकाणीं अणकुचीदार कडे असलेल्या पर्वतांच्या रांगा, खोल दऱ्यांतून भयानक आवाज करीत धांवणाऱ्या बेफाम नद्या, दाटीवाटीनें वाढलेले घनदाट वृक्ष आणि त्यांना बांधणाऱ्या दोरखंडासारख्या जाड वेली सर्वत्र पसरल्या होत्या. अशा या या जंगलांतून जाणारा एकमेव रस्ता म्हणजे Warrior 's Path हा होय. आदिवासी इंडियन लोकांचा हा गुप्तमार्ग असला तरी गोऱ्या लोकांना त्याची भयंकर भीति वाटे. याच रस्त्यानें ते लोक आपल्या वस्तीवर येत आणि कैदी पळवून नेत. या रस्त्याचा आदी आणि अंत म्हणजे एक गूढच होतें. त्याचा माग काढूं लागावें तों, तो एकदम डोंगरकड्याशीं संपलेला असे आणि अनवधानानें चालल्यास मृत्यूशींच गांठ पडे. म्हणूनच ज्या-वेळीं हे सात शिकारी या मार्गाला लागले त्यावेळीं त्यांच्या मागें फक्त

* * * * * *

वृक्षांच्या घनदाट फांद्या राहिल्या आणि एखाद्या हिरव्या कळीच्या दरवाजानें बंद व्हावें आणि पलिकडचें कांहीं दिसूं नये त्याप्रमाणें त्या वृक्षराजींनीं त्यांना अदृश्य केलें.

रेबेका बूनला पुन्हा दोन वर्षांनीं आपल्या नवऱ्याचें दर्शन झालें आणि तो परत आला तोहि रिक्त हस्तानें. रेड इंडियन लोकांनीं त्याचे घोडे चोरले होते आणि त्यानें शिकार करून आणलेलीं केसाळ कातडींहि त्यांनीं लुटलीं होतीं. पण त्यानें आपल्या प्राणाइतकीच मौल्यवान् अशी एक कला हस्तगत केली होती. त्या जंगलांत अनेक वेळां एकाकी हिंडावें आणि रहावें लागल्यामुळें, रेड इंडियन लोकांप्रमाणेंच त्या प्रदेशांत हिंडावें कसें आणि तरीहि सुखरूप कसें रहावें हें तो शिकला होता. पडलेलीं झाडें, दरडी, ओढे, यांतून रस्ता काढतांना आपली खूण कशी मागें राहूं देऊं नये आणि एका रस्त्यानें चालतां चालतां मध्येंच रानद्राक्षांच्या वेलींना धरून झोंका घेऊन दुसऱ्या रस्त्याला कसें लागावें ही कलाहि त्यानें हस्तगत केली होती. जेथें तो वस्तीला राही तेथपर्यंत आलेला माग तो झाडाचीं पानें टाकून नाहींसा करी. एके ठिकाणीं शेकोटी पेटवून वस्तीचा आभास निर्माण करून गुपचूप दुसरीकडे जाऊन वेताच्या हिंदोळ्यावर स्वस्थपणें झोंप घेई. रेड इंडियनांच्या जीवनाचा त्यानें सखोल अभ्यास केला असल्यानें त्यांच्या मनांतील विचार तर तो अचूक समजून घेईच पण त्यांचें पुढचें पाऊलहि त्याला आधींच कळत असे. अशा निष्ठुर लोकांशींसुद्धां त्यानें मैत्रीचे संबंध जोडले. जंगलाला आग लावण्याइतकेंच एकाहि रेडइंडियनला अकारण मारणें त्याच्या दृष्टीनें वेडेपणाचें होतें.

आपल्या बंदुकीपेक्षां तो सावधगिरी आणि धोरणीपणा यांचाच जास्त उपयोग करीत असे. एकदां तो गाढ झोंपेंत असतांना या लोकांनीं त्याला वेढलें. तेव्हां उठून बसतांक्षणींच परिस्थिति लक्षांत घेऊन त्यानें एक युक्ति योजिली. तो त्यांचेकडे पाहून मनमोकळेपणानें

★ ★ ★

हंसला आणि त्यांच्याशीं त्यानें प्रेमानें हस्तांदोलन केलें. त्याच्याजवळ बीव्हरची शिकार नाहीं किंवा हातावर रक्ताची खूण नाहीं हें पाहतांच त्यांनीं त्याला सुखरूप जाऊं दिलें. एकदां तर शत्रु पाठलाग करीत असतांना तो एका तुटलेल्या कड्यापाशीं येऊन पोचला आणि शत्रू पहात असतांनाच त्यानें शुगर मॅपल वृक्षाच्या शेंड्यावर उडी मारली. त्याला अशा चापल्यानें पुढें गेलेला पाहून त्याच्या शत्रूनेंसुद्धां त्याचा पाठलाग थांबवून टाळ्या वाजवून त्याचें कौतुक केलें.

या खेपेला तो केन्टकीमधून जीव घेऊन निसटला. पण 'पुन्हा कधीं परत आलास तर याद राख' असा रेड इंडियन लोकांनीं त्याला दम दिला होता. कारण, बूनला त्या प्रदेशाची आतां खूपच माहिती झाली होती. त्याला वॉरिअर्स पाथ अचूक माहीत झाला होता. केन्टकीच्या तोंडाशीं १३०० फूट उंचीचा कंबरलन्ड पर्वत आहे त्याच्या एका खिडींतून वॉरिअर्स पाथकडे जाणारा रस्ता होता, तोहि बूनला माहीत झाला होता. तिथल्या जंगली म्हशी किंवा गवे यांचे कळप, गुहा, निर्झर, यांचा पूर्ण परिचय त्याला झाला होता. तसेंच मोठाल्या कुरणांत कांहीं विशिष्ट ठिकाणीं गुरें मीठ चाटीत, तीं नैसर्गिक ठिकाणेंहि त्यानें पाहिलीं होतीं. पण हें सगळें गुप्त ज्ञान घेऊन तो निसटला असला तरी तो परतला तर आपल्या बाणांनीं त्याचा निकाल लावण्यासाठीं तिथले आदिवासी डूक धरून बसले होते.

त्यानें सांगितलेल्या गोष्टी ऐकून कॅरोलिना वसाहतींतल्या लोकांना केन्टकींत जायची ओढ लागली होती. इ. स. १७५० मध्यें डॅनियलच्या आईवडिलांनीं त्याला वयाच्या सोळाव्या वर्षीं पेन्सिल्व्हानियांतल्या एका शेतांतून कॅरोलिना येथें आणलें होतें. पेन्सिल्व्हानियांतील रीडिंग गांवाजवळच्या त्या शेतांत तो जन्मला होता, वाढला होता आणि शिकार करायलाहि शिकला होता. आपल्याला वाहून आणतां येणार नाहीं एवढी हरणांची शिकार तो एका वेळीं आसपासच्या जंगलांत करीत असे. पण कॅरोलिनांत आल्यानंतर शिकार

★ ★ ★ ★ ★ ★

संपली होती आणि कितीहि श्रम केले तरी नाना तऱ्हेच्या करांतून शेतकऱ्याची सुटका कधींच होत नसे. तुम्ही जरी जमिनीचे मालक झालांत तरीसुद्धां कर देण्यांतून तुमची कधींच मुक्तता होत नसे. आणि याला कंटाळून ऑक्टोबर १७७३ मध्यें डॅनियल बूनच्या नेतृत्वाखालीं सहा कुटुंबें केन्टकीला जायला निघालीं.

याच गोष्टीची तो कधींपासून वाट पहात होता. आणि त्यानें आपलेंहि कुटुंब बरोबर घेतलें होतें. ते वॉरिअर्स पाथवर असतांना तो खूप पुढें आणि बाकी मंडळी रांगेनें मागें जात होती. तीं झोपेंत असतांना चेरोकी इंडियनांनीं झोपलेल्या मंडळीवर हल्ला केला आणि त्या चाळीस लोकांपैकीं बरेचसे कापून काढले. बूनचा सतरा वर्षांचा मुलगा जेम्स याला त्यांनीं जिवंत धरून नेला आणि हालहाल करून मारला.

या हल्ल्यामुळें धास्तावलेले ते प्रवासी कॅरोलिनाला परत आले. पण येवढ्यामुळें केन्टकीमध्यें वसाहतीसाठीं जाणाऱ्या प्रवाशांचा लोंढा कांहीं थांबला नाहीं. आपण पादाक्रांत केलेली जमीन आपल्याकडे रहावी म्हणून ते मोजणीदारांना बरोबर नेत असत. बूनचा मित्र जिम हॅरॉड यानें तर एक चांगली वसाहतहि स्थापन केली होती.

त्या सुमारास एका गोऱ्या माणसानें शॉनी ह्या मित्रत्वाने वागणाऱ्या जमातीचा पुढारी लोगन याच्या कुटुंबियांचा खून केला. त्या बरोबर ते लोक एकाएकीं इतके चवताळले कीं, ॲलेघनी पर्वताच्या पश्चिमेकडील प्रत्येक गोऱ्या माणसाचा जीव धोक्यांत आला. त्या लोकांना समज देण्यासाठीं डॅनियल बून फक्त एक माणूस बरोबर घेऊन वॉरिअर पाथवरून निघाला. रॉक कॅसल आणि केन्टकीमधील नद्या ओलांडून तो ओहिओ नदीपर्यंत पोहोंचला. वाटेंत शॉनी टोळीवाल्यांनीं ठिकठिकाणीं नावा ठेवून त्याचा रस्ता रोखला होता. पण त्यांना दम भरीत तो तसाच पुढें निघाला. एकसष्ट दिवसांत जंगलां-

* * *

तून मार्ग काढीत त्यानें ८०० मैल अंतर कापलें. आणि शेकडों लोकांचे जीव वांचवून तो वटागा वसाहतीवर परत आला.

स्वतःच्या मुलाच्या खुनामुळेंसुद्धां त्यानें सूडाची भावना भडकूं दिली नाहीं. तर उलट आपला निर्धार पक्का केला. उलट त्या सलणाऱ्या दुःखामुळें बायबलमध्यें म्हटल्याप्रमाणें ' जंगलांतून मार्ग काढायचाच ' असें त्यानें ठरविलें.

त्याला पाहिजे असलेली दुसरी संधि त्याला कर्नल रिचर्ड हेन्डरसनच्या योजनेमुळें मिळाली. हेन्डरसननें चेरोकी जमातीला १०,००० पौंड किंमतीचा माल देऊं करून सर्व केन्टकी प्रदेश विकत घेण्याचा बेत आंखला. आणि तेथें जाणारी वाट तयार करण्याचें काम बूनकडे सोंपविलें. इ. स. १७७५ मधल्या मार्च महिन्यांतील एका सुप्रभातीं तीस तरबेज कुऱ्हाडी चालवणारे सशस्त्र स्वार घेऊन तो होल्स्टन नदीवर लॉंग आयलन्ड या ठिकाणीं हुकुमाची वाट पहात उभा होता. एवढ्यांत हेन्डरसनकडून निरोप आला कीं, चेरोकी जमातीबरोबरचा सौदा पुरा झाला आहे. त्याबरोबर बूननें आपल्या कुऱ्हाडीनें पहिला घाव घालून रस्ता करण्यासाठीं जंगल तोडावयास प्रारंभ केला.

एका आठवड्यांत डॅनियलच्या लोकांनीं कंबरलॅन्ड खिंडीपर्यंतचा शंभर मैलांहून अधिक लांबीचा मार्ग मोकळा केला. त्याच्या पलीकडे दाट जंगल पसरलें होतें. तोंपर्यंत कुणाहि सुसंस्कृत माणसाचा त्यांत प्रवेश झाला नसावा. त्यांच्यावर रेड इंडियन्सनीं हल्ला केला आणि चार माणसें मारलीं. त्यामुळें कांहीं भित्रे लोक माघारीं पळाले. पण बून आणि त्याचे बेडर सहकारी तसेच पुढें निघाले. दलदलीचे ठिकाणीं पूल बांधणें, वाटेंत पडलेले ओंडके उचलून बाजूला टाकणें, रानवेली तोडून रस्ता मोकळा करणें, शत्रूंना लपण्यासारख्या जागा हुडकून त्या साफ करणें यासारखीं कामें त्यांना करावीं लागत. पण त्याचे श्रम वायां गेले नाहींत. आणखी एक आठवड्यानंतर मनाला भुरळ पाड-

* * * * * *

णारीं केन्टकीची गवताळ मैदानें त्यांच्या नजरेस पडलीं आणि त्यांच्या श्रमाचें सार्थक झालें.

जंगलांतून काढलेली ही पायवाटच भविष्यकाळीं अमेरिकेचा एक राजमार्ग व्हावयाचा होता. याच मार्गानें बैलगाड्या, घोडागाड्या यांतून किंवा पायींदेखील कॅरोलिना, व्हर्जिनिया आणि मेरीलॅन्ड येथले रहिवासी आपल्या साऱ्या जंगम मालमत्तेसह याच रस्त्यानें निळ्या गवताच्या प्रदेशांत वसाहतीला येणार होते आणि डॅनियल बूनचें निळ्या कुरणांच्या राज्याचें स्वप्न साकार होणार होतें. अमेरिकेंतील एक मुत्सद्दी व वक्ता हेन्री क्ले यानें जेव्हां या जागेंत पाऊल टाकलें, तेव्हां दोन लाख वसाहतवाले तिथें स्थिर झालेले त्याला आढळले. त्यावेळीं त्यानें कानाला हात लावून कांहींतरी दूरचें आपण ऐकत आहों असा बहाणा केला. लोकांनीं त्याला कुतूहलानें विचारलें, " तूं कसली चाहूल घेत आहेस ?" तेव्हां तो म्हणाला, " आणखी जे लक्षाधिक लोक येथें येणार आहेत त्यांची मला आतांच चाहूल लागली आहे. "

त्यावेळीं केन्टकी ही आघाडीची सरहद्द होती. तिच्या भोंवतीं मनांत वैमनस्य बाळगणाऱ्या आदिवासी जमातींचा वेढा होता. केन्टकी नदीच्या एका वळणावर, बूननें तयार केलेल्या रस्त्याच्या शेवटाशीं त्यानें 'बून्स बरो' नांवाची वसाहत स्थापन केली. एल्म आणि सिकॅमोर यांचे गगनचुंबी वृक्ष तेथें वाढले होते आणि भोंवतालच्या कुरणांत म्हशी चरत असत. वीस वर्षांहून अधिक काळपर्यंत नव्या प्रदेशाच्या शोधासाठीं झगडल्यानंतर विश्रांति घेण्यासाठीं निर्वेध व त्यांतल्या त्यांत सुरक्षित अशी ती जागा होती. आणि अधिक पुढें जाऊन वसाहत करूं इच्छिणारांना तो एक पूर्व तयारीसाठीं उत्तम टप्पा होता. 'बून्स बरो' पासून हांकेच्या अंतरावर शत्रूचा तळ होता. आणि त्या दृष्टीनें ती जागा धोक्याचीच होती. एकदां डॅनियल बूनची पंधरा वर्षांची मुलगी जेमिमा आपल्या दोन मैत्रिणींसह एका होडींत

* * *

बसून नदी ओलांडून गेली. तिथें त्या तिघींना शॉनी टोळीवाल्यांनीं पकडलें आणि आंत दूर जंगलांत नेलें. पण त्या मुली घाबरल्या असल्या तरी चतुर होत्या. म्हणून त्यांनीं शत्रू फरपटत नेत असतां बुटाच्या टांचा घासून, कपडे फाडून त्यांच्या चिंध्या वाटेत टाकून आणि झाडांच्या फांद्या मोडून माग निर्माण केला. त्या मागावर त्या मुलींच्या कांहीं मित्रांना घेऊन डॅनियल दोन दिवस हिंडत होता. मुलींची सुटका करणें जरा अवघडच होतें. कारण शत्रूला थोडी जरी चाहूल लागली असती तर त्यांनीं मुलींचीं खांडोळींच केलीं असतीं. पण त्याच्या आवडत्या Tick Licker बंदुकीनें त्याला कधींच दगा दिला नाहीं. त्यानें नेम धरतांच त्याच्या साथीदारांनींहि किरण साधून एकदम गोळ्या झाडल्या आणि पुढच्याच क्षणीं मुक्त झालेली जेमिमा धांवत येऊन आपल्या बापाला बिलगली.

कांहीं महिन्यानंतर बून स्वतःच शत्रूच्या वेढ्यांत सांपडून जखमी झाला असतां जेमिमानें गोळ्यांच्या वर्षावांतून पुढें जाऊन बापाला उचलून आणलें. यावेळीं 'बून्स बरो' हें क्रांतियुद्धांतील एक रणक्षेत्र बनलें होतें. ब्रिटिशांनीं शॉनी टोळ्यांना शस्त्रें पुरविलीं होतीं आणि मारलेल्या प्रत्येक अमेरिकनागणिक बक्षीस लावलें होतें. त्या लहानशा वसाहतीचे लोक बूनला आपला त्राता मानीत म्हणूनच त्याला आणि त्याच्या तीस अनुयायांना शत्रूंनीं जेव्हां पकडलें तेव्हां तो मारला गेला असें समजून त्यांनीं फार शोक केला.

डॅनियल आणि त्याचे सहकारी यांना शत्रूनें ओहियो प्रांतांतील अगदीं आंत असलेल्या आपल्या खेड्यांत नेलें. तेथें बूननें आपलें शॉनी टोळीवाल्यांवर फार प्रेम असल्याचा बहाणा केला. त्यांच्याशीं खूप गप्पा रंगवून आपला छळ किंवा हत्या करण्यापासून त्यांना परावृत्त केलें. त्यांचा प्रमुख ब्लॅकफिश याची त्यानें अशी समजूत करून दिली कीं, 'बून्स बरो'च्या संरक्षणासाठीं तेथें फार मोठी फौज ठेवलेली होती. हळुंहळूं ते त्याला आपल्यापैकींच एक समजूं लागले. नंतर

* * * * * *

त्यानें एक घोडा, बंदूक आणि दारूगोळा चोरला आणि तो तिथून निसटला. चार दिवसांत तो १६० मैल अंतर कापून 'बून्स बरो' येथें पोंचला. तो गांवांत शिरतो न शिरतो तोंच तटबंदीवर शत्रूचा एक सुरा येऊन आदळला. शत्रूचा भयानक वेढा त्या शहराला पडल्याची ती खूणच होती.

कित्येक दिवसपर्यंत त्यानें आपलें नवे 'आप्त' जे शॉनी टोळीवाले त्यांच्याशीं तहाचीं बोलणीं चालविलीं. हीं बोलणीं चालू असतांच एक दिवस ब्लॅकफिशनें त्यांच्यावर अचानक हल्ला चढविला. त्याबरोबर बून व त्याचे सहकारी गांवाकडे पळाले. आंत सुखरूप येतां यावें म्हणून शत्रूंवर गोळ्यांचा मारा मात्र त्यांनीं चालू ठेवला.

ब्लॅक फिशनें आतां निरनिराळे डावपेंच सुरू केले. कधीं तो रात्रीं हल्ला करी. कधीं एकाएकीं धडक देई तर कधीं माघार घेतल्याचें नाटक करी. 'बून्स बरो'नें हल्ल्याला तोंड दिलें पण शत्रु संख्येनें पुष्कळच जास्त होता. अमेरिकन लोक कमी आहेत हें शत्रूच्या लक्षांत येऊं नये म्हणून बायकांना पुरुषांचे पोषाख घालून त्या शत्रूच्या नजरेस पुन:पुन्हा याव्यात म्हणून त्यांना तटाच्या आसपास तो फिरवूं लागला. शत्रूनें गांवांत येण्यासाठीं भुयार खणायला सुरुवात केली तर बूनहि बाहेर पडण्यासाठीं दुसरे भुयार खणूं लागला. गांवांतलें पाणी संपलें, दारुगोळा संपुष्टांत येऊं लागला. प्रत्येक दिवस शेवटचा असें वाटूं लागलें. एका रात्रीं प्रचंड वादळ सुरू झालें आणि त्याचा फायदा घेऊन ब्लॅकफिश रात्रीं शहरावर हल्ला करणार असें वाटूं लागलें. पण उजाडल्यावर प्रत्यक्षांत अमेरिकेचा राष्ट्रध्वजच पर्वतश्रेणींच्या पश्चिमेला डौलानें वाऱ्यावर फडकतांना आढळला. अमेरिकेचें त्या पर्वतापलिकडे फडकणारें हें पहिलें विजयी निशाण होय.

यावेळीं जरी बून्सबरो वांचलें तरी क्रांतियुद्धाच्या अखेरीसहि केन्टकी वसाहतीचा धोका टळलेला नव्हता. एकदां वैर पत्करल्यावर सहजासहजीं वैर विसरणारी शॉनी जमात नव्हती. डॅनियलचा आणखी

* * *

एक मुलगा या वैरास बळी पडला आणि तो खुद्द आपल्या पित्याच्या बाहुपाशांत मरण मावला. तरीदेखील बून शांतपणें वागला आणि त्याचें वजन शत्रूवरहि पडलें, म्हणूनच शत्रूच्या ताब्यांतील कितीतरी गोऱ्या कैद्यांना तो सोडवूं शकला.

पुढे शत्रूचें वैर जरी अखेरचें गाडलें गेलें तरीदेखील बूनच्या मनाला शांतता लाभली नाहीं. कारण आपल्या, बांधवांना त्यानें जरी एक हिरवें साम्राज्य मिळवून दिलें होतें तरीदेखील त्याचें दारिद्र्य त्याच्या कीर्ति इतकेंच मोठें होतें. केन्टकीनें त्याच्या सन्मानार्थ एका परगण्यालाच त्याचें नांव दिलें पण त्या पाठोपाठच दोन नवीन ग्रामाधिकाऱ्यांनीं त्याची दहा हजार एकर जमीन करापोटीं विकून टाकली. केन्टकीकडे येणारा रस्ता तयार करण्याबद्दल हेण्डरसननें त्याला जमीन दिली होती, पण पुढें चेरोकी जमातीकडून केन्टकी विकत घेण्याचा हेण्डरसनला कायदेशीर अधिकारच नाहीं असें ठरविण्यांत आल्यामुळें बूनचाहि जमिनीवरील हक्क नष्ट व्हावा हें ओघानेंच आलें. त्यानें तयार केलेल्या रस्त्यानेंच अनेक वसाहतवाले, सटोडिये, वकील आणि अधिकारी केन्टकींत आले आणि त्यांनी येतांना कुणालाहि समजणार नाहींत असें फायदेशीर दस्तैवज आणलें आणि त्यांच्या आधारावर बून रहात होता त्या झोपडीखालील जमिनीवर देखील आपला हक्क ते सांगूं लागले.

अशा तऱ्हेनें शॉनी जमातसुद्धां ज्याला घाबरत असे, तो बून आपल्याच देशबांधवांकडून नागवला गेला. शिवाय तो झोपला असतांना ५०,००० डॉलर्सची त्याच्या जवळची रक्कम चोरीस गेली. ती रक्कमसुद्धां लोकांनीं त्यांच्यासाठीं जमिनी घेण्याकरतां त्याच्या स्वाधीन केली होती. ती रक्कम फेडण्याकरतां तो वीस वर्षे राबला. त्यानें जमीन मोजणीदार म्हणून काम केलें; दारूचें दुकान काढलें; पुन्हा शेती करून पाहिली; दुकानदारी केली. ऑटर व बीव्हर पकडण्याकरितां सांपळे लावले; जंगली घोडे पकडले. हरणें आणि अस्वलें

* * * * * *

यांची शिकार केली. सर्व कांहीं केलें. प्रत्येक वर्षी हिरवळीचें राज्य अधिकाधिक श्रीमंत होत होतें. पण बून पतिपत्नी, त्यांच्या दोन कन्या आणि त्यांचे पति मात्र एका खुराड्यांत दिवस कंठीत होते.

म्हणून वयाच्या सत्तराव्या वर्षी आणखी एखादा नवीन मुलुख शोधावा असें त्याला वाटूं लागलें. स्पॅनिश मिसुरीमध्यें त्याची कीर्ति आधींच पोचली होती. आणि तो जेव्हां सेन्ट लुई या छोट्या वसाहतीपाशीं आला तेव्हां स्पॅनिश अधिकाऱ्यांनी त्याचें स्वागत केलें आणि फॅमे ओसेज भागांत ८५०० एकर जमिनीचें मालकीपत्र त्याच्या स्वाधीन केलें. तो तेथें वस्ती करतो न करतो तोंच केन्टकीतून शेंकडों लोक त्याच्या मागोमाग तेथें आले. कारण त्यांना माहीत होतें कीं, बून जाईल तेथें समृद्धि व भरभराट होणार व मग आपलें फावणार. खरें म्हणजे त्याचीं मुलें, नातवंडें नातेवाईक अशींच परिवारांतील सुमारें चारशें मंडळी तेथें येऊन त्याच्याजवळ राहिली. पण त्याला जेमतेम त्यांतल्या शंभरांचीच ओळख पटणें शक्य झालें.

अशी रीतीनें त्याचे अखेरचे दिवस सुखांत गेले. स्पॅनिश अधिकाऱ्यांनीं सिनॉर बून (श्री. बून) यांस त्या जिल्ह्याचे न्यायाधिकारी नेमलें आणि तो आपली न्यायकचेरी आपल्या झोपडीजवळ एका मोठ्या एल्म वृक्षाखालीं भरवीत असे. त्या वृक्षाला न्यायवृक्ष म्हणून लोक ओळखूं लागले. १८१२ च्या युद्धांत त्यानें स्वयंसेवक म्हणन नांव नोंदवलें. पण तो ७८ वर्षांचा असल्यानें त्यास सैनिकांत भरती केलें नाहीं म्हणून तो वैतागला. वयाच्या ८० व्या वर्षी रॉकी पर्वत आणि कॅलिफोर्निया पर्यंतसुद्धां जाण्यासाठीं तो तळमळत होता. लाँग, पाईक आणि ॲस्टोरियन्स यांच्या मोहिमा त्याच्या डोळ्यांसमोरून जातांना त्यानें पाहिल्या. त्यांतले धष्टपुष्ट तरुण लोक नव्या नव्या साहसांसाठीं मार्गक्रमण करीत होते. कांहीं वेळां नदीच्या कांठीं उभा राहून आपल्या आवडत्या Tick Licker बंदुकीशीं खेळतांना तो त्यांना दिसे आणि ते त्याला ओळखतहि असत. ते गेल्यानंतर ते

* * *

जात तिकडे तो शून्य दृष्टीनें पहात राही.

अखेरचे दिवस नातवंडांना अंगाखांद्यावर घेऊन त्यांचें कौतुक करण्यांत ऑटर व बीव्हरच्या पाळलेल्या पिल्लांबरोबर खेळण्यांत आणि करमणुकीकरतां सुतारकी करण्यांत तो घालवीत होता. घरांत लागणाऱ्या उपयुक्त वस्तू तो करीत असे. शिवाय स्वत:साठीं दफनाची पेटी करून ठेवायची आणि मग ती कुणातरी गरीब माणसाच्या शवाकरितां दान करायची असें नेहमीं घडत असे. त्यानें केलेल्या शेंवटच्या पेटीच्या वेळीं मात्र असें घडलें नाहीं. इ. स. १८२० मध्यें त्याला शांतपणें मृत्यु आला आणि त्यानें स्वत: बनवलेल्या चेरी लांकडाच्या दफनपेटींत त्याला घालून त्याच्या पत्नीशेंजारीं पुरण्यांत आलें. ती जागा म्हणजे जेथून, झाडांतून पश्चिमेकडे सहज पाहतां येईल असा एक उंचवटा होता.

पण केन्टकीला त्याच्या मृत्यूनंतर पंचवीस वर्षांनीं त्याचें महत्त्व कळलें. त्याचें थडगें उकरुन काढून त्याचा मृण्मय देह केन्टकीच्या राजधानीला सन्मानानें नेण्यांत आला. तेथें चार घोडयांच्या काळ्या गाडींतून त्याची प्रेतयात्रा स्मशानापर्यंत नेण्यांत आली. वक्त्यांनीं गौरवपूर्ण शब्दात त्याच्या थडग्यासमोर त्याला श्रद्धांजलि वाहिली. नंतर त्याला थडग्यांत पुरण्यांत आलें आणि थडग्यावर इटलीमधील संगमरवरी दगडांत त्याच्या जीवनांतील प्रसंगांचीं चित्रें कोरून स्मारक उभारण्यांत आलें.

खरा डॅनियल बून मात्र येथें विश्रांति घेत नसून जेथें जेथें शौर्य आणि स्वातंत्र्य यांचें वास्तव्य असेल तेथें तेथें त्याच्या अस्तित्वाची प्रचीति येईल. तो हरणांबरोबर बागडत आहे आणि उगवत्या सूर्यप्रकाशांत भरून राहिला आहे. हॅरोड्स्बर्ग येथील ज्या तरुणांचें रक्त बाटानमध्यें सांडलें तें त्याचेंच होय. निळ्या कुरणांवर वाहणारा तो वारा आहे. तो निबिड जंगलांत घुसणाऱ्या सूर्य किरणांसारखा असून अमेरिकन लोकांच्या जीवन मार्गावरचा प्रकाशझोत आहे.

● ● ●



# रॉबर्ट लुई स्टीव्हनसन ७

## गुप्तधनाच्या मार्गावर

लिफ्टची घंटा एकसारखी खणखणत होती. पण लिफ्टची ने–आण करणाऱ्या त्या मुलाचें तिकडे लक्ष नव्हतें. तो हातांतल्या पुस्तकांत गढला होता. तेव्हां वरच्या मजल्यावर लिफ्टची वाट पहात उभा असलेला तो इसम संतापून जिन्यानें वरून धाडधाड खालीं आला आणि त्यानें त्या मुलाच्या हातांतलें पुस्तक हिसकावून घेतलें. पण लगेच त्याने तें पुस्तक त्या मुलाला परत दिलें आणि म्हटलें, " तूं खुशाल हें पुस्तक वाचत बस. तें वाचतांना तुला त्रास द्यायची बुद्धि कुणालाहि न होवो. " तें विख्यात पुस्तक **ट्रेझर आयलंड** हें होतें आणि तें परत देणारा गृहस्थ त्याचा लेखक खुद्द स्टीव्हन्सन् हाच होता.

रॉबर्ट लुई स्टीव्हन्सन या शूर पुरुषाचें सारें आयुष्य विलक्षण प्रसंगांनीं परिपूर्ण असें होतें. आणि उभ्या आयुष्यांत त्याची साहसाची आवड कायम राहिली होती हें त्याचें वैशिष्टय होतें. त्याच्या जीवित

* * *

नौकेवर मृत्युरूपी चांच्यानें अनेकदां चढाई केली होती आणि पुनः पुनः त्याच्याशीं हातघाईची लढाई करून स्टीव्हन्सननें त्याला परतवून लावलें होतें. आयुष्यांत कांहींतरी प्रत्यक्ष कर्तृत्व गाजवावें ही ज्याची तळमळ होती तो प्रत्यक्ष जीवनांत पंगु होऊन बसला होता आणि त्याला जरी तलवार परजतां आली नाहीं तरी लेखणी उचलून त्यानें जीवन-कलहांतून मार्ग काढला. प्रेयसी जिंकली आणि सप्तसमुद्रांचा प्रवास करून एक खरेंखुरें रत्नद्वीप हस्तगत केलें. मनुष्य जीं सुंदर स्वप्नें रंगवितो तींच जीवनांतल्या कटु वस्तुस्थितीपेक्षां अधिक टिकाऊ असतात हें त्यानें स्वतःच्या उदाहरणानें सिद्ध केलें. सामान्यपणें आपली समजूत स्वप्नें हीं क्षणभंगुर असतात अशी असते. स्कॉटलंड-मधल्या कडक हिवाळ्यांत खोकल्यानें एकीकडे वेजार होत असतांहि त्यानें अनेक उत्कट स्वप्नें रंगविलीं आणि तीं पुढें खरीं करून दाखविलीं. कुठेंतरी दूर असणाऱ्या बेटांची कल्पना करून तो त्यांचे नकाशे तयार करी आणि त्यांचा रोमहर्षक इतिहासहि लिहून काढी.

रॉबर्टचें लहानपणचें घरांतलें नांव लेविस असें होतें. तो एकुलता एक असून सारखा आजारी असे. पण अंथरुणांत पडल्या पडल्या सैनिकांची कवाईत कल्पनेनें पहात असे. त्याचा जन्म १८५० सालीं एडिन्बर्ग येथें झाला होता. आणि एडिन्बर्गच्या घरांतल्या खिडकींत उभा राहून लॉरी नांवाचा नगरपालिकेचा नोकर शिडी घेऊन रस्त्यांतले दिवे लावावयास येई त्याची तो वाट बघत बसे. त्याचा अत्यंत आवडता खेळ म्हणजे सैनिक किंवा खलाशी बनणें आणि अत्यंत नावडती गोष्ट म्हणजे थंडीच्या दिवसांत अंधाऱ्या रात्रीं वाऱ्याचें घोंघावणें ऐकणें, अंथरुणांत तळमळत पडून राहून त्याला तें घोंघावणें ऐकावें लागे आणि 'थंड अंधाऱ्या रात्रीं हा वारा पिसाटासारखा कां धांवत सुटतो' असा त्याला प्रश्न पडे.

अशा या जीवनाच्या प्रारंभींच्या आठवणीं 'ए चाइल्डस गार्डन ऑफ व्हर्सेस' (A child's Garden of Verses) हें पुस्तक निर्माण झालें.



...ठी ग्रंथ सं...
अनुक्रम ३८५२२ दि: ...

* * * * * *

हें कवितांचें पुस्तक मुलांचें अत्यंत आवडतें आहे. त्याचे आई वडील आणि आवडती दाई 'कम्मी' यांना या एकाकी वाढणाऱ्या लहान मुलाच्या भवितव्याची नेहमींच काळजी वाटे. स्टीव्हन्सन कुटुंब खूप श्रीमंत असूनहि मुलाला क्षय होईल कीं काय—कारण तो रोग आनुवंशिक होता—याची त्यांना सदैव भीति वाटे. तें कुटुंब अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचें असल्यानें त्यांनीं प्रॉर्थना, भक्तिगीतें आणि उपदेश यांचा त्याच्यावर मारा करून त्यालाहि सश्रद्ध बनवायचा प्रयत्न केला होता. त्यांतच भर म्हणून कीं काय त्याची दाई 'कम्मी' त्याला बागुलबुवाच्या अथवा स्कॉटिश इतिहासांतील रक्तलांछित लढायांच्या कथा सांगे. त्यांतून पुढे 'किडनॅप्ड' (kidnapped) या पुस्तकाची निर्मिती झाली. त्याचे वडील दीपगृहें बांधीत असत. त्यामुळें लेविस मोठा होतांच त्याला वडिलांच्याबरोबर स्कॉटलंडचा भयानक समुद्रकिनारा पहायला मिळाला आणि त्यांतूनच पुढें त्याच्या पुस्तकांत किनाऱ्यावर आपटून फुटणाऱ्या लाटा व वादळें यांचीं सुंदर वर्णनें उतरलीं; आणि तें साहजिकच नाहीं कां? कलावंत हा नाहीं तरी आपल्या अनुभवाच्या लोखंडाचेंच प्रतिभारूपी परिसाच्या सहाय्यानें शंभर नंबरी सोनें बनवीत असतो.

पण अशा कलावंताची ओळख निर्मितीपूर्व काळांत क्वचितच पटते. त्याचा पिता थॉमस स्टीव्हन्सन् याला वाटत होतें कीं, आपला मुलगा आपल्यासारखाच इंजिनिअर होईल. पण लेविसला त्या शास्त्रांतलें 'श्री ग' सुद्धां कळत नव्हतें आणि तें कळावें अशी त्याची इच्छाहि नव्हती. त्याचीं उपजतबुद्धि अत्यंत समर्थ असली तरी तो विद्वान् खास नव्हता. त्याला फ्रेंच भाषेचें व्याकरण यथातथाच येत असलें तरी ती भाषा मात्र तो सफाईनें बोलत असे. शाळेला बुट्टी मारून तो एडिन्बर्गभर हिंडून सर्व प्रकारच्या सामाजिक थरांची व मानवी स्वभावाची ओळख करून घेत असे. सदासर्वकाळ तो पानेंच्या पानें उत्तम मजकूर लिहून काढी, पण त्यांतलें स्पेलींग मात्र चुकीचें असे.

★ ★ ★

एडिंबर्ग विश्वविद्यालयांतले त्याचे इंग्रजीचे प्राध्यापक मात्र त्याच्या वह्या फेंकून देऊन म्हणत कीं, त्याला कधींहि लेखक होतां येणार नव्हतें.

स्टीव्हन्सनचे वडील वाङ्मयाकडे एक शिष्टमान्य छंद म्हणून पहात, व्यवसाय म्हणून नव्हे. आपल्या मुलाला इंजिनियर व्हायचें नसलें तर त्यानें वकील व्हावें असें त्यांना वाटे. लेव्हिसनेंहि आज्ञाधारकपणें कायद्याच्या पुस्तकांत डोकें खुपसलें. पण त्याचा जन्मजात वैरी जो क्षय त्यानें त्याला चैन पडूं द्यावयाचें नाहीं असें ठरवलें होतें. क्षयाचीं पूर्वचिन्हें, त्याची छाती तपासणाऱ्या डॉक्टरना स्वच्छ दिसूं लागलीं. ताबडतोब त्याला रिव्हियेरा या समुद्रकांठच्या सूर्यप्रकाश भरपूर मिळणाऱ्या प्रदेशांत पाठविण्यांत आले. या रक्तपिपासू वैऱ्यानें लेव्हिसचा जो पिच्छा पुरवला तो सतत वीस वर्षे आणि त्यानें त्याला किमान २०,००० मैल पळवलें.

वकिलीची परीक्षा पास होऊन त्यानें सनद काढली पण प्रत्यक्ष वकिली अशी थोडीच केली. याचवेळीं त्याचे सुंदर ललितलेख नामवंत मासिकांतून प्रसिद्ध होऊं लागले होते. त्याच्या पित्यालाहि त्याचा याबद्दल अभिमान वाटून त्यानें त्याला १००० पौंडांची देणगी दिली होती. पण स्कॉटलंडमध्यें सन्मानानें मांड मांडून रहावें हें त्याच्या भाग्यांत नव्हतें. अशक्त प्रकृति आणि खणखणीत मन दोन्ही या कामीं त्याला प्रतिकूल ठरलीं. डार्विन, व्हॉल्टेअर, वॉल्ट व्हिट्मन या क्रांतिकारक विचारवंतांच्या वाचन मननानें, त्याला लहानपणीं मिळालेलें शिक्षण कोतें वाटूं लागलें. 'जग हें केवढें तरी विशाल असून त्यांत अभ्यास करण्याजोग्या खूप गोष्टी आहेत' असें तो म्हणूं लागला. अत्यंत प्रामाणिक असल्यामुळें तो आपल्या वडिलांशीं वाद घालूं लागला तेव्हां आपला मुलगा आध्यात्मिक दृष्टया पार वायां गेला असें त्यांना वाटूं लागलें. त्यालाहि घरांत रहाणें असह्य होऊं लागलें.

जन्मल्यापासूनच तो भटक्या प्रवृत्तीचा होता. तेव्हां घर सोडतांच

★ ★ ★ ★ ★ ★

त्यानें भ्रमंतीला सुरुवात केली. युरोपांतील कालव्यांमधून तो बोटीनें हिंडला तर गाढवावर बसून फ्रान्सचे डोंगर त्यानें पालथे घातले. प्रत्येक सफरीनंतर त्यानें एक पुस्तक लिहिलें. प्रत्येक पुस्तकावर स्टीव्हन्सनच्या व्यक्तिमत्वाची छाप होती. तसेंच त्यानें कांहीं पत्रें लिहिलीं त्यांखालीं फक्त त्याची R. L. S. हीं आद्याक्षरें आहेत. ही पत्रें खरोखरीच अद्वितीय आहेत. कुठेंहि भटकावें, रात्रीं वस्तीला एखाद्या मठांत नाहींतर वसतिगृहांत रहावें, पॅरीसचे रस्ते तुडवावेत आणि बॅरीझोनमधील कलाशिक्षण केंद्रें पहावीं असा आयुष्यक्रम चालू असतांनाच त्याच्या जीवनांतील एक महान् रोमहर्षक प्रसंग घडला; तो प्रेमांत पडला.

एका उन्हाळ्यांतल्या सायंकाळीं तो फाँटेन् ब्ल्यूच्या अरण्यांतल्या एका खाणावळींत आला. तिथें जमलेल्या पथिकांत त्याला फॅनी ओस्बोर्न ही अमेरिकन स्त्री भेटली. आणि दोघेहि प्रथम दर्शनीच एकमेकांच्या प्रेमपाशांत अडकलीं. फॅनीला दोन मुलें होतीं पण ती नवऱ्याला सोडून युरोपांत कायम रहावयासाठीं आली होती. त्याची बुद्धिमत्ता, स्थिर बसूं न देणारा स्वभाव, दरबारी सौजन्य असूनहि स्नेह जुळवण्याची हौस या गोष्टींनीं फॅनी मोहून गेली तर तिचें रूप व स्वभाव त्याला एकदम पसंत पडला.

पण प्रेम जमलें तरी लग्नगांठ शक्य असतेंच असें नाहीं. फॅनीनें जेव्हां अमेरिकेला परत जायचा निर्णय घेतला तेव्हां तिच्या दोन्ही मुलांना इसोबेला आणि लॉईड यांना आश्चर्य वाटलें. कारण तीं मुलें लहान असलीं तरी आपल्या आईबापांतील परस्परसंबंधाची त्यांना कल्पना होती. तिच्या गांवीं म्हणजे कॅलिफोर्नियांतील मॉन्टेरीस येथें परत आल्यानंतर फॅनीला कळून चुकलें कीं, तिची आणि तिच्या नवऱ्याची तडजोड होणें केवळ अशक्य होतें. इकडे लेविस आणि त्याचे वडील यांच्यांतील दुरावा तर या प्रकरणानें आणखीच वाढला.

अखेरीस सर्व विरोध डावलून जवळ पुरेसे पैसे नाहींत, प्रकृति धड

* * *

नाहीं अशा स्थितींतच तो महासागर ओलांडून अमेरिकेंत आपल्या प्रेयसीसाठीं आला आणि तेथें पोचल्यावरहि आगगाडीचा कंटाळवाणा प्रवास करून तो कॅलिफोर्नियांत पोचला तेव्हां अगदीं वाळलेला आणि थकलेला दिसत होता. लेविसच्या वडिलांनीं त्याचा संबंध तोडून टाकल्याचें कळूनहि फॅनीनें त्याला अव्हेरिलें नाहीं अगर ती घाबरली नाहीं.

प्रकृति सुधारावी म्हणून तो फॅनीसह उंच हवेच्या ठिकाणीं गेला. पण तेथें त्याच्यावर त्याचा इतके दिवस पाठलाग करणाऱ्या क्षयानें पहिला जोरदार हल्ला चढवला. त्यांतून फॅनीच्या शुश्रूषेनें तो कसा-बसा सांवरला. तेथून तो सॅनफ्रान्सिस्कोला येऊन कशीबशी गुजराण करूं लागला आणि फॅनी पतीपासून घटस्फोट मिळवायच्या खटपटीला लागली. त्यानें स्कॉटलन्डमधल्या आपल्या मित्राला आपलीं पुस्तकें विकून टाकण्याबद्दल कळवलें आहे ही बातमी त्याच्या पित्याला कळ-तांच त्या तापट परंतु कनवाळू वृद्धाचें हृदय द्रवलें आणि त्यानें मुलाला कळवलें कीं, मी तुला सालीना अडीचशें पौंड देत जाईन.

लेविस आणि फॅनी यांनीं फारसा गाजावाजा न करतां लग्न उर-कून घेतलें. त्यांचा मधुचंद्रहि त्यांच्या भटक्या जीवनास साजेशाच पद्धतीनें साजरा झाला. दोघेहि भटकतां भटकतां सिल्व्हरॅडो येथील निरुपयोगी म्हणून सोडून दिलेल्या रुप्याच्या खाणीवर जाऊन राहिले. पण तेवढ्यांत त्याच्या मातापित्यांनीं त्याला घरीं येण्याबद्दल लिहिलें म्हणून तो सपत्नीक स्कॉटलंडला घरीं गेला.

आतां एकत्र आलेले हे कुटुंबीय मोठ्या आनंदानें कालक्रमणा करीत होते. फॅनीबरोबर तिचा तेरा वर्षाचा मुलगा लॉईडहि त्या घरांत आला होता. घरीं आल्यानंतर एक वर्षानें लेविसच्या नव्या कादं-बरीचें वाचन रोज रात्रीं शेकोटीजवळ बसून प्रकरणशः होऊं लागलें. रोज त्यानें एक प्रकरण लिहावें व तें रात्रीं वाचून दाखवावें असा क्रम सुरू झाला. लॉईड तें अत्यंत तन्मयतेनें ऐकत बसे. 'ट्रेझर आयलंड'-

★ ★ ★ ★ ★ ★

मधला जिम हॉकिन्स मृत चांच्याच्या हातांतील नकाशा काढून घेत आहे, लाँग जॉन सिल्व्हर त्याचा पोपट खांद्यावर घेऊन चालला आहे, वगैरे प्रसंग ऐकतांना लॉईडचे डोळें विस्फारले जात आणि तोंड आश्चर्यातिरेकानें उघडे राही. 'या मजकुरानें जर मुलांना वेड लावलें नाहीं तर मुलें पार वायां गेलीं आहेत असेंच म्हटलें पाहिजे' असें लेविस मिस्किलपणानें हंसून म्हणे.

'ट्रेझर आयलंड' ही मुलांसाठीं आतांपर्यंत लिहिलीं गेलेली सर्वश्रेष्ठ साहस कथा आहे. ती वाचून पुरी झाली म्हणजे वाचणारा मुलगा उसासा सोडून विचारतो, 'ही तर वाचून झाली. अशी आणखी एखादी कादंबरी आहे काय ?' यांवर नकारार्थी उत्तर मिळालें कीं तो तीच पुन:पुन्हा वाचून काढतो. आणि नंतर प्रौढपणीं पुन्हा केव्हां-तरी ती आपल्या मुलांना वाचून दाखवतो आणि मिस्किलपणें हंसून म्हणतो. 'हिनं पोरांना झपाटलं बरं कां !'

आणि याचं कारण म्हणजे आजपर्यंत उच्च-भ्रू साहित्यिकांच्या मार्गदर्शनानें मार्ग चुकलेला स्टीव्हन्सन योग्य मार्गावर याच ठिकाणीं आला आहे. आपलें सामर्थ्य कशांत आहे तें त्याला कळलें आहे. त्यांनीं हें पुस्तक 'दर्जेदार' नाहीं म्हणून त्याची हेटाळणी केली पण स्टीव्ह-न्सन आतां त्या टीकेला किंमत द्यायला तयार नव्हता. पण कला-कृतीपासून मिळणारें खरें समाधान त्याला मिळालें होतें. वाचकांचें प्रेम त्याला लाभलें होते. कीर्ति आणि पैसाहि त्या पाठोपाठ आलीं. पण तीं अर्थात् मागाहूनच येतात. R. L. S. (स्टीव्हन्सन) म्हणतो, "कलावंताचें पहिलें कर्तव्य म्हणजे लोकांचें प्रेम संपादन करणें होय !" आणि त्यानें स्वत: तें कर्तव्य जितक्या मन:पूर्वक केलें तितकें इतर कोणीं क्वचितच केलें असेल.

वाचकांची उत्कंठा वाढवीत राहण्याचा गुण या कादंबरीइतका नसलेली पण अधिक सखोल अशी त्याची कादंबरी म्हणजे 'किडनॅ-प्ड' ही होय. या कादंबरींत 'ट्रेझर आयलंड'सारखी काल्पनिक भूमि

* * *

किंवा पात्रें नाहींत, तर तिच्यांत जुन्या स्कॉटलंडमधील एक जीवन-चित्रच रंगवलेलें आहे. तिच्यांतलें व्यक्तिदर्शनहि गहिरें आहे.

पण त्याच्या त्या कलाकृतीनें त्याचें नांव साऱ्या जगभर गाजलें. तिचा उगम एका मध्यरात्रीं पडलेल्या भयानक स्वप्नांत आहे. एकदां मध्यरात्रीं त्याची पत्नी त्याचें कण्हणें आणि तगमग यामुळें जागी झाली. आणि तिनें त्याला हलवून जागें केलें. पण आपल्याला स्वप्न पडत असतां जागें केल्याबद्दल तिला त्याच्याकडून बोलून घ्यावें लागलें. त्याला पडत असलेल्या भयंकर स्वप्नांत एका माणसाच्या मनांतलें पाप त्याचा ताबा कसा घेते आणि त्याचा सद्‌गुणीपणा कसा निष्क्रीय करून टाकते तें तो पहात होता. जेकिल आणि हाईड या जगद्-विख्यात कादंबरीचें बीज या स्वप्नांत त्याला मिळालें.

या कादंबरीचा पहिला खर्डा अवघ्या तीन दिवसांत लिहून झाला. ती छापून प्रसिद्ध होण्यापूर्वींच तिचा इतका बोलबाला झाला कीं, जे कधींहि वर्तमानपत्रावर नजर टाकीत नाहींत अशा लाखों लोकांनीं ती विकत घेतली. कारण वरकरणी भीतिकथा वाटणारी ही कादंबरी ख्रिस्ती धर्मांतील एका बोधकथेसारखी आहे. आपणां प्रत्येकामध्यें जेकिल (सज्जन मनुष्य) आणि हाईड (सैतान) यांचें मिश्रण असतेंच. यांपैकीं कोणाचा वरचष्मा होऊं द्यावयाचा तें ठरविणें आपल्या हातीं असतें. पण एकदां कां मोहांत पडून सैतानाचा वरचष्मा होऊं दिला कीं, पुढें प्रत्येक वेळीं मोहाचा प्रतिकार करणें अवघड होत जाऊन अखेरीस सैतानच प्रबळ होऊन आपला ताबा घेतो.

स्टीव्हन्सन जसजसा अधिकाधिक नामांकित लेखक होत होता तसतशी त्याची प्रकृति खालावत होती. प्रकृति स्वास्थ्यासाठीं त्यानें कुठेंहि घर केलें-मग तें रिव्हीएरावर किंवा आल्प्सवर असो, इंग्लंडांत असो किंवा स्कॉटलन्डमध्यें असो— तरी नवनवोन्मेषशाली प्रतिभा विरुद्ध क्षयरोगरूपी सैतान यांचा झगडा चालूंच असे. दोघेहि आप-आपल्या परीनें त्याला जिंकायसाठीं झटत होते. त्याचीं कित्येक पुस्तकें

* * * * * *

त्यानें अंथरुणावर पडून लिहिलीं आहेत. कित्येकदां दिवसचे दिवस तो मौन पाळी कीं न जाणो बोलायसाठीं तोंड उघडलें तर छातींतून रक्त उसळी मारून बाहेर यावयाचें. पण तरीसुद्धां रोज ठराविक पानें मजकूर लिहावयाचा नियम त्यानें मोडला नाहीं. अंधाऱ्या खोलींत निजून रहावयाची डॉक्टरांची ताकीद असतांहि त्यानें Child's Garden या पुस्तकांतल्या कविता रचल्या आणि त्या अंधारांतच मोठमोठ्या तावांवर अदमासानें खरडून ठेवल्या.

आतांपर्यंत त्यानें मृत्यूला अनेकदां हुलकावणी दिली होती. त्यानें युरोपमध्यें अनेक ठिकाणीं हवापालटहि करून पाहिला. पण व्यर्थ ! त्यानें घरीं राहून मृत्यूची वाट बघणें किंवा देशत्याग करणें एवढेंच त्याच्या हातीं होतें इ. स. १८८७ मध्यें तो, पत्नी, मुलगा व त्याची विधवा आई यांसह जलपर्यटनाला निघाला आणि तोच त्याचा अखेरचा निरोप ठरला. त्याचा पहिला मुक्काम न्यूयॉर्कला झाला. ट्रेझर आयलंड व डॉ. जेकील आणि हाईड या पुस्तकांच्या लेखकाच्या स्वागतासाठींच जणुं कांहीं संपत्ति आणि कीर्ति त्या ठिकाणीं तत्परतेनें उभ्या होत्या. वर्तमानपत्रांचे बातमीदार, ग्रंथप्रकाशक आणि नियतकालिकांचे संपादक यांनीं त्याला गराडा घातला, प्रश्न विचारले, प्रलोभनें दाखविलीं. अमेरिका म्हणजे त्याच्या साहित्याला फार मोठी बाजारपेठ झाली होती आणि आजतागायत तशीच कायम आहे.

एक हिंवाळा त्यानें कुणा एका डॉक्टर ट्रुडोच्या सॅनिटोरियममध्यें घालवला. तेवढ्या अवधींत सॅन्फ्रान्सिस्कोला जाऊन मेरीनें एक स्वतंत्र जहाजच भाड्यानें घेतलें. दक्षिण पॅसिफिक महासागरांत कुठें तरी एक अज्ञात बेट असून त्या बेटावर आपण पोचलों तर आपलें आरोग्य आपल्याला लाभेल अशी त्याची समजूत होती आणि आतां त्याच बेटाच्या शोधार्थ तो सहकुटुंब जाणार होता. या बोटीवर तो येऊन दाखल झाला तेव्हां तो इतका वाळलेला दिसत होता कीं,

* * *

बोटीच्या कप्तानानें त्याला समुद्रांत दफन करण्याची व्यवस्था गुप्तपणें करून ठेवली होती.

बोटीनें नांगर उचलला, सॅन्फ्रान्सिस्को शहरहि हळुंहळू दिसेनासें झालें आणि विशाल पॅसिफिक महासागरानें त्याचें स्वागत केलें तें त्यानें परत न जावें म्हणूनच. हवाई, ताहिती, मार्क्वेसास, सामोआ इत्यादि त्या सागरांतील कितीतरी बेटें त्याच्या दृष्टीस पडणार होतीं. पण त्याची जन्मभूमि जें एडिन्बर्ग शहर किंवा जिथें जेवतांना साहित्यचर्चा चालायची तें त्याचें आवडतें लंडन शहर त्याला कायमचें अंतरलें होतें.

पण हा जलप्रवास त्याला मानवला असें दिसलें. त्याला प्रवासांतला धोका प्रिय होता. कारण, धैर्य हा त्याचा आवडता गुण होता. धैर्याला तो साऱ्या सद्‌गुणांचा आधार मानी. वादळें, वाऱ्यानें भरलेलीं शिडें आणि वैरभाव धरणारे आदिवासी यांच्यामुळें त्याच्या प्रवासाला रंग भरला. सागरी जीवनांतील सर्व प्रकार त्यानें उपभोगले व त्याच्या कुटुंबियांनीं त्याच्यासाठीं सहन केले. कारण, तो प्रसन्न होता. हळुहळु एकटा प्रवास करण्याइतका तो सशक्त झाला. मोलोकाई नांवाच्या एकाकी बेटावर महारोग्यांची वस्ती होती. त्यांची शुश्रूषा करण्यासाठीं कांहीं संन्यासिनी एका जहाजावरून जात होत्या. त्यांच्यासमवेत तोहि त्या बेटावर गेला आणि तेथें त्याला ते जीवन्मृत दुर्दैवी लोक आढळले. त्यांच्याशी हस्तांदोलन करतांना त्यानें हातमोजे वापरले नाहींत, एवढेंच नव्हे तर एका महारोग्यानें त्याला आपण ओढत असलेली सिगारेट दिली, तीहि त्यानें ओढली. "अशीं भयानक दृश्यें मला सहन होत नाहींत कारण मी दुबळा आहे" असें तो लिहितो तरी पण यावेळीं त्याच्या मनांतील पीडितांबद्दलचा भ्रातृभाव प्रभावी ठरला.

याच ठिकाणीं त्याला फादर डेमियन या धर्मगुरूची हकीकत समजली. फादर डेमियननें आपलें आयुष्य समाजापासून दूर लोटलेल्या

★ ★ ★ ★ ★ ★

येथल्या दुर्दैवी रोगग्रस्त जीवांची सेवा करण्यांत व्यतीत केलें होतें. त्यांची शुश्रूषा करीत असतांना खुद्द त्यालाच महारोगानें पछाडलें. आणि तो त्यापायींच मरण पावला होता. पुढें सिडनेला परत आल्यानंतर त्यानें एका वर्तमानपत्रांत हाईड नांवाच्या मिशनऱ्यानें लिहिलेलें अनावृत पत्र वाचलें. त्या पत्रांत फादर डेमियनचा उल्लेख तिरस्कारानें करून त्याला असभ्य, घाणेरडा आणि अनीतिमान म्हणून संबोधलें होतें. तें पत्र वाचतांच लेविस अत्यंत संतप्त झाला. असा संताप सात्त्विक वृत्तीच्या आणि न्यायाचा कैवार घेणाऱ्यालाच येतो आणि त्यानें त्या पत्राचा लेखक रेव्हरंड डॉ. हाईड याला उद्देशून एक अनावृत्त पत्र प्रसिद्ध केलें,

"डेमियन असभ्य होता !" आम्हांला खरोखरच हें विधान वाचून त्या बिचाऱ्या महारोग्यांची कींव येते, ती अशीं कीं, त्यांना एका असंस्कृत गांवढळ वृद्धाचाच स्नेह लाभला. पण तुम्ही इतके सुसंस्कृत होता तर संस्कृतीचे दिवे घेऊन त्यांची मनें उजळायला तुम्ही कां नाहीं तिथें गेलांत ? 'डेमियन घाणेरडा होता !' मग ते बिचारे महारोगी अशा अस्वच्छ माणसाच्या सहवासानें किती बरं त्रासले असतील ! पण शुचिर्भूत असे हे हाईडमहाशय तर आपल्या सुरेख घरांत बसून जेवण घेत होते. असें आपण धरून चालूं कीं तिथल्या त्या भयानक एकाकी वसाहतींत आपल्या कांहीं धार्मिक कर्मकांडांत डेमियनचे हातून कांहीं प्रमादहि घडला असेल. पण त्याच्या त्यागानें अगदीं कमींत कमी अनुकंपा ज्याच्याजवळ आहे असा माणूसहि द्रवला असता. आणि तुम्हीं काय केलंत, तर तें पत्र लिहिलंत !" या कडाडून हल्ला करणाऱ्या पत्राला जगभर प्रसिद्धी मिळाली आणि फादर डेमियन हा कॅथॉलिक पंथीय हुतात्मा एखाद्या प्रॉटेस्टंट महात्म्याइतका आदरणीय ठरला.

स्टीव्हन्सन हा साहसप्रिय असला तरी सुसंस्कृत होता, साहित्यसेवक होता, विख्यात कथालेखक होता. हें सगळें खरें असलें तरी

★ ★ ★

मलतः तो नीतितत्त्ववेत्ता होता आणि त्याचें नीतींचें तत्त्वज्ञान हें दया आणि प्रेम यांवर आधारलेलें होतें. " तुमच्या नीतिकल्पना जर तुम्हाला रुक्ष व कठोर बनवीत असतील तर त्यांत कुठें तरी चूक असली पाहिजे " असें तो म्हणतो.

त्याच्या नीतीच्या कल्पना भोंवतालच्या लोकांना पटणाऱ्याच नव्हे तर मार्गदर्शन करणाऱ्या ठरल्या. अखेरच्या दिवसांत तो पॅसिफिक-मधील समोआ बेटावर ' वैलीमा ' येथें घर करून रहात होता. त्यानें आपल्या कुटुंबासाठीं स्वतंत्र प्रार्थना-गीतें रचिलीं होतीं. दररोज रात्री आपले आप्त व नोकरचाकर या सर्वांसह तो या प्रार्थना म्हणत असे. " देवा, आम्हांला धैर्य दे ". हें त्याच्या प्रार्थनेचें सार होतें.

आणि त्यानें जें मागितलें तें त्याला पुरेपूर मिळालें. त्याच्या या समुद्रकांठच्या निवासस्थानीं स्कॉटलंडमधील उत्कृष्ट फर्निचर आणि चांदीचीं भांडीं, फान्समधलीं पुस्तकें, चित्रें आणि उत्तमोत्तम मद्यें त्यानें जमा केलीं होतीं. त्याच्या सोबतीला त्याची आई, त्याची धैर्यशाली पत्नी, त्याची दोन्ही सावत्र मुलें लॉईड व इसॉबेल हीं त्याच्याजवळ होतीं. लॉईड त्याचा सहकारी होता तर इसॉबेल त्याचा मजकूर लिहून घ्यायचें काम करी. त्यानें पुष्कळ तद्देशीय नोकर पदरीं बाळगलें होतें. तेहि सुस्वभावी व हुशार असून त्याच्या आज्ञेंत वागत. युरोपमधून त्याला भेटायला त्याचे जुने मित्र येत. येथें मन-पसंत व खूप काम केल्याचेंहि समाधान त्याला मिळालें. त्या कामाचा मोबदलाहि भरपूर मिळेल अशी त्याला खात्री वाटत होती. मुख्य म्हणजे त्याला त्याचें आरोग्यहि परत मिळालें होतें. तो लवकर जागा होई तोहि ताजातवाना होऊन, काम करी तेंहि ताण न वाटतां. त्या द्विपावरील राजासारखा आप्तप्रिय जनांच्या सहवासांत आणि वैभ-वांत तो रहात होता.

मेजवान्या, हास्यविनोद आणि भोंवतालचें अनुपम सृष्टिसौंदर्य यांच्या उपभोगांत त्याचे दिवस मजेंत जात असतांना मृत्यूनें त्याच्या-

* * * * * *

वर अचानक झडप घातली. त्याचें वय अवघें ४४ वर्षांचें होतें; क्षयरोगानें त्याचा पिच्छा सोडला होता; पण यावेळीं मृत्यूनें निमित्त केलें तें मेंदूंतील रक्तस्त्रावाचें. पण त्याला अखेरच्या क्षणीं यातना मात्र झाल्या नाहींत. कारण, लक्षणें दिसूं लागे तोंच त्याची प्राणज्योत मालवली. समोआच्या रहिवाशांनीं या आपल्या थोर नेत्याला आदरानें खांदा दिला आणि त्याच्या घराजवळच्या एका उंच डोंगरावर त्याचें दफन केलें. त्याच्या थडग्यावर त्यानेंच लिहून ठेवलेल्या काव्यपंक्तींचा मतितार्थ असा:

> **तारकांनीं युक्त अशा विशाल आकाशाखालीं माझ्यासाठीं थडग खणून त्यांत मला पडूं द्या. जीवनांतहि मी आनंदी होतों, मरतांनाहि मी आनंदीच आहे आणि मी मृत्यूच्या आधीन होत आहे तोहि स्वेच्छेनेंच.**
>
> **हीच माझी कविता माझ्या थडग्यावर लिहा.**
>
> **याच ठिकाणीं त्याला अखेरची विश्रांति घ्यायची होती. हा नावाडी आतां घरीं आला आहे, सागरावरून परत आला आहे. डोंगरदरींत गेलेला हा शिकारी घरीं परत आला आहे.**

● ● ●



# कार्ल लीनी

८

## पुष्पसृष्टीचा किमयागार

जगाच्या इतिहासांत जे अनेक थोर थोर पुरुष होऊन गेले त्यांपैकीं एखादा आपल्यांपैकीं एखाद्याला मनापासून आवडत असतो. आपल्यांत आणि आपल्या भक्तीचा विषय असलेल्यांत काळाची केवढीहि दरी असली तरी आपल्याला मात्र तो महापुरुष आपला जिवाभावाचा मित्र वाटत असतो. माझ्या आवडीचा असा थोर पुरुष कार्ल लीनी, जगांतला एक महान् सृष्टपदार्थवेत्ता, हा होय. कार्ल लीनीचा जन्म १७०७ मध्यें म्हणजे १८ व्या शतकाच्या सुरुवातीसच झाला. त्यावेळीं सृष्टपदार्थविज्ञान हें शास्त्र केवळ पुस्तकी स्वरूपाचें होतें. त्यांत कल्पनांचा गोंधळ होता आणि नवीन प्रत्ययपूर्ण ज्ञानाची भर पडलेली नव्हती. विज्ञानाच्या या प्रांतांत प्रवेश करतांच लीनीनें पहिली गोष्ट केली ती ही कीं, या शास्त्राकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोनच बदलून टाकला, जुनाट कल्पनांचीं घट्ट लागलेलीं कवाडें उघडून टाकतांच बाहेरचा प्रकाश, सुगंध व नाद मनांत प्रवेशून मोकळेपणीं खेळूं लागले. साऱ्या

★ ★ ★ ★ ★ ★

सृष्टींतच सुव्यवस्था आणि खोल अर्थ भरलेला आहे असें त्याला आढळून आलें आणि म्हणूनच त्या शास्त्रांतील अराजक नष्ट करून त्यानें त्याला एक पद्धत लावून दिली. ईश्वराच्या राज्यांतील वस्तुमात्रांत एकात्मता आहे हें सूत्र त्यानें शास्त्रीय पद्धतीनें पण श्रद्धेनें मांडलें.

लीनीचा जन्म स्वीडन देशांतील एका खेड्यांत एका झोपडींत झाला. त्याच्या वडिलांना तिथल्या चर्चमध्यें लहानशीं नोकरी होती. स्वीडनच्या आजच्या भरभराटीवरून आणि शैक्षणिक प्रगतीवरून त्याकाळच्या स्वीडनची कल्पना केली तर ती अगदींच चुकीची ठरेल; कारण, त्यावेळीं तिथली परिस्थिति आजच्या अगदीं उलट होती. जंगलांनीं आच्छादलेल्या प्रचंड भू-प्रदेशांत काबाडकष्ट करणारीं थोडीशीं माणसें फक्त तिथें होतीं. पाईनवृक्षांचीं विस्तीर्ण जंगलें आणि त्यांतमधूनच चमकणारीं सरोवरें विमानांतून जातांना अजूनहि दिसतात. सृष्टिसुंदरीच्या अशा वैभवसंपन्न सान्निध्यांतच या मुलाच्या बुद्धीचें पोषण झालें.

त्याचा बराचसा वेळ घराभोंवतालच्या बागेंत खेळण्यांतच जात असे. त्याचे वडील त्याला मुद्दाम शेतांतून आणि रानांतून फेरफटका मारावयास नेत असत. आणि फिरतां फिरतां नानाप्रकारचीं नुसतीं फुलें दाखवूनच थांबत नसत तर त्या फुलझाडांचीं मुळें आणि बीं-बियाणें यांचीहि माहिती करून देत. त्यामुळें या सगळ्या झुडुपांचीं नांवनिशी त्याच्या मनांत पक्की रुजली. या वस्तुपाठामुळेंच मधुरवासाचें 'रोझा', पांढरें शुभ्र 'लिलियम्', आणि पिवळट कणसासारखें दिसणारें पण टवटवीत असें 'ऑर्चिस' हीं फुलें आणि त्यांचीं लॅटिन नामाभिधानें त्याच्या सहज लक्षांत राहिलीं. हीं नांवें लॅटिन आहेत हेंहि त्याला माहीत नव्हतें आणि त्याच्या वडिलांची शिकविण्याची हातोटीहि चांगली होती. त्यामुळें एरवीं अवघड वाटलें असतें असें ज्ञानहि त्यानें सहज आत्मसात केलें. त्याकाळीं वनस्पति किंवा प्राणी यांच्यासंबंधींचें ज्ञान निसर्गाशीं समरस होऊन मिळवणें हें कुणाला

* * *

माहीतच नव्हतें. कुठलीहि माहिती हवी असली तर ती मिळविण्यासाठीं दोन हजार वर्षांपूर्वी एखाद्या ग्रीक ग्रंथकारानें लिहिलेल्या पुस्तकाकडे धांव घ्यायची सर्वसाधारण प्रवृत्ति होती. आणि म्हणूनच ग्रंथांत नांव नसलेलें एखादें सुंदर फूल जरी प्रत्यक्षांत आढळलें तरी तत्कालीन विद्वान् तें फेंकून देत. कारण, तें महत्त्वाचें असणें कसें शक्य होतें ? आणि म्हणूनच उप्साला विश्वविद्यालयांतील वृद्ध प्राध्यापक सेल्सियस यांना अत्यंत काळजीपूर्वक फुलांचें निरीक्षण करतांना जेव्हां लीनी आढळला, तेव्हां ते चकित झाले. त्या बागेकडे सहसा कोणीं फिरकतहि नसे. विशेष गंमत अशी कीं, या फुलांच्या नांवनिशीसाठीं कुठल्याहि पुस्तकाचा आधार घेण्याऐवजीं तो स्वतंत्रपणें त्यांचेविषयीं आपणच एखादें पुस्तक लिहायची तयारी करीत असावा असें वाटत होतें. मुलगा तर उघड उघड गरीब दिसत होता. त्याच्या बुटांच्या तळव्यांत पुठ्ठ्याचे कपटे होते आणि त्याचे कपडे उसवलेलें असून अंगकाठीहि कृश दिसत होती. पण जेव्हां प्राध्यापक महाशयांनीं लीनीशीं बोलावयास सुरुवात केली तेव्हां त्याचे बदामी रंगाचे डोळे चमकूं लागले आणि त्याचें वनस्पतिशास्त्रविषयक ज्ञान स्तिमित करणारें आहे, फक्त त्याला विद्यालयीन शिक्षणाची जोड नाहीं असें त्यांच्या लक्षांत आलें. वास्तविक सेल्सियस हे धर्मशास्त्राचे प्राध्यापक होते. पण लीनीवर प्रसन्न होऊन त्यांनीं त्याला घरीं बोलावले, जेवायला घातले, कपडे शिवून दिले आणि आपल्या ग्रंथालयाचा उपयोग करूं दिला.

प्राध्यापक महाशयांच्या या खटाटोपाचें दृश्य फळ म्हणजे लीनीनें आपल्या वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी—पण प्रदीर्घ अभ्यासानंतर—लिहिलेलें फुलांसंबंधींचें पुस्तक होय. या पुस्तकाला लीनीनें नांवहि मोठें विलक्षण दिलें होतें. ‘फुलांचे विवाह’ ( Floral Nuptials ) हें नांव ऐकून त्यांना सानंदाश्चर्य वाटलें. पण आश्चर्य वाटणेंहि साहजिक होतें. कारण वनस्पतींतहि प्राणी सृष्टीप्रमाणें लिंगभेद असतो ही क्वचितच कुणाला ज्ञात असलेली गोष्ट स्पष्टपणें

* * * * * *

मांडली होती. "जीवनरसाच्या शुद्धीकरणासाठीं वनस्पति आपलें पराग टाकून देतात" अशी एक पोकळ समजून त्या काळीं प्रचलित होती. पण लीनीनें सगळी भीड आणि संकोच बाजूस सारून आपल्या वयास साजेलशा निर्भीडपणानें फुलांचे वेगवेगळे अवयव सुपरिचित परिभाषेंत--पण तिचा नव्यानें उपयोग करून समजावून दिले. स्त्री-केसर हा फुलाची योनी असून त्यांमध्यें पोकळ बीजांड कोश असतो आणि त्यांतच पुं-केसरापासून निर्माण झालेल्या परागकणांच्या संयोगा-नंतर बीजाची प्रतिष्ठापना होतें हें त्यानें दाखवून दिलें. एखाद्या मध-माशीनें आपल्या दृष्टिकोनांतून वर्णन करावें तितकें बारकाईनें अत्यंत काव्यमय शब्दांत पण सत्यापलाप न करतां त्यानें फुलांचें स्वरूप आणि कार्य यांचें वर्णन केलें होतें. "ज्या सुंदर पाकळ्या आपण बघतो त्यांचा प्रजोत्पादनाच्या कार्याशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नसतो तर त्यांचें कार्य फक्त संयोगासाठीं लागणारीं सुवासिक नाजूक पुष्पशय्या पुरवणें एवढेंच असतें." हें कांहींसें उघडें-वाघडें निवेदन त्यानें धैर्यानें करून वनस्पतींच्या स्वभावांतील कामविषयक अंग उघडपणें दाखवलें. त्यामुळें सनातनी संस्कृति-संरक्षकांना धक्का बसला तर या विषयाच्या अभ्यासकांना आनंद झाला. त्यामुळें वनस्पतिशास्त्रांत एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. या युगाला 'लीनीचें युग' म्हणतात. त्या युगांत या शास्त्राची बहारदार वाढ झाली, त्याविषयींची लोकांची समजूत अधिक व्यापक झाली आणि त्याचा फायदा आजच्या पिढीला होत आहे.

आपल्या पाल्याचें हें बुद्धिवैभव पाहून वृद्ध सेल्सियस आपला मित्र प्राध्यापक रूडबेक याचेकडे गेला. रूडबेक हा उप्साला विश्वविद्या-लयांत विज्ञानशाखेचा प्रमुख होता. लीनीच्या प्रतिभेची चमक त्याच्या नजरेस पडतांच त्यानें त्याला आपल्या जवळ रहायलाच बोलावलें. स्वतःच्या जीवनांत दुर्दैवाचें अनेक प्रसंग त्यानें अनुभवले होते आणि दारुण मनोभंगहि सोसले होते. तेव्हां जें स्वतःला साधलें नाहीं तें या

* * *

मुलाला तरी साधावें म्हणून त्यानें आयुष्यभर केलेली ज्ञानाची कमाई लीनीला मुक्त हस्तानें देऊन टाकली. त्याच्या सहवासांत कार्लचीं बौद्धिक बैठक अधिक पक्की झाली. त्याचें वाचन सखोल झालें आणि त्याच्या कल्पनाशक्तीला पंख फुटले. त्या दोघांनीं थोडेंसे पैसे जमवले व त्या तुटपुंज्या भांडवलाच्या जोरावरच एक वैज्ञानिक सफर काढा-वयाचें योजिलें. योगायोग मात्र असा होता कीं, हीच सफर पुढें अत्यंत महत्त्व पावणार होती.

इ. स. १७३२ च्या मे महिन्यांत हा एकाकी वैज्ञानिक या मोहिमेवर निघाला. घोडा हें त्याचें वाहन होतें. आणि स्वीडनच्या अगदीं उत्तर टोकाचा प्रदेश, लॅपलँड, हें त्यांचें लक्ष्य होतें. संशोधनाच्या हेतूनें निघालेली अशा तऱ्हेची ही पहिलीच सफर होती. तोंपर्यंत संशोधन याचा अर्थ, ज्यांतील ज्ञान अगदीं शिळें आणि उबट झालें आहे अशा ग्रंथांत पुन्हा पुन्हा अवगाहन करणें हाच होता. पण लीनीनें तो अर्थ बदलून टाकला. या प्रवासांत त्यानें आपल्या तीन हस्तलिखितांखेरीज एकहि पुस्तक बरोबर घेतलें नाहीं. इतर सामुग्री म्हणाल तर फूटपट्टी, दुर्बिण, सूक्ष्मदर्शक यंत्र, चाकू, एक छऱ्यांची बंदूक, वनस्पति वाळवतां याव्यात म्हणून एक विशिष्ट प्रकारचा कागद, पेन्सिली, दऊत, टांक आणि डांसापासून संरक्षण व्हावें म्हणून एक मच्छरदाणी येवढीच होती.

आजकालच्या अद्ययावत् सुखसोयी आणि साधनें यांनीं युक्त असलेल्या आणि मातबर विश्वविद्यालयें वा संस्था यांनीं पुरस्कारिलेल्या शास्त्रीय मोहिमा पाहिल्या कीं त्या तुलनेनें लीनीची मोहीम आपल्याला हास्यास्पदच वाटेल. पण आपण हें विसरतां कामा नये कीं, बरोबर साधनें काय नेलीं यापेक्षां तीं कोणीं नेलीं याला अधिक महत्त्व आहे; तसेंच येतांना कोणते नवे नमुने गोळा करून आणले यापेक्षां कोणत्या नव्या कल्पना आणल्या याला अधिक महत्त्व आहे. लीनी या सफरीवर निघाला तेव्हां त्याचें मन कसें ताजेंतवानें आणि प्रफु-

* * * * * *

लिलत होतें याची साक्ष त्यानेंच लिहून ठेवलेल्या पुढील ओळींवरून पटतें :

" सृष्टिसुंदरी अत्यंत प्रसन्न दिसत होती. हिंवाळीं धान्यें घोटच्या-इतकीं उंच झालीं होतीं. तर बार्ली नुकतींच अंकुरत होती. बर्च, आल्डर आणि आस्पेन या झाडांना पालवी फुटत होती. लार्क पक्षी सारा प्रवासभर मला साथ करीत होता आणि पंचमांत गात होता. " अशा आनंदी मन:स्थितींत विश्वविद्यालयाच्या इमारतीपासून लीनी दूर गेला; जणूं जडापासून सुटून चैतन्यांत एकरूप झाला.

सहा महिन्यांनीं तो परतला तो मात्र कृश होऊन. ध्रुवप्रदेशावरील वारे आणि चोवीस तास असणारा सूर्यप्रकाश—त्या ऋतूंत उत्तरध्रुवावर दिवस असावा—यांनीं त्याच्या त्वचेचा रंगहि काळसर बदामी झाला होता. त्यानें बरोबर जी लूट आणली होती ती त्याच्या डोक्यांत सांठ-वलेली होती. बर्फाच्छादित प्रदेशांतून हिंडतांना त्याची उपासमार झाली होती. कसली तरी खराब झालेली मासळी खाऊन त्याला रहावें लागलें होतें; वेगवान् ओढ्यांतून नावेचा प्रवास करावा लागला होता; अवघड कडे चढून जावे लागले होते आणि एकदां तर संशया-वरून तिथल्या आदिवासींनीं त्याच्यावर गोळीहि चालवली होती. पण तरीसुद्धां तो हरला नव्हता. ध्रुवप्रदेशांत एकहि झुडूप नसलेला टंड्रा नांवाचा जो सपाट मुलुख आहे त्याला अगदीं लागून उगवलेल्या झुडुपांवरील टपोरी रानफुलेंहि त्यानें पाहिलीं. वेगवान् वाऱ्याच्या धारेपुढे जिथें कांहींहि टिकत नाहीं तिथें तीं फुलें टंड्राच्या सान्निध्या-मुळें सुखरूप रहात होतीं, हा एक चमत्कारच होता. अदिवासी लोकांत राहून त्यांची भाषा व चालरीत तो शिकला होता. त्या प्रदेशांतील पक्ष्यांचें जीवन, त्यांचा प्रणय, घरटीं बांधणें वा हुडकणें, त्यांचा पिसारा. त्यांचीं अंडीं आणि पिलें या सर्वांचा त्यानें अभ्यास केला. तिथलें वन्य सांबर हें आदिवासी लोकांचें जीवनसर्वस्व आहे. त्यापासूनच ते अन्न-वस्त्रादि गोष्टी मिळवतात. या सांबराचा पूर्वेतिहास व त्याचें आर्थिक

★ ★ ★

दृष्टचा महत्त्व या गोष्टींचाहि त्यानें अभ्यास केला. आपलीं टिपणें त्याला शेकोटीच्या हालत्या ज्वाळांच्या प्रकाशांत, तिथल्या लोकांच्या झोंपड्यांतील असह्य घाणींत, नावेंत बसल्या बसल्या अगर रान सांब-राच्या मागावर असतांना कुठेंतरी बसून लिहावीं लागलीं. पण त्यानें जें ज्ञान प्रत्यक्ष अनुभवानें मिळवलें तें आजपर्यंत कुठल्याहि शास्त्रज्ञानें मिळवलें नव्हतें.

सफरीहून परत आल्यानंतर लीनी त्या वैज्ञानिक परिभ्रमणाचा वृत्तांत लिहावयास बसला. एका व्यक्तीनें केलेल्या परिभ्रमणाच्या त्या वृत्तांतांत भूगर्भशास्त्र, मानवजातिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, पक्षीविज्ञान, अर्थशास्त्र आणि जंगलांची पहाणी इतक्या शास्त्रांच्या दृष्टिकोनांतून केलेल्या अभ्यासाचें सार होतें. त्यानें प्रवासांतून जे खनिज पदार्थांचे नमुने आणले त्यामुळें स्वीडनला आपल्या उत्तरेकडील भूमीची किंमत समजली. लॅपलंडमधील आदिवासींचा त्यानें जो परिचय करून घेतला, त्यामुळें स्वीडन देशाला आपल्या या दूरस्थ पुत्रांच्यासंबंधीं असलेल्या जबाबदारीची जाणीव झाली. या प्रदेशांतील राजाच्या मालकीचीं वनें, आग, सर्पणाच्या चोऱ्या, बांडगुळें आणि रानकिडे यांच्या भक्ष्यस्थानीं पडत होतीं याची त्यानें प्रथमच जाणीव करून दिली. आजच्या स्वीड-नची जंगलव्यवस्था आदर्श आहे हें खरें, पण त्याचे पहिले श्रेय लीनी-चेंच आहे. उत्तरेकडील प्रांतांतलीं गुरें एका रोगापायीं भराभर मृत्यु-मुखीं पडत. हा रोग एका विशिष्ट झुडुपापासून होतो हें त्यानें शोधून काढलें आणि तीं झुडुपें निंदून काढण्यासाठीं कामकरी मुली पाठवून तीं उपटून टाकावींत असें त्यानें सुचविलें. यावरूनच त्याच्या विद्वत्तेला व्यवहारज्ञानाचीहि जोड होती हें उघड होतें.

त्याच्या टिपणवह्या आणि स्मृति यांतून निघून पूर्णपणें अवतीर्ण व्हायला या अहवालाला तीन वर्षें लागलीं. एवढ्या अवधींत त्याचा बोलबालाहि खूपच झाला होता. त्याच्या या सफरीची हकीकत जर्मनी आणि इंग्लंड इथल्या वृत्तपत्रांतून कधींच प्रसिद्ध झाली होती. पण

★ ★ ★ ★ ★ ★

खुद्द स्वीडिश राष्ट्राला त्याची महत्ता कळायला मध्यें बराच काळ लोटावा लागला. नंतर त्याला सरकारनें डेलकार्लिया या प्रदेशाची लॅपलंड प्रमाणेंच पहाणी करण्यासाठीं बोलाविलें. यावेळीं मात्र त्याच्या हाताखालीं मदतनीस दिले गेले आणि सर्व खर्चाची जिम्मेदारी सरकारनें उचलली.

ही पहाणी संपली आणि १७३५ च्या नववर्षारंभाच्या आनंदाच्या दिवशीं त्याचा एका अनोळखी कुटुंबांत प्रवेश झाला. डॉ. मोरॉस हे तिथले एक रहिवासी असून त्यांची कन्या सारा लिसा त्याच्या प्रथमदर्शनीं मनांत भरली. आणि त्यानें तिच्या वडिलांजवळ तिला मागणी घातली. त्यावेळीं त्याचें वय २८ वर्षांचें असून त्याचा लौकिक सरळ वर्तनाबद्दलच होता. पण तो गरीब होता म्हणून डॉक्टर महाशयांनीं, कांहीं अटी पूर्ण केल्या तरच लिसाशीं त्याला लग्न करतां येईल असें सांगितलें. त्यानें हॉलंडला जाऊन डॉक्टरीचा डिप्लोमा मिळवून त्या व्यवसायांत पुरेसा पैसा मिळवून आपलें यश सिद्ध केलें पाहिजे असे त्याला सांगण्यांत आलें. तोंपर्यंत ते आपली कन्या अन्य कोणाला न देतां थांबायला तयार होते. शिवाय तिच्यासाठीं हुंड्याची रक्कम बाजूला ठेवून ती, ते व्याजीं लावून ठेवणार होते. लीनीनें त्यांना त्यांची अट पूर्ण करण्याचें वचन दिलें.

सारा लिसा आपल्या प्रियकराची साडेतीन वर्षें वाट पहात थांबली. पण लीनी कांहीं स्वस्थ बसला नव्हता. तो एखाद्या उद्योगी मुंगीसारखा सतत काम करीत होता तो हॉलंडमध्यें पोचला पण तत्पूर्वीच त्याची कीर्ति तेथें पोचली होती. यावेळीं त्याच्याजवळ तेरा हस्तलिखित ग्रंथ होते. डच विद्वान् जर कशानें चकित झाले असतील तर वनस्पतींचें वर्गीकरण त्यांच्या लिंगभेदानुसार करण्याच्या त्याच्या पद्धतीमुळें. कुठल्याहि वनस्पतीमधील पुं-केसर व स्त्री-केसरांची संख्या व रचना यांवर ही पद्धति आधारलेली आहे. ही पद्धत प्रचलित होईपर्यंत वनस्पती निश्चित ओळखण्याची दुसरी कुठलीहि विश्वा-

* * *

साई पद्धत माहीत नव्हती. वनस्पतींचें वर्गीकरण अगदीं ठोकळेबाज-पणानें म्हणजे तिचें कांटे किंवा पुष्टता, आद्याक्षरें, काल्पनिक महत्त्व अगर शरिरावर होणारे परिणाम या अनुसार केलें जाई. या सगळ्या पद्धती शास्त्राच्या प्रगतीबरोबर अर्थातच कोलमडून पडल्या. फक्त लीनीची पद्धती थोड्या फार सुधारणेनंतर आजहि शास्त्रज्ञ उपयोगीत आहेत. ती किती सोपी आहे तें पुढें दिलेल्या उदाहरणांवरून सहज लक्षांत येईल :—

| | | |
|---|---|---|
| १ पुं-केसर | १ स्त्री-केसर | कन्ना |
| २ पुं-केसर | १ स्त्री-केसर | लिलॅक व्हर्बेना |
| | २ ,, ,, | स्वीट व्हर्नल नांवाचें गवत |
| | ३ ,, ,, | पेपर |
| ३ पुं-केसर | १ स्त्री-केसर | आयरिस क्रॉकस |
| | २ ,, ,, | गवतांचे बरेचसे प्रकार |
| | ३ ,, , | सी बिलक्स, कार्पेटवुड |

असे अनेक प्रकार त्यानें सिद्ध केले आहेत. अशा प्रकारें फुलांच्या अनंत प्रकारांचा युगानुयुगें चालू असलेला वर्गभेद त्यानें स्पष्ट केला.

ही पद्धति केवळ युरोप खंडापुरती मर्यादित नसून जगांतल्या कुठल्याहि पुष्पवाटिकेच्या अभ्यासांत उपयोगी पडावी आणि नवशिक्यालाहि सहज आत्मसात करतां यावी अशीच तिची योजना आहे. याच पद्धतीचा उपयोग जेन कोल्डेन या न्यूयॉर्कच्या गव्हर्नरच्या कन्येनें केला आणि कितीतरी नवीन झाडाझुडपांचे वर्गीकरण यशस्वी रीतीनें करून ती अमेरिकेंतील पहिली वनस्पतिशास्त्रज्ञ महिला म्हणून ख्यातनाम झाली विख्यात जर्मन महाकवि गटे याला तर लीनीची ही पद्धति म्हणजे एक मोठीच सुखद बौद्धिक करमणूक वाटत होती. पण प्रत्येक चांगल्या गोष्टीला कांहीं विरोधक असतातच. ऑक्सफर्डचा प्राध्यापक डिलेनियस हा त्यांपैकींच एक होता. लीनी ऑक्सफर्ड येथें गेला असतां विश्वविद्यालयाच्या बागेंत तो फिरत

* * * * * *

असतांना ग्रंथालयाच्या खिडकींतून प्राध्यापक मजकुरांनीं त्याला पाहून उद्गार काढले, " हा पहा, वनस्पतीशास्त्रांत गोंधळ माजवणारा माणूस ! " पण नंतर एकच आठवडयानें त्याची लीनीशी प्रत्यक्ष गांठ पडली आणि त्याची पद्धति त्यानें समजून घेतली. तेव्हां मात्र त्याला ती पद्धति आणि तिचा जनक यांनीं इतकी भुरळ घातली कीं, आपला स्वतःचा अर्धा पगार देऊन तो त्याला विश्वविद्यालयांत अध्यापना-साठीं ठेवून घ्यायला तयार झाला.

पण या गोष्टीस लीनीची तयारी नव्हती. हेंच नव्हे तर अशीं आणखी कित्येक आमंत्रणें—जरी तीं पैसा आणि कीर्ति मिळवून देणारीं होतीं तरी— त्यानें नाकारलीं. स्पेनच्या राजानें त्याला चांगला पगार देऊं करून बोलावलें, डच लोकांनीं त्याला पाहुणा म्हणून केप ऑफ गुड होप अथवा वेस्ट इंडीजमध्यें तिथल्या वनस्पतींचा व प्राण्यांचा अभ्यास करण्यासाठीं पाचारिलें. पण तो सारा लिसाला विसरूं शकत नव्हता. तिच्यासाठीं डॉक्टरीचा अभ्यासक्रम पुरा करणें त्याला भागच होतें. आणि त्याप्रमाणें त्यानें तो पूर्ण केला देखील.

आपला डिप्लोमा घेऊन तो स्वीडनला परतला. आणि स्कॉटहोम येथें त्यानें दवाखाना घातला. पण त्या व्यवसायांत त्याला कोणी ओळखत नव्हतें व कुणाला त्याची गरज नव्हती. तो मग अगदीं दरिद्री लोकांच्या वस्तींत जाऊन काम करूं लागला. दारिद्र्याचा सोबती जो क्षय रोग त्याचें ठाणें दरिद्री वस्तींत कायमच असे. तसेंच लैंगिक रोगहि तेथें मुक्काम ठोकून बसलेले असत. तेथें त्यानें अठरा अठरा तास काम केलें. पुढें त्याला बरे दिवस येऊन आरमारखात्यांत त्याची डॉक्टर म्हणून नेमणूक झाली. हळुंहळूं त्याचें नांव झालें व त्याचेकडे जाणें ही फॅशन पडून गेली. आणि मग त्याची नेमणूक राणीचा डॉक्टर म्हणून झाली. विज्ञान—अकादमीचा तो अध्यक्ष निवडला गेला. जून १७३९ मध्यें सारा लिसाशीं त्याचें लग्न झालें. आपली प्रेयसी पत्नी म्हणून प्राप्त झाल्यावर तो पुन्हा आपल्या आव-

★ ★ ★

इत्या विषयाकडे वळला आणि उप्साला विश्वविद्यालयांत काम करूं लागला.

आणि पूर्वी जिथें त्याचा गुरु रूडबेक रहात होता त्याच घरांत लीनी रहावयास आला, पण आतां तो त्या घराचाच नव्हे तर सभों-बतालच्या बागेचा स्वामी झाला होता. आज त्या वास्तूला एखाद्या मठाचें स्वरूप प्राप्त झालें आहे, इतका मान तिला स्वीडिश जनता देते. लीनीच्या पद्धतीप्रमाणें फुलझाडांची रचना या बागेंत केलेली होती. ही बाग म्हणजे जणुं त्याच्या विद्यार्थ्यांना त्याचें प्रत्यक्ष स्मारकच वाटावें अशी ही बाग ठेवलेली होती आणि तिच्यांत वनस्पती व फुलें यांचे सर्वोत्कृष्ट नमुने सांठवले होते सबंध युरोपांत तिच्या तोडीची बाग नव्हती. सगळचा जगभर असलेले त्याचे चाहते त्याला या बागेंत लावण्यासाठीं रोपें पाठवीत. रशियाच्या झरीनानें पाठविलेल्या बियाणांपासून वाढवलेलें एक सोनेरी फुलांचें झाड आणि अशींच कांहीं इतर झाडें तिथें अजूनहि आहेत.

जगाच्या सर्व भागांतले थोर लोक लीनीचा सन्मान करण्यांत आनंद मानीत असत इतका तो कीर्तिमान् झाला होता. त्याचे विद्यार्थी अभ्यासासाठीं दूरदेशीं जात असत. त्यांपैकीं कांहींचा खर्च स्वीडनची राणी देत असे. आशिया खंडांतील उष्ण पट्टयांत होणाऱ्या कांहीं फुलझाडांचे नमुने गोळा करून स्वीडनच्या युवराजानें त्याला नजर केले. ठिकठिकाणचे प्रवासी त्याला वर्गीकरणासाठीं निरनिराळे नमुने पाठवीत अगर आपण जमवून ठेवलेले मौल्यवान् सांठे मृत्युपत्रानें त्याला बक्षीस देत. स्वीडनचीं जहाजें बाहेरून येत तेव्हां त्यांचे कप्तान त्याच्यासाठीं, चित्रविचित्र प्रकारचीं पानें, फुलें, पक्षी गोळा करून आणीत. हॅमारबी नांवाच्या खेडयांत तो नेहमीं सहकुटुंब उन्हाळयाची सुटी घालविण्यासाठीं जात असे. तेथे त्याच्याकडे एक पाहुणा भल्या मोठ्या घोडागाडींतून आला. ती गाडी आंत घेण्यासाठीं फाटकाच्या दरवाजांचे खांब हलवून वाट मोठी करावी लागली होती. हा बडा


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय

* * * * * *

पाहुणा म्हणजे इंग्लंडचा लॉर्ड बाल्टिमोर. हा इतका गर्विष्ठ होता कीं, तो कधीं आपल्या राजालासुद्धां भेटायला जात नसे. पण लीनी-साठीं मात्र तो मुद्दाम या खेड्यांत आला.

याच ठिकाणीं छोटीशी शेतीवाडी होती, तिथें तो अगदीं साधेपणानें रहात असे. त्याच ठिकाणीं तो आल्यागेल्यांचें स्वागत–सत्कार तरी. तो खाजगी शिकवण्याहि करीत असे. यांपैकीं गरीब विद्यार्थ्यांना तो घरीं फुकट ठेवून घेऊन शिक्षण देत असे. सारा लिसा त्यांचे फाटलेले कपडेंसुद्धां त्यांना दुरुस्त करून देत असे. आणि त्याच्या चार कन्या-सुद्धां त्यांच्याशीं मिळून मिसळून वागत. हे विद्यार्थी युरोपांतील विविध देशांतून किंबहुना अमेरिकेंतूनदेखील आलेले असत. त्यांच्या-पैकीं कित्येकांनीं आपल्या बुद्धिमत्तेनें आणि कर्तबगारीनें पुढें स्वतंत्र लौकिकहि मिळविला. वर्षानुवर्षें ते त्या घरांत येत होते आणि शिकून जात होते. अनेकांनीं तर विज्ञानाच्या वाढीसाठीं दूरदूरच्या ठिकाणीं प्रवास केला आणि त्यांपैकीं कांहींनीं जंगलांत आणि वाळवंटांत देह ठेवले. हॅमरबी येथील त्या वास्तूंत गेलें तर अजूनहि लीनीच्या पवित्र सान्निध्यांत असल्याचा भास होतो.

दूर गेलेल्या विद्यार्थ्यांनीं पाठविलेलीं रोपटीं एकावर एक अशीं व्यवस्थितपणें रचून ठेवलीं जात. त्यासाठीं एक चौकोनी दगडांनीं बांधलेली खास वास्तुशाळा होती. या ठिकाणीं बसून आपल्या सूक्ष्म-दर्शी भिंगांच्या सहाय्यानें पृथ्वीच्या पाठीवर कुठेंहि उगवलेल्या वन-स्पतीचें निरीक्षण तो करीत असे. त्याला त्या काळीं ज्ञात असलेल्या सर्व वनस्पतींचें संशोधन करून एक ग्रंथ लिहावयाचा होता म्हणून त्याची ही धडपड चालू होती. हें अशक्यप्राय काम लीनीच्या, साररूपानें लिहिण्याच्या शैलीमुळेंच प्रत्यक्षांत अवतरेल अशी आशा वाटत होती. जास्तींत जास्त दहा समर्पक शब्दांत तो कुठल्याहि जातीचें वर्णन करीत असे. फुलें, पक्षी किंवा पशु यांचें शास्त्रीय नाम-करण करण्याची गुरुकिल्ली उपजतच त्याच्या अंगीं असली पाहिजे.

१४८३९

* * *

दोन नांवें द्यायची त्याची पद्धति इतकी साधी आहे कीं, ती आज देखील सहजच स्वीकारली गेली आहे. एका कुटुंबांतल्या माणसांचें जसें एक नांव व एक आडनांव असतें तसेंच फुलाचें नांव वेगळें असलें तरी त्या जातीचें नांव एकच असतें. जसें जॉन डो, जिम डो आणि टॉम डो हे तीन भाऊ असतात तसेंच गुलाबांच्या जातीला त्यानें रोजा हें नांव दिलें व मग रोजा गॅलीका ( फ्रेंच जातीचा गुलाब ), रोजा व्हर्जिनिआना (व्हर्जिनिया येथील गुलाब) आणि रोजा ॲडोरा (सुवासिक गुलाब) अशीं नांवें त्यानें दिलीं. त्याला परिचित असलेल्या प्रत्येक जिवंत गोष्टीला त्यानें शास्त्रीय नांव दिलें. असें नामकरण करून त्यांचा क्रम ठरवितांना एकाचा दुसऱ्याशीं संबंध काय तें त्यानें लक्षांत घेतलें आणि म्हणूनच निसर्गानें केलेली रचना उदात्त आणि सुंदर असल्याचें त्याला दाखवितां आलें. प्राणी आणि वनस्पति यांचें वर्गीकरण करतांना त्यांचीं मोठीं राज्यें, नंतर लहान राज्यें, नंतर जाति आणि नंतर कुटुंबें असें वर्गीकरण त्यानें केलें आहे. अगदीं लहानपणीं त्यानें ही सुबोध वर्गवारीची पद्धति शोधून मांडली तेव्हां त्या पुस्तकांत फक्त चौदा पृष्ठें होतीं. पण १७६८ सालीं त्या ग्रंथाची बारावी आवृत्ति त्यानें प्रसिद्ध केली त्यांत २५०० पृष्ठें होतीं. आणि त्यानें जो आराखडा आंखून दिला त्यांत बदल होत नसला तरी त्याची सारखी वाढ होत आहे; कारण ज्ञानांत सतत भर पडतच असते.

कार्ल लीनीनें ही पद्धति शोधून काढली असली तरी त्याचें प्रेम निसर्गाच्या योजनेवर नसून खुद्द निसर्गावरच होतें. तो पुन्हा कधींहि स्वीडन सोडून गेला नाहीं. तरी एकदां उप्सा‍ळा विश्वविद्यालयांत स्थिरावल्यानंतर तो नजीकच्या हॅमरबीच्या जंगलांत आणि शेतांत शोधक दृष्टीनें भटकत असे. वाढत्या वयामुळे त्याचें कुतूहल नष्ट झालें नव्हतें. तो शरीरानें थोडासा लठ्ठ झाला होता आणि त्याच्या स्वभावांतला गोडवाहि वाढला होता. त्याच्या सांगितल्या जाणाऱ्या आठवणी अजूनहि रम्य वाटतात. आपल्या छोट्या मुलीला मांडीवर

★ ★ ★ ★ ★ ★

खेळवत तो एकीकडे विद्यार्थ्यांना शिकवीत असे, आपलें कुत्रें घेऊन चर्चमध्यें जात असे, रानकिडे गोळा करून आपल्या शय्यागृहाशेजारच्या खोलींत ते ठेवीत असे. कारण, त्यांची गुणगुण हें त्याच्या निद्रानाशावर औषध होतें. तो शेतीवाडींतून बाहेर पडला कीं इतके लोक त्याच्या मागून हिंडत कीं, त्या गर्दीला शिस्त लावण्यासठीं स्वयंसेवक नेमावे लागत. आणि ही सगळी गर्दी तो हिंडतां हिंडतां अनेक शास्त्रीय गोष्टींवर जें मजेदार भाष्य करीत असे तें ऐकण्यासाठीं असे. या कार्यक्रमावर त्याचे विद्यार्थी इतके खूष असत कीं, ते सगळे जेव्हां भ्रमंति संपवून परत उप्सालांत येत तेव्हां शिंगें आणि नगारे वाजवून गांव दणाणून सोडत आणि त्याच्या निवासाच्या बागेशीं त्याला निरोप देत तेव्हां ' विज्ञान दीर्घायु होवो ?' ' लीनी दीर्घायु होवो !' अशा घोषणा करीत.

आणि तो खरोखरीच दीर्घायु झाला. संपूर्ण सत्तर वर्षें तो जीवन जगला आणि जेव्हां तो जग सोडून गेला तेव्हां त्याची मृत्युयात्रा घंटिकांच्या गजरांत आणि प्रज्ज्वलीत ज्योतींच्या प्रकाशांत निघाली आणि उप्सालाच्या भव्य प्रार्थनामंदिरांत त्याला अखेरची विश्रांति देण्यांत आली. तो या जगांत वावरत होता तोदेखील त्याच्या विद्यार्थ्यांकडून झेलला जाऊन. त्याचे हे विद्यार्थी साऱ्या जगभर पसरले होते आणि त्याच्या आल्हाददायक व्यक्तिमत्वाचा जगाला परिचय करून देत होते. आपल्या दृष्टीनें तो आजहि हयात आहे. कारण त्यानें वर्गवारीचा जो सोपा आराखडा करून ठेवला आहे त्याच्या मदतीनें एखाद्या सकाळीं आपण आपल्या बागेतदेखील एखादें नवीन लॅपलॅन्ड शोधून काढं.

● ● ●



# हेन्री बर्ग

१

## एक कनवाळू माणूस

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचे दिवस. न्यूयॉर्कमध्येंसुद्धां त्यावेळीं घोडागाडी हेंच वाहन होतें. अशीच एक वादळाची रात्र होती आणि एका गाडीला जोडलेले दोन हडकुळे आणि अशक्त घोडे, खच्चून भरलेली ती गाडी ओढायचा आटोकाट प्रयत्न करीत होते. पण खालच्या बर्फाच्छादित जमिनीवर त्यांचीं पावलें ठरतच नव्हतीं. घोडे थांबल्यामुळें अस्वस्थ झालेला गाडीवान त्यांना चाबकानें फटकावीत होता. वेदना असह्य झाल्या म्हणजे ते मागचे पाय झाडीत होते; पुन्हा खालीं टेकून पुढें जायचा प्रयत्न करीत होते; पण त्यांना ती गाडी ओढवत नव्हती. पुन्हा त्यांना वरून चाबकाचे फटकारे मिळत होते. ते घोडे आतां पुढचे पाय उचलून मागच्या पायांवर उभे राहण्याचा प्रयत्न करीत. पण गाडी कांहीं पुढें हलत नव्हती.

एवढ्यांत गाडीच्या खिडकींतून बाहेर पडलेल्या प्रकाशांत एक उंच मनुष्य येतांना गाडीवानाला दिसला. त्याच्या डोक्यावरची उंच

* * * * * *

टोपी, उचललेली छडी आणि हुकमत गाजवणारी गंभीर मुद्रा पाहून हा कुणीतरी बडा मनुष्य असला पाहिजे आणि गाडींत कितीहि गर्दी असली तरी याला गाडींत घ्यावेंच लागेल असें त्या गाडीवानाला वाटलें.

पण झालें नेमकें उलटें. त्या अनोळखी माणसानें सौजन्यपूर्वक सांगितलें कीं, गाडींत प्रमाणाबाहेर गर्दी असल्यानें घोड्यांना ती ओढतां येणें शक्य नाहीं. तेव्हां गाडींतले जादा प्रवासी खालीं उतरावयाला हवेत. आणि जेव्हां गाडीवानानें त्याचें म्हणणें उद्दामपणानें नाकारलें, तेव्हां त्यानें आपल्या कोटावरचा बिल्ला त्याला दाखवला. जेव्हां खुद्द प्रवासीच खालीं उतरायला तयार होईनात, तेव्हां गाडीच्या पायऱ्यांवर उभ्या असलेल्या उतारूंना तो ओढून काढूं लागला. त्यांपैकीं एक आडदांड उतारू पुढें येऊन त्या अनोळखी इसमावर मूठ उगारून त्याला जेव्हां शिवीगाळ करूं लागला तेव्हा त्या नवागतानें पाहतां पाहतां त्या आडदांड माणसाची मानगूट धरून त्याला वर उचललें आणि बाजूच्या बर्फाच्या ढिगावर फेंकून दिलें.

त्याचा हा भीम–पराक्रम पाहतांच त्या सगळ्या प्रवाशांचा पारा उतरला, नूर बदलला आणि ते त्याचाच जयजयकार करूं लागले. त्यांच्या कौतुकाचा विषय झालेला हा माणूस म्हणजे हेन्री बर्ग ! हेन्री बर्गनें त्यावेळीं 'लोकांच्या सदसद्विवेक बुद्धीला टोचीत राहणारी गांधीलमाशी,' 'महान् लुंडबुड्या,' 'चक्रम् बर्ग' अशीं विशेषणें आपल्या थोर कार्याच्या सुरुवातीसच मिळविलीं होतीं. हें त्याचें थोर कार्य म्हणजे 'प्राण्यांना क्रौर्यानें वागवूं नका' या ध्येयवाक्याचा प्रचार.

आज हें कार्य तितकेंसें अवघड राहिलेलें नाहीं. कारण, मध्यवर्ति जीवदया मंडळाच्या शाखा सर्वत्र पसरल्या असून त्यांना संरक्षक कायद्यांची मदतहि आहे. पण ज्यावेळीं असा एकहि कायदा नव्हता– यादवी युद्ध संपून जाईपर्यंत अमेरिकेंत प्राण्यांवर दया करणें भाग पाडील

* * *

असा कायदाच बहुधा नव्हता– त्यावेळीं हेन्री बर्गची चळवळ म्हणजे एक लढाईच होती. आणि एखादा मामुली कायदा असलाच तर तिकडे कोणीं लक्षच दिलें नव्हतें. कारण, अशा कायद्यांच्या पालनासाठीं लागणारी लोकांची मानसिक तयारीच झालेली नव्हती.

अशा परिस्थितींतच हेन्री बर्ग रशियांतील कामगिरी करून परत आला. तो न्यूयॉर्कमधील एका खानदान घराण्यांतील श्रीमंत माणूस होता. जहाजें बांधण्याच्या धंद्यांत त्याच्या वाडवडिलांनीं कमावलेली संपत्ति त्याला वारसाहक्कानें मिळाली होती. त्याची राहणी अद्ययावत् असून नाट्य-प्रयोगांना तो नेहमीं पहिल्या रात्रीं हजर असे. त्याची नेमणूक रशियाची राजधानी सेन्ट पीटर्सबर्ग येथील वकिलातींत चिटणीस म्हणून अब्राहम लिंकननें केली होती. तेथें त्यानें राजकारणी पुरुष म्हणून लौकिक मिळवला असला तरी त्याच्या अंगच्या खऱ्या थोरवीचा प्रत्यय एका लहानशा प्रसंगानें आला. प्राण्यांना क्रूरपणें वागविणें ही त्यावेळीं नेहमींचीच गोष्ट होती. म्हणूनच आपल्या गाढ-वाला बदडत असलेल्या एका रशियन शेतकऱ्याला पाहून बर्गनें जेव्हां हटकलें तेव्हां त्या माणसाला मोठें आश्चर्य वाटलें. पण बर्ग ज्या वकिलातीच्या गाडींत बसला होता त्या गाडीच्या सईसाच्या अंगावरील जरतारी पोषाख आणि चकचकीत पितळी गुंड्या पाहून त्या शेतकऱ्यानें माघार घेतली. त्या प्रसंगानेंच बर्गला आपल्या भावी कार्याची कल्पना सुचली.

१८६४ सालीं तो न्यूयार्कला परतला तेव्हां या प्रश्नाबद्दल लोकमत झोंपीं गेलेलें आहे असें त्याला आढळलें. न्यूयार्कमधील माल आणि माणसें यांची सगळी वाहतूक शब्दश: अश्वशक्तीवर चाले. असें अस-तांहि बरेचसे घोडे लंगडे, आजारी किंवा उपासमार झालेले असत. यंत्रांपेक्षांहि त्यांची काळजी कमी घेतली जाई. मरेपर्यंत त्यांना राब-वीत आणि नंतर त्यांच्या जागीं नवे बळी आणीत. रस्त्यांतील घाण काढण्याचें काम कुत्र्यांनीं ओढलेल्या गाड्यांतून करीत. फळांचा रस

★ ★ ★ ★ ☆ ★

काढणारीं गुऱ्हाळें कुत्र्यांचाच उपयोग करीत. कुत्रीं आणि कोंबडीं झुंजविणें यांकडे पोलीस नुसते दुर्लक्षच करीत असें नसून ते पैसे गुंतवण्याचे धंदे समजले जात आणि ते गुंड टोळक्यांच्या ताब्यांत असत. कुणीं पैसे देऊं केले तर पैसे देणाराला तापदायक होणारी दुसऱ्यांचीं कुत्रीं थोड्याशा मोबदल्यांत कोंडवाड्यांत नेऊन घालायचें काम कांहीं गुंड करीत. मालकाला तीं परत हवीं असल्यास दंड भरून न्यावीं लागत. तशीं न नेलेलीं कुत्रीं दांडक्यानें अगर पाण्यांत बुडवून मारून टाकीत. आणखीहि अनेक तऱ्हांनीं त्यांचे हालहाल करून त्यांना मारीत असत.

हेन्री बर्ग त्या प्रश्नाकडे केवळ भावनाविवश होऊन पहात नव्हता. १८६६ सालीं एका सभेंत त्यानें आपण प्राण्यांना संरक्षण कां देतो तें पुढील शब्दांत सांगितलें : " हा शुद्ध सदसद्‌विवेक बुद्धीचा प्रश्न आहे. यांत इतर प्रश्न घुसडण्याचें कारण नाहीं. खगोलशास्त्राचा त्याच्याशीं जितका संबंध आहे तेवढाच राजकारणाचा आहे. सर्वशक्तिमान परमेश्वराचा जो सगळ्यांत थोर गुण दयाबुद्धि त्याच्याबद्दल अंत:करणपूर्वक आदर व्यक्त करण्याचा हा मार्ग आहे. "

ही सभा म्हणजे पुढील कार्याचीं केवळ नांदी होती. कारण लागलीच 'जीवदया संघाची' अमेरिकेंत स्थापना झाली. या संघानें भूतदयेविषयीं जीं सनद प्रसिद्ध केली त्या सनदेवर न्यूयॉर्कमधील त्या काळच्या जॉन जेकब ॲस्टर, पीटर कूपर वगैरे नामवंत नागरिकांच्या सह्या होत्या. अशा लोकांचा पाठिंबा मिळाल्यामुळें त्यानें न्यूयॉर्क संस्थानच्या विधिमंडळांत प्राण्यांना क्रौर्यानें वागविण्याविरुद्ध कायदा करून घेतला.

पण केवळ अनुकूल कायदा पुरेसा होणार नव्हता. तो अंमलांत आणण्यासाठीं, कायदा मोडणारांना अटक करविण्यासाठीं आणि त्यांच्याविरुद्ध खटले लढविण्यासाठीं आणखी कांहीं पूरक कायदे करवून घ्यायला हवे होते. त्यासाठीं कार्यकर्त्यांची संघटना निर्माण करा-

* * *

यला हवी होती. त्याला केवळ लोकांच्या औदासीन्यालाच तोंड देऊन भागणार नव्हतें, तर अनेक दुखावलेल्या हितसंबंधियांचें वैर पत्करावें लागणार होतें. घोड्यांकडून वाहतूक करणाऱ्या रेल्वे कंपन्यांचें विधिमंडळांत दांडगें वजन होतें. खाटीक, दुग्धव्यवसायी, कुत्रे आणि कोंबडे लढवून पैसा कमावणारे, कबूतरें मारणारे यांच्या पोटावर पाय येणार असल्यानें आणि ते बर्गपेक्षांहि श्रीमंत असल्यानें बर्गशीं लढा द्यायला तयार झालें होते आणि बर्गला तें माहीत होतें.

व्यंगचित्रकारांनीं त्याची उंच अंगकाठी, गंभीर चेहरा आणि लांब मिशा यांचा उपयोग करून त्याचा डॉन क्विक्झोट केला. पण ज्या दिवशीं जीवनदया संघाची स्थापना झाली त्याच दिवशीं तिचा अध्यक्ष म्हणजे बर्ग हा लढा देण्यासाठीं रस्त्यावर आला. घोड्याला चाबूक मारणारा पहिला गाडीवान दिसतांच त्यानें त्याला 'हात आंवर' असें आज्ञापिलें. त्यानें त्या माणसास सांगितलें कीं यापुढें असल्या क्रौर्याला कायद्यानें बंदी केली आहे. त्या गाडीवानानें त्याला एक शिवी देऊन पुन्हा चाबूक उगारला. त्या बरोबर बर्गनें त्याच्यावर चालून जाऊन त्या अन्यायाचा प्रतिकार केला.

दुसरे दिवशीं त्यानें एका खाटकास त्याच्या गाडींतून पुष्कळशी गुरें आणि मेंढ्या एकत्र बांधून बाजारांत जातांना पाहिलें. सामान रचल्यासारखीं तीं जनावरें एकावर एक रचलीं होतीं, त्यांतलीं कांहीं बाहेर लोंबकळत होतीं आणि असह्य यातना त्यांच्या बाहेर आलेल्या डोळ्यांत दिसत होत्या. बर्गनें त्याला अटक करून कोर्टांत नेलें. पण कोर्टाला एक तर भीति वाटली असावी आणि अशा खटल्याचा पूर्वीचा दाखलाहि नव्हता त्यामुळें कोर्टानें गुन्हा शाबीत धरला नाहीं. घाण, दुर्गंधी आणि सांडलेलें रक्त यांचें आगर असलेल्या कसाईखान्यांत बर्ग गेला, तेव्हां तिथें त्याला जनावरें मारण्याच्या अत्यंत क्रूर पद्धती आढळल्या. त्याबद्दल त्यानें तक्रार केली तेव्हां एका मारलेल्या प्राण्याच्या शरीरांतली रक्तमिश्रित घाण एका कसायानें त्याच्या तोंडावर फेकली.

* * * * * *

पण त्याचा राग न मानतां बर्गनें ती पुसून टाकली. तिथून बाहेर पडल्यानंतर तो एका रसायनविक्रीच्या दुकानांत थांबला. त्यानें आपल्या कपड्यावरील डाग साफ करून घेतले आणि पुनः आपल्या कामास सुरुवात केली. अखेरीस १८६७ च्या एप्रिल महिन्यांत त्यानें या कायद्याखालीं एका गुन्हेगाराला कोर्टाकडून शिक्षा देवविली.

पण अजूनसुद्धां लोक त्याची उपेक्षा किंवा टिंगलच करीत होते. तो आतां लोकांच्या चांगल्या परिचयाचा झाला होता. हातमोजे घातलेल्या हातांत एक छडी घेऊन तो न्यूयॉर्क शहरभर हिंडत असे आणि कुठेंहि मुक्या प्राण्यांना क्रौर्यानें वागविलें जात आहे असें दिसलें कीं धांवून जाऊन कायद्यानें दिलेल्या आपल्या अधिकाराच्या जोरावर तें अपकृत्य बंद पाडण्याचा प्रयत्न करीत असे लोक त्याची टिंगल तर करीतच पण वृत्तपत्रांतून खोंचक आणि निंदाव्यंजक लिखाण करणाऱ्या बातमीदारांनाहि त्यांच्या लेखणीला उत्तम खाद्य पुरविणारा चक्रम् माणूस म्हणून तो सुपरिचित झाला होता. टवाळ संपादकीयांतून ढेकूण आणि कीडमुंग्या यांच्यावर दया करावी असा आग्रह धरणारे लेख प्रसिद्ध होत. आपल्या एखाद्या दोषाची जाणीव झाली आणि ती असह्य होऊं लागलीं म्हणजे त्या दोषाकडे बोट दाखवणाऱ्या माणसाबद्दल तिटकारा वाटूं लागणें मनुष्यस्वभावास धरूनच आहे.

हेन्री बर्ग हा हळव्या मनाचा माणूस होता. लोकांनीं आपली थट्टा आणि तिरस्कार करावा याचेंहि त्याला वाईट वाटे. पण त्यानें हें ओळखलें होतें कीं, एखादा मोठा विजय संपादन करायचा असेल तर त्याचें नांव अधिक गाजलें पाहिजे. आणि त्याच्या वागण्याला निश्चित् पद्धत असल्यामुळें वरकरणी थट्टेस पात्र होतील अशाच गोष्टी निवडून त्यांसाठीं तो भांडत बसे. एकदां फ्लॉरिडाहून एक गलबत भरून जिवंत कांसवें आणलीं गेलीं. त्यांच्या कल्ल्यांतून दोरी ओंवून त्यांना एकत्र बांधलें होतें. हेन्री बर्गनें त्या गलबताचा कप्तान आणि खलाशी यांना कैद करवलें. खटला कोर्टापुढें आला तेव्हां न्यायाधीशदेखील

* * *

त्याला उपहासपूर्वक हंसला. कप्तानाच्या वकिलानें कांसव हें एक तऱ्हेचा मासाच आहे म्हणजेच प्राणी नाहीं असा दावा मांडला आणि कप्तान निर्दोष सुटला. बर्गच्या बाजूनें प्रख्यात सृष्टपदार्थवेत्ता आगासीझ हा साक्ष देण्यास आला होता, तरीसुद्धां जेम्स गॉर्डन बेनेट नांवाच्या स्तंभलेखकानें या डॉन क्विक्झोटची टवाळी करणारा खूप मजकूर वृत्तपत्रांतून लिहिला. प्रथम प्रथम बर्गच्या खटल्यांना कंटाळलेले लोक ही टवाळी आवडीनें वाचूं लागले आणि मग विचार करूं लागले.

आतां मात्र सगळ्या समाजाचें लक्ष त्याच्या कार्याकडे लागलें. कांहीं माणसें त्याला उत्तेजन देत असलीं तरी बरीचशी त्याच्याशीं भांडायला उभीं रहात. पण त्यानें मात्र आपला उद्योग माघार न घेतां पण शत्रुत्व वृद्धि न बाळगतां चालू ठेवला होता. जिवंत कोंबड्यांची पिसें खुडून काढणें आणि दूधपुरवठा करणाऱ्या गोठ्यांत रोगट गुरें ठेवणें या विरुद्ध त्यानें मोठी चळवळ केली. या गोठ्यांतून क्षयरोगानें पछाडलेल्या हजारों गायी, त्यांना उभे रहायची ताकद नसतांनासुद्धां पट्ट्यानें बांधून उभ्या करून ठेवीत आणि त्या गतप्राण होईपर्यंत त्यांचें दूध काढीत.

आतां मात्र वृत्तपत्रें त्याच्या बाजूनें खणखणीतपणें लिहूं लागलीं. एकदां बेनेटचें मतपरिवर्तन झालें मात्र, तो बर्गचा मित्र आणि कट्टा पुरस्कर्ता झाला. तरीदेखील एखाद्या गुन्हेगाराला शिक्षा देवविण्यासाठीं अटीतटीनें भांडावें लागे. संस्थानचा मुख्य सरकारी वकील आणि जिल्ह्याचा सरकारी वकील यांनीं बर्गला आपल्या प्रतिनिधित्वाचे अधिकार दिले. आणि त्यामुळें तो कोर्ट कचेरींत चांगलाच प्रसिद्ध झाला. कावेबाज वकिलांनासुद्धां त्याची भीति वाटूं लागली. कुठल्याहि ज्यूरीवर त्याच्या नैतिक सामर्थ्याचें मोठें वजन असे. एखाद्या खटल्यांत खुद्द न्यायाधीशच दुर्लक्ष करूं लागला आणि ढिलेपणानें वागून गुन्हेगाराबद्दल जिव्हाळा दाखवूं लागला तर कोर्टाचा प्रसंगीं

★ ★ ★ ★ ★ ★

अवमान करण्याचा धोका पत्करूनहि बर्ग न्यायाधीशाला कायदा आणि त्याचें कर्तव्य याविषयीं समज देण्यास कमी करीत नसे. त्याचे कांहीं शत्रू त्याच्यावरहि कडी करायचा प्रयत्न करीत असत. असा एक प्रयत्न म्हणजे अमेरिकन जीवदया संघाची सनदच रद्द करण्याचा खटाटोप! पण हा खटाटोप करणारांना त्यांचा मतदानाचा अधिकारच नष्ट करावा अशी खटपट चालू असल्याचें कळलें म्हणजे ते गप्प बसत. कांहीं गुंडांनीं त्याचा जीव घेण्याचीच धमकी दिली. पण ही धमकी अमलांत आणण्याचा विचार करण्यासहि सवड मिळण्यापूर्वींच ते तुरुंगांत डांबले गेले.

बर्ग आपल्या बेतांची आंखणी अगदीं शांतपणें, मागचा पुढचा विचार करून आणि एखाद्या बदमाष गुंडालाच साधेल इतक्या कावेबाजपणें करीत असे. त्याचे शत्रू सगळ्यांत जर कशाला घाबरत असतील तर तें त्याच्या वागणुकींत सतत आढळणाऱ्या सौजन्यास; इतकें त्याचें सौजन्य धोरणीपणाचें असे. एखाद्या गुन्हेगारानें आपली अमानुष वर्तणूक सुधारली तर बर्ग, तो कुठेंहि भेटला तरी न चुकतां त्याला अभिवादन करीत असे.

पण कायदा आणि सहानुभूति या दोनच गोष्टी जीवदयामंडळास समर्थ करण्यास पुरेशा नव्हत्या. पैशाची फार गरज होती आणि आरंभीं तर हेन्री बर्गची खाजगी मालमत्ता येवढाच जीवदयामंडळाच्या आर्थिक गरजेचा आधार होता. कित्येक वेळीं पैशाची तूट पडली म्हणजे तो आपल्या एका खोलीच्या कचेरींत डोकें धरून चिंताक्रांत होऊन बसत असे. अशा वेळीं आपलें कार्य इथेंच संपणार असेंहि त्याला वाटूं लागे

अशा स्थितींत एक दिवस न्यूयॉर्कमधल्या एका इस्पितळांतून त्याला एक संदेश आला. एका आजारी मनुष्यास बर्गला भेटायची इच्छा होती. गोंधळलेल्या मनःस्थितींत तो तेथें गेला आणि त्या माणसाला भेटला तो एक बोनार्ड नांवाचा वृद्ध फ्रेंच मनुष्य होता. पूर्वीं तो फांसे-

* * *

पारध्याचा धंदा करीत असे. बर्गवर वर्तमानपत्रांतून होणारे हल्ले तो वाचीत असे. ती टीका वाचून टीकाकारांच्या क्षुद्र मनःस्थितीचा त्याला फार राग आला. त्याच्या अमदानींत प्राण्यांना क्रौर्यानें वागविण्याचे पुष्कळ नमुने त्यानें पाहिले होते. म्हणूनच आपल्या कमाईचा कांहीं भाग बर्गच्या कार्यासाठीं बर्गला द्यावा असें त्याच्या मनांत होतें. आपली अल्पशी देणगी बर्गनें स्वीकारावी अशी त्यानें त्याला विनंती केली. थोड्याच दिवसांत एक लाख पंधरा हजार डॉलर्सच्या 'अल्पशा' देणगीचा चेक बर्गच्या हातांत पडला. त्याचे आभार मानण्यासाठीं बर्ग घाईघाईनें त्या इस्पितळांत गेला. पण आपल्या सदसद्विवेक बुद्धीवरील ओझें दूर झाल्यामुळें तो वृद्ध मनुष्य मरण पावला होता.

आतां नशिबाला सुलट गति मिळाली होती. आतां देणग्यांचा वर्षाव सुरू झाला. जीवदया मंडळाची लोकजागृतीची चळवळ देशभर पसरली. आज S. P. C. A. ही संस्था (Society for Prevention of Cruelty to Animals) एकट्या न्यूयॉर्क शहरांत सालीना अडीच लाख जनावरांची पांजरपोळांत सोय करते. चारशे पन्नास चुकलेलीं, आजारीं वा जखमी जनावरें दर दिवशीं रस्त्यावरून गोळा करून त्यांना त्यांची शुश्रूषा करून शक्य तों त्यांच्या मालकांकडे परत करते किंवा ठिकठिकाणच्या गोठ्यांत त्यांची सोय करते. स्वतः आजारी पडलेल्या लोकांची किंवा कांहीं गुन्हा करून तुरुंगांत गेलेल्यांची गुरेंढोरें वा कुत्रीं–मांजरें यांचीहि हें मंडळ काळजी घेतें.

हें मंडळ दरवर्षी न्यूयॉर्कमधील पाळावयाचे प्राणी विकणाऱ्या पांच हजार दुकानांची पहाणी करतें. सहा हजार तबेल्यांना भेट देतें, आणि बारा हजार तक्रारींची तपासणी करतें. आतां घोडागाडीऐवजीं ओझीं वाहण्यासाठीं ट्रक्स आले असले तरी अजूनहि हें मंडळ वर्षाकांठीं सुमारें २५००० घोड्यांची काळजी घेते आणि त्यांच्यासाठीं शहरभर पाण्याच्या हौदांची सोय संस्थेनें केली आहे.

* * * * * *

न्यूयॉर्कप्रमाणें अमेरिकेच्या सर्व संस्थानांत मिळून या मंडळाच्या सहाशें चौसष्ट शाखा सर्वत्र विखुरलेल्या आहेत. या शाखांतून होणारा लाखो डॉलर्सचा खर्च आणि प्राणीमात्राची सेवा याच्या मुळाशीं हेन्री बर्ग या एकाच माणसाची दयाशीलता, चिकाटी आणि द्रष्टेपण आहे यांत शंका नाहीं.

इ. स. १८८८ मध्यें बर्ग निधन पावला. तोंपर्यंत तो S. P. C. A. या संस्थेचा अध्यक्ष होता. सुरुवातीला सर्व बारीक सारीक कामें तो स्वत:च करीत असे. पुढें मात्र संस्थेचा व्याप सर्वार्थानें वाढला. पण मूळच्या कल्पनेवरून मात्र तिची दृष्टि ढळली नाहीं. संस्थेनें काय काय कामें करावींत या संबंधींच्या त्याच्या बहुतेक सर्व कल्पना आणि अपेक्षा त्याच्या हयातींतच पूर्ण झाल्या.

प्राण्यांशीं दयाबुद्धीनें कां वागायचें याविषयीं बर्गनें आपली मुख्य कल्पना विशद करून सांगितली आहे तीच फार महत्त्वाची आहे. त्यानें हें वारंवार सांगितलें आहे कीं, प्राण्यांशीं क्रौर्यानें वागणें हें मनुष्याच्या आत्म्याच्या प्रतिष्ठेस कमीपणा आणणारें आहे. मनुष्य एखाद्या प्राण्यांशीं अमानुषतेनें वागतो तेव्हां त्या प्राण्याला होणाऱ्या यातनांपेक्षां यातना देणाराचा अध:पात फार मोठा असतो.

बर्गनें जें जें योजलें तें तें सर्व करून दाखविलें. एवढी मोठी संस्था स्थापन करून ती त्यानें सुस्थिर केली. त्यानंतर वास्तविक त्यानें आपलें जीवितकार्य साध्य झालें असें समजून विश्रांति घ्यावयास पाहिजे होती. पण तो एवढ्यावर संतुष्ट नव्हता. त्याच्या सदसद्-विवेक बुद्धीला आणखी एक सामाजिक दु:ख सतत टोचत होतें. तें म्हणजे निरनिराळ्या कारणांनीं वांया जाणाऱ्या मुलांची दु:स्थिति. न्यूयार्क शहराच्या रस्त्यांतून हिंडतांना कितीतरी अमेरिकन मुलें पतित झालेलीं तो बघत होता आणि कळवळत होता.

त्या दिवसांत मुलांना सार्वजनिक उद्यानांत खेळायची परवानगी नव्हती. कांहीं मुलें रस्त्यावर मिळेल तें काम करीत. कांहीं मुलांना

* * *

पुढें करून धंदेवाईक भिकारी भीक मागत. पाहणाराच्या मनांत दया उपजावी म्हणून या मुलांना गुंगीचें औषध देऊन विद्रूप केलेलें असे. त्यांना गुलामासारखें वागविण्यांत येई आणि त्याविरुद्ध कुठलाहि कायदा नव्हता.

प्राण्यांना क्रौर्यानें वागवूं नये असा कायदा होऊनदेखील मुलांच्या हक्काचा कायदा विधिमंडळांत उधळला गेला. वृत्तपत्रें आणि धर्मसंस्था यांनींहि असा कायदा करण्यानें घर या संस्थेचें पावित्र्य नष्ट होतें असा ओरडा केला. वयांत न आलेल्या मुलाला स्वतःची इच्छा असूं शकत नाहीं आणि तो म्हणजे वडील माणसांची एक मालमत्ता आहे असा कायद्याचा दृष्टिकोन होता. एखाद्या बापानें आपल्या मुलाला कसें वागवावें या विषयांत तुम्हीं लक्ष घातलेंत तर कोर्ट, धर्मगुरु आणि शेजारी-पाजारी तुम्हालाच दोषी ठरवीत.

ही दुस्थिति पाहूनसुद्धां बर्ग ती डोळ्यांआड करीत होता. आपल्याला दिवसभर जीवदया संघाचें काम पुरतें तेव्हां दुसऱ्या कोणीं पुढाकार घेऊन मुलांच्या मुक्ततेचा प्रयत्न करायला पाहिजे अशी तो स्वतःची समजूत घाली. पण कोणीच पुढें आलें नाहीं. लाखों पालकांची वस्ती असलेल्या न्यूयॉर्क शहरांत एकाहि दांपत्याला दुसऱ्याच्या मुलाबद्दल दया उपजली नाहीं. त्यांचें हृदय कुणाच्याहि छळानें हलूं नये इतकें कठोर होतें.

पण १८७३ सालीं एक प्रसंग घडला. श्रीमति व्हीलर नांवाच्या एका समाजकार्यकर्त्या स्त्रीला मेरी एलन नांवाच्या मुलीचे हाल पाहवेनात. त्या मुलीला तिचे पालक गुरासारखी मारहाण करीत. तिची सुटका करण्यासाठीं शेजारपाजारचे कुणीहि प्रयत्न करीनात. अखेरीस हें असह्य झाल्यानंतर ती हेन्री बर्गकडे आली आणि म्हणाली, "मेरी एलनला एखादा लहान प्राणी तरी कां समजूं नये! तेवढें तरी संरक्षण तिला कां मिळूं नये?"

आणि बर्गनें मागली पुढली संपूर्ण तयारी करून मेरी एलनच्या

* * * * * *

पालकावर खटला भरला. त्या मुलीला एका चादरींत गुंडाळून कोर्टांत आणून न्यायाधीशाला ती किती सुखांत (?) होती हें दाखविलें तेव्हां न्यायदेवतेचे आतांपर्यंत बंद असलेले डोळे उघडले. त्या पालकाविरुद्ध बर्गनें खटला जिंकून त्याला शिक्षा देवविली. या यशानंतर त्यानें एल्रिज टी. गेरी हा तरुण वकील आणि जॉन डी. राईट नांवाचे क्वेकर पंथीय दयाळू गृहस्थ ह्यांच्या सहाय्यानें मुलांच्या वतीनें 'दयेचा अर्ज' तयार केला. पुढें स्थापन झालेल्या 'न्यूयॉर्क सोसायटी फॉर दि प्रिव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टु चिल्ड्रेन' या संस्थेला या अर्जामुळें स्फूर्ति मिळाली. तोच त्यांच्या कार्याचा पाया होय. या संस्थेचें कार्य हें आज सगळ्या राष्ट्राला अभिमान वाटेल असें झालें आहे.

पण अगदीं मागें वळून पाहिलें तर या थोर कार्याच्या मुळाशीं उंच, काटकुळा आणि एकाकी असलेला हेन्री बर्गच आहे. "त्यानें एक नव्या प्रकारचा भलेपणा शोधून काढला" असें जें त्याच्या विषयीं म्हणतात तें अगदीं यथार्थच आहे. असे थोर पुरुष अत्यंत दुर्मिळ होत.

● ● ●



# सॅम हाऊस्टन

१०

## एकाकी तारा

इ. स. १८०९ मधली गोष्ट. अमेरिकेंतल्या नॉर्थ कॅरोलिना संस्थानांतल्या ग्रेट स्मोकीज या डोंगराच्या पायथ्याशीं वसलेल्या चेरोकी नांवाच्या खेडयांत १६ वर्षांचा एक गोरा मुलगा एका सकाळीं चालत आला आणि तिथल्या रेडइंडियन रहिवाशांना म्हणाला, 'मी आजपासून तुमच्यांतच रहायला आलों आहे.' नेहमीं फटकून वागणाऱ्या श्वेतवर्णीय माणसांच्या जातींतला हा मुलगा हें बोलतो यांवर त्यांचा विश्वास बसेना. पण त्याची धडधाकट शरीरयष्टि आणि घट्ट व पिळदार स्नायू, तसेच त्याच्या डोळयांतले भाव त्यांना एकदम आवडले. आजहि त्याचा प्रौढ वयांतला फोटो तुम्हीं पाहिलांत तरी त्याच्या डोळयांतलें वैशिष्टय तुमच्या मनांत भरेल. लांबवर कशाकडे तरी तो स्थिर आणि तेजस्वी दृष्टीनें पहात आहे असें तुम्हांला दिसेल आणि त्याला पाहून दिवसा उजेडीं निळया आकाशांतहि दिसून येणाऱ्या एकाकी ताऱ्याशीं त्याचें साम्य आहे असें तुम्हांला वाटेल.

★ ★ ★ ★ ★ ★

त्याचा जन्म २ मार्च १७९३ या दिवशीं व्हर्जिनियांतल्या टिंबर रिज या ठिकाणीं झाला. तो त्याच्या आईच्या नऊ मुलांपैकीं अनुक्रमें दुसरा. तो स्वतंत्र वृत्तीचा असल्यामुळेंच कारकुनी पेशा सोडून कांहीं-तरी वेगळ्या तऱ्हेनें नशीब काढायला निघाला. त्या रेड इंडियन लोकांनीं त्यांच्याकडे आलेल्या नवागताचें मनःपूर्वक स्वागत केलें. लवकरच तो सर्वांचाच आवडता झाला. आणि तिथल्या प्रमुखानें त्याला दत्तक घेऊन रॅव्हन हें नांव दिलें. रॅव्हन हा एक पक्षी असून तो दिसण्यांत सुंदर, थोडासा गूढ वाटणारा, उंच उडणारा आणि रुबाबदार असतो. या पक्ष्याचें नांव हा त्याच्या व्यक्तित्वाचा एक अविभाज्य घटक आहे असें रेड इंडियन जमात मानते. त्यांनीं हाऊस्ट-नला अगदीं योग्य नांव दिलें होतें यांत शंका नाहीं.

जाऊन-येऊन असा तीन वर्षें तो या लोकांसमवेत राहिला. गरजा कशा कमी कराव्यात, भूक कशी कंठावी आणि गाढ कसें झोंपावें हें तो त्यांच्यापासून शिकला. त्यांची छानछोकीची आवड, आणि त्यांची वक्तृत्वाची शैली ही जशी त्यानें त्या लोकांपासून उचलली तसेंच एखादें गुह्य मनांत ठेवावें, कांहीं झालें तरी त्याचा परिस्फोट होऊं देऊं नये हेंहि तो त्यांच्यापासूनच शिकला. प्रणयाचे पहिले धडे आपण रेड इंडियन युवतींकडूनच घेतलें असें तो स्वतःच सांगतो आणि त्याच्या समकालीनांत त्याच्याइतका स्त्रियांचा कैवारी, स्त्रियांना, प्रिय असलेला दुसरा कोणी झाला नाहीं. चेरोकीच्या लोकांनींच त्याला गनिमीकाव्यानें लढण्याचें शिक्षण दिलें. आणि म्हणूनच पुढें जवळ जवळ हातून गमावलेला टेक्सास प्रांत तो परत जिंकून घेऊं शकला. पण इथेंहि तो फार काळ राहूं शकला नाहीं. त्यानें रणनौबतींचा आवाज ऐकला आणि आपल्या विसाव्या वाढदिवशीं सैनिक म्हणून १८१२ च्या युद्धांत तो दाखल झाला. त्याचे वडील क्रांतियुद्धांतील सैनिक होते. त्यांची बंदूक त्याच्या आईनें त्याला दिली आणि त्याच्या बोटांत एक आंगठी घातली. तो जसजसा लठ्ठ होत गेला, नांव-

* * *

लौकिकास चढला आणि त्याला मानचिन्हें म्हणून आणखी आंगठ्या मिळत गेल्या तसतशी ती आंगठी जागा बदलूं लागून अखेर डाव्या हाताच्या करंगळीवर येऊन स्थिर झाली. पण तो मरेपर्यंत ती तिथें होती, कारण त्या आंगठीच्या आंत ' प्रतिष्ठा '—Honour– हा शब्द कोरलेला होता.

रेड इंडियन लोकांची ' क्रीक ' म्हणून आणखी एक जमात होती. ते खंदे लढवय्ये असून या युद्धांत ब्रिटिशाच्या बाजूनें लढत होते. त्यांच्याविरुद्ध ' चेरोकी ' टोळीवाल्यांच्या बाजूनें हाऊस्टन लढला. ' हॉर्सशू बेड ' च्या लढाईंत-रेड इंडियन लोकांनीं लढलेली ही कदाचित् सर्वांत मोठी लढाई असेल—एक अगदीं कनिष्ठ दर्जाचा सैनिकी अधिकारी असलेल्या हाऊस्टननें सेनापति अॅन्ड्र्यू जॅक्सनच्या बरोबरीनें पराक्रम गाजवला. त्याच्या मांडींत एक बाण घुसला तेव्हां स्वतः सेनापतीनें त्याची पाठ थोपटली आणि मरणोन्मुख दिसणाऱ्या या मुलाला सैन्याच्या मागच्या बाजूला शुश्रूषेसाठीं हलवण्याचा त्यानें हुकूम दिला. पण जेव्हां लढाई अगदीं हातघाईवर आली तेव्हां वरिष्ठांची अवज्ञा करूनहि हाऊस्टननें दुसरा हल्ला चढवला आणि त्यांत त्याला बंदुकीच्या दोन गोळ्या लागून तो खाली पडला. मृत्यू त्याच्या अगदीं निकट आला होता पण अखेर त्यानें त्याला सोडून दिलें. त्याचा एक हात मात्र कायमचा जायबंदी झाला.

पण हाऊस्टनसारखा मातबर सहकारी लाभल्यानें सेनापति जॅक्सनचे हात दुप्पट बळकट झाले होते. रेड इंडियनांच्या प्रदेशांतला गोऱ्यांचा प्रतिनिधि म्हणून त्याची नेमणूक करावी अशी शिफारस जॅक्सननें केली. पण त्या जागेवरून करायचें काम मात्र अत्यंत अवघड आणि त्याला शिव्याशाप मिळवून देणारें होतें. चेरोकी जमातीपैकीं कांहीं लोकांनीं मिसिसिपी नदीच्या पलीकडे आपली वस्ती हलवून गोऱ्या लोकांना आपली जुनी जागा वसाहतीसाठीं द्यावी यासाठीं त्यांचें मन वळवण्याचें काम त्याच्यावर सोंपवलें गेलें. आणि त्याचा आणि चेरोकी

* * * * * *

जमातीचा स्नेह असल्यानेंच त्याला हें काम रक्त न सांडतां पार पाडता आलें. पण रेड इंडियनांच्या राजकारणापलीकडचें कांहींतरी राजकारण हाऊस्टनच्या डोक्यांत घोळत होतें. नॅशव्हिले येथें जाऊन त्यानें कायद्याचा अभ्यास केला आणि अवघ्या सहा महिन्यांत वकिलीच्या परीक्षेंत यशस्वी होऊन त्यानें आपल्या चाहत्यांनासुद्धां चकित केलें.

संथपणानें पण सतत तो पुढें पुढें जात होता. अवघ्या दहा वर्षांत तो अॅटर्नी जनरल, नंतर कॉंग्रेसचा म्हणजे मध्यवर्ति लोकसभेचा सदस्य आणि सरते शेवटीं टेनेसी राज्याचा गव्हर्नर झाला. तो 'ओल्ड हिकरी'चा म्हणजे सेनापती जॅक्सनचा उजवा हात होता म्हणूनच त्याला लोक भराभर अधिकारपदावर निवडत होते असें नाहीं तर 'यंग हिकरी' म्हणजे हाऊस्टन याच्याहि अंगांत असे कांहीं बहुमोल सद्‌गुण होते कीं, त्यांच्या सहाय्यामुळेंच जॅक्सन खूपच लोकप्रिय झाला. तो जन्मजात लढवय्या तर होताच पण तसाच राजकारणधुरंधर आणि द्वंद्वयुद्धांतहि निष्णात होता. अर्थात् त्याला द्वंद्वयुद्धें प्रिय नव्हतीं हा भाग वेगळा. तो सहा फूट दोन इंच उंच होता आणि अंगावर ठिपके असलेल्या राखी रंगाच्या घोड्यावर तो बसला म्हणजे तसून्तसू खंदा योद्धा दिसे.

या दरबारी रुबाबामुळ तरुण हाऊस्टन कुठल्याहि समारंभांत उठून दिसे. चेहरे आणि नांवें लक्षांत ठेवण्याची त्याची शक्ति विलक्षण होती. आणि त्यामुळें आपल्याला न विसरणाऱ्या या थोर पुरुषाला अनेक लोक आपला जिव्हाळ्याचा मित्र मानीत. त्याच्याजवळ एक लांकडी ठोकळा आणि त्याचा सुप्रसिद्ध चाकू सदैव असे. त्यांतून एखादी छोटी वस्तु करून मागण्यासाठीं लहान मुलांचा त्याच्यामागें घोळका असे. कुठलाहि सामुदायिक उत्सव त्याच्याशिवाय साजराच होत नसे.

अॅन्ड्र्यू जॅक्सन अमेरिकेचा अध्यक्ष झाला त्यावेळीं सॅमचें वय पस्तीस

* * *

वर्षांचें असून सीमेवरील लोकांचा तो अगदीं आदर्श पुढारी झाला होता. त्याला सर्वार्थानें दैव अनुकूल होतें. फक्त त्याचें लग्न झालें नव्हतें.

तेंहि १८२९ सालीं एलिझा ॲलन नांवाच्या टेनेसीमधल्या एक खानदान कुटुंबांतील १९ वर्षांच्या मुलीशीं झालें. लग्नानंतर तीनच महिन्यांनीं गव्हर्नरच्या जागेच्या फेर निवडणुकीसाठीं तो उभा असतांना त्याची नवपरिणींत पत्नी त्याला सोडून गेली. त्याच्या खाजगी जीवनांतील या आपत्तीचा फायदा घेऊन त्याच्याविरुद्ध या गोष्टीचेंच भांडवल करण्याचा त्याच्या हितशत्रूंनीं प्रयत्न केला. पण स्वतःला सांवरण्यासाठींसुद्धां त्यानें आपल्या पत्नीविरुद्ध एक ब्रहि उच्चारला नाहीं. त्यानें मूकपणें आपल्या गव्हर्नरच्या जागेचा राजीनामा दिला आणि तो टेनेसींतून नाहींसा झाला. त्याच्या फारकतीचें रहस्य कधींच कोणाला कळलें नाहीं. फार उशीरा त्याच्या बायकोला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. आणि तिनें पुन्हां पतीनें आपला स्वीकार करावा म्हणून खटपट केली.

तो परत आपल्या चेरोकी बांधवांत येऊन राहिला. तिथें त्याची टिआना रोजर्स या तरुणीशीं गांठ पडली. ही त्याची दुसरी सहचारिणी. गोऱ्या लोकांनीं त्याला बहिष्कृत केलें, त्याचा भरभराटीला आलेला जीवनक्रम विस्कळीत केला तेव्हां तो चेरोकी जमातीपैकीं एक होऊन राहिला. त्यांनीं त्याला आपल्या सल्लागार मंडळांत घेतलें. त्यानें त्यांच्या इतर जमातींशीं होणाऱ्या लढाया थांबवल्या. अमेरिकन सरकारनें नेमलेले ‘ इंडियन एजंट ’ त्यांना अनेक तऱ्हेनें सतावीत. म्हणून त्यांच्या वतीनें त्यांचा राष्ट्रीय पोषाख करूनच तो अध्यक्ष जॅक्सन-पूर्वींचा सेनापती–कडे गेला आणि त्यानें हें इंडियन एजंट रेडइंडियनांची फसवणूक करतातच पण आपल्या सरकारलाहि कसें फसवतात तें त्याला दाखवून दिलें. जॅक्सननें त्याचें म्हणणें ऐकून घेतलें आणि कित्येक एजंटांना नोकरीवरून काढून टाकलें व कित्येक कॉन्ट्रॅक्ट्स रद्द केलीं.

दर वर्षी तो प्रेसिडेन्टचा पाहुणा म्हणून वॉशिंग्टनला येऊन दरबारी

* * * * * *

थाटांत राहूं लागला. आतां त्याला पुन्हा बरे दिवस आले होते. ज्या समाजांत त्याची खूप बदनामी झाली होती त्याच समाजाला तो पुन्हां आवडूं लागला होता. रेडइंडियन बाईचा नवरा म्हणून त्याच्या हितशत्रूंनीं त्याची टवाळी करायचा प्रयत्न केला. त्याला देशच नाहीं आणि त्याची अखेर दारुड्या म्हणून व्हायची असेंहि त्यांनीं म्हटलें. पण तें सारें व्यर्थ गेलें. टेक्सासमधील सॅन ॲन्टोनियो येथें अलॅमो म्हणून एक इमारत होती. त्या ठिकाणीं त्याचें भवितव्य त्याची जणं वाट पहात होतें. त्या ठिकाणीं तो नेमका गेला.

त्यावेळीं तो प्रदेश टेक्सास नांवाचा अमेरिकेचा प्रांत झालेला नव्हता. १८३२ मध्यें तो मेक्सिकोच्या एका प्रांताचा विभाग होता. तो इतका विस्तीर्ण होता कीं, त्याच्या विस्ताराची कुणालाच कल्पना नव्हती. युरोपांतील कुठल्याहि देशापेक्षां—रशिया वगळून—तो मोठा होता. पण त्याची नीट पहाणी झालेली नव्हती.

या प्रदेशाच्या एका बाजूला समुद्र तर दुसऱ्या बाजूला रिओ गांद्रे ही नदी, तिसऱ्या बाजूला पाईन वृक्षांच्या रांगा तर चौथ्या बाजूला वालुकामय प्रदेश होता. या भूमीतून अमेरिकन राष्ट्राला रॉकेल, नैसर्गिक वायु, गंधक, लोखंड, डांबर इत्यादि नानाविध तऱ्हेची अपरंपार संपत्ति मिळणार होती हें कोणाच्या स्वप्नांतहि नव्हतें.

सॅम हाउस्टनला कल्पनाहि नव्हती कीं एक दिवस त्याला 'टेक्सासचा जॉर्ज वॉशिंग्टन' हें अभिधान मिळणार होतें पण त्या विशाल अव्याप्त भूमीनें त्याला आकर्षित केलें. गेलीं दहा वर्षें अमेरिकन लोक टेक्सासमध्यें वस्ती करूं लागले होते आणि त्यांना सॅमची गरज होती. तेथें वसाहतीसाठीं येणाऱ्यांत सहकुटुंब येणारे शेतकरी जसे होते तसे फांसेपारधी, व्यापारी, पेंढारी, मिशनरी असे नानाप्रकारचे लोक होते. जवळ-जवळ लोकवस्ती अजिबात नसलेला हा प्रदेश झोपाळू स्पेनच्या ताब्यांत कित्येक वर्षें होता. १८२१ मध्यें मेक्सिकोनें स्पेनशीं लढून आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित केलें, तेव्हांपासून आपल्या ईशान्येकडील

* * *

टक्सास हा प्रदेश मेक्सिकोनें अमेरिकन लोकांना वसाहत करण्यास बंद केला. पण त्यापूर्वीच तिथलें कितीतरी परगणे रक्तानें आणि विचारसरणीनें अमेरिकन बनले होते. तद्देशीयांची एक नवी जातच उदयाला येत होती. ते मेक्सिकन लोकांसारखें तरबेज घोडेस्वार होते, टेनेसीच्या लोकांसारखें उत्कृष्ट निशाणपटु होते आणि लढाईंत तर सैतानालाहि मागें सारतील असे शूर होते. त्यांच्यांतहि आतां स्वातंत्र्याचें वारे शिरूं पहात होतें. त्यांनाहि टेक्सास मेक्सिकोपासून अलग आणि स्वतंत्र करावयाचा होता.

टेक्सासमधल्या नेकॉग्डोचेस् गांवीं १८३६ पूर्वींच हाऊस्टन वकिली करण्यासाठीं जाऊन राहिला होता. पण टेक्सास त्यावेळीं अत्यंत अस्वस्थ मन:स्थितींत होता. मेक्सिकोचा निर्दय जुलूमशहा सान्ता आना यानें वॉशिंग्टनमधील अध्यक्षाच्या निवासस्थानावर आपलें निशाण लावायची धमकी दिली होती. त्यानें तेथील लोकांचा छळ आरंभला होता व त्या छळानें हळूंहळूं परमावधि गांठली. अखेरीस टेक्सासच्या जनतेनें हाऊस्टनच्या आधिपत्याखालीं बंड पुकारून टेक्सासचें स्वतंत्र लोकसत्ताक जाहीर केलें. खवळलेल्या जनतेला पुढारी हवा होता तो त्यांना मिळाला होता.

आरंभीं बंडखोरांचें सैन्य म्हणजे देशभक्त तरुण आणि पेंढारी यांच्या लहान लहान स्वतंत्र तुकड्या होत्या आणि त्या उतावीळपणें मन मानेल तशा वागत. प्रथम प्रथम मेक्सिकन सैनिक आणि बंडखोर यांच्या किरकोळ झटापटी सुरू झाल्या. पण १८३६ च्या वसंतऋतूच्या सुरुवातीस म्हणजे हिंवाळ्याचा कडाका कमी होतांच, सांता आनानें कवाइती सैन्याच्या कसलेल्या तीन पलटणी घेऊन सान ॲन्टोनिओवर चढाई केली. तेथल्या अलॅमो या मिशनच्या गढीवजा इमारतींत बंडखोरांनीं आश्रय घेतला होता. त्या सांपळ्यांतून त्यांनीं वेळींच माघार घ्यावी अशी आज्ञा सेनापति हाऊस्टननें दिली. पण ती कोणीं मानली नाहीं. फेब्रुवारी महिन्यांत अलॅमोला वेढा पडला, व मार्चच्या ६ तार-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३५९२२ दि: ...

* * * * * *

खेस त्यांत सांपडलेल्या सर्व देशभक्तांची कत्तल करून सांता आनानें अलॅमो घेतली. युद्धशास्त्राप्रमाणें जो उपदेश शहाणपणाचा होता तो ठोकरून लावल्यामुळें शूर देशभक्त हुतात्मे ठरले पण साध्य कांहींच झालें नाहीं. टेक्सासमध्यें सगळीकडे असे आणखी पराभव झाले आणि अखेरीस टेक्सासच्या ३७० स्वातंत्र्य सैनिकांचीं एक छोटी तुकडी तेवढी हाऊस्टनजवळ उरली.

पण आतां मात्र त्याचा गनिमी कावा त्याच्या उपयोगी पडला. त्यानें जंगलांत रहाणाऱ्या आदिवासींना सैनिक बनविले. त्यांच्यांत शिस्त बाणवली आणि एखाद्या चतुर कोल्ह्याप्रमाणें सांता आनाच्या पुढें येणाऱ्या सैन्याला हुलकावण्या दिल्या. ३७ दिवस ही पद्धतशीर माघार चालू होती. बाह्यतः असें दिसूं लागलें होतें कीं, आपल्या धमकीप्रमाणें एकूण एक अमेरिकन टॅक्सासबाहेर तो हांकलून काढणारच.

एप्रिलच्या २१ तारखेस सांता आना एका नदीच्या कांठीं–सध्यांच्या हौस्टन शहराजवळ–आत्मविश्वासपूर्वक वामकुक्षी करीत होता. आणि तो हवा होता तसा बरोबर एका बेचक्यांत सांपडला होता. हाऊस्टन याच संधीची वाट पहात होता. नदीजवळ एकच पूल होता. तो हाऊस्टननें आधींच उडवून टाकून कुठल्याहि सैन्याला माघार घेण्याचा रस्ताच बंद करून टाकला आणि तो आपल्यापेक्षां प्रबळ असलेल्या शत्रुसैन्यावर चालून गेला. त्यावेळीं त्याच्या अंगांत जणूं वारें संचारलें आणि तो आपल्या सैनिकांना उच्च स्वरानें म्हणाला, ‘ अलॅमोची कत्तल लक्षांत ठेवा आणि पुढें चला ! ’ त्याच्या सैनिकांनींहि तोच घोष केला. ‘ ॲलमोची कत्तल लक्षांत ठेवा ! ’

आणि अवघ्या पंधरा मिनिटांत ती लढाई जिंकली गेली. मेक्सिकन सैन्याचा पार धुव्वा उडाला होता. कांहीं मेले आणि बाकीचे शरण आले. निर्दय सांता आनाची तलवार सॅमच्या हातांत आली. पण ती पेलायचीहि ताकद त्याच्या हातांत उरली नव्हती. कारण, जे २४

* * *

टेक्सन सैनिक त्या हातघाईच्या चकमकींत जखमी झाले त्या सर्वांत त्याच्याच जखमा भयंकर होत्या.

त्याच्या रक्तांत भिनलेल्या विषारांतून बरे व्हायला त्याला कित्येक दिवस लागले. तो बरा झाला पण पायानें जन्माचा अधू झाला. तरी-सुद्धां टेक्सासच्या पहिल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकींत तोच जिंकला. टेक्सासची राजधानी म्हणजे एक खेडें होतें आणि त्याच्या आरमारांत फक्त तीन जहाजें होतीं; तरी पण त्या राज्यांत नौदल होतें, भूदल होतें, टपाल–वांटपाची व्यवस्था होती. न्यायमंदिर, लोकसभा आणि मुख्य म्हणजे राष्ट्राला घटनाहि होती. लंडन, पॅरीस, वॉशिंग्टन येथें त्याचे वकीलहि होते. राष्ट्राचें स्वतःचें चलन होतें, ध्वज होता आणि त्यावर एकाकी ताऱ्याचें चिन्हहि होतें.

एका रानटी आणि असंस्कृत समाजाला त्यानें एका शिस्तींत गोंवलें आणि कार्यक्षम कारभाराच्या खुणा त्यानें मागें ठेवल्या. घटने-प्रमाणें त्याला पुन्हा अध्यक्षपदासाठीं उभें राहतां येत नव्हतें म्हणून तो निवृत्त झाला. यावेळीं त्याची पत्नी टिआना निधन पावली होती. तिची उणीव त्यानें आलाबामाच्या, मार्गारेट लीशी विवाह करून भरून काढली. ती अत्यंत धार्मिक वृत्तीची होती. तिच्यापासून त्याला आठ मुलें झालीं आणि त्यांचें वैवाहिक आयुष्य अत्यंत सुखांत गेलें.

सॅमनंतर मिराबो बोनापार्ट लामार टेक्सासचा अध्यक्ष झाला. हा अत्यंत बेजबाबदार होता. टेक्सास अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत सामील करून घ्यावयाचीं चालू असलेलीं बोलणीं बाजूस सारून यानें ब्रिटन आणि फ्रान्स या दोघांनाहि झुलवायचा प्रयत्न केला. चेरोकी जमातीशीं त्यानें युद्ध पुकारलें. दक्षिण मेक्सिकोंतील युकाटान संस्था-नांत क्रांति झाली. तिकडे आरमार पाठवून नसत्या भानगडी निर्माण केल्या. कागदी चलन इतकें छापलें कीं, देशाचें दिवाळें निघायची वेळ आली, देश कर्जबाजारी झाला, राज्ययंत्र मोडकळीस आलें. अशा

* * * * * *

स्थितींतच त्यानें सांता फे ही मेक्सिकोची राजधानी काबीज करण्यासाठीं सैन्य पाठविलें, पण त्या सैन्याचा संपूर्ण पराभव झाला.

आणि म्हणून टेक्सासच्या नागरिकांनीं हाऊस्टनला पुनः अध्यक्ष केलें. सांता फेवरील हल्ल्याचा सूड घेण्यासाठीं सांता आना पुनः चढाई करून येत होता. खजिना रिता, शिस्त नाहीं, आणि आरमार हुकमत मानीत नाहीं अशी भयानक स्थिति असतांना हाऊस्टननें सूत्रें हातांत घेतलीं. आणि टेक्सास संकटांत आहे याच गोष्टीचा उपयोग करून लंडन आणि वॉशिंग्टन यांच्याशीं राजनैतिक बोलणीं करून सांता आनावर दडपण आणवून त्याला माघार घ्यायला लावली. चेरोकी लोकांवरोबरचें वैर थांबवून त्यांना शांत केलें, खर्च कमी केले आणि कारभारांत शिस्त आणून टेक्सासला भवितव्याची आशा वाटावी इतपत परिस्थिति सुधारली.

आपल्या मायदेशाशीं टेक्सासला संलग्न करून घ्यावें हें त्याचें फारा वर्षांपासूनचें स्वप्न होतें. पण तें सन्मानानें व्हायला हवें होतें. अमेरिकेला टेक्सासच्या सहकार्याची गरज वाटून तें व्हायला हवें होतें. " टक्सास अमेरिकेशिवाय जगूं शकेल पण अमेरिकेला टेक्सासशिवाय जगणें कठीण जाईल. " असें तो म्हणत असे आणि टेक्सासचे लोक आजहि तसेंच म्हणतात. (इतकी संपत्ति टेक्सासनें अमेरिकेला दिली.) शेवटीं १८४५ मध्यें स्वतंत्र लोकसत्ताक म्हणून टेक्सास संयुक्त संस्थानांत सामील झालें. टेक्सासचा स्वतंत्र ध्वज खालीं उतरवतांना त्याला भूमीचा स्पर्श होऊं नये म्हणून हाऊस्टननें तो वरच्यावर झेलला. ध्वजावरील एकाकी ताऱ्याला संयुक्त संस्थानांच्या तारकांकित ध्वजावर स्थान मिळालें.

या नव्या संस्थानानें सॅमला आपला प्रतिनिधी म्हणून वॉशिंग्टन येथें सेनेटवर पाठविलें. तेथें त्यानें १४ वर्षें काम केलें. पण पुन्हा फुटीरपणाचें वारें वाहूं लागलें. यादवी युद्ध भडकणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं.

* * *

हें महायुद्ध गुलामगिरीच्या प्रश्नावरून उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील संस्थानें यांत झालें. सॅम हा दक्षिणेकडील होता. पण तो धैर्याचा पुरुष होता. तो म्हणाला, " दक्षिणेचे हक्क आणि उत्तरेचे हक्क असा भेदाभेद मला करतां येत नाहीं. आमचे हक्क संयुक्त संस्थानांतील सर्वांचे हक्क आहेत आणि आमचें एकराष्ट्रीयत्व संभाळलेंच पाहिजे." त्याबरोबर चवताळलेले दक्षिणी ' डेमोक्रॅट्स ' त्याच्यावर उलटले. पण सॅमनें मात्र पुनः पुनः एकी टिकवण्याच्या बाजूनेंच मत दिलें. तत्त्वनिष्ठा ही राजकारणापेक्षां आजवर तो श्रेष्ठ मानीत आला होता आणि आतांहि तो तत्त्वनिष्ठच राहिला

एवढेंच नव्हे तर त्यानें तत्त्वनिष्ठेचा पाठपुरावा केला. आपल्या अधू पायानें टेक्सास संस्थानचा दौरा त्यानें केला आणि आपल्या अचूक युक्तिवादानें लोकांचें मन वळवून कुठल्याहि पक्षाच्या पाठिंब्याशिवाय त्यानें गव्हर्नरपदाची निवडणूक लढविली आणि तो निवडून आला. यावेळीं सातव्यांदा टेक्सासचें भवितव्य ठरविण्याची जबाबदारी त्यानें उचलली आणि तीहि टेक्सास वेगळें होण्यासाठीं आटापिटा करीत असतांना. तो स्वतः वेगळे व्हायच्या विरुद्ध होता. पण वेगळें व्हायचेंच असेल तर संस्थानानें आपल्या पुरतें बाहेर पडावें आणि तेंहि सामोपचारानें, कुठलाहि कडवटपणा न आणतां, असें त्याचें मत होतें. पण टेक्सासनें तें मानलें नाहीं. त्यानें बंड पुकारलें. सात दक्षिणी संस्थानांच्या संघटित राज्याशीं मी एकनिष्ठ राहीन अशी शपथ गव्हर्नर म्हणून घेण्यासाठीं त्याला सांगण्यांत आलें, तेव्हां तो येवढेंच म्हणाला, " टेक्सासवर माझें अतिशय प्रेम आहे आणि म्हणून तेथें कलह आणि रक्तपात व्हावा असें मला वाटत नाहीं. पण ज्या तत्त्वासाठीं मी लढलों तीं मीच पायदळीं तुडवणार नाहीं."

तेव्हां गव्हर्नरचें पद ' रिकामें झालें आहे ' असें सरकारी आज्ञेनें जाहीर करण्यांत आलें.

वृद्ध सॅम हंट्स्व्हील येथील आपल्या घरीं परत आला. तेथें त्याच्या

* * * * * *

बायकोनें लावलेल्या फुलझाडांच्या ताटव्यांत तो धूम्रपान करीत बसे. मात्र त्याचा मुलगा टेक्सासच्या सैन्याबरोबर लढाईवर गेला होता, त्याची बातमी काय येते इकडे त्याचें लक्ष लागलेलें असें. जिथें टेक्सास तिथें हाऊस्टन मनानें तरी असे टेक्सासच्या उज्ज्वल भवितव्याविषयींचा त्याचा विश्वास आणि त्याची निष्ठा कधीं ढळली नाहीं. गेटीसबर्ग आणि व्हिक्स्बर्ग येथील अखेरच्या लढायांत दक्षिणेचा अखेरचा पराभव झाला आणि अमेरिकेची एकी अभंग राहिली. त्या लढायांनंतर अवघ्या तीन आठवड्यांनीं हाऊस्टन निधन पावला. पण त्याचे अखेरचे शब्द "टेक्सास–टेक्सास" हेच होते. आणि आजहि टेक्सासच्या जनतेच्या हृदयांत या सर्वांत थोर 'टेक्सनचें' स्थान अढळ आहे.

● ● ●



# जिम ब्रिजर

११

## महान् पथनिर्देशक

अमेरिका हें नवीन राष्ट्र स्थापन झालें तेव्हां आदिवासी रेड इंडियन आणि अमेरिकन यांत कट्टर वैर असून सतत लढाया होत असत. उत्तर अमेरिकेंत सूक्स नांवाची एक जमात आहे. रेड क्लाउड नांवाच्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं कर्नल कॅरिंग्टन या अमेरिकन सैनिकी अधिकाऱ्याबरोबर त्यांच्या झटापटी चालू होत्या. तो मुलुख अपरिचित आणि धोक्याचा होता. म्हणून कॅरिंग्टनला जिम ब्रिजर या जाणत्या मार्गदर्शकाचें फार महत्त्व वाटत होतें. पण नेमका त्याचवेळीं त्याला कामावरून कमी करून त्याचा रोजचा पांच डॉलर्सचा खर्च वांचवावा असा वरिष्ठांचा हुकुम कॅरिंग्टनच्या हातीं पडला. त्यावर त्यानें सात्विक संतापानें शेरा लिहिला, "अमलांत आणणें अशक्य!"

ती १८६६ मधली गोष्ट. रेड क्लाऊडच्या मुलखांत ब्रिजरशिवाय पाऊल घालणें म्हणजे डोळे काढून ठेवून चालत जाण्यासारखें होतें.

* * * * * *

एकच वर्षामागें ब्रिजरच्या मदतीनें पॉवडर नदीच्या जवळ जी मोहीम झाली त्यांतली एकमेव लढाई जिंकतां आली. तीसुद्धां कां तर पन्नास मैलांवरून रेड इंडियन लोकांच्या राहुटयांजवळ त्यांनीं पेटवलेल्या शेकोटयांचा धूर ब्रिजरला ओळखतां आला म्हणून. उत्तरेकडील मैदानें आणि रॉकी पर्वताच्या रांगा यांची खडा न् खडा माहिती असलेला हा वाटाडया अगदीं साधासुधा माणूस असून त्याला लिहितां-वाचतांहि येत नसे.

ब्रिजरला अकरा इंडियन भाषांत बोलतां येत असून खाणाखुणांच्या जागतिक भाषेंत तर तो फारच प्रवीण होता. एखादा बाणाचा तुकडा किंवा रेड इंडियन वापरीत तसला काळविटाच्या कातडयाचा जोडा जरी दिसला तरी तेवढयावरून कोणत्या जमातीचे लोक तिथून गेले असावेत हें तो बरोबर सांगत असे. त्यांच्या मनांतले विचार आणि ते लोक पुढें काय करतील याचा अंदाज तो अगदीं अचूक घेत असे. असेंहि सांगतात कीं, अमेरिकन लोकांना आपलीं शस्त्रास्त्रें नेणाऱ्या वाहनांचा गोल व्यूह रचून इंडियन लोकांच्या हल्ल्याला तोंड देण्यास प्रथम ब्रिजरनें शिकवलें. हें मात्र निश्चित कीं, तो स्वतः तीस वर्षें कांहीं इंडियन जमातींशीं वेळोवेळीं लढत आला होता. इंडियन लोकांचे डावपेंच त्याला वॉशिंग्टनच्या गृहखात्यापेक्षां जास्त चांगलें कळत होते. तो स्वतः पश्चिम अमेरिकेचा रहिवासी असून मॉंटानाच्या बिटररूट या सुंदर फुलापासून ते कोलोरेडो येथील औषधी वनस्पतीपर्यंत आणि दक्षिण डाकोटाच्या डोंगराळ प्रदेशापासून उताहच्या दऱ्याखोऱ्यापर्यंतचा सगळा मुलुख त्याला इतर कुणापेक्षांहि अधिक परिचित होता.

अमेरिकेमध्ये ‘ नॅशनल पार्क्स ’ नांवाचें सरकारनें मुद्दाम संरक्षित ठरवून बाजूला काढलेले विस्तीर्ण भूभाग आहेत. आज ज्याला ‘ यलो-स्टोन नॅशनल पार्क ’ म्हणतात, हा असाच ३५०० चौरस मैलांचा प्रदेश असून त्यांत गरम पाण्याचे झरे, धबधबे वगैरे अनेक सृष्ट चम-

* * *

त्कार आहेत. मॉन्टाना आणि इडाहो संस्थानांलगत हा प्रदेश आहे. या प्रदेशाची माहिती असलेला एकमेव गोरा मनुष्य म्हणजे जिम ब्रिजर. तो जेव्हां त्या प्रदेशाविषयीं विलक्षण हकीकती सांगूं लागला, तेव्हां लोकांनीं त्याला थापाड्या ठरवलें. पण तो ज्याला 'कांचेचा पर्वत' म्हणत असे त्याला आज 'ऑब्सीडिय कडा' म्हणतात. वर थंड खालीं ऊन असणाऱ्या ज्या झऱ्याचें वर्णन तो करीत असे तो झरा आज 'फायरहोल नदी' म्हणून ओळखला जातो. आणि 'अटलांटिक व पॅसिफिक या दोन्हीं महासागरांकडे वहात जाणारा प्रवाह' ही अगदीं अशक्य वाटणारी गोष्ट असल्याचें मान्य झालें आहे. खरोखरीच त्या प्रवाहाचे दोन फाटे दोन समुद्रांना जाऊन मिळतात.

पण त्याच्या कहाण्या ऐकून लोक हंसतात असें जेव्हां त्याला आढळून आलें तेव्हां तो गंभीरपणें त्यांना आपण ब्लॅकफूट नांवाच्या एका भयंकर रेड इंडियन माणसाच्या तावडींतून कसें निसटलों त्याची हकीकत सांगूं लागला. "एकदां असे सात भयंकर लोक माझा पाठलाग करूं लागले. तेव्हां मी पळतां पळतां हातांतल्या सहा बारी बंदुकीनें त्यांतल्या सहांना यमसदनाला पाठविलें आणि तेवढ्यांत मी एका डोंगराच्या कड्यावर येऊन पोचलों आणि तो सातवा खवीस अगदीं माझ्या पाठीशीं येऊन पोचला होता. इतका कीं त्याचे गरम उच्छ्वास मला माझ्या मानेवर जाणवत होते."

"मग जिम, पुढें काय झालं तें सांग कीं!" असा लोक त्याला आग्रह करूं लागले तेव्हां तो सहज म्हणाला, "पुढं काय व्हायचंय्! त्यानं मला ठार मारलं अन् माझं ठोकं सोलून नेलं!"

जॉर्ज आर्मस्ट्रॉंग कस्टर हा अमेरिकन सैन्यांतील जनरल असून रेड इंडियन लोकांशीं लढण्यांत तरबेज होता. त्याच्या जन्माच्या कितीतरी आधींपासून जिम इंडियन लोकांशीं लढत होता आणि कस्टरच्यानंतर आणखी पांच वर्षें जिमनें या जगांत काढलीं आणि अशा जिमचें डोकें मारून आणणें आणि तें त्या रानटी लोकांच्या

* * * * * *

पद्धतीप्रमाणें सोलून ध्वजासारखें मिरवणें या सारखा मोठा मान त्यांना कुठलाच वाटत नव्हता, पण तें त्यांना कधींच साधलें नव्हतें. त्याचें कारणहि उघड आहे. जिमनें इंडियन लोकांचे डावपेंच आणि त्यांचीं गांवठी हत्यारें यांचे योग्य मूल्यमापन केलें होतें आणि तो त्यांना कधींच क्षुल्लक समजत नव्हता. त्यांचे बाण, कुऱ्हाडी, भाले वगैरे हत्यारें बंदुकीइतकींच भयानक होतीं, हें त्यानें जवळून पाहिलें होतें—इतक्या जवळून कीं, इतक्या जवळ गेल्यानंतर तेथून जिवंत निसटणेंसुद्धां प्राय: अशक्य होतें.

जिमच्या या कीर्तीमुळें मोठमोठीं माणसें त्याच्या दारीं येत. फ्री मॉन्ट आणि बॉन्व्हीलसारखे पर्यटक, फादर डी स्मेटसारखे कॅथॉलिक मिशनरी, मार्कस व्हिटमनसारखे मिशनरी डॉक्टर, आल्बर्ट सिडने जॉन्सनसारखे पुढे यादवी युद्धांत नांवाजलेले योद्धे, भूगर्भशास्त्रज्ञ हेडन, सृष्टपदार्थवेत्ता विस्लिझनस् हे सर्व मोठया अभिमानानें त्याला आपला मित्र मानीत.

असा जरी तो कीर्तिमान होता तरी त्याची व्यक्तिश: फारच थोड्या लोकांशी ओळख होती. कारण, तो मितभाषी होता. त्याचें वर्तन इतकें सौम्य असें कीं, एखाद्या दुष्ट रेड इंडियनला तो फार दुबळा असावा असें वाटे. ब्रिजरला अशी धोक्याची शंका आली तर तो सापाच्या चपळाईनें त्या शत्रूवर हल्ला चढवून त्याला खिळखिळा करून टाकीत असे.

तो सैन्यांत कामगिरीवर असे तेव्हां आठवडेच्या आठवडे क्वचितच दृष्टीस पडे. कारण, पहांट होण्यापूर्वींच तो आपल्या राहुटींतून बाहेर पडे आणि रात्र पडल्यानंतर छावणींत परत येऊन सेनापतीला एकांतांत तो आपल्या कामाचा अहवाल देई. नंतर आपणच आपला स्वयंपाक करून एकटाच जेवण घेत असे. आणि नंतर अंगावर पांघरूण घेऊन, एक कान जमिनीला लावून– जमिनीला कान लावला असतां दूरवरच्या घोड्यांच्या टापा ऐकूं येतात– दुसऱ्या कानानें

* * *

आणखी कसली चाहूल लागते कीं काय तें ऐकत पडून राही. तीच त्याची विश्रांति.

वयाच्या तेराव्या वर्षीं तो पोरका झाला आणि एका लोहाराकडे काम करूं लागला. तेव्हांपासूनच तो स्वावलंबी झाला. ज्या मिसुरी संस्थानांतील सेन्ट लुई या बंदरांत तो रहात होता तें जग भांडकुदळ, खुनी, दारुडे, लोकर गोळा करणारे पारधी अशांसारख्यांचें असूनहि त्यांच्याशीं जमवून घेऊन तो राहूं लागला. याच ठिकाणीं कॅनडांतले भटके लोक येत रानटी पशूंची लोंकर किंवा कातडीं घेणारेहि येत. त्यांतले कांहीं तर हा धंदा मोठ्या प्रमाणावर करून श्रीमंत बनले होते. पूर्वीं स्वतःच पारध्याचा व्यवसाय करणारे आतां हाताखालीं बरेचसे पारधी नोकरीस ठेवून मोठ्या प्रमाणावर हा धंदा करीत.

इ. स. १८२२ मध्यें म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षीं त्यानें ऐकलें कीं, हेन्री आणि ॲश्ले नांवाच्या दोघा श्रीमान् गृहस्थांना शंभर धाडसी तरुण हवे होते मिसुरी नदीच्या उगमापर्यंत जावयाची त्यांची तयारी असल्यास त्यांना तेथें एक ते तीन वर्षें काम मिळणार होतें.

तरुण जिमनें लोहाराकडचा हातोडा फेकून दिला आणि तो या नव्या नोकरीसाठीं उमेदवार म्हणून हजर झाला. तो उंच होता. लोहाराकडे काम करून त्याचे स्नायु घटलेले होते, तो सडपातळ असला तरी ताठ होता. त्याच्या डोळ्यांकडे बघितलें म्हणजे तो प्रामाणिक दिसेच पण त्याशिवाय त्यांत एक वेगळीच चमक दिसे आणि असें वाटे कीं, कठीण प्रसंगींहि हा डगमगणार नाहीं. म्हणूनच त्याच्या गांठीं कुठलाहि अनुभव नसून नव्या मालकांनीं त्यास कामावर घेतलें. त्याच्याबरोबरच कामावर घेतलेले बहुतेक लोक तरुण असून अननुभवी होते पण ते सारे बळकट, चलाख, स्वावलंबी आणि पुढें जाण्यास उत्सुक असलेले असे होते.

आणि कामगिरी त्यांची वाटच पहात होती त्या काळचे युरोप-अमेरिकेंतले फॅशनेबल लोक बीव्हर या जंगली प्राण्याची लोंकर अस-

* * * * * *

लेल्या टोप्याच वापरीत. त्यामुळें हे बीव्हर प्राणी जिथे जास्तींत जास्त मिळतील तिथे सुप्रसिद्ध ' हडसन बे कंपनी 'च्या आधीं पोचण्याची ' हेन्री-अॅश्ले फर कंपनी 'ची धडपड होती. ही हडसन बे कंपनी म्हणजे श्रीमंत ब्रिटिश लोकांची मक्तेदारी असून त्यांना सरकारी मदत होती आणि त्यांचा पसाराहि मोठा होता.

अशा तऱ्हेनें उत्तम बस्तान बसलेल्या धंद्याशीं अमेरिकन व्यापाऱ्यांना चढाओढ करायची होती. त्यांच्याजवळ भांडवल थोडें असलें तरी एक नवी क्रांतिकारक आणि खास अमेरिकन अशी कार्यपद्धति होती. लोंकर गोळा करायला जाणाऱ्या तुकडींतील प्रत्येक घटक स्वावलंबी आणि बळकट असून त्याला जास्तीत जास्त संधि देण्यांत येई आणि अर्थातच त्याला तितकीच जबाबदारीहि स्वीकारावी लागे. हा अमेरिकन पारधी स्वत:साठीं आणि व्यवसायासाठींहि राबत असे आणि तशीच त्याची भावना असे. कारण, त्याचें कौशल्य आणि त्याचा पुढाकार यांच्या प्रमाणांत त्याला नफ्यांत वांटा मिळे. त्यामुळें प्रतिवर्षी लोंकर गोळा करण्याच्या मोसमांत म्हणजे हिवाळ्यांत, धाडसी अमेरिकन व्यावसायिक बीव्हरच्या शिकारीसाठीं निबिड जंगलांत दूरवर जात ते पटाईत घोडेस्वार असून निशाणबाजींतहि तरबेज असत. ते कुठल्याहि संकटाला भीत नसत, पण शक्यतों भांडण-बखेडा टाळण्याचें शिक्षण त्यांना दिलेलें असे. कारण, अगदीं जवळचें सैन्याचें ठाणें देखील पुष्कळदां एक हजार मैलांइतकें दूर असे. अशा वेळीं स्वत:च्या सहकाऱ्यांखेरीज अन्य मदत मिळणें शक्य नसे. या लोकांना ' मौन्टनमेन ' म्हणत. यांच्याइतके निष्ठावान, हिकमती आणि धैर्यशाली जवान मिळणें कठीण.

जिम ब्रिजर हा पोरसवदा तरुण सर्वांत लहान होता. पण त्यानें दुसऱ्याच हिवाळ्यांत एक मोठा भौगोलिक शोध लावून अमेरिकन इतिहासाची दिशा अक्षरश: बदलली. त्यानें एका म्हशीच्या कातड्याची नाव बनवली आणि तीमध्यें बसून बेअर नदीचें उगमस्थान

* * *

शोधायला तो निघाला आणि एका शांत सरोवरांत येऊन पोचला. विशेष म्हणजे हें सरोवर एका वाळवंटाच्या मध्यभागीं होतें. तहानलेल्या जिमनें त्यांतील पाण्याचा घोट घेतला पण तो खारट लागल्यामुळें थुंकून टाकला. हें सरोवर म्हणजेच सुप्रसिद्ध 'ग्रेट सॉल्ट लेक' होय. हें शोधण्याचें श्रेय जिम ब्रिजरचें आहे.

अमेरिकेच्या पश्चिम भागांतील युटाह् संस्थान जिमनेंच शोधून काढलें. त्यांतल्या दऱ्यांना, मौंटन मेन–गिर्यारोहण पटु – 'गुंफा' म्हणत. वाळवंटावरील वाऱ्यांनीं त्या ऊबदार रहात आणि पर्वतशिखरांवरील हिमावरून आलेल्या वाऱ्यांनीं थंड होत. पारधीसाठीं हा प्रदेश अगदीं मनपसंत असा होता. जिमनें सांगितलेल्या या प्रदेशाच्या मनोरंजक हकीकतीमुळें त्याचें कांहीं सवंगडी तिथें गेले. त्यांच्यापैकीं फिट्झ पॅट्रिक यानें फ्रिमाँट या हुषार इसमास तेथें नेऊन त्या जागेचा नकाशा त्याच्याकडून तयार करून घेतला. या भागाला 'ब्रिजरचें नंदनवन' म्हणतात. या भागाचा शोध लावून ब्रिजरनें अमेरिकन इतिहासाचें एक नवें प्रकरण लिहिलें.

बीव्हर हा प्राणी अतिशय हुषार असा इंजिनिअर आहे. तो कोल्ह्यासारखा लबाड असून रात्रीं आपलें काम करतो आणि दिवसा लपून राहतो. आपल्याला पकडायला पारधी येतात हें जाणून तो नदी आणि ओढे यांचे मार्ग तोडलेलीं झाडें, दगड आणि माती टाकून बंद करीत असें. दिवसाउजेडीं त्याला हें काम करावें लागलें तर खबर देण्यासाठीं तो ठिकठिकाणीं दूत उभे करी. अशा या बीव्हरची शिकार करणें मोठें अवघड काम होतें. झाडावर बीव्हरनें केलेल्या खाणाखुणा व त्या केव्हां केल्या तें पारध्याला कळायला हवें असें. नदीच्या प्रवाहाच्याविरुद्ध दिशेला मैलच्या मैल चालत जाऊन बीव्हर नक्की सांपडेल अशा ठिकाणीं नदींत सांपळा लावून ठेवावा लागे. माणसाचा वास आला कीं बीव्हर पळ काढतो म्हणून त्या सांपळ्याला बीव्हरच्याच ग्रंथीपासून तयार केलेलें वासाचें तेल फांसावें लागे आणि पुन्हा तो सांपळा बीव्हर

* * * * * *

त्यांत अडकल्याबरोबर त्याच्यासकट तळाशीं जाणार नाहीं किंवा तो सांपळाच ओढून किनाऱ्यावर नेऊन त्यांतून आपली सुटका करून घेणार नाहीं इतकी खबरदारी घ्यावी लागे.

सांपळे लावण्याच्या ह्या कामांत ब्रिजर हा अतिशय तरबेज झाला होता आणि त्या काळीं बीव्हर लोंकरीच्या टोप्यांना अखंड मागणी असल्यानें कराल तेवढी शिकार थोडीच होती. तेव्हां प्रतिवर्षीं आपली तुकडी घेऊन जिम अधिकाधिक दूर जात होता. वाटेंत केलेली शिकार तो अतिशय खुबीनें ठिकठिकाणीं पाणीबंद खड्डे करून त्यांत लपवून ठेवीत असे. नंतर शिकार संपवून उन्हाळी मुक्कामासाठीं परत फिरतांना ही सगळीं लपवून ठेवलेली शिकार जिम ब्रिजर गोळा करीत असे. कित्येकदां त्याचा हा फेरफटका १००० मैलांचासुद्धां असे.

शिकारीचा मोसम संपल्यानंतर उन्हाळा जिथें घालवायचा तें संकेतस्थल आदल्या वर्षींच ठरविण्यांत येत असे. या ठिकाणीं दूरदूरच्या अरण्यांत गेलेले शिकारी-मांऊटन मेन-परत येऊन एकत्र जमूं लागत. या ठिकाणींच सेन्ट लुईसहून त्यांना वर्षभर पुरणाऱ्या सामुग्रीची गाडी पाठविली जाई. ही गाडी येण्याची वाट बघत जमलेले लोक ख्यालीखुशालींत वेळ घालवीत. त्यांच्या अंगावरचे कपडे काळविटाच्या मऊ पण चिवट कातड्याचे असत आणि पोर्क्युपाईन नांवाच्या जंगली प्राण्याच्या ताठ पिसांनीं त्यांचे पोषाख सजवलेले असत. हातावर बंदुकी झेलीत ठिकठिकाणचे लोक एकत्र आले आणि एकमेकांचीं ओळख पटली म्हणजे– कारण मोसमभर त्यांच्या दाढ्या वाढलेल्या असत– नमस्कार चमत्कार, आरडाओरडा आणि हंसणेंखिदळणें ह्यांना नुसता ऊत येई. अमेरिकन लोकांबरोबर स्नेहभाव बाळगणाऱ्या कांहीं रेड इंडियन जमातींचे दिखाऊ कपडे आणि मोठमोठीं पांघरुणें, गरुडाचीं पिसें आणि प्राण्यांच्या आंकड्यासारख्या नखांच्या भयानक माळा घेऊन तेथें येत. त्यांच्याबरोबर विक्रीसाठीं लोंकर आणि त्यांच्या मुली पण असत.

* * *

अशा तऱ्हेनें एकमेकांच्या जिनसांची अदलाबदल किंवा लहानशा प्रमाणांत ते देवघेव करीत. मद्यसेवन करीत, सुरस आणि चमत्कारिक गोष्टी एकमेकांना सांगत, हे शिकारी सामुग्रीची गाडी येईपर्यंत आपला वेळ घालवीत आणि गाडी आली कीं ओरडून आणि बंदुकींच्या फैरी झाडून तिचें स्वागत करीत. कारण, या गाडींतून बंदुका, दारूगोळा, ओझ्याचीं जनावरें आणि दारू, तंबाखू वगैरे जिन्नस येत आणि मग हजार डॉलर्स किंमतीचा बीव्हरसुद्धां या वस्तूंच्या खरेदीसाठीं विकला जाई. १८३५ सालच्या उन्हाळ्यांत ब्रिजर ३१ वर्षांचा होता. त्यानें "फ्लॅट हेड" जमातींतली एक मुलगी वधू म्हणून निवडली होती आणि तिच्याकरतां आरसे, मण्यांच्या माळा, लाल रंग आणि भपके-बाज परकर इत्यादि वस्तू घेण्यासाठीं ब्रिजरनें आपला सगळा लोक-रीचा सांठा फुंकून टाकला. जिमबरोबर आयुष्य घालवायला तद्देशीय मुलगीच योग्य होती. जिमनें एकूण तीन लग्नें केलीं. त्यांतलें हें पहिलें लग्न होय.

आणि एकाएकीं एक कल्पनातीत विलक्षण गोष्ट घडली. बीव्हर लोंकरीच्या टोप्या वापरायची पद्धत एकदम मागें पडलीं आणि त्यांची जागा रेशमी टोप्यांनीं घेतलीं. त्याबरोबर इकडे अमेरिकेच्या पश्चिमे-कडील जंगलांत लोंकर गोळा करणारांचा भावहि घसरला. १८४० च्या उन्हाळ्यांत जें संम्मेलन झालें तें निरोप देणारेंच ठरलें. हा व्यव-साय करणारे शिकारी ठिकठिकाणीं पांगले, कांहीं परागंदा झाले आणि अखेरीस हें नांवहि इतिहासांतून नाहींसें झालें. पण जिम मात्र पराभूत झाला नाहीं.

त्याच्या दूरदृष्टीला जुनी पश्चिम नाहींशी झाली तरी एका नव्या पश्चिमेचा उदय होत असलेला दिसला. वसाहतीसाठीं येणाऱ्या लोकांची संख्या सारखी वाढत होती. तें वसाहतींसाठीं पश्चिमेकडे निघाले म्हणजे खूप तयारीनिशीं निघत. अन्नाचा सांठा, इतर सामानसुमान, दारूगोळा, खूप पैसा, आणि चांगल्या मालवाहू गाड्या त्यांच्याबरोबर

* * * * * *

असत. पण जवळचे खाद्यपदार्थ संपल्यानंतर पश्चिमेकडील शुष्क प्रदेशांत त्या पैशाचा कांहींच उपयोग नव्हता. त्यानें एक अवघड ठिकाण हेतुपूर्वक शोधून काढलें. त्यानें हिशेब केला आणि ठरविलें कीं, याठिकाणीं पोंचेपर्यंत या वसाहतवाल्यांचे घोडे आणि खेचरें यांचा दम निघेल, मालगाड्यांच्या चाकांच्या लोखंडी धांवा निघून येतील, घोड्यांचें जीन आणि गाड्यांचें दांडे मोडकळीस येतील आणि या ठिकाणीं मेटाकुटीस आलेल्या या लोकांना मदतीचा हात द्यायला जिम ब्रिजर तयार राहील.

अशा तऱ्हेनें अडलेल्या प्रवाशांना मदत करतां यावी म्हणून व्योमिंग संस्थानच्या एका कोपऱ्यांत त्यानें 'फोर्ट ब्रिजर' नांवाचें विश्रांतिस्थान उभें केलें. ती जागा अतिशय सुंदर असून एका अखंड वाहणाऱ्या झऱ्याकांठीं सुंदर गवतानें आच्छादलेल्या जमिनीवर त्यानें ही गढी बांधली. या गढींत तेरा खोल्या असून एक सामानाची कोठी, एक लोहाराची भट्टी आणि एक सुताराचें दुकान होतें. या सर्वांभोंवतीं अठरा फूट उंचीचा एक दगडी तट होता. त्याच्या बाहेर सामानसुमान, गुरेंढोरें, वगैरेंसाठीं तबेले आणि त्याच्या पलीकडे मित्रभाव बाळगणाऱ्या इंडियन जमातींच्या राहुट्या असत. हे लोक लोंकर, म्हशीचें मांस या गोष्टी देऊन त्याच्या बदल्यांत कणीक आणि संसारोपयोगी उपकरणें मिळवीत. ब्रिजर स्वतः या गढींत फक्त उन्हाळ्यांत रहात असे. हिंवाळ्यांत तो मिसूरीपर्यंत जाऊन वसंत ऋतूच्या सुरुवातीला आपल्याला लागणारी साधनसामुग्री घेऊन येत असे.

मिसुरीहून पश्चिमेकडे वसाहत करायला येणाऱ्या लोकांना वाटेवर जेवण आणि सामानसुमान पुरवणारा फोर्ट ब्रिजर हा पहिला टप्पा झाला. कंटाळलेल्या, हाल अपेष्टांनीं शिणलेल्या आणि इंडियन लोकांच्या हल्ल्यांनीं बेजार झालेल्या प्रवाशांना तो जणुं कांहीं स्वर्गच वाटे. कित्येक लोकांचे जीव त्यामुळें वांचले, कित्येक स्त्रियांना वेड लागायचें टळलें आणि कित्येक आठवडे दूध न मिळालेल्या मुलांना तिथें

★ ★ ★

दूध मिळालें. तेथें अगदीं प्रारंभीं वसाहतीला जाणाऱ्या लोकांच्या दैनंदिनींत ब्रिजरचा उल्लेख असा आढळतो; "तो पाहुण्यांच्या स्वागतांत सढळ हाताचा होता; त्यानें आम्हाला डोंगर ओलांडतांना मार्गदर्शन केलें; तसेंच ताज्या दमाचे घोडे देऊन आमच्या मालगाड्याहि दुरुस्त करून दिल्या; इंडियनांशीं संबंध आला तेव्हां त्यानें दुभाष्याचें काम केलें; माझी पत्नी रडकुंडीला आली होती तिला धीर दिला; आमच्या मुलांना हंसवलें; त्याशिवाय बर्फ, वालुकामय प्रदेश आणि आमच्याशीं वैर करणारे रेडस्किन नांवाचे इंडियन ह्यांच्यापासून त्यानेंच आम्हांला वांचवलें."

पण पुढें जिमचा फोर्ट ब्रिजरहि त्याच्या हातून गेला. कारण, त्याचें आणि मोर्मोन जमातीचें वांकडें आलें. १८५७ मध्यें जेव्हां अमेरिकन सरकार आणि सेन्ट्स जमातीचे लोक यांचें युद्ध जुंपलें तेव्हां अमेरिकन सेनानी आल्बर्ट सिडने जॉन्सन याच्या सैन्याच्या वाटाड्याचें काम जिमनें केलें. जिम नसता तर त्या सैन्याची धडगत नव्हती. उटाहला पोचण्यापूर्वींच त्यांना हिवाळ्यानें गांठलें आणि त्यांची उपासमार होणार असें दिसूं लागलें. पण शोशोन जमातीशीं ब्रिजरची दोस्ती असल्यामुळें या सैन्याला मांसाचा पुरवठा होऊं शकला. तिथल्या हवामानाची त्याला चांगली माहिती असल्यानें वादळ केव्हां होईल आणि रात्रीं कुठें आसरा घ्यावा हें त्याला चांगलें माहीत होतें. आणि म्हणूनच वसंतऋतूच्या सुरुवातीस त्यांना उटाह जिंकता आलें पण तोंपर्यंत सेन्ट जमातीनें सूड म्हणून फोर्ट ब्रिजरच जाळून टाकला होता.

कॅप्टन स्टॅन्स्बरीनें स्थळांची भौगोलिक पहाणी करणाऱ्या इंजिनिअरांच्या तुकडीसमवेत मार्गदर्शनासाठीं ब्रिजरला नोकरीस ठेवलें, तेव्हां त्याची खरी किंमत अमेरिकन सैन्याला कळून चुकली. सैन्याला तोंपर्यंत माहीत असलेला दक्षिणेकडील रस्ता अत्यंत कष्टाचा असून त्या रस्त्यावर इंडियन जमातींच्या हल्ल्याची सतत भीति असे. त्यांना एखादा जवळचा रस्ता असेल तर हवा होता. जिमनें त्यांना " ब्रिजर

* * * * * *

पास " या रस्त्यानें दक्षिण व्योमिंगमधून पूर्व-पश्चिम नेलें. त्यामुळें शेंकडों मैल अंतर वांचलें आणि हल्ल्याचा धोका टळला. नंतर कॅप्टन स्टॅन्स्बरीच्या अहवालावरून टपाल वाहतूक आणि प्रवासी वाहतूक पहिले रस्ते सोडून या रस्त्यानें होऊं लागली. त्यावेळीं ही वाहतूक घोड्यावरून होत असे. पण पुढे जेव्हां प्रथमच रूळरस्ते आले तेव्हां युनियन पॅसिफिक रेल्वेनें डोळे झांकून हाच रस्ता पत्करला. आजहि अमेरिकेंतील ३० व्या क्रमांकाचा राजरस्ताहि येथूनच जातो. लाखों अमेरिकनांनीं आजवर ब्रिजरच्या पाठोपाठ तोच मार्ग अनुसरला आहे आणि पुढेंहि हजार वर्षेपर्यंत तरी तो एक महत्त्वाचा रस्ता म्हणून राहील.

१८५९ मध्यें कॅप्टन रेनॉल्डच्या इंजिनिअरांच्या तुकडीबरोबर मार्गदर्शक म्हणून जिमला पुन्हा बोलावण्यांत आलें. या तुकडीला नकाशे तयार करण्यासाठीं त्यानें एक हजार मैलांच्या वर्तुळांत फिरवलें. १८६१ सालीं ओव्हरलॅन्ड स्टेज कंपनीनें डेन्व्हर आणि सॉल्ट लेक सिटी यांना जोडणारा नवा रस्ता शोधण्यासाठीं त्याला नोकरीस ठेवलें. या ठिकाणीं त्यानें अडीचशें मैलांचा फेरा वांचवला. १८६५ मध्यें जनरल कोनरनें एका पर्यटनांत त्याची मदत घेतली. आणि पुढील वर्षीं कर्नल कॅरींग्टननें सरकारी आदेशाविरुद्ध जाऊनहि त्याची नोकरी चालू ठेवली हें सुरुवातीसच सांगितलें आहे.

वेस्ट पॉइन्ट येथील लष्करी कॉलेजांत युद्धशास्त्राचें पुस्तकी शिक्षण घेतलेल्या सेनापतींना वेडया सहसापासून परावृत्त करून त्यांचे आणि इतरांचे प्राण जिमनें वांचविलें हेच त्याचे खरे विजय होत. रेड क्लाऊड या रेड इंडियन पुढाऱ्याबरोबर जें युद्ध झालें त्यांत त्याचा मुख्य उद्योग म्हणजे सैनिकांची संख्या, हालचालीची सुलभता आणि सामुग्रीचा पुरवठा या बाबतींत शत्रूला अनुकूल परिस्थिति असेल त्यावेळीं अमेरिकन सेनापतीला युद्ध न करूं देणें हाच होता. तो त्यांना कागदी वीर Paper Collar Soldier, असें विनोदानें म्हणे. कारण,

★ ★ ★

त्यांना घोड्यावर कसें बसावें आणि घोड्यावर बसून गोळी कशी चालवावी याचें ज्ञानहि नव्हतें. रेड क्लाऊडबरोबरच्या पहिल्या युद्धांत अमेरिकन सैन्य हरलें तेव्हांच या गोष्टीचा प्रत्यय आला. सैन्याला माघार घ्यावी लागली आणि नंतर शत्रूच्या किल्ल्यांची सांखळी तोडून विस्कळीत करण्यासाठीं जी मोहीम आंखली तींत त्याला प्रमुख मार्गदर्शक नेमण्यांत आलें.

इंडियन लोकांच्या अनेक जमातींशीं जिमच्या झटापटी झाल्या. कपटी रिकॅरी, टेटन सूझ आणि आरापा होज इत्यादि जमातींशीं त्याला किमान तीस वेळां तरी लढावें लागलें. त्यांपैकीं दहाहून अधिक लढाया अमेरिकन लोकांचें हाडवैरी असे जे ब्लॅक फीट नांवाचें भयंकर लोक त्यांच्याशीं झाल्या.

एकदां याच लोकांशीं तहाचीं बोलणीं चालू असतां त्याच्या मनांत एकाएकीं संशय उत्पन्न झाला आणि त्यानें बंदूक उचलली. त्याच क्षणीं त्याच्या पाठींत बाण घुसला आणि नंतर त्याच्या असहायतेचा फायदा घेऊन त्याच्या शत्रूनें तडाखे हाणून त्याला बेशुद्ध केलें. त्याच्या शिकारी मित्रांनीं त्याला ओढून नेऊन त्याचा जीव वांचवला पण त्याच्या पाठींत घुसलेला बाण ओढून काढतांना इतक्या यातना होऊं लागल्या कीं, जिमच्या सांगण्यावरून तो मोडून काढावा लागला आणि त्याचें धातूचें टोंक त्याच्या कण्यांत तीन वर्षांपर्यंत तसेंच रुतून बसलें होतें. तीन वर्षें त्यानें दुःख सहन केलें आणि नंतर मार्क्स व्हिट्मन नांवाचा मिशनरी डॉक्टर तेथें आला आणि त्यानें तें टोंक त्याच्याभोवतीं वाढलेलें हाड कापून बाहेर काढलें. भूल देण्याचें साधन जवळ नव्हतें. तरीपण त्या शस्त्रक्रियेच्या वेळीं जिम कण्हलादेखील नाहीं. व्हिट्मनच्या ह्या कर्तबगारीनें रेड इंडियन लोकहि चकित झाले; थोडे घाबरलेसुद्धां. आणि ब्रिजरनें त्याचे उपकार फेडण्यासाठीं त्याच्या एकाकी रस्त्यावर त्याला खूप दूरपर्यंत सोबत केली.

जिम कांहीं केवळ सरकारी नोकरीच करीत होता असें नाहीं.

* * * * * *

त्यानें सर जॉर्ज गोअर नांवाच्या एका आयरीश उमरावाच्या वाटाड्याचें काम पत्करलें. हा उमराव मोठा शिकारी असून स्वभावानें कांहींसा चक्रम् होता. तो पश्चिम अमेरिकेंत शिकारीसाठीं आला होता. त्याच्याबरोबर शंभर घोडे व बारा शिकारी कुत्रे असून, त्याशिवाय शिकार करणारे मित्र, मारलेले प्राणी पेंढा भरून जसेच्यातसे ठेवणारें तज्ज्ञ आणि कांहीं सृष्टपदार्थवेत्ते यांचा मोठा लवाजमा होता. उत्कृष्ट मद्यांचा प्रचंड सांठा आणि शेक्स्पीयरचीं सगळीं नाटकेंहि त्याच्याबरोबर होतीं. ब्रिजरच्या मार्गदर्शनाखालीं गोअरनें अस्वलें, हरणें, रानरेडे आणि इतर मिळतील त्या मोठमोठ्या शिकारी केल्या. गोअरचा त्याच्यावर संपूर्ण विश्वास बसला आणि जिम त्याला इतका आवडूं लागला कीं, तो त्याला नजरेसमोरून हलूंहि देईना. संध्याकाळीं तो जिमला शेक्स्पीयरचीं नाटकें वाचून दाखवी आणि तीं ऐकतांना जिम जी खास आपली अशी खुमासदार टीका करी ती ऐकून त्याची भरपूर करमणूक होत असे.

जिमला शेक्स्पीयर इतका आवडूं लागला कीं, त्यानें दीडशें डॉलर्स खर्चून शेक्स्पीयरचें वाङ्मय विकत घेतलें. आणि महिना चाळीस डॉलर्स देऊन तें वाचून दाखवण्यासाठीं एक मुलगा नोकरीस ठेवला. त्याची स्मरणशक्ति इतकी उत्कृष्ट होती कीं, पानेंच्या पानें मजकूर नुसतां ऐकून त्यानें पाठ केला आणि बाहेर हिंडतांना किंग लियर आणि मॅक्बेथ यांतले संवाद तोंडानें म्हणतां म्हणतां मध्येंच तो अशीं कांहीं उत्स्फूर्त वाक्यें घुसडून देत असें कीं, त्यांतलीं मूळचीं कोणतीं आणि जिमचीं कोणतीं हें एखाद्या तज्ज्ञ साहित्यिकाशिवाय कुणालाहि कळलें नसतें.

१८६८ सालीं वयाच्या चौसष्टाव्या वर्षीं तो निवृत्त होऊन कन्सास शहराजवळ एक शेत घेऊन त्यावर जाऊन राहिला. त्याच्या तिन्हीं बायका यापूर्वींच निवर्तल्या होत्या. त्याच्याबरोबर सुरुवातीला जे शंभर साहसी तरुण बीव्हरच्या शिकारीसाठीं निघाले होते त्यांपैकीं

* * *

बऱ्याच जणांची वाताहात झालीं होतीं. अमेरिकन सरकारनें दहा वर्षें फोर्ट ब्रिजर भाड्यानें घेतला होता. त्यांतलीं एक कवडीहि जिमला दिली नव्हती. आणि म्हातारपणीं त्याची स्थिति हलाखीची झाली होती.

ज्या पश्चिमेकडील प्रदेशांत तो मोठा झाला आणि लढलादेखील तो प्रदेश आतां पार बदलला होता. कदाचित् अधिक चांगला झाला होता. ज्या ठिकाणीं रानरेडे मस्तवालपणें हुंदडत तेथें आतां गवताच्या कुरणावर पाळलेलीं पुष्ट गुरेंढोरें चरत होतीं आणि लोक वस्ती करून रहात होते. ज्या ठिकाणीं औषधोपचाराकरतां येऊन राहिलेल्या मिशनरी डॉक्टरांच्या राहुट्या होत्या तेथें आतां प्रार्थनामंदिरें उभीं असलेलीं दिसत होतीं. पण त्या प्रदेशांत आतां जिमला स्थान उरलें नव्हतें.

आतां त्याची दृष्टि मंद झाली होती. पूर्वी त्यानें दूरवर दिसणारीं हिमाच्छादित पर्वतशिखरें पाहिलीं होतीं. मैलच्या मैल अंतरावर असलेल्या इंडियनांची वस्ती तेथील धूर पाहून ओळखली होती. बीव्हरची वस्ती असणारीं आणि हिरव्या वृक्षांनीं वेढलेलीं शांत तळीं बघितलीं होतीं. पण यांपैकीं कांहींहि आतां त्याला दिसूं शकत नव्हतें. हळूंहळूं तर त्याला केवळ अंधारच दिसूं लागला. मग तो वेळ घालवण्यासाठीं आपल्या म्हाताऱ्या घोड्यावर बसून तो जाईल तिकडे त्याला जाऊं देत असे त्याचा म्हातारा कुत्रा सुलतानहि आतां थकला होता, लंगडत चालत होता. तरीपण तो तेवढा त्याला साथ करी. अखेरीस इ. स. १८८१ च्या उन्हाळ्यांत त्यानें देहत्याग केला आणि तो परमात्म्याशीं एकरूप झाला.

● ● ●



# लेनार्डो डा व्हिन्ची

१२

## नव्या युगाचा अग्रदूत

" जें आयुष्य कारणीं लागतें तेंच खरें दीर्घायुष्य ! "

वरील उद्‌गार ज्यानें काढलें त्याचें आयुष्य जर त्याच मापानें मोजलें तर तो अनेक शतकेंच नव्हे तर अनेक जन्म जगला असेंच म्हणावें लागेल. कारण लेनार्डो डा व्हिन्ची हा चित्रकलेच्या सुवर्ण-युगांतला सर्वश्रेष्ठ कलावंत तर होताच पण इतर अनेक शास्त्रांतहि त्याच्या बहुविधा प्रतिभेनें संचार केला होता. तो जरी अर्वाचीन कालांत जन्मला असें म्हटलें तरी सामाजिक पुनरुज्जीवनाच्या आंदो-लनाच्या अगदीं प्रारंभीच्या कालांत त्याचा जन्म झाला असल्यानें आपणांस अलीकडेच उपलब्ध झालेल्या तांत्रिक सुखसोयींचा लाभ त्याला झाला नव्हता.

त्यानें जे महत्त्वाचे शोध लावले ते त्याच्या टिपण वह्यांतच राहिले त्यामुळें ते कित्यक दिवसपर्यंत उजेडांतहि आले नाहींत. अगदीं अली-कडे ते मिळतील तेवढे एकत्र जुळवून प्रसिद्ध केले गेले आहेत. त्याच्या

* * *

मृत्यूनंतर त्याच्या टिपण वह्यांची वाताहात झाली. त्यांतल्या अर्ध्या-मुर्ध्या तर बहुधा नाहींशाच झाल्या असाव्यात. कारण त्यांचा लिलांव होऊन त्या विकल्या गेल्या. त्या ज्या लोकांनीं घेतल्या त्यांनाहि त्यांतल्या मजकुराचें महत्त्व माहीत नव्हतें. केवळ लेनार्डोचें हस्ताक्षर आपल्यापाशीं असावें म्हणून त्यांनीं त्या विकत घेतल्या होत्या. बरें, ज्या हातीं लागल्या त्या तरी वाचतां याव्यात ? त्या उलटया करून आरशासमोर धरल्या म्हणजे मात्र वाचतां येत. सुरुवातीला तो डावखोरा असला तरी पुढें तो सव्यसाची लेखक बनला. एवढेंच नव्हे तर त्यानें अनेक कला हस्तगत केल्या.

निसर्गानें या मुलाला ‘ देतां किती घेशिल दो करांनी ’ असें म्हणण्या इतक्या बौद्धिक देणग्या दिल्या खऱ्या पण त्याच्या या गुणांना शोभतील अशीं मातापितरें मात्र दिलीं नाहींत हें एक आश्चर्यच होय. पिढ्यान् पिढ्या शेतावर राबणाऱ्या एका गरीब कुलांत त्याच्या आईचा, कॅटेरिनाचा जन्म झाला होता. याच्या जन्माच्या वेळीं तिचें वय अवघें सोळा वर्षांचें होतें. पिरो द व्हिन्ची हें त्याच्या वडिलांचें नांव. त्यांचा व्यवसाय वकिली हा होता. अशा जोडप्याच्या पोटीं लग्न पूर्वसंबंधापासून हा असा प्रज्ञावंत मुलगा निसर्गानें जन्माला घालावा हें एक महदाश्चर्यच होय. त्याचा जन्म इटलीमध्यें आंचिआनो येथें १५ एप्रिल १४५२ या दिवशीं झाला.

पीरोचें लग्न हलक्या कुळांत जन्मलेल्या कॅटेरिनाशीं होऊं नये म्हणून त्याच्या कुटुंबियांनीं त्याचें लग्न दुसऱ्या एका उच्चकुलीन मुलीशीं लावून दिलें; इकडे कॅटेरिनानेंहि एका शेतकऱ्याशीं लग्न केलें. पण त्या काळच्या पद्धतीप्रमाणें पीरोनें आपला हा मुलगा त्याच्या आईपासून विकत घेतला आणि त्याला उघड उघड आपला मुलगा म्हणून सांभाळलें. बालपणीं घरांत तो एकुलता एक असल्यानें अति लाडानें बिघडलेला होता. त्याचें देखणेंपण आणि तल्लख बुद्धि यांमुळें त्याच्या स्वभाववैगुण्याकडे क्षमाबुद्धीनें पाहिलें जाई. थट्टेच्या नांवा-

[illegible] ग्रंथ संग्रहालय, [illegible]
अनुक्रम [illegible] दि. [illegible]

* * * * * *

खालीं इतरांना सतावणें, विलक्षण घमेंड बाळगणें आणि दिवास्वप्नें रंगवीत बसणें हे दुर्गुण लाडामुळें त्याच्या अंगीं कायमचें घर करून बसले होतें. पण त्याचें स्वप्नरंजन वेडगळपणाचें नव्हतें तर तें त्याच्या प्रतिभेच्या दीप्तीनें प्रकाशमान झालेलें असे. आपल्या उत्तर आयुष्यांत तो नेहमीं म्हणायचा कीं एखादा कलावंत ज्यावेळीं कांहीं न करतां स्वस्थ बसलेला दिसतो तेव्हांच तो निर्मितीच्या खटपटींत जास्तींत जास्त व्यग्र असतो असें खुशाल समजावें. पण ज्यावेळीं लेनार्डो लौकिकाच्या उत्तुंग शिखरावर होता त्यावेळींदेखील त्याच्या धन्यांनीं त्याच्याकडून एखाद्या रंगाऱ्याकडून काम करवून घ्यावें तसें काम करून घेतलें.

सुप्रसिद्ध फ्लॉरेन्स शहराजवळ व्हिन्ची हें गांव होतें आणि व्हिन्ची-लगतच त्याच्या कुटुंबाचा जमीनजुमला होता. त्या ठिकाणीं त्याचें बालपण गेलें. भोंवतालच्या रम्य प्रदेशांत तो मनःपूत हिंडला. शेंड्याशीं एखाद्या लहान छत्रीप्रमाणें दिसणाऱ्या पाईन वृक्षांच्या राईत, वळणा-वांकणांनीं वहात जाणारे निर्झर, स्वप्नांत रंगून गेल्याप्रमाणें दिसणारे डोंगरांचे सुळके आणि नाजुक रानफुलें यांच्या सौंदर्याचें प्राशन त्यानें इतक्या तद्रूपतेनें केलें कीं, कालांतरानें तें त्याच्या कुंचल्यांतून नव्या नवलाईनें रंगलेल्या निसर्गचित्रांच्या रूपानेंच बाहेर पडलें. बाह्यतः आळशीपणांत त्यानें जे दिवस घालवले होते आणि ज्या पायीं वडील माणसांचीं बोलणीं ऐकून घेतलीं होतीं आणि उदाहरणें सुटत नाहींत म्हणून शिक्षकांना दमविलें होतें त्या दिवसांची ही कमाई पुढें त्याच्या अशी उपयोगी पडली. त्याला संगीताचीहि अत्यंत आवड होती आणि वाद्यवादनांत तो तरबेज होता. काव्यपंक्ती त्याच्या ओठांतून सहज-गत्या बाहेर पडत. जीवन हीच त्याची माता आणि गुरु होतें आणि त्याचें बहुतेक सारें शिक्षण त्याचें त्यानेंच संपादन केलें होतें.

आपली जन्मदात्री आई जिवंत आहे हें त्याला ठाऊक असलें तरी ती कोण व कोठें आहे हें त्याला कधींच कळूं दिलें गेलें नव्हतें. तिच्या

* * *

भटीसाठीं त्याचा जीव इतका तळमळत होता कीं, अखेरीस ती तळमळ असह्य होऊन तिचा काव्यरूपानें उद्रेक झाला आणि त्यानें सुंदर काव्यकुसुमें ख्रिस्तमाता मेरीच्या चरणीं अर्पण केलीं. आई–मुलाचें प्रेम कसें असतें तें प्रत्यक्ष कधींच न अनुभवल्यामुळें त्यानें कल्पनेनेंच बाल येशूचें मन रिझवण्यासाठीं, सारें जग धुंडाळून त्या जगांतली टवटवीत फुलें, बागडणारीं कोंकरें, चिमुकले पक्षी आणि सुंदर वनश्री व कडेकपाऱ्या यांचें काव्यमय वर्णन केलें.

आपल्या मुलानें काढलेलीं सुरुवातीचीं चित्रें जेव्हां पीरोनें बघितलीं तेव्हां त्याचा दुसरा अभ्यासक्रम गुंडाळून ठेवून त्यानें त्याची रवानगी फ्लॉरेन्समधील व्हेरोशिओ या चित्रकाराच्या रंगमंदिरांत उमेदवार म्हणून केली. व्हेरोशिओ हा सबकुछ शिकवणारा कलावंत होता. अर्थात् त्याचें सर्वच कलांचें ज्ञान यथातथाच असलें तरी लिओनार्डोची महत्त्वाकांक्षा चित्रकला, संगीत, भूमिति, इतकेंच काय सृष्टिज्ञानासुद्धां सर्व विद्यांत प्राविण्य मिळविण्याची असल्यानें हे गुरुशिष्य एकमेकांवर खूष होते. या ठिकाणीं त्याला पुष्कळ चांगले मित्र मिळाले. बोटीसेली हा त्यांपैकींच एक होता. हे दोघेजण वादविवाद करीत, दंगामस्ती करीत, कुस्ती खेळत आणि माजलेल्या घोड्याला वठणीवर आणण्याचा खेळहि खेळत. हा खेळ तर लेनार्डोचा अत्यंत आवडता होता आणि त्याला तो योग्यहि होता. कारण, घोड्याचा नाल एका हातांत धरून वांकवण्याइतकी शक्ति त्याच्या अंगांत होती असें सांगतात.

त्याचे आणखीहि कांहीं छंद होते. एक तर फ्लॉरेन्समधील प्रार्थनामंदिरें आणि वाडें यांची कलापूर्ण बांधणी आणि कलाकुसर यांचा अभ्यास करीत तो हिंडत असे अगर कुठेंतरी सांवलींत बसून गणित, भूगोल, खगोल इत्यादि शास्त्रें जाणणाऱ्या विद्वानांबरोबर त्या त्या विषयांची चर्चा करून त्यांचेकडून मिळणारें नवें ज्ञान आत्मसात करीत असे. तो खूप बोलका होता. आणि शहरबाजारांत उभा राहून समोर

* * * * * *

जमलेल्या लोकांना तो आपल्या कल्पना आणि स्वप्नें रंगवून सांगत असे थोडासा आदर आणि थोडी घटकाभर करमणूक तर होईल अशी दृष्टि मनांत ठेवून जमलेलीं तीं माणसें डोंगराखालून बोगदे खणण्याच्या आणि सबंध इमारती इकडून तिकडे हलविण्याच्या त्याच्या योजना लक्षपूर्वक ऐकून घेत.

एकंदरींत त्याचा जो विज्ञानाचा अभ्यास चालू होता त्याची थोडी-बहुत चुणूक त्याच्या या योजनांवरून दिसते. नानाप्रकारच्या शास्त्रांचा अभ्यास तो करीत असे, तो केवळ तीं शास्त्रें आपल्या कलेच्या अभ्यासाला पूरक व्हावीत म्हणून नव्हे, तर तीं शास्त्रें कलेचा एक अविभाज्य घटक आहेत या भावनेनें. त्याच्या मतानें कला आणि विज्ञान यांत मूलभूत वेगळेंपण असें नाहींच. परमेश्वरानें निर्मिलेल्या एकाच विश्वाचें स्वरूप वर्णन करण्याचे ते दोन वेगळे पर्याय आहेत एवढेंच. जे कलावंत निसर्गाचें स्वरूप पालटून त्यांत सुधारणा करण्याची भाषा बोलत त्यांच्यावर तो तुटून पडत असे. तो म्हणे, "त्यांपेक्षां त्यांनीं स्वत:ला सुधारावें हें बरें; कारण, निसर्ग कधींच चुकणार नाहीं.'

तो अत्यंत एकाग्रतेनें चित्रें रंगवावयास बसे आणि रुक्ष व चेतनाहीन अशा वस्तुमात्रांवर साक्षात् सुंदरतेचें चैतन्यमय वस्त्र चढवून त्याला विलक्षण शोभा आणीत असे. त्याचें ज्ञान, त्याचें तंत्र, त्याचें निर्दोष रेखाटन–कौशल्य, या सार्‍या गोष्टी मात्र एखाद्या जादुगाराच्या हातचलाखीसारख्या अदृश्य रहात. आपल्या कलेवर त्याचें किती प्रेम होतें तें सरावाकरतां त्यानें रेखाटलेल्या चित्रांवर नुसती नजर टाकली तरी लक्षांत येईल आणि त्याच्या हातचीं अशीं शेंकडों रेखाचित्रें उपलब्ध आहेत. त्यांतल्या एका पानांवर एखाद्या अर्भकाच्या गालावरील खळी अगर गुडघ्याची दुमड दिसेल तर त्याच्याच शेजारीं एखाद्या मरणोन्मुख सैनिकाच्या चेहर्‍यावरील भयानक भाव दिसतील. दुसर्‍या पानावर एखाद्या अर्धनग्न श्रांत कामकर्‍याचें रेखाचित्र असेल तर लगतच एखादी तरुण स्त्री गुडघे टेकून प्रार्थना करीत असलेली दिसेल.

* * *

एखाद्या वृद्ध भिकाऱ्याच्या मानेचे ओढलेले स्नायू तुम्हांला जेथें रेखाटलेले आढळतील, त्याच्याच शेजारीं एखाद्या बागडणाऱ्या बालकाचें सौंदर्य टिपलेले आढळेल. हें नीट साधावें म्हणून सुंदर आणि भयानक दृश्यांच्या शोधांत तो भटकत राही. मरणोन्मख वृद्धांच्या आणि फांशी जाणाऱ्या गुन्हेगारांच्या मुखांवरील भाव न्याहाळण्यासाठीं तो दवाखाने आणि तुरुंग यांना भेट देई. मातेच्या स्तनांना लुचणारें, भुकेनें व्याकूळ झालेलें अर्भक पहायला मिळावें म्हणून तो रस्त्यांतून उघडपणें फिरत असे तर देवानें घडवलेल्या शरिराच्या रचनेचें अचूक व संपूर्ण आकलन व्हावें म्हणून चोरून शवविच्छेदन करीत असे. कारण त्या काळीं या गोष्टीस समाजाची मान्यता नव्हती.

शारीरशास्त्राइतका दुसऱ्या कसल्याच अभ्यासांत त्यानें वेळ व्यतीत केला नाहीं. आपल्या स्नायूंमध्यें तरफेची योजना आहे, आपला डोळा हा एक भिंग आहे आपलें हृदय हा एक प्रकारचा पंप असून छातीचे ठोके आणि नाडीचे ठोके यांत एक संगति आहे. या सर्व गोष्टी प्रथम त्यानेंच सिद्ध केल्या. तसेंच हृदयाचें आंकुचन होण्याची क्रिया दुसऱ्या नियंत्रक स्नायूबंधांवर–Moderator Bands–अवलंबून असते आणि वृद्धपणीं येणाऱ्या मृत्यूचें कारण पुष्कळदां धमन्या टणक होत जातात हें होय, हे शोधहि त्याच्या प्रदीर्घ अभ्यासाचेंच फळ होत.

त्या काळीं मिलान येथील राजवटीचीं सगळीं सूत्रें लुडोव्हिको स्फोर्झा या ड्यूकच्या हातीं होतीं. त्याच्याकडे नोकरी मागण्यासाठीं लेनार्डोनें जें पत्र लिहिलें आहे त्यांत आपण काय काय करूं शकतो ह्याची त्यानें जंत्रीच दिली आहे. "शत्रूचा पाठलाग करतांना मध्यें एखादा ओढा लागला तर तो ओलांडून जातां यावें म्हणून, स्वारींत बरोबर वाळगतां येण्याजोगा एक सुटसुटीत पूल आपण तयार केला आहे, ज्या किल्ल्याचा पाडाव करायचा असेल त्याच्या भोंवतालच्या खंदकांतलें पाणी उपसून काढूं शकेल असा एक पंपहि आपण बनवला आहे, आपल्या किल्ल्यावर शत्रूनें चढाई करूं नये म्हणून त्यांनीं

* * * * * *

किल्ल्याला लावलेल्या शिड्या पाडून टाकण्याइतकी बलवान् तरफ आपल्या जवळ आहे, आपल्याला मोठमोठ्या तोफा ओततां येतात आणि पायदळाचा मार्ग मोकळा करून देण्यासाठीं स्वयंचलित रणगाडे बनविण्याची योजनाहि आपल्याजवळ तयार आहे." अशा नाना गोष्टी त्या पत्रांत त्यानें लिहिल्या होत्या. वास्तविक फ्लॉरेन्सच्या लोरेन्झो द मेडिसी यानें त्याला ड्यूककडे देण्यासाठीं जें शिफारस पत्र दिलें होतें त्यांत लेनार्डो हा निष्णात तंतुवाद्यपटु होता असें लिहिलें होतें पण घातकी आणि क्रूर स्फोर्झाला लेनार्डोनें लिहिलेले इतर गुणच जास्त आवडले असावेत. त्यानें त्याला पदरीं ठेवून घेतलें एवढें मात्र खरें.

त्याच्या टिपण वह्या जर आपण वाचल्या तर नुकत्याच झालेल्या दुसऱ्या महायुद्धांत भाग घेण्याइतकी त्याची युद्धशास्त्रांत तयारी झाली असल्याचें दिसतें. म्हणजे संशोधनाच्या दृष्टीनें पाहतां तो चार शतकें तरी आधीं जन्मला होता असें म्हटलें पाहिजे. एकूण ३३ बार करणारी तोफ त्याला ओततां येत होती. तींतून एका वेळीं अकरा गोळे सुटत. वेगवेगळ्या प्रकारच्या मशीनगन्स आणि तोफगोळे यांचे आराखड त्यानें तयार केले होते. पूर्व संकेताप्रमाणें उडणारे बॉम्ब-गोळे, हातगोळे, धूरगोळे आणि धूररक्षक मुखवटे त्यानें बनवले होते. गोलंदाजांना रणांगणावर तोफा टेकवतां याव्यात आणि हव्या त्या दिशेला व पाहिजे त्या कोनांत त्या रोखतां याव्यात यासाठीं अत्यंत सोईस्कर आणि बरोबर न्यायलाहि सुटसुटीत असे घोडे तयार करून त्यांना चाकेंहि लावलीं होतीं

पण तो जेव्हां फ्लॉरेन्स सोडून मिलानला आला तेव्हां त्याच्या लक्षांत आलें कीं, फ्लॉरेन्सचें प्रसन्न हवामान तर तिथें नव्हतेंच पण त्याच्या अष्टविधा ज्ञानाचाहि तिथें उपयोग नव्हता. डचेस्च्या स्नानगृहाची व्यवस्था बघणें, तिच्या आश्रयाखालीं होणाऱ्या नाटकांचे पडदे रंगवून देणें आणि त्या नाटकांसाठीं नव्या नव्या फॅशन्सचे पोशाख बेतून देणें,

★ ★ ★

तसेंच ड्यूकच्या गर्विष्ठ पण आंबलेल्या चेहेऱ्याच्या रखेलीची ऐटबाज पोषाखांतलीं चित्रें रंगविणें असलें हरहुन्नरी काम त्याच्या वांट्यास आलें होतें. अर्थात् या कामाबरोबरच मिलान शहराच्या पाणी पुर-वठ्याची योजना आंखून ती त्यानें कार्यवाहींत आणली. त्याखेरीज तें शहर अधिक सुंदर दिसावें म्हणून रस्तेरुंदीच्या आणि वेगवेगळ्या वाहतुकीसाठीं स्वतंत्र रस्ते करण्याच्या त्यानें आंखलेल्या योजना मात्र कागदावरच राहिल्या. कारण, त्याची रवानगी आल्प्स पर्वताकडे करून तिथल्या दऱ्याखोऱ्यांच्या संरक्षण योजनेची तरतूद करण्याचें काम तज्ज्ञ म्हणून त्याच्यावर सोंपविण्यांत आलें. कारण, उत्तरेकडून मिलान-वर स्वारी होण्याचा धोका वाढत होता. ह्या निमित्तानें स्वित्झर्लंड-मधील एन्गडाईन या सुंदर खोऱ्यांत त्याचा प्रवेश झाला. आल्प्स पर्वतावरील हवा त्याला फारच मानवली. तिथले डोंगर कड्यांवरून कोसळणारे जलप्रपात त्यानें पुनः पुन्हा पाहिले आणि तिथल्या डोंगर-कपारींत उगवणारीं नाना प्रकारचीं सुंदर फुलें आणि पिसासारखीं पानें असलेलीं झुडुपें त्याला दिसलीं तीं अलगद उचलून त्यांचें सौंदर्य आपल्या कलावंताच्या दृष्टीनें त्यानें टिपून घेतलें आणि पुढें तीं पुन्हा कॅनव्हासवर अशीं सुंदर रेखाटलीं कीं तीं चिरंजीव झालीं बालपणीं तो असाच डोंगरदऱ्यांतून खूप हिंडला होता. त्या अनुभवांत या भ्रमंतीनें भरच पडली आणि याच अनुभूतीच्या जोरावर ' दि व्हर्जिन ऑफ दि रॉक्स ' या अपूर्व चित्राची वनश्रीनें बहरलेली पाश्वभूमि त्याला याथ-तथ्य रेखाटतां आली. या कलापूर्ण पार्श्वभूमीमुळेंच या चित्रांतील कुमारी माता, बाल येशू आणि त्याचा सवंगडी सेन्ट जॉन या त्रिमूर्तींचें पावित्र्य पहाणाराच्या मनावर ठसतें.

या चित्राचें काम लेनार्डोस मिलानमधील एका धार्मिक संघ-टनेनें दिलें होतें आणि त्याचा मोबदला अवघे वीस डकेट्स (त्या काळचें एक चांदीचें नाणें) मिळणार होता. चित्र पुरें झाल्यानंतर शंभर डकेट्सपेक्षां कमी किंमतीला तें विकायला तो तयार होईना.

★ ★ ★ ★ ★ ★

त्याचें गिऱ्हाईक कराराच्या रकमेपेक्षां जास्त देईना. शेवटी ती तक्रार कोर्टात गेली व लेनार्डोस त्यासाठीं वीस वर्षे झगडावें लागलें. अखेरीस फ्रान्सच्या राजानें तें चित्र विकत घेतलें आणि पॅरीसमधील आपल्या राजवाड्यांत लावलें. लेनार्डोनें आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें त्या चित्राची एक प्रतिकृति तयार केली व त्या धर्ममंडळाला दिली. तीच आज लंडन येथें नॅशनल गॅलरींत लावली आहे.

आपल्या बारा पट्टशिष्यांसमवेत येशूख्रिस्त भोजन घेत आहे या बायबल मधील प्रसंगाचें चित्र लेनार्डोनें एका मठांतील भोजन-गृहाच्या भिंतीवर चित्रित केलें होतें. त्या चित्रांतला येशूख्रिस्त दु:खी दिसला तरी धीरगंभीरपणें बसला आहे आणि त्याच्या इतक्याच दु:खित मनानें त्याचे शिष्योत्तम बसलेले दिसत आहेत. "तुमच्या-पैकींच एकाच्या हातून माझा घात होणार आहे" अशी भविष्यवाणी तो सांगतो आणि त्याच्या शिष्यांपैकीं प्रत्येकजण "तो मी तर नव्हे ना?" असें विचारतो आहे. त्या चित्रांत वापरलेल्या रंगासाठीं ती भिंत अगदीं योग्य नव्हती. वीस वर्षांत तें चित्र बरेंचसें आपोआपच खराब झालें. आणि उरलेल्याची वाताहत इतरांनीं केली. मग तें चित्र राहिलें तरी कसें? तर त्या चित्राच्या तें रसरशीत असतांनाच इतर चित्रकारांनीं प्रतिकृती केल्या होत्या आणि खुद्द लेनार्डोची सुरुवा-तीचीं रेखाटनें (Sketches) शिल्लक राहिलीं आहेत म्हणूनच त्या अत्युत्कृष्ट कलाकृतीची आठवण तरी उरली आहे.

लेनार्डोच्या हातून फारच थोडी चित्रें पूर्णावस्थेप्रत गेलीं. त्यांतलीं बरीचशी कालौघात नष्टच झालीं आहेत. पण सराव म्हणून त्यानें केलेलीं रेखाटनें मात्र हजारोंनीं आहेत. प्राथमिक तयारी पुरी झाल्या-नंतर तो चित्र रंगवावयास बसे तेव्हां मात्र तो दिवसचे दिवस न खातांपितां काम करीत असे. मधेंच कांहीं दिवस तो तासनतास त्या चित्राकडे नुसता पहात बसे आणि साऱ्या दिवसांत अवघे दोन-तीन रंगाचे फटकारे त्याच्याकडून दिले जात. आपलें कुठलेंहि चित्र पूर्ण झालें

* * *

आहे असें त्याला कधीं वाटलेंच नसावें. म्हणूनच त्याच्या चित्राखालीं त्याची स्वाक्षरी क्वचितच आढळते.

आणि एकीकडे एवढीं अप्रतिम चित्रें रंगवीत असतांना त्याच्या डोक्यांत मात्र विज्ञानाच्या प्रगतीबद्दल विचार चालू असत. त्याच्या या स्वप्नरंजनाला आकाशाची उंची किंवा सागराची खोली यांनींहि मर्यादा पडत नसत. कारण केव्हांना केव्हां मनुष्यप्राणी आपल्या कल्पना कृतींत उतरवीलच याची त्याला खात्री वाटत असावी.

त्याला आकाशांत उडायचें होतें; त्यासाठीं त्यानें वातावरणाचा आणि पक्षी कसे उडतात त्याचा अभ्यास केला. पक्षांचे पंख अगदीं सपाट नसतात, त्यांना पन्हळ असते, त्यामुळें ते सरळ उंच चढतात असें त्याला आढळून आलें. कागदाचे नमुने तयार करून त्यानें ते हवेंत सोडून त्यांचा अभ्यास केला तेव्हां त्यांच्या शेपट्या आणि गळून पडणारीं पानें गरगरा फिरतात असें त्याला आढळून आलें. कल्पनेंतील या विमानाचा अगदीं प्रारंभींचा आराखडा त्यानें तयार केला. त्यांत पंख फडफडायला हवेत म्हणून कातड्याचे वेगवेगळे भाग एकत्र शिवून विमान करावयाचें व वैमानिकानें आंत पालथें निजून विमानाचे पंख हलवावयाची योजना होती.

त्यानंतर त्याला स्वयंचलित यंत्राला गति देणाऱ्या पंख्याची कल्पना सुचली. या कल्पनेचा जनक तोच. त्यानें एक नमुना तयार केला त्यांत हा पंखा जमिनीशीं समांतर राहून आडवा हालत असे. वैमानिकानें आंत बसून पायानें तें यंत्र सुरू करावयाचें म्हणजे त्याच्या डोक्यावरचा पंखा फिरूं लागेल व तें हेलिकॉप्टरवर उडेल अशी त्याची कल्पना. नंतर त्यानें एक पुठ्ठ्याचें आकाशयान बनविलें. त्यांत त्यानें एक घट्ट स्प्रिंग बसविली. ती जसजशी उलगडत जाईल तसतशी पंख्याच्या हातांना गति मिळावयाची योजना त्यांत होती. या आकाशयानाला उड्डाणापूर्वीं गति येण्यासाठीं धावायचा पट्टा नको होता कीं अनुकूल वाऱ्याची गरज नव्हती. तें एकदम उड्डाण करणार होतें. हलक्या

★ ★ ★ ★ ★ ★

जळणाचें एंजिन त्या काळीं माहीत नव्हतें म्हणून बिचाऱ्या व्हिन्चीची हेलीकॉप्टरची कल्पना मूर्तरूप धारण करूं शकली नाहीं.

तरीपण त्यानें उड्डाणाचा एक प्रत्यक्ष प्रयोग केलाच. त्यासाठीं त्यानें बनवलेलें आकाशयान कसें होतें हें सांगणें अवघड आहे. कारण त्याबाबत त्यानें फारच गुप्तता राखली होती. पण बहुधा तें ग्लायडर असावें. खूप काळजी घेऊन त्यानें तें एका उंच इमारतीवरच तयार केलें आणि त्यांत स्वत: बसून उडी घेतली येवढी माहिती मिळते. पण त्यांत त्याला अपयश आलें आणि नंतर त्यानें फिरून प्रयत्न केल्याची कुठें नोंद नाहीं. हेंहि सुदैवच म्हटलें पाहिजे. कारण, त्यांत कदाचित् त्याचा प्राण गमावला असता किंवा त्याचा बहुमोल वेळ फुकट गेला असता, विमानाचा शोध लागला नसता तो नसतानाच. कारण त्याकाळीं त्या शोधाला जरूर असणारी वैज्ञानिक प्रगति झालेली नव्हती. पण या अपयशांतूनच एक उपयुक्त शोध सहजगत्या लागला तो म्हणजे हवाई छत्रीचा (पॅराशूट). तिचा यशस्वी प्रयोग नंतर थोड्या कालावधीनें झाला एवढेंच.

लेनार्डोचे शोध अपरिमित आहेत. जमिनीला भोंक पाडायचें यंत्र त्यानें तयार केलें, सुटी करून हलवतां येण्याजोगीं हलकीं घरें बनवलीं, स्क्रू तयार करणारें यंत्र, जमीन सपाट करणारा बुल्डोझर, सिमेंटची यांत्रिक घाणी, सूत काढणारें यंत्र अशा कितीतरी गोष्टींचें त्यानें शोध लावले. गणितांत आलेखाची पद्धति त्यानें शोधली. शस्त्रसज्ज लढाऊ जहाजांची कल्पना प्रथम त्यानेंच काढली. वाफेच्या शक्तीचा उपयोग करावा ही कल्पना त्याचीच. दिशा दाखवणारा कंपास त्यानेंच बनवला. असेच आणखी अनेक शोध त्यानें लावले. तेच आज अधिक सुधारणा करून उपयोगांत आणले जात आहेत.

अथांग सागराविषयींहि त्याला विलक्षण आकर्षण वाटे. समुद्रांत सुरक्षितपणें खोल बुडी मारतां यावी म्हणून त्यानें 'डायव्हिंग बेल' नांवाचें उपकरण बनवलें आणि बिनधोक तरतां यावें म्हणूनहि एक

* * *

जीवरक्षक साधन तयार केलें. एवढेंच नव्हे तर त्यानें पाणबुड्या तयार करण्याच्याहि योजना आंखल्या. पण जेव्हां माणसें त्यांचा दुरुपयोग करून समुद्राच्या तळाशी एकमेकांचे गळे कापतील—कारण मनुष्य-स्वभावांत दुष्टपणाचा फार मोठा अंश आहे. असें तो म्हणे— म्हणून त्यानें त्या योजनांचें आराखडे स्वतःच्या हातानेंच नष्ट केले.

न्यूटनच्या कितीतरी आधीं त्यानें गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत प्रतिपादन केला. वनस्पती किंवा प्राणी यांचे अगदीं पुरातन अवशेष खडकावर सांपडतात. त्यांच्याविषयीं बरेच अपसमज होते. महापुरानें कांठावर फेकलेले प्राण्यांचे अवशेष किंवा एखाद्या सहलीनंतर उरलेल्या पदार्थांच्या त्या खाणाखुणा असाव्यात अशी फॉसिलबद्दल कल्पना होती. पण लेनार्डोनें दाखवून दिलें कीं, फॉसिल नामक हे अवशेष म्हणजे समुद्राच्या तळाशीं रहात असलेल्या आणि कालौघांत नष्ट झालेल्या प्राण्यांच्या खुणा आहेत. त्याकाळीं आजचे हे खडक समुद्राचा पृष्ठभाग असले पाहिजेत. भूगर्भशास्त्राच्या अभ्यासामुळें त्याचें असें मत झालें होतें कीं, आर्नो नदीकांठचें खोरें, जें तिच्या पुरामुळें वाहून आलल्या मातीनें तयार झालें तें व्हायलासुद्धां दोन लाख वर्षे लागलीं असणार ! मग बायबलच्या मताप्रमाणें 'हें जग' केवळ पांच हजार वर्षांपूर्वीं अस्तित्वांत आलें हें खरें कसें असणें शक्य आहे !

त्याचें सुदैव म्हणूनच त्या काळच्या इन्क्विझिशन नामक छळवादी न्यायासनाला त्याच्या ह्या टिपण वह्या सांपडल्या नाहींत. कारण, त्याच्यामागून एक शतकानें आलेल्या गॅलिलिओस त्याच्या शास्त्रीय अतएव पाखंडी मताबद्दल छळ सोसायची वेळ आली होती. आणि लेनार्डोच्या टिपणवह्यांत गॅलिलिओचीं मतेंच मांडलीं होतीं. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते, सूर्य हा विश्वाचा केंद्रबिंदू आहे आणि पृथ्वी हा सूर्यमंडळांतला एक लहानसा ग्रह आहे, येथून दिसणारे तारे हें पृथ्वीपेक्षां कितीतरी प्रचंड आहेत वगैरे वगैरे.

इंद्रधनुष्य आणि ध्वनिप्रतिध्वनि या विषयींहि त्यानें विचार

* * * * * *

केलेला आढळतो. सूर्याचा किरण हा सात रंगांचा वर्णपट आहे हें त्यानें दाखवून दिलें आणि प्रकाश व ध्वनि यांच्या लाटा असतात हा सिद्धांत मांडला. प्रकाशकिरण वांकतात तसेंच गोफणीप्रमाणे फिरणाऱ्या वस्तूचा कल बाहेर पडण्याकडे असतो हें त्यानें दाखवून दिलें. स्फोटक बॉम्बगोळे आणि अणुविज्ञान या विषयींहि त्यानें अनुमानें बांधलीं होतीं. या साऱ्या वैज्ञानिक प्रगतीमुळें काय घडेल हेंहि त्याला आधींच समजलें होतें. तो लिहितो :

" भूगर्भांतून अशी शक्ति बाहेर पडेल कीं तिच्या आवाजानें जवळपासचे सगळे मानव स्तिमित होतील. आणि शक्तीच्या नुसत्या उच्छ्वासानेंदेखील माणसें मृत होऊन खालीं कोसळतील. शहरें आणि किल्लेसुद्धां बेचिराख होतील. आकाशांत विनाशक वडवानळ निर्माण झालेला माणसांना दिसेल आणि पाहतां पाहतां त्याच्या ज्वाळा खालीं येऊन भिडतील. सूर्यकिरणांनीं त्यांच्या खालचें जग पेटून निघेल. आपण स्वतःच जें जें निर्माण केलें त्यांचा विनाश पाहतांना माणसांना एक प्रकारचा आसुरी आनंद होईल. "

असा हा अष्टपैलू प्रतिभेचा थोर पुरुष लवकर थकला असला तर नवल खास नाहीं आणि त्यानेंच इ. स. १५१० च्या सुमारास काढलेल्या स्वतःच्या तसबिरींत तो तसा दिसतोहि. वयाच्या ५८ व्या वर्षींच तो जराजर्जर दिसत होता. तो गंभीर आणि आदरणीय दिसत असला तरी श्रांत आणि कांहींसा निराश झालेलाहि दिसतो. इतक्या विविधप्रकारचें जें जीवन त्यानें व्यतीत केलें होतें त्यानें त्याची देहयष्टि करपून गेलेली त्या तसबिरींत दिसते.

फ्रेंचांनीं मिलानवर स्वारी करून स्फोर्झाच्या ड्यूकला बाहेर पिटाळून लावलें. तेव्हां लेनार्डोलाहि पळ काढावा लागला. मांटुआ, व्हेनिस, रोम, पार्मा, फ्लॉरेन्स आणि पुन्हा मिलान अशी त्याला भ्रमंति करावी लागली. शेवटचीं कांहीं वर्षें ड्यूकनें त्याचा पगार दिला नव्हता तेव्हांपासून दारिद्र्य त्याचे मागें लागलें होतें. आतां

* * *

तर तो पुरताच दरिद्री झाला होता. होतें नव्हतें तें किडूकमिडूक मोडून खाणें आणि मिळतील तीं लहान मोठीं बरीवाईट कामें पत्करून थोडीशी कमाई करणें एवढेंच फक्त त्याला शक्य झालें

फ्लॉरेन्स येथील लिसा गेरार्डिनी नांवाच्या स्त्रीची तसबीर काढण्याचें अशापैकींच एक काम त्याला मिळालें. ही स्त्री चांगली श्रीमंत व सुसंस्कृत असूनहि तिच्या चित्रांत मात्र तिच्या अंगावर काळा पोषाख चढवला आहे आणि तिच्या अंगाखांद्यावर एकहि दागिना नाहीं. तिचें लहान मूल नुकतेंच मृत झालें होतें म्हणून तिनें हा शोकनिदर्शक वेश केला होता. तिला समोर बसवून हें चित्र काढावयास त्यानें सुरुवात केली तेव्हां तिचें वय एकवीस वर्षांचें होतें आणि चित्राचें काम सहा वर्षें चालू होतें. तरीसुद्धां त्यानें तिचा पोषाख किंवा चित्तवृत्ति उदास करणारी दुःखद पार्श्वभूमि बदलली नाहीं, मोना लिसा म्हणून विख्यात असलेलें चित्र तें हेंच. ही मोना लिसा एखाद्या साक्षात् व्यक्तीची प्रतिकृति आहे म्हणण्यापेक्षां व्हिन्चीचें एक दिवास्वप्नच त्यानें साकार केलें आहे असें म्हणणें उचित ठरेल. चित्रांतलीं मोना लिसा तुमच्या उजव्या खांद्याच्या मागें असलेल्या एखाद्या दृश्याकडे पाहून स्मित करीत आहे असें तुम्हांला वाटून तुम्ही चटकन् जरी मागें वळून बघितलें तरी तुमची फसगत होईल. कारण तुम्हाला तेथें कांहींच दिसणार नाहीं. आपल्याला तिचें तें चकवा लावणारें स्मितच फक्त दिसूं शकतें.

घोटाळ्यांत पाडणारी पुढची गोष्ट म्हणजे तें चित्र त्यानें त्या स्त्रीला किंवा तिच्या नवऱ्याला कधींच दिलें नाहीं. फ्रान्सचा तरुण राजा फ्रान्सिस यानें त्याला आपल्या दरबारांत आमंत्रण दिलें तेव्हां तो तें चित्र घेऊनच फ्रान्समध्यें रहावयास गेला. फ्रान्सिसनें तें चित्र बारा सहस्र फ्रॅन्क्सना विकत घेऊन लीव्हर राजवाड्यांत त्याची प्रतिष्ठापना केली. त्या ठिकाणीं तें चित्र २१ ऑगस्ट १९११ या दिवशीं सकाळीं ८ पर्यंत होतें. पण नंतर तें तेथून एकदम चोरीस गेलें.

* * * * * *

तेव्हां अशी भूमका उठली कीं, कित्येक वर्षांपूर्वी या जगांतून गेलेल्या त्या चित्रांतील सुंदरीच्या त्या विलक्षण स्मितानें कुणाला तरी भुरळ पडून कुणा चोराचें तिच्यावर प्रेम जडलें आणि त्यानें तें लांबवलें. पण नंतर दोनच वर्षांनीं तो चित्रचोर तें चित्र कांखोटीस घेऊन इटलींतील एका चित्राच्या दुकानांत शिरला आणि तेथेंच पकडला गेला. तेव्हां त्या चोरानें जाहीर केलें कीं, आपण एक इटालियन देशभक्त असून हें मूळचें इटलींतील चित्र स्वगृहीं परत यावें म्हणूनच चोरून नेलें होतें.

फ्रान्समध्यें अँबाईस या गांवीं व्हिन्चीचे अखेरचे दिवस सुखासमाधानांत गेले. त्याच्या हातांना पक्षघाताचा विकार जडला होता. म्हणून त्याला भेटायला येणारे लोक तिकडे पहायचे टाळत असत. पण त्याची बुद्धि मात्र नेहमीं इतकीच तल्लख होती. एका प्रचंड कालव्याची योजना त्याच्या डोक्यांत शिजत होती आणि त्यांत तो पूर्णपणें रंगून गेला होता. त्या संबंधींच्या बारीकसारीक शेकडों कल्पना त्यानें आपल्या टिपणवहींत नोंदून ठेवल्या होत्या. त्याचें संभाषणचातुर्य सुतराम् कमी झालेलें नव्हतें, त्याचें व्यक्तिमत्त्व तसेंच प्रभावी होतें आणि त्याच्या मुखावरील हास्य त्याच्या तीव्र बुद्धिमत्तेची ग्वाही देत होतें. गूढरम्यता आणि शहाणपण या दोन्हीच्या संयोगापासून उत्पन्न झालेला प्रकाश म्हणजेच जणू त्याचें स्मित होतें. अखेरीस २ मे १५१९ या दिवशीं मृत्यु त्याला भेटायला आला तेव्हां त्यानेंच त्याचें स्मित हिरावून नेलें.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक .....
मराठी ग्रंथ संग्रहालय